एकूण एकहजार एकूणहत्तर स्वार पाठविले आहेत, यापैकीं कांहीं गणत्या येथें जाल्या आहेत, व कांहीं होणें आहेत, त्या तुम्हीं तेथें घेणें; याचे रोजमरे आठवडे व दुमाहीच्या दप्तरच्या यादी दाखल्याच्या व गणत्या अलाहिदा पाठविल्या आहेत, त्याप्रमाणें गणतीचे तेरखापासून रोजमरे देत जाणें, व पागाची घोडीं वगैरे यांची पाहाणी करून चंदी वगैरे शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन. सनद १. रसानगी नारो शिवराम कारकून.

१ राजकीय

(ब) इतर माहिती

१ सातारकर महाराज.

३७ (८४) दिंमत हुजुरात धननीकडे सरंजाम सालमजकुरापासून. रसानगी यादी.

अर्बा सबैन मया व अलफ रबिलाखर. २३

रुपये.

८०९१॥= श्रीमंत महाराज सौ० वती मातुश्री बाईसाहेब वाडा पहिला यांजकडे.

---

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to:--

(1) SATTARA RAJA.

(37) A saranjam worth Rupees 5000 was given to each of the two wives of the Sattara Raja; and a saranjam worth Rupees 3000 to each of their two daughters, Ranubai Nimbalkar, and Santubái Mahádik.

A. D. 1773-74

८००० बरहुकुम यादी मखलासीची.

५००० धननीकडे.

३००० कन्या सौ० वती राणूबाई निंबाळकर याजकडे.

८०००

९१॥= जाजती.

८०९१॥=

सरंजाम प्रांत वाई पैकीं लावून दिलेला आहे.

८०८१। श्रीमंत महाराज सौभाग्यवती मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा नेमणूक.

रुपये.

५००० धनिनीकडे.

३००० सौ० वती संतूबाई माहाडीक यांस.

८०००

८१। जाजती.

८०८१।

सरंजाम प्रांत वाई कराड पैकीं वगैरे लाऊन दिलेला आहे. येविशीं सनदा.

५ मामलेदारास कीं गांव व जमीन तुह्मांकडून दूर करून सालमजकुरापासून याजकडे दिल्हा असे, तरी याजकडील कमाविसदाराचे स्वाधीन करणें, ते अंमल करतील. तुह्मीं कोणेविशीं उपद्रव न करणें बोभाट येऊं न देणें ह्मणोन.

१ हैबतराव भवानीशंकर याजकडील प्रांत वाई पैकीं गांव व सेरीमा.

१ श्रीमंत महाराज सौ० वती मातुश्री बाईसाहेब वाडा पहिला यांजकडे कजबे निंब संमत मजकूर.

२ श्रीमंत महाराज सौ० वती मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा यांजकडे.

१ मौजे खेड तालुके वंदन.

१ मौजे भोसें संमत कोरेगांव येथील सेरी, बद्दल देवाजी कृष्ण, बिघे ६.

१ सेरी मौजे कुमठे संमत कोरेगांव, बद्दल देवाजी कृष्ण, जमीन बिघे २२ बेवीस.

५ श्रीमंत महाराज राजश्री स्वामीच्या कन्या.

४ सौ० वती राणूबाई निंबाळकर वाडा पहिला.

१ मौजे साप तालुके सातारा.

१ मौजे निनाम तालुके सातारा.

२ तर्फ वाटेगांव.

१ मौजे कोटदोसी.

१ मौजे खैरासी.

२

४

१ सौ० वती संतूबाई महाडीक निजबत वाडा दुसरा यांजकडे मौजे वेंचलें.

५

९

एकूण नऊ पैकीं मौजे अटगांव व येकसेरी यांचे स्वाधीन करणें ह्मणोन. सनद.

१ बाबाजी महादेव याजकडील प्रांत कराड पैकीं गांव.

१ श्रीमंत महाराज सौभाग्यवती मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा यांजकडे मौजे येराळें.

१ श्रीमंत महाराज राजश्री स्वामीची कन्या सौ० वती संतूबाई महाडीक यांजकडे मौजे नागझरी.

२

दोन गांव याजकडील कमाविसदारांचे स्वाधीन करणें म्हणोन, मशारनिल्हे यास. सनद.

१ भगवंत शिवराम यांस कीं मौजे निनाम तर्फ सातारा प्रांत वाई येथील बाग, महाराज राजश्री स्वामी यांची कन्या सौ० वती राणूबाई निंबाळकर यांजकडे दिल्हा असे, तरी कमाविसदारांचे स्वाधीन करणें म्हणोन. सनद.

२ कृष्णराव अनंत याचे नांवें.

१ मौजे निनाम तर्फ सातारा प्रांत वाई येथील बाग सरकारांत आहे, तो श्रीमंत महाराज राजश्री स्वामीची कन्या सौ० वती राणूबाई निंबाळकर यांजकडे दिल्हा असे, तरी याजकडील कमाविसदारांचे स्वाधीन करणें म्हणोन.

१ मौजे भोसें संमत कोरेगांव प्रांत वाई येथील खंडाबाबत जमिनीचे शंभर रुपये साताऱ्याचे नेमणुकेंत आहेत, ते सालमजकुरापासून श्रीमंत सौ० वती मातुश्री बाईसाहेब वाडा दुसरा यांजकडे देवविले असेत, तरी देणें म्हणोन.

———

२

———

५ पांच सनदा मामलेदाराचे नांवें.

९ मोकदम देहाय यांस कीं, त्याजकडील कमाविसदारासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन. पत्रें.

७ प्रांत वाई.

१ कजबे निंब संमत मजकूर.

२ संमत कोरेगांव.

१ मौजे साप.

१ मौजे भोसें.

———

२

२ तर्फ सातारा.

१ मौजे निनाम.

१ मौजे वेंचलें.

———

२

१ मौजे खेड तर्फ वंदन.

२ तर्फ आटेगांव.

१ मौजे कोटरोसी.

१ मौजे खैरासी.

———

२

———

८

पैकीं कजबे निंब येथील सनद पेशजीं दिली ते बार जाली आहे, सबब एक
[वजा] बाकी ७.
२ प्रांत कराड.
१ मौजे येराळें.
१ मौजे नागझरी.

———
२

———
९

———
१४

चवदा सनदा, रसानगी यादी, व गांवाची नेमणूक. परवानगी रूबरू.

३८–(३०२) वेदमूर्ति रघुनाथभट बिन विठ्ठलभट उपनाम वैद्य यांणीं हुजूर किल्ले पुरंधर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, कैलासवासी राजाराम महाराज यांचें वृंदावन किल्ले सिंहगड येथें आहे, त्यांत आईसाहेब यांणीं बाणाची स्थापना करून त्याची पूजा वेदमूर्ति मोरेश्वरभट बिन नीळकंठभट उपनाम पळसकर पुराणीक दिंमत हुजुरात यास सांगोन, मौजे आंगलंबे तर्फ कर्यात मावळ हा गांव वृंदावनाकडे दरोबस्त इनाम आहे, त्यापैकीं मोईन सालीना बरहुकूम सनद. छ. ९ रबिलावल, सन खमस खमसेन.

सबा सबैन मया व अलफ जमादिलावल २६

५० श्रीस नैवेद्यास.
१५० भटजीस वेतन.
———
२००

दोनशें रुपये करार करून दिल्हे, त्यापासून भटजीनीं आह्मांस आईसाहेबांचे समक्ष नेहेमीं पूजेचें काम सांगितलें, त्यापासून आम्हीं पूजा करून दोनशें रुपये नेमणूकप्रमाणें सन सितेन पावेतों घेत आलों. सन सलास सितेनांत हुजुरून विसाजी केशव यांस देखरेख सांगितली, त्यांणीं सन सबा सितेनापासून मोईनपैकीं सवाशें रुपये कमी करून पाऊणशें रुपयेप्रमाणें देत आले, त्यास किल्यावरील वस्ती, नेहेमीं वर असावें लागतें, त्याचे कालक्षेप चालत नाहीं, कमी जाहल्यामुळें बह्मस्वही बहुत जाहलें, याजकरतां स्वामींनीं कृपाळु होऊन मशारनिल्हे

(38) There was a monument raised at fort Sinhgar in memory of Rájárám Máharáj. A grant previously made by Ayisáheb for the worship of a deity placed there was continued.

A. D. 1776-77.

यांणीं सन सबा सितेनापासून सन सीत सबैन पावेतों दरसाल सवाशें रुपये प्रमाणें बाकी राहिली आहे, ते झाडून देविले पाहिजे ह्मणोन; त्यावरून हे सनद सादर केली असे, तरी पेशजीं दोनशें रुपये मोईन भटजीस होती, त्यापैकीं तुह्मीं सन सबा सितेनांत रुपये १२५ सवाशें कमी केले होते, ते सन इसन्ने सबैनापासून करार करून दिल्हे असत, तरी पेशजींप्रमाणें दोनशें रुपये साल दरसाल गांवपैकीं देत जाणें, व सन इसन्ने सबैनापासून दरसाल सवाशें रुपये प्रमाणें सालगुदस्तां सन सीत सबैन पावेतों बाकी राहिली आहे, ते झाडून देणें, व साल मजकुरापासून नैवेद्य मुशाहिरे वगैरे खर्च पेशजींपासून चालत असेल, त्याप्रमाणें ज्याचे त्यास देऊन बाकी गांवचा ऐवज राहील, त्याची समाराधना करीत जाणें ह्मणोन, विसाजी केशव याचे नांवें.

सनद १.

रसानगी याद.

३९-(५०१) यवतेश्वर येथील डोंगराचा नळ पाण्याचा सातारियास राजवाड्यांत येत आहे, तो जागा जागा जाया जाला आहे, त्याचे दागदोजीस दोन तीन हजार रुपये लागतील, ते सरकारांत विनंति करून घ्यावे ह्मणोन, तुह्मीं सदाशिव अनंत यास पत्र लिहिलें, त्याजवरून त्यांणीं सरकारांत विनंति केली, त्यास इतका ऐवज द्यावयाची सोय नाहीं, अगत्या आगत्य पाहून, नळाची मरामत करण्याबद्दल रुपये ८०० आठशें पर्यंत लाऊन, नळ नीट करणें ह्मणोन, कृष्णराव अनंत याचे नांवें.

समान सबैन
मया व अलफ
रमजान २२

सनद १.

परवानगी रूबरू.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

४०-(९०८) श्रीमंत महाराज राजश्री स्वामी यांचे पुत्रास दांडपट्टा वगैरे शिकण्याबद्दल निंबाजी बिन तुकाजी पवार पहिलवान प्यादा दिंमत रामजी यादव यास पाठविलें आहे, त्यास रोजमरा दुमाही रुपये १२ बारा रुपये रोजमरा देविला असे, तरी छ. ५ साबानचा रोजमरा हुजूर पावला आहे, पुढें तारीख भरल्यावर सदरहूप्रमाणें रोजमरा दुमाहीचा दुमाही चाकरी घेऊन किल्ले सातारापैकीं देत जाणें ह्मणोन. बाबूराव कृष्ण याचे नांवें. छ. ८ साबान.

समान सबैन
मया व अलफ
सवाल ३०

सनद १.

रसानगी यादी.

---

(39) An aqueduct conveying water from Yevateshwar hill to the palace in Satara, being out of repair, sanction of Rs. 800 was given for repairing it.

A. D. 1777-78.

(40) Nimbáji bin Tukáji Pawár was sent to Satara on a salary of Rs. 12 every two months for training the Rája's son in the use of the sword.

A. D. 1777-78.

४१–(५९९) श्रीमंत महाराज कैलासवासी राजाराम साहेब यांची समाध सिंहगडीं आहे, तिजवरील बाण पूर्वीं सरकारांत आणला होता, तो हल्लीं तुम्हांकडे पाठविला आहे, तर पूर्ववतप्रमाणें बाण समाधीवर ठेवणें म्हणोन, नारो महादेव याचे नांवें. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर ३

परवानगी रूबरू.

४२–(६०७) श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचें लग्न व्हावयाचें, याजकरतां येथून बळवंतराव मुढे पागा, व पथक सुद्धां तुह्मांकडे पाठविले आहेत, तरी हे तेथें राहतील तों पावेतों यांजकडील पागेचीं घोडीं आहेत, त्यांस वैरण प्रांत सातारा येथील कुरणपैकीं बेगमी करून देत जाणें ह्मणोन, कृष्णराव अनंत मुक्काम सातारा याचे नांवें. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर २५

४३–(६२३) कमाविसभेट राजश्री राव यांस महाराज छत्रपति स्वामीकडील वस्त्रें साताऱ्याहून आलीं, ते गुजारत शेटी जरडा खिजमतगार, सनगें ऐकूण.

समानीन मया व अलफ जमादिलाकर

रुपये.		
७५	मांदिले	१
३७॥	झगा बादली	१
७५	चादर बादली	१
३७॥	तुंबा किनखापी	१
२२५		४

४४–(६६८) सौभाग्यवती दुर्गाबाई थोरली धनीण कैलासवासी जाली, त्यांचे उत्तरकार्यासमई ब्राह्मणांस दोन चावर जमीन भूमिदानास दिली ते आपणाकडून देवविली, त्या पैकीं कांहीं जमीन ब्राम्हणांस पावली, बाकी जमीन राहिली ते अद्याप ब्राम्हणांस पावली नाहीं, त्यास दोन चावर ज-

समानीन मया व अलफ मोहरम ८

(41) The monument of Rájáram Mahárаj was at fort Sinhagad. An idol which was there was brought to Poona. It was now returned to Sinhagad.

A. D. 1778-79.

(42) The marriage of the Satara Rája being about to be celebrated, a body of horse was sent to Satara to be present on the occasion.

A. D. 1777-78.

(43) Clothes worth Rs. 225 were received as present from the Satara Rájá.

A. D. 1779-80.

(44) There is an allusion in this Sanad to the death of the eldest Ráni of the Satara Rájá called Durgábái. Land was given in Inam to Brahmins on the occasion of the performance of her obsequies.

A. D. 1779-80.

मिनीपैकीं बाकी जमीन राहिली असेल ती नेमून द्यावी म्हणोन, पंत प्रतिनिधी यांस. सनद १.
परवानगी रूबरू.

४५–(७०१) सदाशिव दिनकर कमाविसदार, कसबे खेड शिवापूर याचे नांवें सनद कीं, शिवापूरचे बागेपैकीं आंबे पिकले इरसाल नामी श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति यांजकडे सातारियास दर रवानगीस दीडशेंप्रमाणें तीन रवानग्या मिळोन आंबे सुमार ४५० साडे चारशें, सरकारचे खिजमतगार पाठविले आहेत, यांजबरोबर रवाना करणें म्हणोन. सनद १.
परवानगी रूबरू.

इसने समानीन मया व अलफ जमादिलाकर

४६–(७९८) नारायणजी मोहिते, श्रीमंत महाराज शाहू छत्रपति स्वामी यांचे सासरे, यांस घरचे बेगमीस पांचशें रुपयांचा गांव व पांचशें रुपये इतलाख द्यावयाचा साल गुदस्त करार केला, त्यापैकीं इतलाख साल गुदस्त साल मजकूर मिळोन रुपये १००० एक हजार रुपये देविले असेत, तरी प्रांत कराड पैकीं पावते करणें. पेस्तर साल सन सलास समानीनापासून पांचशें रुपये इतलाख द्यावयाचे, त्यास प्रांत वाई पैकीं मौजे माजगांव तर्फ सातारा हा गांव दुमालदार खेरीज करून बाकी सुमाकडील अंमल बेगमीबद्दल पेस्तर सालापासून लावून दिला, त्याची बेरीज रुपये ६७०, पैकीं वजा, पांचशें रुपयांचा गांव द्यावा सबब वजा रुपये ५००, बाकी रुपये १७० एकशें सत्तर रुपये गांवचे जाजती जाहले, ते इतलाखांत धरावयाचा करार करून इतलाखपैकीं बाकी राहिले ते रुपये ३३० तीनशें तीस रुपये दरसाल देविले असेत, तरी प्रांत कराड पैकीं सदर्हू तीनशें तीस रुपये मशारनिल्हे यास दरसाल पाववीत जाणें म्हणोन, श्रीनिवास शामराव मामलेदार प्रांत मजकूर याचे नांवें. सनद १. रसानगी यादी.

इसने समानीन मया व अलफ जमादिलाकर १४

४७–(७८०) बद्दल श्रीमंत महाराज राजश्री स्वामी छत्रपति छ. २० रोजीं वाड्यांत आले, ते समई राजश्री राव यांसी पोशाक दिला, तो गुजारत जिवाजी कोटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

सलास समानीन मया व अलफ रविलावल २३

---

(45) Mangoes from the Sivápoor garden were sent to the Rájá of Satara as a present.

A. D. 1781-82.

(46) It was agreed in the preceding year that Náráyanji Mohite, father-in-law of the Maháràja Sháhu, should be given Rs. 500 in cash and a village worth Rs. 500. The agreement was now carried out.

A. D. 1781-82.

(47) Presents were received from the Satara Rájá on the occasion of his coming to the Peshvá's wádá on the 20th of this month.

A. D. 1782-83.

७९ चिरा जरी बादली १
११० झगा जरी बादली १
३० वोढणी जरी बादली १
२९ तुंबा किनखापी १

२४०

४८–(७८१) बद्दल श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांजकडे खासास्वारी रोज गुदस्तां दर्शनास गेली, ते समई पोशाख दिल्हा, तो गुजारत जिवाजी कोटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

सलास समानीन मया व अलफ रविलावल २४

६९ चिरा जरी बादली १
४० वोढणी जरी बादली १
१२० झगा जरी बादली १
३१ तुंबा किनखापी १

२६०

४९–(८११) सौभाग्यवती संतूबाई माहाडीक, श्रीमंत महाराज राजश्री शाहू छत्रपति स्वामी यांची बहीण, यांस महाराजांचीं दोन लग्नें जाहालीं, त्यास करवलीपणाचा मान ते समई द्यावयाचा, तो पावला नाहीं, सबब हल्लीं जमीन अवल दूम सीम तिहीं प्रतीची चावर ·ll· अर्धा एकूण, साठ बिघे कुलबाव कुलकानू दरोबस्त नूतन इनाम करार करून दिल्ही असे, तरी सदरहूप्रमाणें अर्धा चावर जमीन प्रांत कऱ्हाडपैकीं नेमून दुमाला करून यांचे नांवें इनाम खर्च लिहीत जाणें; आणि जमिनीचा चतुःसीमापूर्वक मोजणीजाबता लिहून हुजूर पाठवणें, त्याप्रमाणें इनामपत्रें करून दिल्हीं जातील ह्मणून, श्रीनिवास शामराव यांचे नांवें. सनद.

आर्बा समानीन मया व अलफ साबान २५

रसानगी यादी.

---

(48) Presents were received from Mátoshri Ayisáheb on the occasion of the visit paid to her by the Peshvá on the preceding day.

A. D. 1782-83.

(49) Santubái Mahádik, the Rájá's sister, was given half a cháhur of land in Inam as a customary present on the occasion of the marriages of the Satara Rájá.

A. D. 1783-84.

५०-(८१२) नरसिंगराव गुजर, श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचे मेहुणे, यांस जातीस तैनात सालीना करार केली, ते रुपये १०००, पैकीं वजा गांव लाऊन द्यावयाचा रुपये ५००, बाकी रुपये ५०० पांचशें रुपयांची डौल साताऱ्याकडे नेमणूक केली असे, तरी सदरहू पांचशें रुपये सालीना देत जाणें ह्मणून, कृष्णराव अनंत याचे नांवें. सनद १.

आर्बा समानीन
मया व अलफ
साबान २६

रसानगी यादी.

५१-(८१३) श्रीमंत मातुश्री आईसाहेब वाडा दुसरा यांचे आप्त यांस कुटुंबाचे बेगमीस सालीना नेमणूक. रुपये.

आर्बा समानीन
मया व अलफ
साबान २६

२०० खंडेराव शिर्के.
२०० खंडेराव गुजर.

४००

एकूण चारशें रुपये साल मजकुरापासून करार करून डौल साताऱ्याकडे नेमणूक केली असे, तरी सदरहू चारशें रुपये सालीना देत जाणें ह्मणून, कृष्णराव अनंत याचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५२-(८१४) संताजी भोसले, श्रीमंत मातुश्री आईसाहेब वाडा दुसरा यांचे मेहुणे, यांस कुटुंबाचे बेगमीस सालीना नेमणूक. रुपये.

आर्बा समानीन
मया व अलफ
साबान २७

६०० खासा संताजी भोसले यांस. रुपये.
२०० सौभाग्यवती ठमाबाई स्त्री, आईसाहेबांची बहीण, यांस.

८००

एकूण आठशें रुपये सालमजकुरीपासून करार करून डौल साताऱ्याकडे नेमणूक केली

(50) Narsingrao Guzar, brother-in-law of the Satara Rájá, was given a grant of Rupees 1000 in land and cash.
A. D. 1783-84.

(51) An allowance of Rupees 200 each was given to Khanderao Shirke, and Khanderao Guzar, relatives of the 2nd wife of the Satara Rájá.
A. D. 1783-84.

(52) An allowance of Rupees 200 was given to Thamábái, sister of the Rájá's second wife; and one of Rupees 600, was given to Thamábái's husband, Santáji Bhosle.
A. D. 1783-84.

असे, तरी सदर्हू आठशें रुपये सालीना देत जाणें ह्मणून, कृष्णराव अनंत याचे नांवें. सनद.

रसानगी यादी.

५३-(८६२) श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांस सनगें रूबरू पाहून सातारियास पाठविलीं, ताहा बापूजी जाधव हुजरे, व गिरजापा मोहिते, जामदार दिंमत हुजुरात, सनगें एकूण. आंख.

खमस समानीन मया व अलफ जिल्काद १५

६०० पितांबर मर्दानी आसवली किनारदार १

आंख.

६८२ शाल फर्द केशरी २, दर ३४१

४०० पामरी सोंवळ्याची अमदाबादी १

८५० जामेवार जरी निशाणास (२)

४३० प्रत १

४२० प्रत १

८५० २

१ बासनास खादीपैकीं ।·

२५३३ ६।

५४-(९३९) श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांजकडील डौलाची दिवाणगिरी पेशजींपासून रामराव विष्णु यांजकडे आहे, त्यास ते मृत्यु पावले, सबब त्यांचे पुत्र गोपाळराव राम यांजकडे दिवाणगिरी करार केली असे, तरी यांजकडील कारकुनापासून पेशजींप्रमाणें दिवाणगिरीचें कामकाज चालणें म्हणोन. सनदा.

सबा समानीन मया व अलफ सफर ६

१ कृष्णराव अनंत यांस.

१ बाबूराव कृष्ण यांस.

एकूण दोन सनदा.

रसानगी याद.

---

(53) Clothes worth Rupees 2533 were sent as a present to the Rájá of Satara.

A. D. 1784-85.

(54) The office of Diwán to Shrimant Mahárаj Mátushri Ayi-Sáheb, which was held by Rámrao Vishnoo, was on his death bestowed upon his son Gopálrao.

A. D. 1876-87.

५५-(९४१) हुजुरांत खर्च-श्रीमंत महाराज छत्रपति स्वामी यांस पुत्र जाहला, सबब बाळंतविडा पाठविला, तसलमात श्रीनिवास त्रिंबक कारकून शिलेदार, व पांडु मुळ्या, व मायाजी बाबर खिजमतगार, सनगें एकूण. आंख.

सब समानीन मया व अलफ रबिलाखर ८

११९९ मातुश्री आईसाहेब यांस सनगें एकूण. आंख.

३८० लुगडें १
३०४ शेला जाफरखानी १
४४१ किनखाप १
३० खण १

११९९ ४

१२१०॥ वाडा पहिला.

१०१९॥ प्रत.

३९७॥ पातळ जरी १
२२५ शेला जाफरखानी १
४०० किनखाप १
३३ खण जरी चौकडीदार १

१०१९॥ ४

१९५ पुत्रास.

१ कुंची.
१ पेहरणें.

२

खातें गुजारत कचू शिंपी सनगें एकूण आठ.

११० किनखाप गज ·॥१ सनंग ८=
७६ चोळखण जरी कारचोबी पेहरण्यास १
एकूण गज ·।३
९ अस्तरास सनंग ८=

१९९ १।

(55) Presents were sent to the Satara Rájá and his wives in honour of the birth of a son to the Rájá.

A. D. 1786-87.

९००। वाडा दुसरा.

२३७॥ पातळ जरी १

२२९।।। शेला जाफरखानी १

४०० किनखाप १

३३ खण जरी काजळी चौकडीदार १

९००। ४

९ बासनास.

७ शेला साधा हात ७ सनंग ।·

आंख.

२ खादीपैकीं ।॥·

९ ।॥·

३२७४।॥· १४

५६–(१०१९) कसबे संगमेश्वर तर्फ मजकूर तालुके रत्नागिरी येथें श्रीमंत कैलासवासी संभाजी महाराज राज्य करीत होते, त्या राजवाड्याचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी मावलंगकर यांणीं आपले घराचा चौथरा ह्मणोन घर बांधों लागले, तेव्हां समस्त जोशी संगमेश्वरकर यांणीं राजवाड्याचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी घर बांधणार यास ताकीद करून घर बांधूं न द्यावें म्हणोन तुह्मांस सांगितलें, व हुजूरही विनंति केली, तेव्हां हुजूर चौकशी जालियाशिवाय घर बांधों नये, याप्रमाणें जालें असतां तिगस्तां चौकशी न होतां त्या चौथऱ्यावर घर बांधलें, तेव्हां गणपतराव जिवाजी सर सुभा यास चौकशी करून घर मोडावें, ह्मणून आज्ञा जाली असतां, गुदस्तां पहिलें घर बांधिलें आहे, त्या लगते नवें काम घराचें केलें, ह्मणोन समस्त जोशी संगमेश्वरकर यांणीं हुजूर विदित केलें ऐशियास राजवाड्याचा चौथरा तुह्मांस समजला असतां सदाशिव दादाजी यास चौथऱ्यावर घर बांधों दिलेंत, हें ठीक न

इह्दिदे तिसैन मया व अलफ रबिलावल ६

(56) Sadáṣiva Dádáji Mawlangkar built a house on the foundation of the palace belonging to the previous ruler, Sambháji Maháráj at Sangmeshwar. The house was ordered to be pulled down, and the site including that of the royal garden was retained by Government.

A. D. 1790-91.

केलें, त्याजवरून हल्लीं हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी घर मोडावयास सरकारांतून मोरो आत्माराम कारकून व ढलाईत आसामी २ पाठविले आहेत; हे घर मोडतील त्यास मोडूं देणें. राजवाड्याचे चवथऱ्याजवळ महाराजांची बाग आहे, त्यासुद्धां जागा सरकारांत ठेवणें म्हणोन, महिपतराव कृष्ण याचे नांवें चिटणिसी. पत्र १.

५७-(१०२८) श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचे दोघी कन्यांचीं लग्नें आहेत; त्याचें साहित्य सातारियास पावतें करणें म्हणोन. सनदा.

इहिदे तिसैन मया व अलफ जमादिलाखर १९

परगणे शिराळें निसबत रघुनाथ चिंतामण याजकडून. सुमार.

१५००० कडबा पुले.
५००० पत्रावळी.
५००० पानें केळीचीं.

२५०००

एकूण पंचवीस हजार सुमारी देणें, याखेरीज बेगारी आसामी ५० पन्नास एक महिना नेमून देणें म्हणोन. सनद १.

रघुनाथ चिमणाजी सचिव यांजकडून. सुमारी.

८००० पत्रावळी.
१७१३ बुरुडकाम.
७५० तट्ये.
१०० हारे.
५०० शिपतरें.
५० दुरड्या.
१०० पाट्या.
१०० सुपें.

परशराम श्रीनिवास प्रतिनिधी यांजकडून सुमारी. सुमार.

१०००० पत्रावळी.
१५००० कडबा पुले.
१७१२ बुरुडकाम.
७५० तट्ये.
१०० हाऱ्ये.
५० दुरड्या.
५०० शिपतरें.
१०० पाट्या.
१०० सुपें.
५० वरोळ्या.
५० केरसुण्या.
१२ चाळणी.

१७१२

९७५ कुंभारकाम.
७५ रांजण.
७५० घागरी.

---

(57) The marriages of two daughters of the Satara Rájá being about to be celebrated, orders were issued to the Pratinidhi, the Sachiv, and other officers for supplying the necessary provisions for the ceremonies.

A. D. 1790-91.

९० वरोळ्या.
९० केरसुण्या.
१३ चाळणी.

१७१३

९७१३

एकूण नऊ हजार सातशें तेरा सुमारें पावते करावे, याखेरीज बेगारी आसामी ९० पन्नास एक महिना नेमून द्यावे ह्मणून. सनद १.

विश्वासराव नारायण किल्ले वंदन याजकडून सुमारी. सुमार.

९००० कडबा पुले.
२००० पत्रावळी.

७०००

सात हजार सुमारी पावते करणें ह्मणोन. सनद १.

१९० मडकीं लाहान थोर जात.

९७९

२७६८७

एकूण सत्तावीस हजार सहाशें सत्याशीं सुमारी पावते करावे, याखेरीज बेगारी आसामी ९० पन्नास एकमाही नेमून द्यावे ह्मणोन. सनद १.

श्रीनिवास शामराव प्रांत कराड याजकडून सुमारी. सुमार.

१०००० कडबा पुले.
९००० पत्रावळी.
९७९ कुंभारकाम.
७९ रांजण.
७९० घागरी.
१९० मडकीं लहान थोर जात.

९७९

१५७९९ (१५९७९)

एकूण पंधरा हजार नऊशें पंच्याहत्तर सुमारी पावते करावे, याखेरीज बेगारी आसामी ९० पन्नास एक महिना नेमून देणें ह्मणोन. सनद १.

एकूण पांच सनदा.

रसानगी यादी.

५८ (१०४२) कमाविस भेट राजश्री राव, सातारियास स्वारी गेली होती, ते समईं आली, ती गुजारत जानाजी जाबक खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

इसन्ने तिसैन मया व अलफ रविलावल ६

२०२९॥ श्रीमंत महाराज छत्रपति स्वामी यांचे दर्शनास गेले, ते समईं आलीं, तीं सनगें एकूण. रुपये.

४३७॥ प्रथमदर्शनीं सनगें एकूण किंमत. रुपये.

३०० श्रीमंत महाराज यांजकडील दुपटा अनारदाणी १

---

(58) The Peshwá paid a visit to the Rájá at Satara. The clothes received by him as presents from the Rájá & his two Rânis are credited on this date.

A. D. 1791-92.

९० आईसाहेब यांजकडील वोढणी बादली १
९० वाडा पहिला वोढणी बादली १
३७॥ वाडा दुसरा वोढणी बादली १

४३७॥ ४

११९२ निरोप समई वस्त्रें दिल्हीं, तीं सनगें एकूण. रुपये.

१०२५ श्रीमंत महाराज यांजकडील.
३०० तिवट अनारदाणा १
४५० दुपटा अनारदाणा १
१२५ जामेवार जरी बादली. (२)

६५ २० (६०)

१२५ २
१५० किनखाप १

१०२५ ५

२३९ बाबत आईसाहेब.
२५ तिवट १
१५० दुपटा १
२४ शेले साधे २, दर १२
४० किनखाप ॥·

२३९ ४॥

१६४ वाडा पहिला.
२५ तिवट १
७५ जाफरखानी १
२४ शेले साधे २, दर १२
४० किनखाप ॥·

१६४ ४॥

* * * * *

५९–(१०६७) श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांची स्त्री सौभाग्यवती आनंदीबाई वाडा पहिला यांस पुत्र जाहाला; त्यास बारशास व साखर वाटण्यास व हेलकरणीस वगैरे रुपये १००० एक हजार रुपये खर्च करणें ह्मणोन, कृष्णराव अनंत याचे नांवें. सनद १.

सलास तिसैन मया व अलफ रजब ११.

परवानगी रूबरू.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

२ पेशवे, (अ) नारायणराव पेशवे यांचा वध.

६० (४४) सुमेरसिंग गारदी याची सासुरवाड कजबे चांदवड येथें आहे, त्यास तेथें त्याची बायको व मुलें माणसें आहेत, त्यांस पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेवणें, पोटास अडशेरी देणें. वस्तभाव वगैरे जी असेल त्याचा बारकाईनें शोध करून मोजदाद करून बराबर प्यादे देऊन बंदोबस्तानें हुजूर पुण्यास पाठऊन देणें म्हणोन, हवालदार व कारकून किल्ले चांदवड निजबत तुकोजी होळकर याचे नांवें.

आर्बा सबैन मया व अलफ राबिलावल २२

छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

---

(59) Ánandibái, the first wife of the Satara Rájá, having given birth to a son, sanction was given to the expenditure of Rs. 1000 for distributing sugar and for the ceremonies to be performed on the 12th day after birth.

A. D. 1792-93.

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(2) PESHWÁ—(a) Náráyanrao's Murder.

(60) The wife of Sumersing Gárdi with his family was at Chándwad at her father's house. The officer of the fort of Chándwad was directed to keep her and Sumersing's family in cofinement, to attach his property, and to send it to Poona.

A. D. 1773-74.

६१–(४५) किल्ले हाय येथें अटकेस ठेवावयास पाठविले असेत, तरी पायांत बिड्या घालून पक्या बंदोबस्तानें ठेविणें, पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें म्हणोन, हवालदार व कारकून यांस. छ. १७ जिल्काद. सनदा.

आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

१ किल्ले विसापूर येथें शिवराम गिरमाजी येविशीं.

१ किल्ले घनगड येथें अंतोबा घाणेकर येविशीं.

१ किल्ले लोहगड येथें केशवराव बल्लाळ येविशीं.

३

दुसरे जागा पाठविणें सबब दूर.

केसो बल्लाळ गोगटे याचीं माणसें किल्ले राजमाची येथें आहेत, तीं अटकेंत ठेविलीं असेत, तरी माणसें पक्या बंदोबस्तानें ठेविणें, व पाहारे चवक्या ठेविणें म्हणोन, रामराव नारायण यास. छ. १७ जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

किल्ले शिवनेर येथें खरकसिंगाचीं मुलें माणसें आहेत, तीं अटकेंत ठेविलीं असेत, तरी पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेविणें, व घरीं चवक्या बसविणें म्हणोन, उध्धो विरेश्वर याचे नांवें. छ. १७ जिल्काद. सनद १.

आबाजी महादेव याचीं मुलें माणसें नागोठण्यास आहेत, व त्याचे भाऊ काशीहून आले, ते अवचितगडास अगर नागोठण्यास असतील, त्यांस पत्र दर्शनीं कैद धरून वस्तवानीसुद्धां जप्त करून मुलें माणसें किल्यावर बंदोबस्तानें अटकेंत ठेविणें; व त्याचे भावाचे पायांत बिडी घालून सुरगडावर पक्या बंदोबस्तानें ठेविणें; ज्या किल्यावर मुलें माणसें ठेवाल त्या किल्यावर त्यास न ठेविणें. लिहिल्याप्रमाणें सुरगडावर ठेविणें; आणि पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें. जप्तीचा सर्व वस्तवानीचा जाबता लिहून हुजूर पाठऊन देणें म्हणोन, गणेश त्रिंबक याचे नांवें. छ. १७ जिल्काद. सनद १.

---

(61) Orders for the imprisonment of the following persons with their families, and for the attachment of their property, appear in the diaries of this date.

A. D. 1773-74.

1 Ṣiwarám Girmáji.

1 Antobá Ghánekar.

1 Keshavrao Ballál.

1 Kharaksing.

1 Abáji Mahádeo. (of Nágothne.)

तुळाजी पवार खिजमतगार याचीं मुलें माणसें मौजे गोलेगांव परगणे मजकूर येथें आहेत, त्यांस कैद करावयाची आज्ञा केली असे, तरी पत्र दर्शनीं कबिलेसुद्धां माणसें कैद करून हुजूर पुण्यास पाठऊन देणें. वस्तवानी जप्त करून वस्तवानीचाही जाबता हुजूर पाठऊन देणें म्हणोन, बाबूराव माणकेश्वर सुभेदार, परगणे कडें रांजणगांव यांचे नांवें. छ. १७ जिल्काद. सनद १.

केशवराव बल्लाळ यास अटकेंत ठेवावयास पाठविलें असे, तरी यास पक्या बंदोबस्तानें साष्टीचे किल्यांत अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें. तुम्हांजवळ मशारनिल्हे येऊन पोंहचल्याचा जाब पाठविणें म्हणोन, आनंदराव राम याचे नांवें. छ. १८ जिल्काद. सनद १.

त्र्यंबकजी भालेराव याचीं मुलें माणसें मौजे कळंब नांदूर प्रांत जुन्नर येथें आहेत, त्याची जप्ती करावयास रघुनाथ हरी यास आज्ञा केली आहे, ते व तुम्हांकडे माणसें पाठवितील, त्यांस पक्या बंदोबस्तानें किल्ले शिवनेर येथें अटकेंत ठेऊन पोटास अडशेरी देत जाणें म्हणोन, उधो विरेश्वर तालुके शिवनेर याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

सखाराम हरी याचीं मुलें माणसें मौजे उरवडें तर्फ मुठेखोर येथें आहेत, त्याची जप्ती करून वस्तभावेची वगैरे मोजदाद करून जाबता हुजूर पाठविणें; व मुलें माणसें किल्ले सिंहगड येथें पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें; व मशारनिल्हेचे घरीं घोडीं व उंटें वगैरे असतील ते जलद हुजूर पाठविणें, व रामचंद्र विठ्ठल निजबत चिटणीस याचें घर जे मजकुरीं आहे, त्यास त्याची जप्ती करून व वस्तभाव वगैरे याचा जाबता हुजूर पाठविणें, व मुलें माणसें किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यमप्रतीचा देणें म्हणोन, आनंदराव जिवाजी याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

राजाराम गोविंद याचीं मुलें माणसें शहर अहमदनगर येथें आहेत, तीं किल्ले अहमदनगर येथें अटकेंत पक्या बंदोबस्तानें ठेऊन शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें; व त्याची वस्तभाव जेथें असेल तेथून बारकाईनें शोध करून आणून मोजदाद करून जाबता लिहून हुजूर

---

1 Tulâji Pawâr (Khijmatgâr.)
1 Keso Ballâl (of Rajmâchi.)
1 Trimbakji Bhâlerao (of Kalamb Nândur.)
1 Sakhâram Hari (of Urawde in Taluka Muthekhore.)
1 Rajârâm Govind (Ahmednagar.)

पाठविणें; व परगणे कडेवलीत येथील देशमुखी वगैरे वतनें आहेत, त्यांपैकीं मशारनिल्हेचा हिसा जप्त करून आकार होईल तो किल्ले मजकूरचे हिशेबीं जमा करणें म्हणोन, महादाजी नारायण याचे नांवें. छ. २० माहे जिल्काद. सनद १.

बाबूराव बल्लाळ काणे याचीं मुलें माणसें कजवे तळें येथें आहेत, त्यास किल्ले तळगड येथें पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेविणें; व वस्तभाव जेथें असेल तेथें बारकाईनें शोध करून जप्त करणें, आणि जाबता हुजूर पाठविणें. माणसांस शिधा मध्यम प्रतीचा देत जाणें म्हणून, गोविंदराव व चिमाजी माणकर प्रांत राजापुरी याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

मल्हारराव कृष्ण सुमंत याचीं मुलें माणसें मौजे राजापूर परगणे कर्डे रांजणगांव येथें आहेत, त्यांस जप्त करून किल्ले अहमदनगर येथें पोंहचऊन देणें ह्मणोन, बाबूराव माणकेश्वर सुभेदार परगणे कर्डे रांजणगांव यास आज्ञा केली आहे, त्यास मशारनिल्हे मुलें माणसें तुह्मांकडे पाठवितील, त्यास किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन ब्राह्मण आसामी असतील त्यांस उत्तम प्रतीचा शिधा देत जाणें; व एकादी कुणबीण असेल, तीस शिरस्तेप्रमाणें अडशेरी देत जाणें ह्मणोन, महादाजी नारायण किल्ले अहमदनगर याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

महमद इसफ गारदी याचीं मुलें माणसें रोज्यास अगर शहर औरंगाबाद येथें असतील, त्यांचा बारकाईनें शोध करून तेथून धरून आणून किल्ले दौलताबाद येथें पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें; व वस्तभाव वगैरे याची मोजदाद करून किल्ले मजकुरीं ठेऊन जाबता हुजूर पाठविणें; व लोकांकडे कर्जवाम वगैरे पैका व वस्तभाव असेल त्याचाही बारकाईनें शोध करून जप्त करून जाबता हुजूर पाठविणें ह्मणोन, धोंडो महादेव याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

सदाशिव रामचंद्र याचीं मुलें माणसें किल्ले मजकुरीं अटकेस ठेवावयास पाठविलीं आहेत, तरी पक्के बंदोबस्तानें ठेऊन उत्तमप्रत शिधा देत जाणें, ह्मणोन उदाजी वाळुंज हवालदार, व कारकून किल्ले लोहगड याचे नांवें. छ. २० जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

1 Báburao Ballál Kâṇe. (of Talen)
1 Malhárrao Krishna Sumant. (Rajápur in Parganá Karden Ránjangaum.)
1 Mohamed Esuf Gárdi's family at Rozá or Aurangabad.
1 Sádáshiv Rámchandra (appears to be an important personage.)

शिवाजी कान्हो याची बायको कजबे सासवडास माहेरास आहे, व बाजीराव गोविंद बर्वे याचीं माणसें मौजे गराडें येथें आहेत, त्यांची जप्ती करून वस्तभावेचा बारकाईनें शोध करून आणून मोजदाद करून जाबता हुजूर लिहून पाठविणें; व माणसांस शिधा मध्यमप्रत देत जाणें; व मौजे भिंवरी तर्फ करेपठार हा गांव बाजीराव गोविंद यांजकडे आहे, तो जप्त करून आकार होईल तो प्रांत पुणें येथील हिसाबीं जमा करणें ह्मणोन, नारो आपाजी याचे नांवें. छ. २० जिल्काद.

सनद १.

परवानगी रूबरू.

नूरमहमद गारदी याचीं मुलें माणसें रोज्यास, अगर शहर अवरंगाबाद येथें असतील, त्यांचा बारकाईनें शोध करून, तेथून धरून आणून, किल्ले दौलताबाद येथें पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें; व वस्तभाव वगैरे असेल, त्याची मोजदाद करून, किल्ले मजकुरीं ठेवून, जाबता हुजूर पाठविणें; व लोकांकडे कर्जवामवगैरे येणें असेल, त्याचाही शोध करून जप्त करणें; आणि हुजूर लेहून पाठविणें ह्मणोन, धोंडो महादेव याचे नांवें. छ. २० जिल्काद.

सनद १.

हरि रघुनाथ भिडे याचीं मुलें माणसें मौजे आसरें येथें आहेत; तीं अटकेस ठेवावयाविषयीं हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी मशारनिल्हेचीं मुलें माणसें आणून किल्ले अवचितगड येथें पक्या बंदोबस्तानें ठेविणें; व त्याची वस्तभाव जप्त करून जप्तीचे जिनसांचा जाबता हुजूर लिहून पाठविणें. माणसांस शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें म्हणोन, गणेश त्रिंबक याचे नांवें. छ. २१ जिल्काद.

सनद १.

अंताजी राम सावकार आनंदवल्लीस आहेत, त्यांस किल्ले त्र्यंबक येथें अटकेस ठेवण्यास आज्ञा केली असे, तरी तुम्हीं किल्ले मजकूर पैकीं लोक पाठऊन, आनंदवल्लीहून घेऊन जाऊन, पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेविणें. पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें. सरकारचे कारकून भास्कर बल्लाळ आनंदवल्लीस आहेत, ते तुम्हांस लिहितील तेव्हां त्यांजकडे प्यादे पाठवून, अंताजी रामास किल्ले मजकुरीं घेऊन जाऊन अटकेस ठेविणें म्हणोन, काशी बल्लाळ याचे नांवें. छ. २१ जिल्काद.

सनद १.

परवानगी रूबरू.

अच्युतराव गणेश याचे बंधू व मुलें माणसें कजबे चांदवड येथें आहेत, त्यास किल्ले मजकूर अटकेंत आहेत. पक्या बंदोबस्तानें ठेऊन शिधा मध्यमप्रत देत जाणें. वस्तभाव

1 Siwaji Kanho's wife of Saswaḍ.
1 Nur Mohamed Gárdi's family at Rozá or Aurangábád.
1 Hari Raghunáth Bhiḍe.
1 Antáji Ráṇe Sawkar of Anandwalli.
1 Achutráo Ganesh of Chándwaḍ.

जेथें असेल तेथें बारकाईनें शोध करून आणून मोजदाद करून बराबर माणसें देऊन मोजदाद जाबतासुद्धां हुजूर पाठऊन देणें म्हणोन, हवालदार व कारकून किल्ले चांदवड निजबत तुकोजी होळकर यास. छ. २१ जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

आपा लिमया व गोपाळ लिमया शागीर्द यांचें घर मौजे कन्हेले कजब्यांत नेवरें तालुके रत्नागिरि येथें आहे. त्यास हरदू जणाचे घराची जप्ती करून, मुलें माणसें धरून, कैद करून, पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन, पोटास शिधा मध्यमप्रतीचा देत जाणें; व वस्तभावची जप्ती करून जाबता हुजूर पाठऊन देणें ह्मणून, महिपतराव कृष्ण यास. सनद १.

गंगाराम परदेशी जमादार प्यादे यासी किल्ले चांदवड तालुके शिवनेर येथें अटकेस ठेवावयाबद्दल पाठविला असे, तरी पायांत बिडी घालून पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें म्हणोन, उद्धव विरेश्वर याचे नांवें. छ. १ जिल्हेज. सनद १.

रामचंद्र बाबाजी जोगळेकर यांचें घर वाडा ढोकमळें, कर्यात नेवरें, जिल्हा रत्नागिरि येथें आहे, त्यास याचे घराची जप्ती करून मुलें माणसें कैद करून बंदोबस्तानें अटकेस ठेविणें, आणि पोटास शेर मध्यमप्रत शिधा देत जाणें. वस्तभावेची मोजदाद करून जाबता हुजूर पाठऊन देणें म्हणोन, महिपतराव कृष्ण यास. छ. जिल्हेज. सनद १.

परवानगी रूबरू.

बाबूराव बल्लाळ काणे याची बायको मौजे पालील तालुके सुवर्णदुर्ग येथें पांडुरंग बल्लाळ मोडक याचे घरीं आहे, त्यास तीस कैद करून, किल्ले रसाळगड येथें पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन, पोटास शिधा मध्यमप्रतीचा देणें; व तिची वस्तभावेची वगैरे जप्ती करून, जाबता लिहून हुजूर पाठऊन देणें; व आबाजी महादेव सोहनी याचीं मुलें माणसें तालुके मजकुरीं गेलीं आहेत, ह्मणून हुजूर विदित जाहलें, त्यास याचा पत्ता बारकाईनें लाऊन जेथें असतील तेथें कैद करून, हरएक किल्यावर अटकेंत ठेऊन, पोटास शिधा मध्यमप्रतीचा देणें. वस्तभावेची वगैरे जप्ती करून जाबता हुजूर पाठऊन देणें म्हणून, मोरो बापूजी तालुके मजकूर याचे नांवें. छ. ३ जिल्हेज. सनद १.

दुसरी सनद दिली सबब हे दूर. परवानगी रूबरू.

आबाजी महादेव सोवनी याची बायको, लक्ष्मण अनंत सबनीस किल्ले घोंसाळा याची कन्या, लक्ष्मण अनंत याचे मेहुणे पांडुरंग बल्लाळ मोडक याचे घरीं मौजे पालील तालुके

1 Appá Limayá & Gopál Limayá (attendants).
1 Gangárám Pardeshi Jamâdár of peons.
1 Rámchandra Bábáji Joglekar.
1 Báburao Ballál Káne.
1 Abáji Mahádeo Sowani's wife.

सुवर्णदुर्ग येथें आहे, तीस धरून आणून, किल्ले रसाळगड येथें पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन, पोटास शिधा मध्यमप्रतीचा देणें; व तिचे वस्तभावेची वगैरे जप्ती करून, जाबता हुजूर पाठऊन देणें; व बाबूराव बल्लाळ काणे याचीं मुलें माणसें तालुके मजकुरीं गेलीं आहेत म्हणून हुजूर विदित जाहलें, त्यास त्यांचा बारकाईनें शोध लाऊन जेथें असतील, तेथून धरून आणून, हरएक किल्यावर पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शिधा मध्यमप्रतीचा देणें; व वस्तभावेची वगैरे जप्ती करून जाबता हुजूर पाठऊन देणें म्हणोन, मोरो बापूजी तालुके सुवर्णदुर्ग याचे नांवें. छ. ४ सनद १.

परवानगी रूबरू.

[1] बहाद्दरसिंग गाडदी याचा कबीला जोरावरसिंग हजारी याचे घरीं माहेरास मुल्हेर किल्याचे माचीस आहे, तीस वस्तवानीसुद्धां कैद करावी; व बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देणें; आणि वस्तभावेची मोजदाद करून जाबता हुजूर पाठऊन देणें ह्मणून, लक्ष्मण विश्वनाथ यासी. छ. ८ जिल्हेज. सनद १.

रसानगी यादी.

जयसिंगराव निकम सरनोबत दिमत पागा हुजूर याजकडे प्रांत जुन्नर पैकीं गांव तपसील.

१ मौजे चिंचोली तालुके चाकण.

१ मौजे बहुल तालुके पावळ येथील मोकास बाबेचा अंमल.

२

एकूण दोन गांव आहेत, त्यांची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस तुम्हांस सांगितली असे, तरी हरदू गांवचा अमल चवकशीनें करून वसूल घेऊन सरकार हिशेबीं जमा करीत जाणें; व मशारनिल्हेचीं मुलें माणसें मौजे चिंचोली येथें आहेत, ते किल्ले शिवनेरीस अटकेस ठेवण्याविषयीं उधो विरेश्वर यास अलाहिदा सनद सादर जाहली आहे, तरी तुम्हीं मशारनिल्हेचीं मुलें माणसें कैद करून शिवनेरीस उधो विरेश्वर याजकडे पावतीं करणें ह्मणोन, रघुनाथ हरी याचे नांवें. छ. १९ जिल्हेज. सनद १.

जैसिंगराव निकम सरनोबत दिंमत पागा हुजूर याचीं मुलें माणसें मौजे चिंचवली तर्फ चाकण प्रांत जुन्नर येथें आहेत, ते कैद करून तुह्मांकडे किल्ले शिवनेर येथें अटकेस ठेवण्यास पाठवावयाविषयीं रघुनाथ हरी यास सनद अलाहिदा सादर केली आहे, त्यास माणसें मशारनिल्हे तुह्मांकडे पाठवितील ते किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन

---

1 Bahádursing Gárdi's wife, residing at fort Mulher.

1 Jaysingrao Nikam in the service of Sarnobat in Págá Huzur was ordered to be imprisoned.

पोटास शिधा मध्यमप्रतीचा शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, उधो विरेश्वर याचे नांवें. छ. १९ जिल्हेज. सनद १.

विसाजी महादेव दात्या निसबत सुमेरसिंग गारदी याचें घर मौजे कोरलें प्रांत राजापूर येथें आहे, त्यास मुलांमाणसांस कैद करून हरएक किल्यावर पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर मध्यमप्रतीचा देणें; आणि वस्तभाव असेल ती जप्तींत ठेऊन, जाबता हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, महादाजी रघुनाथ, तालुके विजयदुर्ग यास. छ. १० मोहोरम. सनद १.

परवानगी रूबरू.

६२–(४८) तालुके पटा येथें अनंतराम व मोहोनसिंग याचें सत्तावीस माणूस खरकसिंग याचे मारफतीचें आहे, त्यास किल्यास परदेशी माणूस ठेवावयाचें नाहीं, तरी याचे ऐवजीं दुसरें माणूस करार करून ठेऊन, याचा हिशेब भरून देऊन रुसकत करणें ह्मणून, बाळकृष्ण केशव तालुके पटा याचे नांवें. छ. २४ जिल्हेज. सनद १.

आर्वा सबैन मया व अलफ रबिलावल. २२

रसानगी यादी.

६३–(४९) किल्ले आशेर येथें खरकसिंगाचे दिमतीचे माणूस, आसामी ३५ पस्तीस आहेत, ठेवावयाचें नाहीं, तर ते माणूस दूर करून किल्याखालीं उतरून देणें, व त्यास अदा जाला असोन (असेल), तो हुजूर लिहून पाठविणें. हुजुरून हिशेब होऊन ऐवजाची सनद तुम्हांस सादर होईल त्याप्रमाणें देणें. या लोकांचे ऐवजीं हुजुरून लोक करार करून पाठविले जातील, त्यांपासून चाकरी घेत जाणें ह्मणून, जगन्नाथ नारायण याचे नांवें. छ. १२ मोहरम. सनद १.

आर्वा सबैन मया व अलफ रबिलावल २२

परवानगी रूबरू.

---

1 Visáji Mahádeo Dáte in the service of Sumersing Gárdi, (of Korle, Pargana Rájápur).

(62) There were 27 Pardeshi men at Taluka Patta. As no Pardeshis were to be kept at forts, these men were ordered to be disbanded.

A. D. 1773-74.

(63) 35 men belonging to Kharaksing, and serving at fort Asher were disbanded.

A. D. 1773-74,

६४-(५०) सुमेरसिंग गारदी याचा लेक कजबे शेवगांवास आहे, त्याचा शोध करून जप्त करून ठेवणें म्हणोन पेशजीं तुम्हांस सनद सादर जाली होती, त्याचा जाब तुम्हीं कांहींच लिहिला नाहीं, त्यास असे कामाची सुस्ती तुम्हांपासून व्हावयाची नाहीं असें असतां, हें कसें केलें असेत? त्यास त्याचीं मुलें माणसें पुण्याहून गेलीं, ते कजबे मजकुरीं मणीराम परदेशी सुमेरसिंगाचा व्याही आहे, त्याचे घरीं त्याचीं माणसें गेलीं, त्याजवर पुढें जप्ती होते हें ऐकून शहर औरंगाबादेस माणसें मात्र पळोन गेलीं; परंतु वस्तवानी व मालमवेसी तशीच मणीरामचे घरींच ठेविली आहे, हें वर्तमान हुजूर विदित जाहलें. तुम्हीं जवळ असतां ठिकाण लाविलें नाहींत, तस्मात् गाफिली केली, असोत; या उपरी याची चांगली चवकशी करणें. मणीराम प्रस्तुत इंदुरास होळकराकडे आहे, त्याचा पुतण्या परशराम परदेशी प्रस्तुत शेवगांव कजब्यांत आपले घरीं आहे, तरी पत्र पावतांच त्याजला धरून त्याचे घराची जप्ती करून वस्तवानची मोजदाद करून जाबता हुजूर पाठविणें; व परशरामासही समागमें राऊत देऊन चांगले बंदोबस्तानें हुजूर पुण्यास पाठविणें. सुमेरसिंगाजवळ ऐवज बहुत आहे, तो त्यानें साराच या परदेशीयाचे घरींच ठेविला आहे, यांत गुता नाहीं, तरी तुम्हीं बहुत चांगली चवकशी करून पैका ठिकाणीं लावणें; आणि सविस्तर हुजूर लिहिणें; व परशरामासही बंदोबस्तीनें पाठविणें म्हणून, नरहर लक्ष्मणराव कमाविसदार, परगणे शेवगांव याचे नांवें. छ. १५ मोहोरम. सनद १.

आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

परवानगी रूबरू.

---

(64) The Kamávisdár of Parganá Shewagaum was previously directed to make a search for Sumersing Gárdi's son at Shewagaum, but no reply was received from him. He was reprimanded for his negligence and was addressed as follows:

A. D. 1773-74.

Government is informed that Sumersing's relations on leaving Poona went to Manirám Pardeshi's house at Shewagaum, and that when they learned that a search was being made for them at that place, they went away to Aurangábád leaving their property at Manirám's house. Manirám is at Indore with the Holkar. His nephew is, however, at his house. You should immediately on receipt of this order take him into custody, and send him to Poona, forwarding at the same time a list of the property that may be found in the house. Sumersing had considerable cash with him, and there can be no doubt that it has been kept at the above Pardeshi's house. Very careful inquiry should therefore be made, and detailed report sent to Government.

६५ [अ]-(२३२) महिपतराव कृष्ण यास सनद कीं, नारो गणेश फाटक हे तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध गर्दीत सरकारकामास आले, यास्तव याचे मातोश्रीस, व स्त्रीस, व मशारनिल्हेचे भाऊ वेदमूर्ति बाळंभट व सदाशिव गणेश फाटक वगैरे कजबे पावस, तालुके मजकूर, प्रांत राजापूर यांचे कुटुंबाचे योगक्षेमार्थ तालुके रत्नागिरि येथें हरएक गांवीं नूतन इनाम भात जमीन बिघे ५ पांच ध्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें पांच बिघे जमीन हरएक गांवीं चतुःसीमापूर्वक नेमून देऊन आकार होईल तो यांचे नांवें इनाम खर्च लिहीत जाणें; आणि जमिनीची चतुःसीमापूर्वक मोजणी करून हुजूर पाठवणें. त्याप्रमाणें भोगवटियास इनामपत्रें करून दिल्हीं जातील. या सनदेची प्रति लिहून घेऊन हे असल सनद याजवळ भोगवटियास परतोन देणें म्हणोन. सनद १.

सीत सबैन मया व अलफ सावान २

रसानगी यादी.

[ब]-(२३३) महिपतराव कृष्ण यास सनद कीं, नारो गणेश फाटक हे तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब संनिध गर्दींत सरकारकामास आले, यास्तव याचे मातुश्रीस व स्त्रीस योगक्षेमाबद्दल तालुके रत्नागिरि येथें मशारनिल्हेचे भाऊ बाळाजी गणेश याचे नांवें साल मजकुरीं अवल सालापासून आसामी करार करून, वेतन सालीना खेरीज शिरस्ता निवळ रुपये १५० दीडशें करार केले असेत, तरी चाकरी न घेतां मशारनिल्हेचे घरीं दीडशें रुपये तालुके मजकूरचे ऐवजीं साल दरसाल पावीत जाणें ह्मणोन. सनद १.

रसानगी यादी.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६६-(२४०) उधो विरेश्वर तालुके शिवनेर यांचे नांवें सनद कीं, चापाजी टिळेकर खिजमतगार हा तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध गर्दींत सरकारकामास आला, यास्तव याचे मुलामाणसांचें चालवणें जरूर जाणून, चापाजी मजकूर याचा लेक हणमंता टिळेकर यास मौ-

सीत सबैन मया व अलफ रमजान ३०

---

(65) Náro Ganesh Phátak having lost his life in the attack made by the Gárdis against Peshwá Náráyanrao, five Bighas of land were given for the support of his wife, mother, and brother; an appointment worth Rs. 150 a year was also conferred on the brother; and it was ordered that the salary should be disbursed to him free of service.

A. D. 1775-76.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(66) Chápáji Tilekar Khismatgár having sacrificed his life in the service of Government, at the time the Peshwá Náráyanrao was attacked by the Gárdis, his son was given one *cháhur* of land in inam at Kumset in Prant Junner.

A. D. 1775-76.

जे कुंभशेत तालुके हवेली प्रांत जुन्नर या लगते गांवीं इनाम जमीन अवल दूम सीम तिहीं प्रकारची चावर १, एक चावर देविली असे, तरी सदरहूप्रमाणें जमीन चतुःसीमापूर्वक नेमून देऊन यांचे दुमाला करून जमिनीचा आकार होईल तो यांचे नांवें इनामखर्चे लिहीत जाणें; आणि चतुःसीमापूर्वक मोजणी जावता लेहून हुजूर पाठवणें, त्याप्रमाणें भोगवटियास इनामपत्रें करून दिल्हीं जातील म्हणून, मशार निल्हे याचे नांवें. छ. १२ साबान सनद १.

रसानगी, इनामपत्राचे यादीवर देणें जालें असे.

६७–(३१३) बाजीराव आपाजी तालुके धोडप याचे नांवें सनद कीं, सुमेरसिंग याचा मेहुणा नाथूराम वलद संभुनाथ हा पेशजीं लबाडींत होता, सबब सदाशिव बापूजी कमाविसदार परगणे वणदिंडोरी यांणीं कैद करून अटकेस ठेविला आहे, तो तुह्मांकडे पाठवितील, त्यास किल्ले धोडप तालुके मजकूर येथें बेडी घालून पक्या बंदोबस्तानें ठेऊन, पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें; व त्याचीं मुलें माणसें धरावयाचे शोधांत मशारनिल्हे आहेत, तीं हस्तगत जाहल्यास धरून तुह्मांकडे पाठवितील, त्यांस पक्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं ठेवणें ह्मणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ जमादिलाखर २५

परवानगी रूबरू.

६८–(३१७) अबदुल कादर गारदी याचीं मुलेंमाणसें कैद करून तुह्मांकडे किल्ले मजकूर येथें अटकेंत ठेवावयासी. असामी.

सबा सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

२ पुत्र.
२ बहिणी.
१ राख गाडदी मजकूर याची.
१ कुणबीण.
२ लेकी.

—
८

एकूण असामी आठ पाठविले आहेत, यांस पक्के बंदोबस्तानें किल्यावर अटकेंत ठेऊन सात असामींस पोटास मध्यमप्रतीचा साधा व कुणबिणीस शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें

---

(67) Náthurám wallad Sambhunáth, brother-in-law of Sumersing, having been implicated in the conspiracy was arrested by the Kamavisdár of Wan Dindori. He was now sent to fort Dhodap. Orders had already been issued for the arrest of his family members.

A. D. 1776-77.

(68 The members of the family of Abdul Kádar were sent to fort Sinhgad for imprisonment.

A. D. 1776-77.

ह्मणोन, गोविंदराव मोरे हवालदार व कारकून किल्ले सिंहीगड याचे नांवें. छ. १९ जमादिलावल. सनद १.

पत्र पुरंधर व परवानगी रूबरू.

६९-(३२९) हणमंता बिन चापाजी टिळेकर यास तालुके शिवनेरपैकीं एक चावर जमीन इनाम, मौजे कुंभशेत तर्फ हवेली मजकूर हा गांव याचे पाटिलकीचा आहे, त्या लगत नेमून देणें ह्मणोन सालगुदस्तां तुह्मांस सनद सादर जाली आहे, त्यावरून मौजे आगरगांवपैकीं जमीन तुह्मीं नेमून देत होतां ते याच्या सोईची नाहीं, यास्तव मौजे सिरोली लंबक तर्फ हवेली शिवनेर येथें सदरहू एक चावर जमीन नेमून द्यावी ह्मणोन याणें हुजूर येऊन विनंति केली. त्यावरून मौजे मजकूर पैकीं एक चावर जमीन अवल दूम सीम तीन प्रतीची पांच हात पांच मुठींचे काठीनें देविली असे, तरी सदरहू एक चावर जमीन याकडे नेमून देऊन इनाम चालवणें; आणि जमिनीचा चतुःसीमेचा जाबता हुजूर लिहून पाठवणें. त्याप्रमाणें इनामपत्रें करून दिलीं जातील. साल गुदस्तांपासून सदरहू जमीन यास तुह्मांकडून देविली असतां, याचे पदरीं पडिली नाहीं, त्यास हल्लीं एक चावर जमीन नेमून द्याल त्या जमिनीचे आकाराप्रमाणें गुदस्तांचा ऐवज यास देऊन पावल्याचे कबज घेणें; या कामास सरकारचा खिजमतगार पाठविला आहे, त्याचे हु(गु)जारतीनें एक चावर जमीन मोजून याचे पदरीं घालणें म्हणोन, उधो बिरेश्वर तालुके शिवनेर यांस. सनद १.

सबा सबैन मया व अलफ साबान १०

रसानगी यादी.

भिवराव यशवंत पानसी याच्या कीर्दीपैकीं.

७०-(४१३) कमावीस जप्तीबद्दल फाजल मशारनिल्हे वगैरे स्वारी राजश्री दादा, रुपये तारापुरांत वस्तभाव सांपडली ते जमा.

२२२। बरहुकूम फाजल मशारनिल्हे गाडदी, तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांस मारावयाचे मेळ्यांत होता, सबब जप्ती केली त्यांत दागिनें सांपडले ते जमा किंमत रुपये, गुजारत बाजी गंगावर प्रांत बेलापूर. रुपये.

सबा सबैन मया व अलफ मोहरम १

(69) Hanmantá bin Chápáji Tilekar whose father lost his life in protecting the late Peshvá was given land in Inam at Kumbshet. As this did not suit him, orders were issued to give him an Inám at Shiroli in Tarf Haveli of Parganá Junnar.

A. D. 1776-77.

(70) Property belonging to Fázal Gárdi and Kharaksing Gárdi, who were among the assassins of Peshvá Náráyanrao, found at Tárápur in Parganá Belápur was attached.

A. D. 1776-77.

२३। पोत गळ्यांतील.

२१ मोत्यें दाणे ३३६, दर रुपयास १६ दाणे.

१। मणी सोनें २०, वजन ८१ दर १६

१ मोती १

२३।

३३ दुलडी मोत्यांची.

३०।।। मोत्यें सर १०, दर ७ (७४?) प्रमाणें सुमार ७४० दर रुपयास २४ प्रमाणें.

२ पानडी मधील १

·।· मणी सोनें १

३३

४ आंगठी माणकाची १

शहत.

७ माणिकें चुणी.

१ पाच.

किंमत रुपये.

* * *

२३९।।।— बरहुकूम, खरगसिंग तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांस मारावयाचे मेळ्यांत होता सबब. रुपये.

* * * *

७१—(४५१) ताजखान वल्लद महमदखान रोहिले दिंमत रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याणीं महमद इसफ गाडदी सरकारचा हरामखोर पळोन जात होता, तो जातीनिशीं मर्दुमी करून धरून आणून दिल्हा, सबब मशारनिल्हे याजवर कृपाळु होऊन परगणा जळगांवपैकीं नूतन इनाम गांव कमाल आकार रुपये १००० एक हजार रुपये याचा द्यावयाचा करार करून हे

सबा सबैन
मया व अलफ
रबिलाखर २

(71) Tâjkhán wd. Mohammadkhán Rohillá in the service of Raghoji Bhosle, Sena saheb Subhá, with great personal valour captured Mohammad Isaf Gárdi, who acted treacherously towards Government, and was absconding. An Inam village of Rs. 1000 was therefor, ordered to be given to him.

A. D. 1776-77.

सनद तुम्हांस सादर केली असे, तरी परगणा मजकूर पैकीं एक हजार कमाल आकाराचा गांव नेमून मशारनिल्हे याचे दुमाला करून गांवचा आकार पेस्तर सालापासून इनाम खर्च लिहीत जाणें; आणि गांव द्याल तो हुजूर लेहून पाठवणें, त्याप्रमाणें इनाम पत्रें करून दिल्हीं जातील. सदरहू गांव कसबे जलगांवचे लगत नेमून देणें म्हणोन, विश्वासराव रामचंद्र व दामोदर गोविंद कमाविसदार परगणा मजकूर यास. सनद १.

रामाजी अण्णाजी दिंमत नारो कृष्ण यांस कीं हजार रुपयांचा कमाल आकाराचा गांव नेमून देणें म्हणोन. पत्र.

२

रसानगी यादी.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं

७२–(४८१) बाळाराम सुमेरसिंग याचा लेक यास किल्ले सिंहगड येथें अटकेस ठेवावयास पाठविला आहे, तरी याच्या पायांत बिडी घालून पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास दाळपीठ मिळोन सवाशेर किल्ले मजकूर पैकीं देत जाणें म्हणोन, नारो महादेव याचे नांवें. छ. ९ जमादिलाखर. सनद १.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

परवानगी रूबरू.

७३–(४८२) बाळाराम सुमेरसिंग याचा लेक यास किल्ले सिंहगड येथें अटकेंत ठेवावयासी पाठविला, त्यास दाळपीठ मिळोन सवाशेर शिधा द्यावयाविशीं तुम्हांस पेशजीं सनद सादर जाहली आहे, त्यास तो दाळपीठ घेत नाहीं म्हणोन तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें, त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी बाळाराम यास कणीक व दाळ मिळोन सवाशेर व तूप दोन पैसेभार याप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून दररोज किल्ले मजकूर पैकीं देत जाणें म्हणोन, नारो महादेव याचे नांवें. छ. २२ जमादिलाखर. सनद १.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

परवानगी रूबरू.

---

(72) Bálárám, Sumersing's son, was sent for imprisonment at fort Sinhgad and orders were issued to provide him with flour (of Jawári or Bájri) and pulse &c. weighing in all $1\frac{1}{4}$ seer.

A. D. 1777-78.

(73) Bálárám objected to receive the flour given to him. Permission was therefore granted to supply him with wheat flour and ghee.

A. D. 1777-78.

७४-(५०५) वेदमूर्ति बाळंभट बिन गणेशभट, व सदाशिव गणेश, उपनाम फाटक गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबे पावस, यांणीं हुजूर किल्ले पुरंदर मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपला भाऊ नारो गणेश फाटक हा सन अर्बा सबैनांत कैलासवासी श्रीमंत नारायणराव साहेब यांसंनिध गर्दींत सरकारकामास आला, आपण कुटुंबवत्सल आहों, योगक्षेम चालला पाहिजे, यास्तव स्वामींनीं कृपाळु होऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ कांहीं जमीन नूतन इनाम करार करून देऊन चालविलें पाहिजे म्हणोन, त्याजवरून सनसीत सबैनांत पांच बिघे भातजमीन इनाम द्यावयाचा करार करून चतुःसीमापूर्वक नेमून द्यावयाविशीं महिपतराव कृष्ण मामलेदार तालुके रत्नागिरि यास छ. ४ साबान सरकारांतून सनद सादर जाली. त्यावरून त्यांणीं मौजे तोडदे तर्फ हरचिरी प्रांत राजापूर येथें पांच बिघे जमीन नेमून देऊन मोजणीचा जाबता चतुःसीमापूर्वक करून दिला, त्यास जमीन दुमाला होऊन आपणाकडेस चालवितों तेच सालीं तोतयाची गडबड जाली, याजमुळें जमीन आपले दुमाला होऊन चालली नाहीं, त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन सनसीत सबैनांत पांच बिघे जमीन नेमून द्यावयाविशीं सनद तालुके मजकूर येथील मामलेदारास सादर जाली आहे, त्याचा दाखला दप्तरचा व मामलेदार मशारनिल्हे यांणीं जमिनीचा मोजणी जाबता करून दिल्हा आहे, तो पाहून त्याप्रमाणें जमीन देववून भोगवटियास इनामपत्रें करून दिल्हीं पाहिजेत म्हणोन, त्याजवरून मनास आणतां त्याचा भाऊ नारो गणेश फाटक हा सन अर्बा सबैनांत तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध गर्दींत सरकार कामास आला, व हे शिष्ट सत्पात्र कुटुंबवत्सल, यांचें चालविल्या(स) श्रेयस्कर जाणोन त्याजवर कृपाळु होऊन पांच बिघे भातजमीन द्यावयाचा करार करून सनसीत सबैनांत महिपतराव कृष्ण मामलेदार तालुके मजकूर यांस सनद सादर केली, त्यास त्यांणीं मौजे मजकूर येथें पांच बिघे जमीन नेमून देऊन मोजणी जाबता करून दिला असतां तोतयाचे गडबडेमुळें जमीन याजकडे चालली नाहीं, हें जाणोन व सुभाचा मोजणीजाबता व दप्तरचा दाखला यांणीं आणून दाखविला तो पाहून त्याप्रमाणें मौजे मजकूरपैकीं जमीन भातशेत. बिघे.

समान सबैन मया व अलफ सवाल ९

---

(74) Náro Ganesh Phátak was killed in the assault made on Peshvá Náráyanrao in Arbá Sabain. His brothers Bálambhat and Sadáshiv were therefore granted, in A. D. 1775-76, land measuring 5 bighas. The inam was not however, actually handed over owing to the disturbance of the Imposter. New sanad was now issued confirming the grant previously made.

A. D. 1777-78.

निसबत भाटकर मळे जमीन.
भातशेत दुपिकी बिघे.
०।३॥ ठिकाण नजीक श्री देव सोमेश्वर.
मूळ काठ्या. अर्ज.
१८ १० ८॥

१८॥
पैकीं निमे ९।
काठ्या १६६॥ एकूण.
चतुःसीमा.
१ पूर्वेस वोढ्याचा पौड.
१ पश्चिमेस देवाची इनामत.
१ दक्षणेस पाट.
१ उत्तरेस वोढा.
—
४
पांड साडे आठ.
०।१ ठिकाण कर्दे कृष्णाजी रुद्र फळणकर.
अर्ज १२ कुल १०
काठ्या १२० यांत
चतुःसीमा.
१ पूर्वेस शेत खालीसा.
१ पश्चिमेस धरणाचे नाक्यावरील बांध.
१ उत्तरेस नदी.
१ दक्षणेस देवाची इनामत.
—
४

किता जमीन बिघे.
०१०४। मळे जमीन.
भातशेत दुपिकी.
निसबत वारपैकीं.
००३॥ निसबत झिमा गुरव.
००१॥ प्रत ९ तुकडा ३॥
काठ्या ३१॥ एकूण.
४०२ प्रत ७॥ वसला ५
काठ्या ३७॥ एकूण.
००३॥ यास चतुःसीमा.
१ पूर्वेस बांध शेत खालीसा.
१ पश्चिमेस शेत भाटकर खालीसा.
१ उत्तरेस भाटकर शेत खालीसा.
१ दक्षणेस पाटाचा बांध.
—
४
साडेतीन पांड.

एकूण सहा पांड जमीन.

एकूण पांच बिघे भातजमीन पैकीं सवातीन बिघे अडीच पांड दुपिकी भातजमीन व दीड बिघा अडीच पांड जमीन गिलावस कडधन व सर्दभात येणेंप्रमाणें चतु:सीमा-पूर्वक कुलबाब व कुलकानू हल्ली पट्टी पेस्तर पट्टी देखील हबसी पट्टी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप सहित, खेरीज हक्कदार करून इनाम तिजाई सुद्धां दरोबस्त, यास नूतन इनाम करार करून दिल्ही असे, तरी मौजे मजकूर पैकीं सदरहू जमीन त्याचे दुमाला करून

देऊन यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें. दरसाल नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या सनदेची प्रति लिहोन घेऊन हे असल सनद याजवळ भोगवटियास परतोन देणें म्हणोन. पत्रें.

३ सनदा.

१ नांवाची.

१ मोकदम मौजे मजकूर.

१ सदाशिव केशव मामलेदार तालुके रत्नागिरि यांस कीं सदरहू पांच बिघे जमीन इनामपत्राप्रमाणें चतुःसीमापूर्वक भटजींचे दुमाला करून देऊन जमिनीचा आकार यांचे नांवें दरसाल इनामखर्च लिहीत जाणें; आणि मागील सनसीत व सब सबैन दुसाला याचे इनामतीचा ऐवज राहिला आहे, तो यांस सुभाहून इतलाख पावता करून हिशेबीं इनामखर्च लिहिणें. तुम्हांस मजुरा पडतील म्हणोन सनद.

३

२ येविशीं चिटणिसी पत्रें.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रांत राजापूर यांस.

१ जमीदार तर्फ हरचिरी सुभा प्रांत राजापूर यांस.

२

५

पांच पत्रें पैकीं तीन सनदा व दोन चिटणिसी पत्रें. रसानगी यादी.

समान सबैन मया व अलफ सवाल ९

७५–(९०६) सदाशिव केशव तालुके रत्नागिरि यास सनद कीं, बाळाजी गणेश फाटक याचा भाऊ नारो गणेश सन अर्बा सबैनांत तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध सरकारकामास आला, सबब त्याची मातुश्री, व स्त्री, व मशारनिल्हे बंधु यांस योगक्षेमार्थ तालुके मजकूर येथें सनसीत सबैनांत अवल सालापासून वेतन खेरीज शिरस्ता सालीना दीडशें रुपये करार करून चाकरी न घेतां वेतन पाववीत जाणें ह्मणोन, महिपतराव कृष्ण माजी मामलेदार मजकूर यांस छ. २ साबानीं सन मजकुरीं सनद सादर जाली, त्यास आसामीचें वतन मशारनि-

---

A. D. 1777-78.

(75 The allowance of Rs. 150 previously granted to Náro Ganesha's wife, mother, and brother for their maintenance was also ordered to be continued.

ल्हेस पावावें, तरी तेच सालीं तोतयाची गडबड जाली याजमुळें सीत व सबा दुसाला वेतन पावलें नाहीं, त्यास मशारनिल्हेचा भाऊ सरकारकामास आला, सबब याची आसामी सीत सबैनापासून वेतन निवळ खेरीज शिरस्ता सालीना रुपये १५० दीडशें चाकरी न घेतां द्यावयाचे करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सनसीत व सबासबैन दुसाला मिळोन वेतन तीनशें रुपये यास पावते करून साल मजकुरापासून याजपासून चाकरी न घेतां आसामीचें वेतन दरसाल तालुके मजकूरपैकीं दीडशें रुपये निवळ खेरीज शिरस्ता पाववीत जाणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी यादी.

७६–(६९४) कमावीस जफ्तीबाबत कुशी बुदरूख बटीक सरकार ही कैलासवासी नारायणराव यांच्या दंग्याचे फितुरांत होती, सबब अटकेस ठेऊन सनगें सरकारांत आणविलीं, ते गुजारत राघो विश्वनाथ गडबोले कारकून शिलेदार सनगें. एकूण आंख.

समानीन मया व अलफ जिल्हेज २

२ लुगडें जुनें १

२९ पातळ साधें धुवट १

२५ धटी जनानी १

५ खादी पासोडी १

९॥। चोळखण ५

.।. बासन छिटी जुनें १

६७

७७–(७९९) कमावीस जप्ती बद्दल बाळाराम सुमेरसिंग याचा लेक याची वस्तभाव मणीराम नागनाथ याजकडे होती, सबब तुकोजी होळकर यांस लिहिलें होतें, त्याजवरून मशारनिल्हेजवळून वस्तभाव आणवून पाराशर दादाजी याजहस्तें सरकारांत पाठविली, त्यापैकीं कापड जमा गुजारत गंगाधर रघुनाथ कारकून शिलेदार व जीवनराम मदनराम दिंमत मणीराम बरहुकूम आंख पटी छ. १ जमादिलाखर सनगें एकूण चौपट आंख.

सलास समानीन मया व अलफ जमादिलाखर १४

---

(76) Kushi, a female slave, being implicated in the disturbance which led to Náráyanrao Peshvá's death was sent to prison and her clothes worth Rs. 67 were attached.

A. D. 1779-80.

(77) Property worth Rs. 1970 belonging to Bálárám, Sumersing's son, which was with Manirám Nágnáth was attached by Tukoji Holkar and sent to the Huzur.

A. D. 1782-83.

८९ तिवटें ३
११९ शेले साधे ३॥
११० पासोड्या ताडपत्री २
१२९ शेला जाफरखानी १
३० चिरा जरी १
७२ गजनी १
७९ पीतांबर मर्दानी १
१० झगा धुवट १
९०० रज़ाई दस्की १
४९० शाला फर्द २, दर २२९
६० छिटें बंदरी ३
२०० तुंबा किनखापी १
१२ हुदा सकलादी १
४० निशाणें ताफ्त्याचीं २
२ बासन छिटी अस्तरें खादी १

१९७०(१८९०) २४॥

७८–(९७२) सुमेरसिंग याचा लेक किल्ले सिंहीगड येथें अटकेंत आहे, त्यास आणविला आहे, तरी दहा प्यादे बरोबर देऊन पक्या बंदोबस्तानें हुजूर पाठवून देणें ह्मणोन, केशवराव जगन्नाथ याचे नांवें. सनद १.

तिसा समानीन मया व अलफ रमजान ११

रसानगी, आनंदराव गणेश बिवलकर.

७९–(१०४६) हणमंता बिन चापाजी पाटील टिळेकर मौजे येखतपूर परगणे सुपें सरकार जुन्नर सुभे खुजस्ते बुनीयाद याणें हुजूर कसबें पुणें येथील मुक्कामीं अर्ज केला कीं, माझा बाप चापाजी पाटील टिळेकर श्रीमंत कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध गर्दीत सन अर्बा सबै-

इसन्ने तिसेन मया व अलफ रमजान २३

---

(78) Sumersing's son, who was under inprisonment at fort Sinhgad, was ordered to be brought to Poona.

A. D. 1788-89.

(79) At the request of Hanmantrao, son of Chápáji Tilekar, who lost his life while defending Peshwá Náráyanrao, he was given the village of Ekatpoor in inam in lieu of a piece of inam land and Pátilki vatan previcusly conferred on him.

A. D. 1791-92.

नांत सरकारकामास आला, यास्तव साहेबीं मेहरबान होऊन मजला मौजे शिरोली बुद्रुक तर्फ हवेली सरकार जुन्नर पैकीं एक चावर जमीन इनाम, व मौजे कुमशेत तर्फ हवेली सरकार मजकूर येथील पाटिलकीचें वतन व वतनसमंधें इनाम जमीन हकदक मानपानसुद्धां सरकारचे होते ते मजला बक्षीस देऊन पत्रें करून दिल्हीं त्याप्रमाणें मजकडे चालत आहे; परंतु माझे सोईची जमीन व पाटिलकीचें वतन नाहीं, तें साहेबीं सरकारांत ठेऊन एक गांव इनाम करार करून देऊन चालविलें पाहिजे ह्मणोन, त्याजवरून मनास आणितां तीर्थरूप कैलासवासी नारायणराव साहेब यांसंनिध याचा बाप सरकारकामास आला, सबब याजला मौजे शिरोली बुद्रुक पैकीं एक चावर जमीन इनाम व मौजे कुमशेत येथील पाटिलकी दिल्ही होती ते याची सोईची नाहीं, सबब सरकारांत ठेऊन याचें चालवणें जरूर जाणोन, याजवरी मेहेरबान होऊन, यास हल्लीं मौजे येखतपूर परगणे मजकूर हा गांव खेरीज बाबतीचा अंमल करून जाहागीर, व मोकासा, व निमचौथाई, व फौजदारी, व सावोत्रा, व सरदेशमुखी कुलबाब कुलकानू हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हकदार व कदीम इनाम करार करून, इनाम तिजाईसुद्धां दरोबस्त जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप सहित, पेस्तरसाल सन सलास तिसैनापासून इनाम सरकारांतून करार करून दिल्हा असे, तर मौजे मजकूर येथील बाबतीचा अंमल खेरीज करून सदरहूप्रमाणें याचे दुमाला करून देऊन यास व याचे लेंकराचे लेंकरीं इनाम चालवणें. दरसाल नवीन सनदेची उजूर न करणें. या सनदेची प्रति लेहून घेऊन हे असल सनद याजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणून सनदा व पत्रें.

५ फडणिसी.

सनदा.

१ नांवाची.

१ मोकदम मौजे मजकूर यांस.

२ मामलेदार यांस कीं, मौजे मजकूर येथील खेरीज बाबतीचा अंमल करून दरोबस्त अंमल कुलबाब कुलकानू खेरीज हक्कदार व कदीम इनामदार करून इनाम तिजाईसुद्धां पेस्तर साल सन सलास तिसैनापासून इनाम करार करून, भोगवटियास अलाहिदा पत्रें करून दिल्हीं असेत, तरी मौजे मजकूर येथील बाबतीचा अंमल खेरीज करून दरोबस्त अंमल इनामपत्राप्रमाणें पेस्तर सालापासून टिळेकर मजकूर याचे दुमाला करून देऊन आकार हिशेबीं इनामखर्च लिहीत जाणें ह्मणोन.

१ आनंदराव त्रिंबक सुभेदार परगणे मजकूर कीं, जाहागीर, व मोकासा, व निमचौथाई, व फौजदारी, व सावोत्रा देखील इनाम तिजाईसुद्धां दरोबस्त अमलाचा करार परगणे मजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहीत जाणें ह्मणोन.

१ रामचंद्र नारायण प्रांत पुणें यांस कीं, मौजे मजकूरचा सरदेशमुखीचा अंमल पुणें सुभाकडे कमाविसीनें आहे, तो टिळेकर मजकूर याचे दुमाला करून देऊन आकार प्रांत मजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहीत जाणें ह्मणोन.

२

१ कृष्णाजी बल्लाळ मामलेदार तालुके शिवनेर यास कीं, हणमंता बिन चापाजी पाटील टिळेकर यास मौजे सिरोली बुद्रुक तर्फ हवेली सरकार जुन्नर पैकीं एक चावर जमीन इनाम, व मौजे कुमशेत तर्फ हवेली सरकार मजकूर येथील पाटिलकीचें वतन, व वतनसमंधें इनाम जमीन, हकदक मानपान सुद्धां सरकारचे होते, ते बक्षीस देऊन पत्रें करून दिल्हीं त्याप्रमाणें चालत आहे; परंतु जमीन व पाटिलकी टिळेकर याचे सोईची नाहीं, याजकरितां सरकारांत ठेऊन, मौजे इ(ये)खतपूर, परगणे सुपें हा गांव, खेरीज बाबतीचा अंमल करून दरोबस्त पेस्तर साल सन सलास तिसैनापासून इनाम करार करून दिल्हा, सबब इनाम जमीन, व पाटिलकीचें वतन सरकारांत ठेविलें, त्याची बेरीज रुपये.

२८९ इनाम जमीन, मौजे सिरोली पैकीं चावर जमीन.

१३५ पाटिलकीचें वतन, मौजे कुमशेत येथील कित्ता.

४२०

चारशें वीस रुपये इनाम जमीन पाटिलकी तालुके मजकुराकडे ठेऊन, सनद तुह्मांस सादर केली असे, तरी पेस्तर सालापासून चौकशीनें आकार करून तालुके मजकूरचे हिशेबीं जमा करीत जाणें ह्मणोन.

५

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशाधिकारी, व लेखक वर्तमान व भावी, परगणे मजकूर यांस.

१ देशमुख, व देशपांडे, परगणे मजकूर यांस.

२

७

एकूण सात सनदा, व पत्रें मिळोन दिल्हीं असेत. रसानगी यादी.

९

मौजे मजकूरचा तनखा देखील सरदेशमुखीसुद्धां बरहुकूम याद. रुपये.
८४४॥

यास तपशील.

३३६॥ जहागीर दरसदे ४० प्रमाणें.

३३६॥ मोकासा व बाबती.

१६८।· मोकासा दरसदे २० प्रमाणें.

१६८।· बाबती दरसदे २० प्रमाणें.

३३६॥·

६७। सरदेशमुखी दरसदे ८ प्रमाणें.

८४ निमचौथाई व फौजदारी.

४२ निमचौथाई दरसदे ५

४२ फौजदारी दरसदे ५ प्रमाणें.

८४

२०। सावोत्रा दरसदे २॥ प्रमाणें.

८४४॥ एकंदर.

यास गांवचा कच्चा आकार कमाविसदार यांणीं लिहून दिल्हा त्याप्रमाणें.

६५० जमिनीचा आकार.

१०० पेठेचा आकार.

१८ बलुतें.

१६ घरजमा वगैरे.

७८४

पैकीं वजा..रुपये.

२०० गांवखर्च.

९० हक्कदार.

२९०

बाकी..रुपये ४९४

किस्ता..रुपये ६

५॥≈ मिरासपट्टी तिसरे सालीं घ्यावी, रुपये १७ पैकीं तिसरा हिसा दरसाल.
।≈ जाजती.

६ ५००

४५४॥। जहागीर, व मोकासा, व बाबती, व निमचौथाई, व फौजदारी, व सावोत्रा.

१९६॥= जहागीर.
९८।- मोकासा.
९८।- बाबती.
२४॥-॥ निमचौथाई.
२४॥-॥ फौजदारी.
१२।- सावोत्रा.

४५४॥।
३९। सरदेशमुखी.
६ मिरासपट्टी तिसरे सालीं घ्यावी, ते दरसाल रुपये ६ सहा प्रमाणें.

५००

पैकीं वजा बाबतीचा अंमल ९८।- रुपये.

बाकी..४०१॥≡ रुपये.

एकूण चारशें दीड रुपया तीन आणे आकाराचा गांव इनाम दिल्हा असे. पेशजीं टिळेकर मजकूर यास इनाम जमीन व पाटिलकीचें वतन सरकारांतून दिल्हें, तेव्हां पत्रें करून दिल्हीं आहेत, तीं घेऊन सरकारांत ठेवावीं, याप्रमाणें मखलाशीचे यादीवर करार आहे, त्यास टिळेकर याजवळ सनदा व पत्रें होतीं ते दप्तरीं माघारीं घेतलीं असेत.

४ मौजे सिरोली येथील एक चावर जमिनीबद्दल.

२ सनदा.
१ नांवाची.
१ मोकदमाची.

२

२ चिटणिसी पत्रें, देशाधिकारी; व देशमुख, देशपांडे.

४

२ पाटिलकी मौजे कुमशेत याचीं पत्रें उधो विरेश्वर याचे नांवें छ. १३ साबान. सनसीत सबैनांत सनद दिल्ही आहे, त्यांत मौजे मजकूरचे पाटिलकीचें वतन सरकारचें आहे, तें टिळेकर यास बक्षीस दिल्हें आहे, तर याचे हवालीं करून चालवणें. पाटिलकीसंमधें भोगवटियास पत्रें करून द्यावीं, त्यास पेशजीं पाटिलकीचें वतन महमद अलमखान यांणीं सरकारांत नजर केलें, ते समई पत्रें दिल्हीं नाहींत ते घेऊन हुजूर पाठवणें; पत्रें त्याजपाशीं नसलीं तर पाटिलकीसीं आपल्यासीं अर्थाअर्थीं संमंध नाहीं; पत्रें पुढें मागें निघालीं तर रद्द असेत; त्याप्रमाणें पत्र घेऊन सरकारांत पाठवणें ह्मणोन पत्र दिल्हें आहे, याजवरून भोगवटियास पत्रें जालीं नाहींत; व टिळेकर याजवळही पत्रें भोगवटियाचीं नाहींत. महमूद अलमखान याचे बेदाव्याचें पत्र होतें तें, व गोत महजर करून घेतला होता, तो माघारा घेतला असे.

१ महमूद अलमखान याचे बेदाव्याचें पत्र सरकारचे नांवें.

१ गोत महजर टिळेकर याचे नांवाचा.

२

दोन पत्रें.

६

एकूण सहा सनदा व पत्रें, पैकीं महमूद अलमखान याचें पत्र सरकारचे नांवें बेदाव्याचें आहे, तें लाखोटा करून जवाहीरखान्यांत ठेवावयास दिल्हें असे. बाकी पांच पत्रें दप्तरीं ठेविलीं असेत.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

२ पेशवे, (ब) सवाई माधवराव पेशवे.

आर्बा सबैन मया व अलफ सवाल २९

८०-(२३) मिरजा खामबेग वल्लद मौला कुलीबेग, वस्ती कजबे विजापूर, परगणे मजकूर, यास चिरंजीव कैलासवासी राव यांणीं मौजे सारवड, परगणे विजापूर पैकीं जमीन निमचावर एकूण बिघे साठ इस्तकबिल मुशाहिरा द्यावयाचा करार करून राजश्री श्रीनिवास पंडित यांस सालगुदस्त नेमून द्यावयासी सनद नेमून दिली, त्याजवरून त्यांणीं मौजे मजकूरपैकीं सदरहू जमीन नेमून देऊन चतुःसीमेचा जाबता करून दिल्हा आहे, तो पाहून यांणीं सरकारांत बहुत दिवस खिजमत केली, यास्तव त्यांचें चालवणें जरूर जाणून यांजवर मेहेरबान होऊन यांस इस्तकबिल मुशाहिरा जमीन दिल्ही होती, ते हल्लीं नूतन इनाम करार करून दिल्ही. इस्तकबिल मोजणी जाबता थलरामगौडापैकीं जमीन रेगड अवल चावर ·॥·

यासी चतुःसीमा.

पूर्वेस सिरगिरी बाबद थल, हल्लीं कजबे लिंगाणा मुनवाड १

* *

पश्चमेस मौजे मजकूरचें गाईरान, त्यापुढें कणमुचनहाल येथील शींव १ आहे.

* *

येणेंप्रमाणें निमचावर एकूण बिघे ६० साठ बिघे जमीन नूतन इनाम करार करून हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खातेहक्कदार करून दरोबस्त इनाम चतुःसीमापूर्वक करार करून दिली असे, येविशीं. सनदा, पत्रें.

२ सनदा.

१ नांवाची.

१ गांवास.

———

२

---

[1] POLITICAL MATTERS.

Matters relating to

PESHWÁ (b) Sawái Mádhavrao.

A. D. 1773-74.

(80) The late Peshwá is in this sanad referred to as चिरंजीव (Chiranjiva.)

३ चिटणिसी.

१ जमीदारास.

१ कमाविसदार व वर्तमानभावी यांस.

१ श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी.

———

३

———

५ रसानगी यादी.

पुण्यांत पेशजीं पत्रें दिलीं आहेत, तीं दप्तरीं बार झालीं आहेत, तीं दूर करून हीं पत्रें बार करणें.

८१–(३८) पुण्याचे वाड्यांत इतबारी लोक रखवालीस ठेविले पाहिजेत, याजकरितां किल्ले सातारा येथून शंकराजी नाईक घुले कुलाबकर व नंदगीरकर लोक यांस हुजूर पाठविणें. आपाजी पायगुडे याजकडील दीडशें लोक पहिले नेमिले आहेत, ते किल्यावर गेलेच असतील. हल्लीं पायगुड्यांकडील पन्नास लोक नेमिले आहेत, ह्मणजे दोनशें लोकांची भरती जहाली ह्मणोन, नागोजी शिंदे, व बाबूराव किल्ले सातारा यांस. सनद १.

आर्बा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

रसानगी, लक्ष्मण आपाजी कारकून शिलेदार.

८२–(४३) महाराज राजश्री छत्रपति स्वामींकडून पेशवाईचीं वस्त्रें घ्यावयास सातान्यास गेले, तेथें वस्त्रें दिलीं, ते समईं जवाहीर दिलें, विद्यमानें महादाजी नीळकंठ किंमत रुपये.

आर्बा सबैन मया व अलफ रविलावल १६

जडाव दागिने किंमत रुपये.

१ शिरपेंच, घाट मीनगोर किंमत रुपये ९४७।

शहत.

---

(81) It being necessary to keep trustworthy men to guard the palace at Poona, Nágoji Ṣinde and Báburao of Satára fort were ordered to send Shankaráji Naik Ghule Kulábekar and the men of Nandgir serving at the fort.

A. D. 1773-74.

(82) The Peshwá having gone to Satára to receive the clothes of office, received along with the clothes, some ornaments, a list of which is given in the jamá portion of this day's diary.

A. D. 1773-74.

१ पाच मदनाईक छपेलु.
३६ हिरे हिरकण्या.
२ पाच किर्डे बाजूस.
६ माणकें चुणी.
१ मोतीं कलमे, रती ९॥

४६
१ जगो, घाट साधा किंमत रुपये ४०२
शहत.
३१ हिरवे हिरकण्या.
४९ माणकें चुणी.
१ मोतीं कलमे.

८१
१ कंठी, किंमत रुपये ११९३
शहीत.
८ धुगधुगी, किंमत रुपये ११९
१ माणिक मदनाईक.
६ हिरकण्या.
१ मोतीं कलमे.

८
५९ मोत्यें माळेस, वजन टाक ४॥।४। चवी १९४ दर ७ प्रमाणें किंमत रुपये. १०५८(१०७८)

---

६० (मोत्यें).
१ तुरा मोत्यांचा, समेत दांडी किंमत रुपये १३३२॥।=
४६२ मोत्यें, सर १४ दर ३३ प्रमाणें वजन टाक १६॥१, चवी १९४॥ दर चवीस रुपये ६॥। प्रमाणें किंमत रुपये १३१२॥।=
५ दांडी रुपें मुलामा सोनेरी एकूण किंमत रुपये २०
१ हिरकणी.
१ पाच किर्डा.

३ चुणी.

५

४६७

१ तरवार, निमचा घाट साधा किंमत रुपये.

५०६ दरज लोखंडी, त्याजवर जडाव किंमत रुपये.

१३३ हिरे हिरकण्या.

२ हिरे लोलक थोर.

१३१ प्रत हिरकण्या.

१३३

३७२ माणकें चुणी.

१ पाच किर्डा.

५०६

२९ खर्डा १ एकूण लटकता नथणीस किंमत रुपये.

४ हिरे.

२५ चुणी.

२९

४ सोनें शहीत मीनगोर किंमत रुपये.

२ झुबी लटकती नथणीस.

२ आवले.

४

५३९

५

मोत्यें चवकडा मालोल किंमत रुपये. मोत्यें हुरमोजी रंग, वजन रती २३॥। एकूण किंमत रुपये २६०० रुपये.

मोत्यें ४

सोनें दूड करण्यास दर तोळा रुपये १९। प्रमाणें रुपये १९।= सोनें वजन तोळे १।-।

सोनें सुमारी दागिने, किंमत रुपये २४७॥‸

१ पडदळे मखमली लाल आंत वादी सांबरी, किंमत रुपये १८७॥‸ रुपये.
कड्यासहित.

२ खंजिऱ्याच्या कड्या थोर, आजमासें तोळे १०

२ माणकेच्या कड्या लहान, एकूण आजमासें तोळे २॥

४ १२॥

२ शिक्का, मोर्तब सोकटी सोन्याची छापे रुप्याची, किंमत रुपये ६०.

१ शिक्का, राजाराम नरपति हर्षनिधान माधवराव नारायण मुख्य प्रधान, सोनें रुपये.

१ मोर्तब लेखन. शिक्का.
सोनें. रुपें.

२ २४७॥‸

३

शिक्के दौत तीन पुडी, रुप्याची, वजनी किंमत रुपये भार ६४॥‸
एकूण रुपये वजन ६०।‗ तोळे.

दागिना १.

कट्यार लोखंडी हरजिनसी ताड्यास मुलामा सोनेरी तहमद रुपें, किंमत रुपये ९.

दागिना १.

८३-(५१) वेदमूर्ति महादेव जोशी बिन नारायण जोशी पावसकर यांणीं वैशाख अधिक शुद्ध सप्तमी सोमवारीं पुत्रउत्साह होईल ह्मणोन प्रश्न सांगितला होता, त्याप्रमाणेंच पुत्रउत्साह जाला, सबब त्यांस इनाम जमीन शंभर रुपये सरकारआकाराची देखील इनाम तिजाईसुद्धां दरोबस्त द्यावयाची करार करून हे सनद लिहिली असे, तरी सदरहू प्रमाणें शंभर रुपये आकाराची जमीन प्रांत वाई पैकीं कृष्णातीरीं नेमून देऊन जमीन चालती करणें, आणि चतुःसीमेचा

आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

(83) Mahádeo Joshi bin Náráyan Joshi of Páwas had predicted that a son would be born on Vaishákh Adhik Shudha 7th, Monday. The prediction being fulfilled, land worth Rs. 100 was given in inam (This evidently refers to the birth of Sawái Mádhavrao.)

A. D. 1790-91.

जाबता हुजूर लिहून पाठवणें, त्याप्रमाणें इनामपत्रें करून दिल्हीं जातील. सदरहू शंभर रुपये आकाराची जमीन इनाम चालऊन इनामखर्च लिहीत जाणें ह्मणोन, हैबतराव भवानी शंकर याचे नांवें. सनद १.

८४–(५५) चिरंजीव गंगाबाई यांस पुत्र जाहला; या उत्साहास्तव बंदिवान किल्यास आहेत, त्यांपैकीं चिरंजिव राजश्री दादासाहेब यांजकडील प्रकरणाचे पेशजींचे व हल्लींचे असतील, ते तर सोडावयाचे नाहींतचः बाकी दुसरे हुजुरून पेशजीं पाठविले असतील, व तालुके मजकुरींहून ठेविले असतील, त्यांपैकीं भारी अन्यायाचे असतील ते अटकेंत ठेऊन, थोडक्या अन्यायाचे असतील ते सोडून देणें; आणि सोडून दिल्याचा व अटकेंत राहिल्याचा झाडा सबब लाऊन हुजूर पाठविणें ह्मणून, सौभाग्यवती पार्वतीबाई यांचे नांवच्या सनदा.

आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

१ बाळाजी गणेश, तालुके देवगड.
१ महादाजी रघुनाथ, तालुके विजयदुर्ग.
१ महिपतराव कृष्ण, तालुके रत्नागिरि.
१ कृष्णाजी लक्ष्मण, तालुके अंजणवेल.
१ मोरो बापूजी, तालुके सुवर्णदुर्ग यास कीं सदरहू खेरीज पेशजीं ज्यांणीं सोनाराचा मूल मारिला ते अटकेंत आहेत, त्यांस न सोडणें ह्मणोन सनदेंत लिहिलें आहे.
१ गोविंदराव चिमाजी माणकर, प्रांत राजपुरी.
१ आनंदराव शिंदे, तालुके रेवदंडा.
१ राणोजी बलकवडे, तालुके जयदुर्ग ऊर्फ उंदेरी.
१ गणपतराव कृष्ण, तालुके रायगड.
१ भिकाजी महादेव, तालुके उरण.
१ आनंद रामराव, तालुके साष्टी.
१ वामनाजी हरी, तालुके कल्याण भिंवडी.
१ रामचंद्र खंडेराव, तालुके बेलापूर.
१ दुर्गोजी शिंदे, किल्ले माहुली.

---

(84) Orders were issued in the name of Lady Párvatibái (सौभाग्यवती पार्वतीबाई) to the officers of the various provinces to release prisoners confined for minor offences, in honor of the birth of a son to Lady Gangábái (चिरंजीव गंगाबाई). They were distinctly warned not to release prisoners confined for their connection with Dádásaheb, nor those confined for grave offences.

A. D. 1790-91.

१ भिकाजी गोविंद, मामले कोहाज.
१ रामचंद्र कृष्ण, तालुके बीरवाडी.
१ गणेश त्रिंबक, तालुके अवचितगड.

३ प्रांत वसई.

१ त्रिंबक विनायक.
१ गणजी चंदरराव मोरे, जंजिरे वसई.
१ अण्णाजीराव बोकसे, जंजिरे अर्नाळा.

३

१ विसाजी केशव, किल्ले पारनेर.
१ भागोजी बालकवडे, किल्ले डबई.
१ जगन्नाथ नारायण, किल्ले आशेर.
१ बाळकृष्ण केशव, तालुके पटा.
१ कृष्णाजी विश्वनाथ, किल्ले मजकूर दुंढे.
१ बाजीराव आपाजी, तालुके घोडोप.
१ काशी बल्लाळ, तालुके त्र्यंबक.
१ परशराम त्रिंबक, तालुके कावनई.
१ उधो विरेश्वर, तालुके शिवनेर.
१ महादाजी नारायण, किल्ले अहमदनगर.
१ (२) रामचंद्र शिवाजी, यांचे नांवें.

१ किल्ले नारायणगड.
१ किल्ले सोलापूर.

२

१ धोंडो महादेव, किल्ले दौलताबाद.
१ आनंदराव भिकाजी, किल्ले कारीगड.
१ रामराव नारायण, तालुके राजमाची.
१ शामराव जगजीवन, किल्ले चंदन, व नांदगिरी, व ताथवडा.
१ जयराम कृष्ण, किल्ले प्रतापगड.
१ नागोजी शिंदे, व बाबूराव कृष्ण, किल्ले सातारा.
१ आनंदराव भिकाजी, किल्ले सिंहगड.

१ नारायणराव कृष्ण, किल्ले चाकण.
१ मोरो विश्वनाथ, किल्ले दारोगड.

४१

एकेचाळीस सनदा छ. १० सफर. परवानगी रूबरू.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

८५ (६१) पुत्रउत्साह, मातुश्री गंगाबाई यांस पुत्र जाहला, सबब खर्च जाहला तो. रुपये.

आर्बा सबैन मया व अलफ रविलावल २२

६५३६८= छ. ६ सफर.

६५१७ पुत्र जाहल्याचें वर्तमान पुरंदराहून आलें, ते समई ब्राह्मणांस भूयसी दक्षणा वांटली ते रुपये.

६४९६ नवे पागेंत, विद्यमान वासुदेवभट कर्वे उपाध्ये.

५२८२ ब्राह्मण असामी ५२८२

१२१४ पुर्ठ्ये, व गुजराथी, व बायका, मुलें, असामी २४२८, दर ॥ प्रमाणें.

६४९६ ७७१०

२१ वाड्यांतील वगैरे असामी, गुजारत रामाजी काशी वाकनीस ब-

FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

A. D. 1773-74.

(85) Rs. 7794-3 were expended at Poona on the occasion of the birth of a son to Lady Gangábái. The amount was spent in giving alms to Brahmins, rewards to singers, and musicians, donations to the various deities, feeding the Bráhmins and performing certain religious ceremonies. The details are given in full (we find in these details the names of all the important deities in Poona then existing, and their destination.) The festivities commenced on the 6th Safar when news of the birth was received in Poona.

द्दल यादी.	असामी.

१७ वाड्यांतील.

३ आश्रित.

३ हरकारे.

७ शागीर्द.

२ निसबत गोदूबाई देशमुखीण.

२ पुठ्ठे प्यादे.

१७

५ निसबत नारो आपाजी.

२२

दक्षणा.	रुपये.

२० प्रत असामी २० टगे.

१ पुठ्ठे २, दर ॥.

२१

६५१७

१९८= लोक दिंमत हुजूर असामी ३०६ पागेंत ब्राह्मणांचे बंदोबस्तास होते, त्यांस पोस्ताबद्दल दर ४~ प्रमाणें.

६५३६८=

५० छ. ७ सफर, रवानगी यादी दोन.

९ कसबे पुणेकर महार वोवाळावयास आले त्यांस.

४० कळवातांचे ताफे.

१ अजब कुवर.

१ नूरी रहिमत.

१ सगुणी.

१ पंनाशहरवाली.

४

दर ताफेयास रुपये १० प्रमाणें.

९ फेजखान वल्लद अंमलखान, व कालेखान गवई यांस.

९०

१४ छ. १० सफर, ब्राह्मणांस भूयसी दक्षणा वांटावयास अधेल्या खरेदी केल्या त्यास बट्टा पडला, तो गुजारत बाळाजी नाईकजी पोतदार अधेल्या सुमार २८०० एकूण रुपये १४०० दर शेकडा रुपये १ प्रमाणें याद.

१४९॥।≡ छ. ११ सफर, देवास दक्षणा वगैरे, गुजारत रामाजी काशी वाकनीस बद्दल याद. रुपये.

१४९८‍ श्रीदेव वास्तव्य पुणें यांसी.

६०।‍ महादेव.

४३।‍ मोहरा नाणें.

१ श्रीनागेश्वर.

१ वृद्धेश्वर, मौजे बांभोर्डे (भांबुर्डे)

१ देवदेवेश्वर, पर्वतीस.

३

दर १४।≡ प्रमाणें.

नक्त. रुपये.

१ सिद्धेश्वर, मंगळवारांतील.

१ केदारेश्वर, सोमवारांतील.

१ त्रिंबकेश्वर, वेव्हार आळींतील.

१ केदारेश्वर, गणपतीजवळ.

१ नळिकंठेश्वर, मजमदाराचे घरानजीक.

१ स्वयंभू, दुर्जनसिंगाचे हवेली नजीक.

१ रामेश्वर, शुक्रवारपेठेंतील.

१ काशीविश्वेश्वर, तुळशीबागेंतील.

१ रामेश्वर, योगेश्वरीचे देवळांतील.

१ हरिहरेश्वर, शनवारांतील.

१ पंचलिंग, पुलावरील.

१ अमृतेश्वर.

१ सिद्धेश्वर.

१ ओंकारेश्वर.

१ त्रिंबकेश्वर, बांबवडें यांतील.

१ महादेव, बुधवारपेठेचे विष्णूचे देवळांतील.

१ महादेव, बुधवारांतील.

६०।-

२२।≡ श्रीविष्णु.

१४।≡ विष्णु, वास्तव्य पर्वतीयास.

मोहरा. नाणें १ एकूण.

नक्त. रुपये.

१ विठोबा, गंजांतील.

श्रीविष्णु.

१ व्यंकटेश, तोफखान्याजवळ.

१ रामचंद्र, तुळशीबागेंतील.

१ लक्ष्मीनारायण, बुधवारपेठेंतील.

१ वेंकोबा, बुधवारांतील.

१ कृष्णनाथ, अमृतेश्वराचे देवळांतील.

१ कृष्णाजी नाईक दातार याचे धर्मशाळेंतील.
१ विठ्ठल जोती पंताचा.

२२।≡

२१।≡ श्रीगणपति.

१४।≡ गांवांतील गणपतीस मोहरा नाणें १.

नक्त. रुपये.

१ गणपति, आदितवारपेठें-तील.
१ सोमवारपेठंतील नजीक चावडी.
१ शनवारपेठेंतील मातीचा गणपति.
१ वाड्याचे कमाणी दरवाज्या नजीक.
१ योगेश्वरीचे देवळांतील.
१ मोरेश्वर, तुळशीबागेंतील.
१ मोरेश्वर, बुधवारांतील वि-ष्णूचे देवळांतील.

२१।≡

२०।≡ हनुमंत.

१४।≡ शनवारपेठेंतील. मोहर नाणें १

नक्त. रुपये.

१ अमृतेश्वराचे देवळांतील.
१ बुधवारांतील झेंड्यानजीक.
१ रविवारांतील.
१ सोमवारांतील.
१ गणेशपेठेंतील.

१ शुक्रवारांतील.

२०।≡

१४।≡ महादोबा, कसब्यांतील यास मोहर नार्णे १.

१० कित्ता.

१ बहिरव, कसब्यांतील.
१ पद्मोबा.
१ बालोबा मुंज्या.
१ वेताळ, शुक्रवारांतील.
१ शेखसल्ला.
१ शेख साद.
१ बाबदेव.
१ मुंज्या, पार्गेतील.
१ योगेश्वरीचे देवळांतील पिंपळाखालील देव.
१ म्हसोब्या, लकडखान्यांतील.

१०

१४९८

।।।≈ जागा जागाचे देवांस दक्षणा पाठविली, त्यास विड्याबद्दल पानसुपारीस पाठविले खुर्दा टक्के.

।· भीमाशंकर.
।· विठोबा, पंढरपुरास.
।· योगेश्वरी, आंबे जोगाईचें.
।· भवानी, तुळजापूरची.
।· शंभुमहादेव.
।· त्रिंबकेश्वर.
।· भवानी, वेहरची.
।· गणपति, वास्तव्य पुळें.

।· यवतेश्वर.

।· श्रीत्रिंबकेश्वरास.

।· सप्तशृंगचे भवानीस.

दर ३॥।६ (?) प्रमाणें.

७२॥।= बारशाचे दिवशीं वाड्यांत ब्राह्मणभोजन जालें त्यास. रुपये.

१९८= खरेदी जिन्नस एकूण.

१६।= दूध वजन ८४॥ पक्के, दर ८।१ प्रमाणें.

१॥। आंबे हिरवे कडीस सुमारें ८००

१ भोपळे काळे भाजीस

१२ एकूण.

१९८=

९३॥। मजुरीखर्च.

९१ स्वयंपाकास आच्यारी वगैरे रोजकरी ठेविले त्यास.

१६ आच्यारी असामी १६ दर १ प्रमाणें.

१८ पुर्णाच्या पोळ्या करावयास असामी ३६

बारशाचे दिवशीं ब्राह्मणभोजन जाहलें त्यास.

मजुरीखर्च रुपये.

स्वयंपाकास आसामी.

रुपये. एकूण.

१२॥ पुरण वाटावयास व कणीक तिंबण्यास असामी २० दर ॥= प्रमाणें.

४॥ खटपट्ये असामी ९(९), दर
-॥-

५१

२॥। उष्टीं काढावयास गुजारत.
हरी. नातु.
निसबत नारो आपाजी. असामी ४२
खुर्दा टक्के १०॥, दर ३॥।६ प्रमाणें.

९३॥।

७२॥।=

७३(?)

१ छ. १९ रोज माहे सफर कसबे पुणेकर कुंभारास इनाम रसानगी चिठ्ठी. रुपये.

११३। छ. २१ सफर.
८ मेहेत्रे असामी ४
१ ढवला.
२ ढवळ्या निसबत मोहतर्फा.

११

१०२। नामकर्णा निमित्य छ. १६ सफरीं वाड्यांत ब्राह्मणभोजन जाहलें, त्या[स] दक्षणा पात्रावर दिल्ही, ते ब्राह्मण असामी ३०६८, दर असामीस खुर्दा रुके ८६ प्रमाणें टक्के ३८३॥ दर ३॥। टक्के प्रमाणें.

११३।

४५३॥- छ. २३ सफर, जागा जागाचे देवास दक्षणा पाठविली.

४४७॥- मोहोरा पंचमेळ बरहुकूम पत्र पुरंदर.
नाणें.

७ दिवें श्रीवर्धन येथें बरोबर रामचंद्र कृष्ण भातखंडे.

२ श्रीहरिहरेश्वर व कालभैरव.

१ श्रीउत्तरेश्वर दिवें.

४ श्रीवर्धन येथील.

१ श्रीजीवनेश्वर.

१ श्रीनारायण.

१ भैरव.

१ सोमजाई.

४

७

४ महिपतराव प्रल्हाद कमाविसदार परगणे इंदापूर वगैरे याजवळ दिल्या नाणें.

१ शंभुमहादेव.

१ योगेश्वरी, आंबें.

१ भवानी, तुळजापूरची.

१ विठोबा, पंढरपूर.

४

८ बाळाजी महादेव कारकून दिंमत नारो आपाजी सुभा प्रांत पुणें या बरोबर.

१ श्रीगणपति, वास्तव्य थेऊर.

१ श्रीमोरेश्वर, वास्तव्य मोरगांव.

१ श्रीफिरंगाई, कुरकुंब.

१ श्रीगणपति, वास्तव्य सिद्धटेक.

१ श्रीमार्तंड, जेजुरीस.

१ श्रीगणपति, रांजणगांव.

१ श्रीभुलेश्वर.

१ श्रीसोमया, करंजें.

८

३ कृष्णराव अनंत याजकडे सातारियास पाठविल्या त्यांणीं पावत्या कराव्या, बरोबर लोक चंदनगडकरी तसलमात सदाशिव बाबाजी कारकून.

१ श्रीयेवतेश्वर.

१ श्रीमहाबळेश्वर.

१ श्रीमहालक्ष्मी, कोल्हापुरीं.

३

२ भास्कर बल्लाळ याजकडे आनंदवल्लीस पाठविले, त्यांणीं पावत्या कराव्या, बरोबर आवजी घंगाला, व गंगाजी वाईकर प्यादे दिंमत मुदफर्क आनंदवल्लीकर.

१ श्रीत्रिंबकेश्वरास.

१ सप्तशृंगचे भवानीस.

२

१ श्रीभीमाशंकर, यास तसलमात केसो बल्लाळ चासकर.

२ गोविंद त्रिंबक कारकून दिंमत रामराव नारायण तर्फ राजमाची याजवळ.

१ भवानी, वेहेरची.

१ श्रीबल्लाळेश्वर, पालीस.

२

१ श्रीबनेश्वर, यासी लक्ष्मण कृष्ण कारकून याजकडे रवाना, बरोबर रामचंद्र अनंत कारकून दिंमत हुजूर हशम.

१ श्रीवज्रयोगिणीदेवीस, तसलमात हरी कृष्ण कारकून दिंमत त्रिंबक विनायक सरसुभा प्रांत कोंकण.

१ श्रीगणपति, वास्तव्य पुळें यासी तसलमात भास्कर राम कारकून दिंमत महिपतराव कृष्ण तालुके रत्नागिरि.

१ श्रीसिद्धेश्वर, वास्तव्य टोकें यासी तसलमात कृष्णाजी बल्लाळ कारकून नेवासें वगैरे महाल निसबत नारो आपाजी.

२१

दर १४।≡ प्रमाणें. रुपये.

६ नक्त दिवे श्रीवर्धन येथील देवास, बरोबर रामचंद्र कृष्ण भातखंडे, रसानगी याद, मुक्काम पुणें. रुपये.

३ श्रीउत्तरेश्वरासंनिधचे देवास.

१ बाबदेव.

१ भैरव.

१ एकवीरा.

३

१ श्रीकाळकाई, कारलेकर.

१ स्थानपुरुष, आगर श्रीवर्धन.

१ श्रीकुसबा देवी, आगर श्रीवर्धन.

६

४५३॥ -

१८१॥ किता छ. २३ सफर, वाड्यांत रात्रीवगार्स ब्राह्मण लाविले होते, त्यास इस्तकबिल छ. ७ सफर तागाईत छ. १७ मिनहू रोज ११

बरहुकुम याद गुजारत रामाजी काशी वाक-
नीस. रुपये.

१६५ रात्रीवर्गाचे ब्राह्मणांस दक्षणा. असामी.

१ भिकजोशी पंचनदीकर.
१ नारायण जोशी.
१ बाळकृष्णभट खरे.
१ बाळंभट पटवर्धन.
१ बापूभट पाळंद्ये.
१ गंगाधरभट विध्वंस.
१ सदाशिव दीक्षित मालवणकर.
१ आपा जोशी गोलपकर.
१ गोपाळभट दात्ये.
१ बाळदीक्षित वाके.
१ दिवाकरभट माले.
१ बाळकृष्णभट छत्रे.
१ विरेश्वरभट कर्वे.
१ विश्वनाथभट गोडसे.
१ चिंतामणदीक्षित मालवणकर.
१ मथुराभट काशीकर.
१ मोरभट जोगळेकर.
१ आबाभट दांडेकर.
१ महादेवभट वैद्य.
१ रामचंद्रभट केळकर.
१ रघुनाथभट पुरंदरे.
१ जनार्दन जोशी गोळपकर.
१ त्रिंबकभट मराठे.
१ दिनकरभट ढेकणे.
१ परशरामभट दांडेकर.
१ बाबूभट गोखले.
१ विनायकदीक्षित आपटे.
१ नरसा वधाजी (नरसिंह दाजी?)

१ रामकृष्णदीक्षित बापट.
१ गंगाधरभट टोळ.
१ बाळकृष्णभट पांवसे.
१ जयरामदीक्षित टुल्लु.
१ बाळदीक्षित गडबोले.
१ गोपीनाथभट दातार.

दर असामीस पुतळी १ प्रमाणें ताटे ३४ तोळे १०।·।, दरतोळा रुपये १६॥~

११ खरेदी मिठाई पेढे वजन पक्के ॥२ दर ८॥२ प्रमाणें.

९॥ दररोज रामरक्षा व मंत्राक्षत पुरंधरास पाठवावयास ब्राह्मण असामी २ ठेविले होते, त्यांचे रोज २२ दररोज रुपये ।· प्रमाणें.

१८१॥

२॥।~ छ. ३० सफर, बारशाचे दिवशीं वाड्यांत ब्राह्मणभोजन जालें, त्यास छ. २६ सफरीं खरेदी पानें द्रोणास एकूण खुर्दा टक्के १०॥।३ दर ३॥।३ प्रमाणें बरहुकुम याद, गुजारत रामाजी काशी वाकनीस. रुपये.

८२॥ छ. ६ रविलावल, हेलकरणी बायकांस द्यावयास लुगडीं खरेदी केलीं, त्यास दर रुपयास नफा ८=॥ प्रमाणें द्यावा, त्यास हल्ली शिक्का रुपये द्यावयाचे करार करून दर रुपयास अडीच आणे प्रमाणें नफा द्यावा, याप्रमाणें करार केला, त्या बरहुकुम खरेदी लुगडीं एकूण रुपये ११००० एकूण दरसदे रुपये ·॥।· प्रमाणें बट्टा पोते चाळीस. रसानगी याद. रुपये.

२ छ. ९ सफर रुजू रविलावल, आपा जिनगर याणें सरकारच्या वाड्यांत दरवाज्यास तोरण बांधिलें, सबब इनाम. रसानगी यादी. रुपये.

१४॥= छ. १२ रविलावल, सेखसला पीर पुणें यास पे-

शर्जी एक रुपया ठेविला होता, त्याखेरीज हल्लीं ठेविली मोहर, नाणें पंचमेळी एकूण. रुपये.

रसानगी याद.

१२० छ. १२ रबिलावल, वाजंत्री वगैरे वाड्यांत दहा दिवस वाजवीत होते, त्यांस बिदाई रसानगी चिटी.

८९ वाजंत्री ताफे यास.

७५ प्रत ताफे ७५ एकूण.

३ प्रत ताफे ६

९ प्रत ताफे ३

२ प्रत ताफा १

———

८९

१२ होलार ताफे १२

१८ कर्णेकरी असामी ३६

१ तुतारीवाले असामी २

———

१२०

———

७७९४४≡

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

८६–(१०६) वेदमूर्ति राजश्री महादेव ज्योतिषी बिन नारायण ज्योतिषी पावसकर, गोत्र शांडिल्य, सूत्र आश्वलायन, वास्तव्य कसबे पुणें यांणीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं विदित केलें कीं, श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांस सालगुदस्त सन अर्बा सबैनांत वैशाख शुद्ध सप्तमीस पुत्रोत्साह होईल म्हणोन आपण प्रश्न सांगितला, त्याप्रमाणें घडोन आला, यास्तव आपल्यावरी कृपाळु होऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ श्रीकृष्णातीरीं प्रांत वाई पैकीं शंभर रुपये आकाराची जमीन नूतन इनाम द्यावयाचा करार करून चतुःसीमापूर्वक नेमून देऊन जाबता हुजूर पाठवणें, त्या-

खमस सबैन
मया व अलफ
रमजान २९

---

(86) A piece of land was ordered to be given to Mahádeo Jotishi bin Náráyan Jotishi Pâwaskar, residing at Poona, for his having fore-told that Lady Gangábái would give birth to a son on the 7th Vaishákha Shuddha. The measurements of the inam were now reported by the Mamlatdar of Wâi for confirmation, and the inam was confirmed.

A. D. 1774-75.

प्रमाणें इनामपत्रें करून दिल्हीं जातील म्हणोन, राजश्री हैबतराव भवानी शंकर मामलेदार प्रांत मजकूर यांस सालगुदस्तां सनद सादर जाली, त्याजवरून त्याणीं श्रीकृष्णातीरीं कसबे बावधन संमत हवेली प्रांत मजकूर पैकीं शंभर रुपये पावणेतीन आणे आकाराची जमीन साडेसवीस बिघे सवाचार पांड नेमून दिली, त्याचा मोजणी जाबता कसबे मजकूरचे मोकदमांनीं करून दिला आहे, तो पाहून त्याप्रमाणें स्वामींनीं कृपाळु होऊन भोगवटियास इनामपत्रें करून दिलीं पाहिजेत म्हणोन; त्याजवरून मनास आणतां यांणीं प्रश्न सांगितला तो घडोन आला, यास्तव यांस कृष्णातीरीं प्रांत मजकूर पैकीं जमीन शंभर रुपये आकाराची नूतन इनाम द्यावयाचा करार करून चतुःसीमापूर्वक नेमून द्यावयाविशीं हैबतराव भवानी शंकर मामलेदार प्रांत मजकूर यांस सालगुदस्त सनद सादर केली, त्याजवरून त्यांणीं कसबे मजकूर पैकीं शंभर रुपये पावणेतीन आणे आकाराची जमीन साडेसवीस बिघे सवाचार पांड नेमून दिली, त्याचा मोजणी जाबता तुम्हीं करून दिला आहे, तो पाहून हे शिष्ट सत्पात्र कुटुंबवत्सल स्नानसंध्यादि षट्कर्माचरण करून आहेत, यांचें चालविल्या, स्वामींस व स्वामीचे राज्यास श्रेयस्कर, हें जाणून यांजवरी कृपाळु होऊन यांस कसबे मजकूर पैकीं बरहुकूम मोजणी जाबता जमीन बिघे.

८१३।२। तर्फ पिसाळ दर बिघा रुपये ३।।। प्रमाणें रुपये १०४~।।। एकूण जमीन. बिघे.

८७८३ सेत जानोजी बिन विठोजी पिसाळ, दर बिघा रुपये ३।।। प्रमाणें रुपये २६।।।~

एकूण जमीन बिघे ८७८३

यासी चतुःसीमा.

पूर्वेस खंडु दारव याजबद्दल दळा. पश्चिमेस निंबाजी तेली याजबाबत दळा १

दक्षणेस कुबाजी पिसाळ याजबद्दल दळा १ उत्तरेस महाल ओढा कोरडा.

* * * * *

एकूण साडेसवीस बिघे सवाचार पांड जमीन शंभर रुपये पावणेतीन आणे आकाराची सदरहू प्रमाणें चतुःसीमापूर्वक स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा देखील सरदेशमुखी दरोबस्त इनाम तिजाईसुद्धां कुलबाब कुलकानू हलीं पट्टी व पेस्तर पट्टी खेरीज हक्कदार करून जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप सहित नूतन इनाम यास सरकारांतून करार करून दिल्ही असे, तरी कसबे मजकूर पैकीं साडेसवीस बिघे सवाचार पांड जमीन सदरहूप्रमाणें यांचे दुमाला करून देऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें; दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें; या सनदेची प्रति लेहून घेऊन हे असल सनद ज्योतिषी यांजवळ भोगवटियास परतोन देणें म्हणोन. सनदा, व पत्रें.

२ सनदा.

१ नांवाची.

१ मोकदम कसबे मजकूर.

२

३ चिटणिसी. पत्रें.

१ देशाधिकारी, लेखक वर्तमान व भावी, प्रांत मजकूर.

१ देशमुख, व देशपांडे, परगणे मजकूर.

१ हैबतराव भवानी शंकर मामलेदार, प्रांत मजकूर यांस.

३

५

दोन सनदा, व तीन पत्रें दिल्हीं असत. छ. २६ रमजान.

रसानगी यादी.

८७–(१०७) कमाविसभेट राजश्री रावसाहेब यांस अन्नप्राशन संस्कार केला, सबब आहेराबद्दल महिपतराव कृष्ण साठे याजपैकीं जमा, गुजारत येसाजी शेटगा खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपये.

खमस सबैन मया व अलफ रमजान

१५ तिवट	१
२० जाफरखानी	१
३५	२

८८–(१११) नानाजी चिंतामण पुरंदरे, जोशी, कुळकर्णी, व देशपांडे, कसबे सासवड यांचे घरीं खासा स्वारी मुहूर्तेंकरून गेली होती, सबब मशारनिल्हे यांस नूतन इनाम जमीन बिघे ४२० वीस बिघे दर बिघा सवा रुपयाचे प्रतीची सासवडानजीक पांच कोशांमध्यें द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहू वीस बिघे जमीन सवा रुपया बिघ्यास दराची मशारनिल्हेस नेमून देऊन त्याची चतुःसीमा करून जाबता हुजूर पाठवणें, याप्रमाणें इनाम पत्रें करून दिल्हीं जातील म्हणोन, नारो आपाजी याचे नांवें. सनद १.

खमस सबैन मया व अलफ रमजान २१

रसानगी याद.

---

(87) The infant Peshwá having commenced to eat food, a present of clothes was received.

A. D. 1774-75.

(88) The young Peshwá having gone to the house of Nánáji Chintaman Purandare, Joshi, Kulkarni, and Deshapánde of Kasbe Sâswad, on an auspicious day, a grant of inam land was made to the family.

A. D. 1774-75.

८९–(१३४) देणें येसूबाई सोहनी यांणीं मातुश्री गंगाबाई यांचें सुईणपण केलें, सबब सांखळी सोन्याची सोनें वजनी दागिना, निसबत सौभाग्यवती पार्वतीबाई, पैकीं परवानगी राजश्री सखाराम भगवंत, व बाळाजी जनार्दन फडणीस, विद्यमान सौभाग्यवती पार्वतीबाई, रसानगी व तसलमात बाजी बल्लाळ परांजपे, दर तोळा रुपये १९॥ प्रमाणें, किंमत रुपये ३३६।≈

खमस सबैन मया व अलफ मोहरम २

एकूण सोनें वजन तोळे २१॥≈॥, छ. २२ रोज सोनें वजनी दागिना १

९०–(१७८) जमा जामदारखाना.

खमस सबैन मया व अलफ सफर ३०

कमाविसभेट बद्दल राजश्री सखाराम भगवंत, राजश्री रावसाहेब यांची स्वारी मुहूर्तें करून बाहेर निघाली, आणि सखाराम भगवंत यांचे घरीं गेले होते तेथें सनगें दिलीं तीं जमा, गुदस्त (गुजारत?) खंडोजी पणदरा खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

१५७ राजश्री रावसाहेब यांस.

९०	चिरा बादली	१
७५	वोढणी जरी	१
१२	मु(तुं?)बा किनखापी	१
२०	झगा बादली	१
१५७		४

१०४ मातुश्री गंगाबाई यांस.

१००	साडी शेलारी	१
४	खण	१
१०४		६

२६१

(89) Esubái Sohoni who served as midwife at the accouchment of Lady Gangábái was given for her service a golden chain weighing 21 Tolás and valued at Rs. 336-7 under the orders of Sakhárám Bhagwant and Báláji Janárdan Phadnis.

A. D. 1774-76.

(90) Clothes, presented to the infant Peshwá by Sakhárám Bhagwant on the occasion of his going to the latter's house on an auspicious day, are credited on this date.

A. D. 1774-75.

९१–(१८०) कमाविसभेट सनगें एकूण किंमत रुपये, राजश्री राव यांचा वर्धापन संस्कार जाहला, सबब गुजारत हरि विश्वनाथ भावे कारकून शिलेदार वाड्यांतील सनगें एकूण. रुपये.

खमस सबैन मया व अलफ रबिलावल ५

२३०॥ बाबत महिपतराव त्रिंबक पुरंदरे सनगें एकूण रुपये.

११८ मातुश्री गंगाबाई यांस.

११५ लुगडीं सनंग	१
३ खण	१
११८	२

११२॥ मातुश्री सगुणाबाई यांस लुगडें पैठणी सनंग १ एकूण.

२३०॥	३

२९ बाबत सखाराम भगवंत.

१९ मातुश्री गंगाबाई यांस.

१५ लुगडें साधें	१
४ खण	१
१९	२

१० मातुश्री सगुणाबाई यांस लुगडें साधें सनंग १ एकूण.

२९	३

२०॥ मातुश्री गंगाबाई यांस, बाबद व्यंकटराव नारायण घोरपडे यापाशीं सनंग एकूण. रुपये.

२० साडी शेलारी	१
·॥· खण	१
२०॥	

(91) The Vardhápan ceremony of the infant Peshwá was performed.

A. D. 1774-75.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं

९२—(२५१) नारो केशव बर्वे यांणीं हुजूर विदित केलें कीं, श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांच्या अस्ती आपले जवळ देऊन, श्रीमंत कैलासवासी माधवराव साहेबीं आम्हांस महायात्रेस रवाना केलें; त्यास अस्ती प्रयागीं नेऊन तिरस्थळी यात्रा गया वर्ज्यन् करून आल्यावर श्रीमंत रावसाहेबीं आपणांस इनाम जमीन बिघे दहा, मौजे सोनगांव, तालुके सुवर्णदुर्ग, येथें दिल्ही; त्यास इनामाचा ऐवज एक साला सरकारांत द्यावयाचा करार जाला आहे, त्याजवरून मामलेदार आपणाजवळ इनाम जमीनीचा ऐवज मागतात, येविशीं ताकीद जाली पाहिजे म्हणोन; ऐशियास नारो केशव यांणीं सरकारचें महत्कार्य केलें, सबब त्यांचे इनामाचा ऐवज घ्यावयाचा नाहीं, तरी त्यांचे इनाम जमीनीचा वसूल न घेणें. सुदामत चालत आल्याप्रमाणें जमीन मशारनिल्हेकडे चालविणें म्हणोन, मोरो बापूजी तालुके सुवर्णदुर्ग याचे नांवें छ. २९ साबान, चिटणिसी.

सीत सबैन मया व अलफ रमजान ३०

पत्र १.

९३—(२९४) महादेवभट बिन रामभट, व नागेशभट बिन गंगाधर, भव्ये(?) बिन रामभट, व मोरभट व विठ्ठलभट बिन रामभट, उपनाम पुरंधरे, गोत्र भारद्वाज, सूत्र आश्वलायन, ज्योतिषी व कुळकर्णी, किल्ले पुरंधर यांणीं हुजूर किल्ले मजकूर येथील मुक्कामीं विदित केलें कीं, सन अर्बा सबैनांत शके १६९६ जयनाम संवत्सरीं अधिक वैशाख शुद्ध सप्तमी इंदुवासरीं किल्ले मजकूर येथील माचीस स्वामीचा जन्म जाहला, ते समईं श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांणीं आम्ही समस्त पुरंधरे ज्योतिषी कुळकर्णी किल्ले मजकूर यांस नूतन इनाम जमीनी चावर तीन प्रांत पुणें पैकीं द्यावयाचा करार करून चतुःसीमापूर्वक नेमून द्यावयाविशीं नारो आपाजी यास सनद सन अर्बा सबैनांत छ. २५ सफरीं दिल्ही, त्याजवरून त्यांणीं सदरहू तीन चावर जमीनीपैकीं आपले विभागास जमीन पाव चावर आली, ते मौजे कोंढीत तर्फ करेपठार प्रांत पुणें येथें नेमून

सीत सबैन मया व अलफ सवाल १७

---

(92) Náro Keshav Barve was sent to Prayág by Peshwá Mádhavráo, in charge of the bones of the body of the Peshwá Nánásaheb. He was for this service given 10 bighas of land in inam by Peshwá Mádhavráo.

A. D. 1775-76.

(93) Some land was given in inam to Mahádeobhat and Rámbhat and others surnamed Purandhare, who were the astrologers and Kulkarnis of the fort of Purandhar, in honor of the birth of the infant Peshvá at the fort on Monday the 7th of the bright half of Adhik Vaishákh of Shake 1696. The measurements of the land are given. The rod of measurement was 5 hands and one fist in length.

A. D. 1775-76.

देऊन चतु:सीमेचा जाबता करून दिला असे, त्याप्रमाणें जमीन आपणाकडे चालत आहे, त्यास भोगवटियास इनामपत्रें करून दिलीं पाहिजेत म्हणोन; त्याजवरून मनास आणितां हे शिष्ट सत्पात्र कुटुंबवत्सल, यांचें चालविल्यास राज्यास श्रेयस्कर, हें जाणोन त्यांजवर कृपाळु होऊन तीर्थरूप मातुश्री गंगाबाई यांणीं आमचे जन्मकाळीं हे समस्त पुरंधरे ज्योतिषी व कुळकर्णी किल्ले मजकूर यांस नूतन इनाम जमीन चावर तीन प्रांत मजकूर पैकीं द्यावयाचा करार करून चतु:सीमापूर्वक नेमून द्यावयाविशीं नारो आपाजी यास सनद सन आर्बा सबैनांत छ. २९ सफरीं सादर केली, त्याजवरून त्यांणीं तीन चावर जमीन चतु:सीमापूर्वक नेमून दिली, त्यापैकीं याचे विभागास जमीन आली ती मौजे मजकूर येथें पांच हात एक मुठीचे काठीनें मोजून देऊन चतु:सीमापूर्वक जाबता सुभाहून करून दिला आहे, तो पाहून त्याप्रमाणें थळ करजाळे पैकीं जमीन बिघे.

८२९॥= प्रत मोजणी.

८९।॥१॥ कित्ता.

तुळ काठ्या.	अर्ज काठ्या.	
६३	३१	४०।
	३८	

———

११० (१०९।?)

पैकीं तिजाई, पावणेसहा बिघे दीड पांड.

प्रत मोजणी.

८२३॥।॥ कित्ता मोजणी.

तुळ काठ्या.	अर्ज काठ्या.	
२३२	३८॥।	४१॥।
	४२	४१
	४०	०

———

२०३॥

पैकीं पांचवा हिसा, काठ्या ४१ पावणेचवीस बिघे अर्धा पांड.

———

८२९॥=

साडेएकुणतीस बिघे दोन पांड, यास चतु:सीमा.

पूर्वेस शेत गोंदजी पाटील खैरे मौजे पश्चिमेस शेत भवानजी पाटील खैरे

मजकूर १	मौजे मजकूर.
दक्षणेस पाणंद.	उत्तरेस मौजे चांबळी तर्फ करेपटार येथील सींव १

८।·३ प्रत मोजणी, मळई नजीक वोढा करजाळे.

तुळ काठ्या.	अर्ज काठ्या.
२०	८

आठ पांड जमीन संताजी जाधव याचे शेतपैकीं यास चतुःसीमा.

पूर्वेस वोढा थळमजकूर १	पश्चमेस ओढा थळमजकूर १
उत्तरेस बांध थळमजकूर १	दक्षणेस ओढा थळमजकूर १

·।·

एकूण जमीन पाव चावर अवल दुम सीम तिही प्रतीची चतुःसीमापूर्वक स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा दरोबस्त देखील सरदेशमुखी व इनाम तिजाई सुद्धां कुलबाब कुलकानू हल्लीं पट्टी पेस्तर पट्टी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप सहित खेरीज हक्कदार करून नूतन इनाम यास सरकारांतून करार करून दिली असे, तरी सदरहू जमीन यांचे दुमाला करून देऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रति लिहून घेऊन असल पत्र भोगवटियास भटजींजवळ परतोन देणें म्हणोन. येविशीं पत्रें.

२ सनदा.

१ नांवाची सनद कीं, तुह्मी सदरहू जमीन आपले दुमाला करून घेऊन इनाम अनुभवून सुखरूप राहणें ह्मणोन.

१ मोकदम मौजे मजकूर यास.

२

२ चिटणिसी पत्रें.

१ देशाधिकारी, व लेखक वर्तमान भावी.

१ जमीदार प्रांत मजकूर यास.

२

४

चार पत्रें.

रसानगी यादी.

९४-(३०९) सरकारांत कुही शेळीचें प्रयोजन आहे, तरी एक शेळी तांबडी अगर काळी चांगली दुधाची खरेदी करून पाठवणें; या रंगाची न मिळेल तरी पांढरी चांगली शेळी दुधाची एक खिजमतगार सरकारचा पाठविला आहे याजबरोबर जलद पाठऊन देणें म्हणोन, आनंदराव काशी कमाविसदार कोतवाली शहर पुणें याचे नांवें. सनद १.

सबा सबैन मया व अलफ जमादिलाकर ८

९५-(३५७) जमा जामदारखाना.

सबा सबैन मया व अलफ जिल्काद २६

कमाविसभेट सनगें एकूण किंमत रुपये.

३६८॥ मातुश्री गंगाबाई यांची स्वारी पुण्यास गेली होती, तेथें सनगें आलीं तीं जमा, गुजारत खंडोजी पणदरा खिजमतगार सनगें एकूण किंमत रुपये.

२६५ बद्दल राघोजी आंगरे.

२५०	लुगडें पैकीं	१
१५	खण पैठणी	१
२६५		२

३१ बद्दल महिपतराव कृष्ण.

३०	लुगडें	१
१	खण	१
३१		२

३१ बद्दल बाळाजी हरी साठे.

३०	लुगडें	१
१	खण	१
३१		२

२५॥ बद्दल विनायकभट थथे.

२५	साडी शेलारी	१
॥	खण	१
२५॥		२

(94) A milch she-goat of the कुही kind, either red or black, was ordered to be purchased at Poona for Government.
A. D. 1776-77.

(95) Lady Gangábai received clothes from Rághoji Ángriá and others when she had gone to Poona.
A. D. 1776-77.

१६ बद्दल गोविंद भटजी जवनरे.

१५	लुगडें	१
१	खण	१
१६		१(२)

३६८॥	१०

१६९ राजश्री सखाराम भगवंत यास बद्दल राघोजी आंगरे, गुजारत मल्हारजी कामथे खिजमतगार दिंमतगार दिंमत मजकूर.

२९	तिवट	१
६०	शेला जाफरखानी	१
३०	किमखाप	·॥·
५०	महमुद्या	२
	दर २५	
१६९		१४॥

९३३॥

९६–(३७०) मातुश्री सगुणाबाई मौजे वडुतास श्रीकृष्णातीर जाऊन राहतात, सबब तेथील बेगमी करून देण्याविशीं. सनदा.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज ५

१ कृष्णराव अनंत याचे नांवें पत्र कीं, मौजे वडुत येथील बाग सरकारची आहे, ते मातुश्रीकडे देविली असे ती देणें, व सातारेयाचे बागेपैकीं फुलें, व बेल, व तुळसी, व खाजी भाजी, व केळीचीं पानें कार्याकारण दररोज देविलीं असेत; लिहिले प्रमाणें पावतीं करीत जाणें; व चौकीच्या बंदोबस्तास सातारेयापैकीं प्यादे असामी १५ पंधरा नेहेमीं देविले असेत, नेमून देणें म्हणोन. सनद.

१ शामराव जगजीवन याचे नांवें पत्र कीं, चौकीपहाऱ्यास तुम्हांकडून प्यादे व बेरड मिळोन असामी १० दहा ठेविले असेत, तरी किल्ले चंदन, व किल्ले नांदगिरी पैकीं रोजकर यांची बेगमी करून नेहेमीं नेमून देणें म्हणोन. सनद.

(96.) Mátushri Sagunábai being desirous of residing at Vaḍuth, on the banks of the Krishná, provision was made for her residence at the place.

A. D. 1776-77.

१ सदाशिव गोविंद याचे नांवें सनद कीं, मातुश्री यांचे स्वारीबरोबर घोडीं, व उंटें, व गुरें तेथें राहतील त्यांस सहा महिन्यांचे बेगमींबद्दल आजमासें गवत पुले सुमारें ७०,००० सत्तर हजार गवत सातारेयाचे कुरणपैकीं देविलें असे, तरी गंजी पैकीं देणें म्हणोन. सनद.

२

तीन पत्रें. रसानगी यादी.

९७–(४०४) भवानी शंकर हैबतराव यास सनद कीं, मातुश्री सगुणाबाई मौजे वडुत येथें नेहेमीं रहावयास जाणार, त्यास मौजे मजकुरीं सरकारचा वाडा आहे, तेथील तक्तपोशी जाहली नाहीं, व मोऱ्यांची वगैरे सोय नाहीं, सबब हरि जिवाजी सांगतील त्याप्रमाणें तुम्हांकडील कारकून कामावर ठेऊन प्रांत वाईपैकीं तीन चारशें पावेतों रुपये लाऊन काम लौकर करून देणें म्हणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ मोहरम ४

परवानगी रूबरू.

९८–(४०७) कमाविस राजश्री रावसाहेब यांचें चूडाकर्म जालें, सबब आहेर आले ते जमा इस्तकबिल छ. ७ मोहरम तागाईत छ. ८ मिनहू सनगें सुमारें.

सबा सबैन मया व अलफ मोहरम ८

४ सखाराम भगवंत.
४ बाळाजी जनार्दन फडणीस.
४ विश्वासराव येशवंत पानसे.
८ जनार्दन आपाजी.
४ गोपाळ संभाजी.
४ मोरो हरी.
४ बगाजी गोपाळ देशपांडे.
६ बाळाजी नाईक भिडे.
४ सर्वोत्तम शंकर.
४ शिवराम रघुनाथ निसबत खासगी.

---

(97) Orders were issued for repairing the Government building at Vaduth to make it convenient for the residence of Mátushri Sagunábai, who intended to go there.

A. D. 1776-77.

(98) Presents were received from Sakhárám Bhagwant, Báláji Janárdan Fadnis, Vishwásrao Yeshwant Pánse, and many other officers, on the occasion of the चूडाकर्म (tonsure ceremony) of the Peshwá.

A. D. 1776-77.

८ हरि पुरुषोत्तम पटवर्धन.
४ कोंडाजी नाईक चिटा कोळी.
८ गणपतराव भिकाजी रास्ते.
३ नारो बल्लाळ भुसकुटे.
२ फत्तेसिंग गाईकवाड याजकडील वकील.
२ दिपाजीराव यरुणेकर.
६ कृष्णराव बल्लाळ काळे.
६ सुबराव वकील, दिंमत मुरारराव घोरपडे.
४ भिकाजी विश्वनाथ जकाते प्रांत पुणें.
९ भवानराव प्रतिनिधी.
५ गोविंदराव गाईकवाड याजकडील वकील.
४ वेंकोजी माणकेश्वर पोतनीस.
४ बाळाजी शंकर निसबत फरासखाना.
२ गंगाधर गोविंद पटवर्धन.
४ महिपतराव कृष्ण साठे.
४ माधवराव सदाशिव जाधवराई.

१२१ २६

एकूण आंखाचे निमे किंमत. रुपये.

२१९ चिरेबादली.

१९	१९	२०	५०	
३०	४९	४०	०	
	२१९			७

२० तिवट छिटी ब-हाणपुरी २, दर १०

२७४ तिवटें.

७॥	१०	१२॥	१०	
१२॥	१२॥	१२॥	९	
५	६	७॥	७॥	
७॥	७॥	१०	८॥	
१०	७॥	३९	२५	
५०॥	०	०	०	
	२७४			२१

२२१२।≡ शिल्लक रोजगुदस्त नक्त.

९९॥ जमा, छ. मजकूर तसलमात कृष्णाजी उगला, जामदार पैकीं खर्च मुळें जमा, मोहरा नाणें एकूण. रुपये.

४०॥ अलमशाई ३, दर १३॥

१९ सुरती १

९९॥ ४

२२६७॥≡

९९–(४२१) मौजे कोपरगांव, परगणा कुंभारी येथें गंगेचे बेटांत श्रीशुक्लेश्वराचे देवालयासंनिध सन इसने सबैनांत सरकारचा वाडा व बाग नवा केला, तेथें बेट मजकुरीं पेशजींपासून जमीन इनाम चालत आहे, त्यापैकीं वाडा व बागेकडे जमीन घेतली, याची चौकशी बापूजी कृष्ण कारकून निसबत खासगी यांणीं केलियाप्रमाणें हल्लीं सरकारांतून मोबदला दुसरी जमीन मौजे मजकूर येथील बेट पैकीं जमीन बिघे.

सबा सबैन मया व अलफ मोहरम २०

८३॥८४ श्रीशुक्लेश्वराकडील इनाम पैकीं घेतली, तिचे मुबदला हल्लीं दुसरी जमीन बिघे साडे तीन व काठ्या ४

८६८४८४ मसीदीकडे चिराख बत्तीबद्दल इनाम चालत आहे, त्यापैकीं जमीन घेतली, तिचे मुबदला हल्लीं दुसरी मसीदीकडे सा बिघे चार पांड चार काठ्या जमीन.

८९॥४।३

एकूण साडे नऊ बिघे सवाचार पांड तीन काठ्या जमीन, हल्लीं सरकारांतून सदरहू प्रमाणें दुसरी जमीन पेशजींप्रमाणें सालमजकुरापासून इनाम करार करून देऊन, हे सनद सादर केली असे, तरी पेशजींपासून जमीन इनाम चालत आहे, त्याप्रमाणें हल्लींची सदरहू साडेनऊ बिघे सवाचार पांड तीन काठ्या जमीन, इनाम दरसाल चालवणें ह्मणून. सनदा.

२ कमाविसदार वर्तमान व भावी यांस. सनदा.

(99) A Government house was built at Kopargaum in Parganá Kumbhári in a piece of land situated in the bed of the Godávari near the temple of Shukleshvar in A. D. 1771-72, and a garden was laid out at the place. Land was for those purposes taken from the inams of Shukleshvar and a mosque; and other land in exchange was given to the temple and the mosque.

A. D. 1776-77.

१ श्रीशुक्लेश्वराचे जमीनीविशीं.

१ मसीदी बेट मजकुरीं आहे, तेथील चिराख बत्तीबद्दल जमीनीविशीं.

२

२ हल्लींचे कमाविसदार आत्माराम रंगनाथ, व आत्माराम राजाराम परगणा मजकूर यांस कीं सदरहूप्रमाणें जमीन इनामखर्च लिहीत जाणें म्हणून. सनदा.

१ श्रीशुक्लेश्वराचे जमीनीविशीं.

१ मसीदीकडे जमीन चालवणें म्हणोन.

२

४

रसानगी यादी.

१००–(५०४) २०० वाड्यांतील कारकून, शिलेदार, वगैरे यांस कैलासवासी गंगाबाई यांचे सुतकांत राजश्री राव याजवळ चाकरीस होते त्यांस बक्षीस. रसानगी यादी.

समान सबैन मया व अलफ सवाल ८

कापड आंख ५०० पांचशें देविलें, त्यास जामदारखान्यांत कापड मिळालें नाहीं, सबब अडीचपट नक्त रुपये.

७२ कारकून शिलेदार.

३६ महादाजी विश्वनाथ जोशी, आंख ९० रुपये.

३६ गोपाळ कृष्ण जोशी, आंख ९० एकूण.

७२

२० रामचंद्र विष्णु मराठा आचारी, आंख ५० एकूण.

२८ सदाशिव शिवराम परांजप्या हरकारा ब्राह्मण, आंख ७० एकूण.

२० रामचंद्र विश्वनाथ गोखला शागीर्द, आंख ५० रुपये.

२० माणकोजी आढाव न्हावी, आंख ५० एकूण.

४० खिजमतगार आसामी ६, एकूण आंख १०० रुपये.

---

(100) Clothes worth Rs. 500 were given to Karkoons, Silledars, and others who had charge of the infant Peshwá while in mourning for the death of Gangábai.

A. D. 1777-78.

६।।। बाबाजी पडक १७

६।।। खंडोजी पणदरा १७

६।।। जानोजी चव्हाण १७

६।। बाळोजी वागमारा १६

६।। जिवाजी काटकर १६

(६।।। .... १७?)

४० १०(१००)

२००

रसानगी, खंडोजी पणदरा खिजमतगार. रुपये.

१०१–(५९८) कमाविसभेट, सनगें एकूण. रुपये.

तिसा सबैन मया व अलफ रविलाखर १

३७।। राजश्री राव यांचे बृ(व्र)तबंधाचे आमंत्रणास बाळाजी जनार्दन फडणीस पुण्यांत गेले होते, त्यांस सनगें आलीं, तीं गुजारत मल्हारजी ठकगीरा खिजमतगार सनगावर चौपट प्रमाणें आंख घालून त्यापैकीं चौथाई किंमत जमा. रुपये.

१० प्रसाद श्रीगणपति कसबे पुणें तिवट १

२७।। बरहुकूम जनार्दनभट शालग्राम.

१२।। तिवट १

१५ जाफरखानी १

२७।। २

३७।।

० लंग.

३७।।

(101) Báláji Janárdan Fadnis had gone to Poona to give invitations for the thread-ceremony of the Peshwá.

A. D. 1778-79.

१०२-(६०२) गुजारत रामाजी काशी वाकनीस बरहुकूम यादी. रुपये.

तिसा सबैन मया व अलफ सवालाकर ९

१७५॥ धर्मादाय विषयीं राजश्री रावसाहेब पर्वतीहून स्वारी पुण्यास आली तेसमई.

१॥ घटिकास्थापन केलें त्यास दक्षणा.

·॥· गणपतीस.

१ घटिकेस.

———

१॥

४२ ग्रहप्रीत्यर्थ दानें दिल्हीं त्यास दक्षणा.

१० रविप्रीत्यर्थ.

५ माणिकदान महादेवभट भाव्ये वरसईकर यांस दिलें त्यास दक्षणा.

५ आरक्तवस्त्र देणें बाजीभट केळकर.

———

१०

१० भौमप्रीत्यर्थ.

५ प्रवालदान देणें बाळंभट पेंडसे.

५ सुवर्णदान देणें बाळंभट वैद्य वरसईकर.

———

१०

११ शनिप्रीत्यर्थ.

५ तिलदान देणें कृष्णंभट गोखले.

६ कुळीथ देणें बापूभट नाशि[क]कर.

———

११

११ केतुप्रीत्यर्थ.

६ कस्तुरी देणें अनंतभट फाटक.

---

(102) Alms were given to Brahmins, and offerings were sent to deities both Hindoo and Mohamedan, on the occasion of the Peshvá's entering the palace at Poona. The Peshvá entered through the Delhi gate and then passed through

A. D. 1778-79.

2 inner doors.

९ शास्त्रदान देणें चिमणभट केळकर.

११

४२

६ तिथिप्रीत्यर्थ तांदूळदान देणें बाळकृष्ण दीक्षित काशीकर.

५ मुहूर्तेंकरून निघते समई घरचे देवास दक्षणा.

६६ वाड्यांत प्रवेशसमई खर्च.

१५। थोरले देवघरांतील देवास दक्षणा. मोहर नाणें १

५०।।। पुण्याहवाचन केलें ते समई.

१ गणपतीस दक्षणा.

४ कलशास, कलश २

२ हिरण्यार्थ, दर १

२ पुण्याहवाचन कलशास दक्षणा, दर १

४

४ शिवा प (आपः) संतु, ब्राह्मण असामी ८, दर ।।.

२६।। भूयसी दक्षणा शिष्ट ब्राह्मणांस असामी ५३, दर ।।.

१५। सौभाग्यवती दुर्गाबाई वोवाळावयास आली त्यास वोवाळणी घातली, मोहर नाणें १

६६

४९ गांवांतील वगैरे देवांस दक्षणा पाठविली, गुजारत महादाजी विश्वनाथ जोशी.

रुपये.

७ पर्वतीचे देवांस.

६ देवदेवेश्वरपंचायतनसुद्धां

१ देवदेवेश्वरास.

१ सूर्यनारायणास.
१ गणपतीस.
१ देवीस.
१ कार्तिकस्वामीस.
१ विष्णूस.

६

१ श्रीविष्णूस.

७

१ नवलाखे, पर्वतीचे तळ्यावरील यास.
१ व्यंकोबा, तोफखान्याजवळील.
१ श्रीरामेश्वर, पुण्यांतील.
१ विष्णु, बुधवारांतील.
१ श्रीरामचंद्र, तुळशीबागेंतील.
१ श्रीयोगेश्वरी, बुधवारांतील.
१ गणपति, गांवांतील.
१ श्रीओंकारेश्वर.
१ श्रीअमृतेश्वर.
१ श्रीसिद्धेश्वर.
१ श्रीकेदारेश्वर.
१ श्रीनागेश्वर.
१ श्रीहरिहरेश्वर.
१ श्रीसोमेश्वर, स्वयंभू रविवारांतील.
५ हणमंतास.
  १ शनवारांतील.
  १ बुधवारांतील.
  १ शुक्रवारांतील.
  १ गणेशपेठेंतील.
  १ मंगळवारांतील.

५

१ मातीचे गणपतीस.
१ वेताळ, गुरुवारांतील.
१ नीळकंठेश्वर, मजमदारांचे घराजवळील.

१ विष्णु, अमृतेश्वराचे धर्मशाळेंतील.
१ श्रीसिद्धेश्वर, मंगळवारांतील.
१ बालोबा, काले (काळीं) तील.
१ महादोबादेव.
१ पदमोबा, कसब्यांतील.
१ बहिरोबा, कसब्यांतील.
१ ह्मसोबा, लकडखान्याजवळील.
१ बाबदेव, कसब्यांतील.
१ गणपति, गणेशदरवाज्याजवळील.
१ मुंजाबा, हुजूरपागेंतील.
५ सभोंवतालचे गांवचे देवांस पाठविले.
१ श्रीवृद्धेश्वर, भांभवड्यांतील यास.
१ गणपति, गणेशखेंडींतील.
१ सोमेश्वर, पाषाणचा.
१ विठोबा, विठ्ठलवाडीचा.
१ बहिरोबा, वानवडीचा.

५

४५(४४)

१० सवाष्णी ब्राह्मणबायका, दीप, व पूर्णकुंभ घेऊन उभ्या होत्या, त्यांस चोळी लुगड्याबद्दल. रुपये.
५ सौभाग्यवती सखुबाई करवी, दीप घेऊन उभी होती त्यांस.
५ सौभाग्यवती विठाबाई अनगळीण, पूर्णकुंभ घेऊन उभी होती त्यांस.

१०

१७५॥(१७४॥)

३८॥। कुणबिणीस चोळीलुगड्याबद्दल स्वारी वाड्यांत मुहूर्तेंकरून आली, ते समई घागरी वगैरे घेऊन उभ्या होत्या त्यांस. असामी.

६ पाण्याच्या घागरी घेऊन उभ्या होत्या त्यांस.

२ दिल्लीदरवाज्यांतील.

१ यमुनी.

१ शेवती.

२

२ मधल्या दरवाज्यांत.

१ लवंगी.

१ राणी.

२

२ माजघरच्या दरवाज्यांत.

१ पाची.

१ सगुणी.

२

६

३ दहींभात घेऊन उभ्या होत्या त्या असामी.

१ धोंडी, दिल्लीदरवाज्यांत.

१ चापी, मधल्या दरवाज्यांत.

१ माजघरचे दरवाज्यांत अंबरी.

३

१ कृष्णी, मीठ मद्दुऱ्या घेऊन उभी होती.

१०

रुपये.

३५ लुगड्याबद्दल दर असामीस रुपये ३॥ प्रमाणें.

३।॥ खणाबद्दल दर असामीस ·।= प्रमाणें.

३८।॥

२ खैरातखर्च विषयीं राजश्री रावसाहेब मुहूर्तेंकरून पर्वतीहून स्वारी पुण्यास आली, ते समईं पिरास पाठविले. रुपये.

१ शेक सला.

१ शेक सादत.

२

॥· खासगत खेरीज जिन्नस राजश्री राव यांजकडे.

।≡ लाह्या बारीक साळीच्या कैली ८८२॥·

८‑ जानवीजोडा सुमार १

॥·

२१६॥· (२१५॥)

तपशील.

३०॥ मोहरा नाणें २ दर १५।·

१८६।(१८५।) नक्त.

२१६॥· (२१५॥)

१०३–(१०६) कमाविसभेट सनगें एकूण. रुपये.

शिसा सबैन मया व अलफ रबिलाकर.

२०५ बरहुकूम संस्थान भूपाल याजकडून वस्त्रें आलीं, तीं राजश्री राव यांस, गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें एकूण आंखाची चौथाई किंमत जमा. रुपये.

५० चिराबादली १

५० शालफर्द २

दर २५

३० जामेवार जरी ॥·

७५ किमखाप १

२०५ ४॥

२०५

अशाच प्रकारचीं सनगें शिंदे, होळकर, पंतसचिव, व दुसरे सरदारांकडून आलीं आहेत.

(103) Clothes worth Rs. 205 were received by the Peshvá from Sansthán Bhopal. (Similar presents were also received from Scindia, Holkar, Pant Sachiv and others.)

A. D. 1778-79.

१०४-(६१४) रामचंद्र गणेश भावे यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपल्यास सरकारांतून वाड्याचे नजीक घर बांधण्यास जागा दिल्ही होती, तेथें इमल्यास नऊशें रुपये लाऊन घर बांधिलें, त्यास साल गुदस्त सरकारचे वाड्याभोंवतीं जागा मोकळी केली, याजमुळें आपलें घर मोडून इमला सरकारांत खासगीकडे घेतला, यास्तव इमल्यास सदरहू नऊशें रुपये लागले आहेत, ते अथवा जागा इमल्यासुद्धां सरकारांतून देविली पाहिजे म्हणून; त्याजवरून लक्ष्मण कास्त याची जागा पेठ बुधवार, शहर पुणें येथें बेवारसी होती, त्या जाग्यावर केशवराव बल्लाळ केतकर याणें पेशजीं इमला बांधिला आहे, ते जागा इमलासुद्धां मल्हारजी गौंड्या, व गंगाराम सुतार चाकर सरकार यांचे गुजारतीनें किंमत रुपये साडे चारशें ४५० रुपये, ठरऊन जाग्याची हद्द महदूद.

तिसा सबैन
मया व अलफ
जमादिलावल १८

गज.

८। लांबी.
७॥ रुंदी.

———

१५॥।

एकूण पावणे सोळा गज, पैकीं लांबी सवा आठ गज, व रुंदी साडे सात गज, याप्रमाणें आहे, ते मशारनिल्हेस इमल्यासुद्धां देविली असे, तरी देणें; आणि सदरहूविशीं साऱ्याचे पट्टीचा तगादा मशारनिल्हेस न लावणें म्हणोन, पांडुरंगराव बाबूराव यांचे नांवें छ. १९ रबिलावल.

सनद १

रसानगी यादी.

१०५-(६२१) जमा जामदारखाना.

कमाविसभेट राजश्री राव यांसी, बरहुकूम जाबीतजंग धौशे याजकडून सनगें आलीं, ते गुजारत शेटी जरडा खिजमतगार सनगें एकूण.

समानीन
मया व अलफ
जमादिलाखर ४

रुपये.

१२५	शाला थिके	२
२०	चिरा बादली	१

---

(104) Rámchandra Ganesh Bháve had built a house near the Government palace at a cost of Rs. 900. The building was pulled down in the preceding year to leave an open space round the palace. Rámchandra was given another house in exchange.

A. D. 1778-79.

(105) Clothes worth Rs. 375 were sent as a present to the Peshvá by Jábitjang Dhoushe.

A. D. 1779-80.

१० गोष पेच बादली १
१०० जामवारे बादली २
२० पटका बादली १
१०० किमखाप

३७५

१०६-(७२०) कमाविसभेट राजश्री रावसाहेब यांसी, राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांचे घरीं भोजनास गेले ते समईं दिल्ही, तीं जमा गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें छिटी ब्र्हाणपुरी, वर काम सोनेरी, एकूण. रुपये.

इसन्ने समानीन मया व अलफ सवाल

१००	तिवट छिटी बराणपुरी	१
१२५	झगा छिटी बराणपुरी	१
१००	दुपटा छिटी ब्र्हाणपुरी	१
१२५	तुंबा किनखापी अस्तर गुलबादन	१
४५०		४
३०	धोतर जोडा	१
४८०		५

१०७-(८०३) लग्नाचे समारंभाकरतां शहर मजकूरचे रस्ते नीट करण्यास गंवड्या वगैरे माणसें जदीद काम होई तोपर्यंत ठेवणें, म्हणोन तुम्हांस आज्ञा जाहली होती, त्यावरून तुम्हीं छ. ११ मोहरमापासून जदीद माणसें ठेविलीं, त्यांस तैनात दरमहा. रुपये.

सलास समानीन मया व अलफ रजब ३

७॥	गंवड्या असामी	१ एकूण.
३०	सुबेकरी असामी	४ दर ७॥ प्रमाणें रुपये.
८४	मजूरदार असामी	२१ दर ४ प्रमाणें.
१२१॥		२६

(106) The Peshvá went to dine at Báláji Janárdan Fadnis' house.
A. D. 1781-82.

(107) One mason and 25 laborers were entertained from 11th Mohorum on a monthly salary of Rs. 121-8 for repairing the roads in the city in connection with the marriage of the Peshvá.
A. D. 1782-83.

एकूण एकशें साडे एकवीस रुपये, सवीस असामींस निवळ दरमहा तुमचे ठेवणुकेप्रमाणें करार केले असत, तरी चाकरी बमोजीब कबज होईल तो ऐवज कोतवालीचे ऐवजीं देणें, मजुरा पडेल म्हणोन, घासीराम सावळदास कसबेदार कोतवाली, शहर पुणें याचे नांवें सनद १.

रसानगी यादी १.

१०८-(८९९) पागा व शिलेदार. रुपये.

खमस समानीन मया व अलफ सफर २१

२०० महादजी शिंदे याजकडून काशीद, पातशाच्या भेटी होऊन, राजश्री राव यांचे नांवें बक्षीगिरी करून घेतल्याचीं पत्रें घेऊन आले सबब इनाम. परवानगी रूबरू.

रुपये.

५० हिरा वलद टिकाराम.
५० भोपा वलद गोवर्धन.
५० पेमा वलद गंगाराम.
५० लाला वलद खेमा.

२००
० लंग.

२००

१०९-(९१२) जमा जामदारखाना.

सीत समानीन मया व अलफ सफर १०

कमाविसभेट राजश्री राव यांसी, बाबत अली बहादर यास पुत्र जहाला, सबब खासा स्वारी घरास गेली, ते समईं पोशाख दिल्हा, तो गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपये.

१२० सनगें छिटी बराणपुरी.

३०	तिवट	१
६०	दुपटा	१
३०	झगा	१
१२०		३

(108) Reward was given to the messengers who brought letters from Mahádji Scindia announcing that he had obtained for the Peshwá the office of Baxîgir.
A. D. 1784-85.

(109) Presents were received by the Peshwá on the occasion of his visit to Ali Bahádur's house to congratulate the latter on the birth of a son.
A. D. 1785-86.

६० तुंबा किमखापी १

———— ——

१८० ४

११०–(९६२) भाऊबीजखर्च, बंधुमंडळी यांस वाड्यांत भोजनास बोलाविलें, त्यास विद्यमान सौभाग्यवती रमाबाई, तसलमात मोरो विश्वनाथ भावे कारकून शिलेदार सनगें एकूण. आंख.

समान समानीन मया व अलफ मोहरम २९

४८२॥। कृष्णाजी भैरव थथे यांचे पुत्र यांस सनगें एकूण. आंख.

१७९ श्रीधर कृष्ण यांस. आंख.

३७॥ तिवट्या १

१४१॥ शेला जाफरखानी १

———— ——

१७९ २

१०१ रघुनाथ कृष्ण यांस. आंख.

२९ तिवट्या १

७२ दुपटा १

———— ——

१०१ २

१०३ आनंदराव कृष्ण यांस. आंख.

३४ तिवट्या १

६९ दुपटा १

———— ——

१०३ २

९९॥।· दाजी कृष्ण यांस. आंख.

३१॥। तिवट्या १

६८ दुपटा १

———— ——

९९॥। २

———— ——

४८२॥। ८

---

(110) Here is a list of Peshwa's and his wives' cousins and relations who were invited to dine on the Bháubij Festival. Their surnames are Thatte, Omkár, Ráste, Joshi, Rodé, Gondhalekar, and Deshmukha.

A. D. 1787-88.

४७४।- बाळाजी केशव थथे सनगें एकूण. आंख.

१९७ खासा बाळाजी केशव यांस. आंख.

४८ तिवट्या	१
१४९ शेला जाफरखानी	१
१९७	२

१५०। अमृतराव केशव यांस. आंख.

५८। तिवट्या	१
९२ दुपटा	१
१५०।	२

१२७ दामोदर केशव यांस. आंख.

३१॥ तिवट्या	१
९५ दुपटा	१
१२७(१२६॥?)	२
४७४।	६

१९६। ओंकार मंडळी यांस सनगें एकूण. आंख.

९९ विठोबा नाईक यांस. आंख.

२९॥ तिवट	१
६९॥ शेला जाफरखानी	१
९९	२

९७। बळवंतराव नाईक यांस. आंख.

३३ तिवट	१
६४। शेला जाफरखानी	१
९७।	२

१९६।

१९४॥। येशवंतराव गणपत रास्ते यांस सनगें एकूण. आंख.

३९॥। तिवट	१

१९९	शेला जाफरखानी	१
१९४॥।		२

२७५। मामे भाऊ यांस सनगें एकूण. आंख.

९९ पांडुरंग धोंडाजी यांस. आंख.

२८॥।	तिवट	१
७०।	शेला जाफरखानी	१
९९		२

१००॥ बाळाजी बाजी जोशी यांस. आंख.

३३	तिवट	१
६७॥	शेला जाफरखानी	१
१००॥		२

७५॥। आपाजी बाजी जोशी यांस. आंख.

३०।	तिवट	१
४५॥	शेला गोलदार	१
७५॥।		२
२७५।		६

१३४ माउस भाऊ यांस सनगें एकूण. आंख.

६०॥। वासुदेव जोशी रोडे यांस. आंख.

३१॥।	तिवट	१
२९	शेला गोलदार	१
६०॥।		

७३। मोरो विश्वनाथ गोंधळेकर. आंख.

३२	तिवट	१
४१।	शेला गोलदार	१
७३।		२
१३४		४

१०१।।। निसबत गोदूबाई देशमुखीण यांस. आंख.

५१ रामचंद्र यादव भिडे यांस.

२५।।।	तिवट	१
२५।	शेला गोलदार	१
५१		२

५०।।। काशीनाथ जोशी यांस. आंख.

२२।।।	तिवट	१
२८	शेला गोलदार	१
५०।।।		२

१०१।।।	४

१८९९	३४

तपशील.

५७६।।	तिवटें	१७
७१७	शेले जाफरखानी	७
३९६।।(३९६?)	दुपटे	५
१६९	शेले गोलदार	५
१८९९		३४

खेरीज सनगें एकूण. आंख.

५९३।	तिवटें	१८
२००।।	शेले गोलदार	६
७१७	शेले जाफरखानी	७
३९६।।	दुपटे	५
२	खादी	०।।
१९०९।		३६।।

१११–(९७६) बाजेखर्च, राजश्री राव यांजकडे दांडलकडी खेळते समई हातास बांधावयास रुमाल तापत्याचा सुमार १, तसलमात हणमंता टिळेकर खिजमतगार, ताफ्ता कद हात २७ नग ८॥ एकूण आंख ६

तिसा समानीन
मया व अलफ
मोहरम २२

११२–(९८३) कमाविसभेट राजश्री राव यांसी, बाबद अबदुल हकीम खान पठाण सावनूरकर याचे डेऱ्यास खासा स्वारी गेली, ते समई पोशाक दिल्हा, तो गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

तिसा समानीन
मया व अलफ
जमादिलावल १२

४००	सनगें छिटी बऱ्हाणपुरी वर काम सोनेरी सनगें एकूण.	रुपये.
६०	तिवट छिटी	१
१४०	दुपटा छिटी	१
२००	जामेवारे छिटी	२
	दर १००	
४००		४
१००	किमखाप	१
५००		५

११३–(९९९) जमा जामदारखाना.

तिसैन
मया व अलफ
रविलावल २८

कमाविसभेट सौभाग्यवती रमाबाई यांसी दुसऱ्यानें रजोदर्शन प्राप्त जालें, सबब ग्रहस्तांकडील वाढून आलीं, त्याजवर चोळखण आणिले, ते गुजारत केदारजी यवला खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

१	बाबत बाळाजी केशव थथे खण सेलारीचा	१
·॥·	बाबत सौभाग्यवती चिमाबाई कोलटकर खण तपसील्याचा	१
१	बाबद व्यंकटराव नारायण घोरपडे खण सेलारीचा	१
१	बाबद रामचंद्र नाईक परांजपे खण सेलारीचा	१
३॥		४

---

(111) Refers to the fact that the Peshwá was learning to fence with sticks. दांडलकडीपटी.
A. D. 1788-89.

(112) The Peshwá went to pay a visit to Abdul Hakim Khán Pathan of Sáwnur at his tent.
A. D. 1788-89

(113) The Peshwá's wife being for the 2nd time in her monthly course, dainties were sent to her by Báláji Keshao Thatte and others.
A. D. 1789-90.

इजाफत खासगी राजश्री राव पैकीं खर्च मुळे जमा झगा धुवट उतरी सनंग सुमार १ एकूण किंमत रुपये ३८।।।.

छ. २८ रविलाखरीं सनगें खर्च पडलीं तेथें जमेस धरलीं सबब दूर.

११४-(१०२१) कमाविसभेट राजश्री राव यांसी, बाबत फत्तेसिंग भोसले याचे डेऱ्यास खासा स्वारी मेजवानीस गेली, ते समईं पोशाख दिला, तो गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

इहिदे तिसैन मया व अलफ रविलावल १५

१२५	तिवट छिटी बराणपुरी वर काम सोनेरी	१
३००	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी असावली किनारदार वर सोनेरी काम	१
१२५	जामेवार छिटी बऱ्हाणपुरी वर सोनेरी काम	१
१५०	किमखाप	१
७००		४

११५-(१०३१) कमाविसभेट राजश्री राव यांसी, बाबत शंकराच्यार्यें स्वामी, संस्थान करवीर यांचे दर्शनास खासा स्वारी गेली, ते समईं दिल्ही, ती गुजारत मलोजी जाधव खिजमतगार सनगें एकूण.

इहिदे तिसैन मया व अलफ साबान ७

२२।।	तिवट	१
४०	शेला जाफरखानी	१
६२।।		२

११६-(१०४४) सरकारांत शिकारखान्याकडे बाज व नुरे पक्षी लखनऊ प्रांतींहून खरेदी करून आणावयास शेख इमाम मीरसीकर, व जासूद जोडी पाठविली आहे, ते खरेदी करतील त्यास पक्षी आणावयाकरितां माणसें असामी २ दोन नवीं ठेऊन देऊन पुण्यास पक्षी पोहोंचाऊन देणें, आणि माणसांचे चाकरीचा पैका होईल तो प्रांत बुंदलखंड पैकीं देणें ह्मणोन, बाळाजी गोविंद याचे नांवें.

इसने तिसैन मया व अलफ रमजान १६

सनद १.

रसानगी, दिनकर बल्लाळ कारकून शिलेदार.

(114) The Peshwá went to dine with Fatesing Bhoslé at his tent.
A. D. 1790-91.

(115) The Peshwá paid a visit to Shankarácharya Swámi of Karwîr.
A. D. 1790-91.

(116) Persons were sent to Lucknow to purchase birds 'Bâz' and 'Nure.'
A. D. 1791-92.

११७–(१०९२) राजश्री राव यांसी पातशाहानीं वकील मुतलकी, व मीरबक्षीगिरी इनायतें करून दिल्लीहून खतुत पाठविलीं, ती गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ जिल्काद १

३८ तिवट चुनडी समेत बतना व तुरा मुकेसी	१
३२ कानळ पेट्या कारचोबी	२
५६५ कुडते बादली व झगा कारचोबी एकूण.	रुपये.
२६५ कुडते बादली तमामी सोनेरी एकूण.	रुपये.
५५ प्रत निमस्तनी	१
२१० प्रत कुडता	१
२६५	२
३०० प्रत झगा कारचोबी	१
५६५	३
१९ चिरा मुकेसी	१
१० गोष पेच कारचोबी	१
४३ पटका व बलाबादी कारचोबी.	
२५ पटका	१
१८ बलाबादी	१
४३	२
१५० शाला फर्द केसरी	२
दर ७५	
३९ सरपोस जरी जामेवाराचा तमामी अस्तर ताफ्ता	१
८८८	१३

(117) Clothes of honor were received from the Emperor on the occasion of the investiture of the dignity of Vakil Mutalaki and Mir Baxigiri conferred by the Emperor on the Peshwá.

A. D. 1791-92.

११८-(१०८०) जमा जामदारखाना.

आर्बा तिसैन मया व अलफ मोहरम ७

कमाविसआहेर सौभाग्यवती येशवदाबाई यांस पदर घातला, ते समई आले, ते सनगें एकूण. रुपये.

१७४० राजश्री राव यांसी, गुजारत सिदोजी काढ्या खिजमतगार सनगें. रुपये.

१७४ बाबद गणेश कृष्ण गोखले सनंग एकूण. रुपये.

२५ तिवट	१
१२५ दुपटा	१
२० लुगडें	१
४ चोळखण	१
१७४	

६०८ बाबद राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस सनगें. रुपये.

१०० तिवट चुनडी	१
१७५ दुपटा काशीचा	१
८० छिटें मुलतानी दर ४० प्रमाणें रुपये.	२
१७९ किमखाप	१
७९ पातळ चिलांदोनी कारचोबी जरी	१
३ चोळखण	१
६०८	७

४६४ बाबद हरी बल्लाळ फडके सनगें एकूण. रुपये.

३० तिवट आंबवी	१
१९० दुपटा काशीचा	१
१९० किमखाप	१
७० पातळ जरी	१
४ चोळखण पैकीं	१

(118) Presents were received on the occasion of Yeshwadábái's attaining puberty.

A. D. 1793-94.

६० जामेवार छिटी बालपूर	२
दर ३० प्रमाणें रुपये.	
४६४	७

४१० बाबद रघुनाथराव नीळकंठ पटवर्धन सनगें एकूण.

२० तिवट पैकीं	१
१२५ दुपटा पैकीं	१
१२५ किमखाप	१
६० जामेवार छिटी बऱ्हाणपुरी	२
दर ३० प्रमाणें.	
७५ लुगडें पैकीं	१
५ चोळखण	१
४१०	७

८४ बाबत कृष्णराव बळवंत सनंग एकूण. रुपये.

१२॥ तिवट	१
४० जाफरखानी	१
१॥ चोळखण	१
३० पातळ जरी	१
८४	४

* * *

११९–(११०६) वेदमूर्ति गणेशभट बिन अनंतभट, उपनाम भट, गोत्र गार्ग्य, सूत्र आश्वलायन, श्रीवर्धनकर यांस तीर्थस्वरूप कैलासवासी दादासाहेब, व माधवराव साहेब, व तीर्थरूप नारायणराव साहेब यांच्या अस्ती देऊन श्रीमहायात्रेस पाठविलें, त्यांणीं प्रयागीं जाऊन त्रिवेणींत अस्ती निक्षेपून गयेस जाऊन त्रिवर्गांचें, व तीर्थस्वरूप कैलासवासी भाऊसाहेब यांचें गयावर्जन करून

आर्बा तिसैन मया व अलफ जिल्काद ५

(119) Ganeshbhat bin Anantbhat, surnamed Bhat of Shrîwardhan, took the bones of the deceased Peshwá Mádhavrao Sáheb, Náráyanrao Saheb and Dádá Saheb to Prayâg and threw them in the Gánges. He performed the Gayáwarjan ceremonies of these persons and of Bhau Saheb. Inam land was therefore given to him.

A. D. 1793-94.

पुण्यास आले, यास्तव यांजवरी कृपाळू होऊन यांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ मौजे हुमगांव, तर्फ कोथल खलाटी, परगणे नसरापूर, तालुके लोहगड येथें भटजींचे रयताव्याची जमीन भातशेत लागवड आहे, त्यापैकीं व परगणे मजकुरीं हरएक गांवीं यांचे सोईस पडेल तेथें भात जमीन दुपीकी वहीत लागवड रुपये १०० शंभर रुपये हाल आकाराची स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा देखील सरदेशमुखी व इनाम तिजाईसुद्धां दरोबस्त कुलबाब कुलकानू हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी खेरीज हक्कदार करून साल मजकुरापासून सरकारांतून नूतन इनाम द्यावयाचा करार केला असे, तरी सदरहूप्रमाणें शंभर रुपये आकाराची जमीन परगणे मजकूरचे शिरस्तेप्रमाणें चतुःसीमापूर्वक दुमाला करून देऊन, आकार यांचे नांवें तालुके मजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहित जाणें, आणि चतुःसीमेचा जाबता लिहून हुजूर पाठवणें, त्याप्रमाणें पत्रें करून दिल्हीं जातील म्हणून, बाळाजी जनार्दन यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

१२०–(११३६) कमाविस भेट राजश्री राव यांसी, बाबद हाय, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सीत तिसैन मया व अलफ रविलावल ४

१०१० पार्थिव गणपतीचे दर्शनास खासा स्वारी गेली ते समईं दिल्हीं तीं सनगें एकूण. रुपये.

६७० बाबद राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस सनगें. रुपये.

४०	तिवट पैकीं	१
३५०	दुपटा पैकीं	१
८०	झगा छिटी बऱ्हाणपुरी	१
२००	तुंबा किमखापी अस्तर गुलबदन	१
६७०		४

३४० बाबद चिंतामण हरि फडके सनगें एकूण रुपये.

३०	तिवट कच्चा रंग	१
१७५	दुपटा काशीचा	१
६०	झगा धुवट शेल्याचा	१
७५	तुंबा किमखापी अस्तर गुलबदन	१
३४०		४

१०१० ८

(120) The Peshwá went to see the Ganapati idols on the Ganesh-Chaturthi festival at Báláji Janárdan Fadnis' and Chintaman Hari Fadke's house.

A. D. 1795-96.

२९७॥ बाबद हुसेन मिया सावनूरकर यांणीं भगवंत भिमाजी
कारकून याजबरोबर पाठविलीं तीं सनगें एकूण रुपये.

२०	तिवट छिटी बऱ्हाणपुरी	१
१२९	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी	१
३७॥	जामेवार छिटी बऱ्हाणपुरी दर १८॥। प्रमाणें रुपये.	(२)
७९	किमखाप	१
२९७॥		५
१२६७॥		१३

१२१–(११४०) १९६ बद्दल गोपाळराव राम पंडित यांचे घरीं नवरात्राचे उत्साह निमित्य खासा स्वारी गेली ते समईं पोशाख दिला तो सनगें. रुपये.

सीत तिसैन मया व अलफ रविलाखर ९

१९	तिवट छिटी	१
१००	दुपटा छिटी	१
१६	महमुद्या	२ दर ८
२९	किमखाप	॥
१९६		४॥

१२२–(११४१) धर्मादाय खर्च राजश्री राव यांचे शरीरास समाधान नाहीं, सबब मन्युसूक्ताचे अनुष्ठानास व अर्घ्यप्रदानास व देवाचे पूजेस ब्राह्मण लाविले, त्यास देवास व ब्राह्मणांस, गंधास व विड्यास, व पूजेस सामान इस्तकबिल छ. ८ रोज तागाईत छ. १३ मिनहू पावेतों सहा रोजा बेगमीबद्दल यादी वाकनीस तसलमात त्रिंबक जुन्नरकर शागीर्द.

सीत तिसैन मया व अलफ रविलाखर ८

---

(121) The Peshwá went to Gopálrao Pandit's house during the "Naorátrá" festival.

A. D. 1795-96.

(122) The Peshwá being indisposed, Brahmins were engaged to repeat propitiatory incantations to the deity from the 8th to the 13th of this month.

A. D. 1795-96.

वजन तोळे.		वजन पक्के.	
५॥=	केशर.	८८८४॥	तेल चमेली.
·॥·	कस्तुरी.	८८८२।	बुक्का.
१३॥	कापूर.	८८८६।॥	
२॥	दशांग.	आगरबत्त्या सुमार २४	
७।१	लवंगा.		
७।१	वेलदोडे.		
·॥·	जाईफळ.		
१॥१	कातगोळ्या.		
८१	अत्तर मोतिया.		
३९			

सीत तिसैन मया व अलफ रविलाखर ११

किंमत रुपये २५०

१२३–(११४२) जमा खरेदी कर्ज गुजारत महादाजी बल्लाळ साठे याजपैकीं हातघड्याळ फरासी सीराबा त्यास खाशाकडे होते ते जमा, गुजारत हैबती जराडा खिजमतगार, आंत कांटे पांच व सांखळी एकेरी एक व मोहोर व किल्ली एकूण सामान तांब्याचें घर लांकडी रंगीन आंतून मढीव

A. D. 1795-96. (123) A watch worth Rs. 250 of the French make was used by the Peshwá.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

२ पेशवे. (क) राघोबादादा.

१२४–(४१) निंबाजी विठ्ठल कारकून तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडून सातारियास पत्रें घेऊन आला होता, तो किल्ले रायगड येथें अटकेस ठेवण्याबद्दल पाठविला असे, तरी यास किल्यावर घेऊन याचे पायांत बेडी घालून पक्या बंदोबस्तानें ठेवणें; आणि यास पैवस्तगिरीपासून पोटास शेर ब्राह्मणाचे शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, गणपतराव कृष्ण यांचे नांवें. सनद १.

आर्बा सबैन मया व अलफ सफर ६

(ह्या व पुढील महिन्यांत राघोबादादांकडील लोकांच्या व त्यांचे पक्षास जाऊन मिळाले लोकांच्या जमिनी जप्त जाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.)

१२५–(५२) जगजीवन पवार तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे चाकरीस आहे, सबब त्याजकडे प्रांत जुन्नर पैकीं सरंजाम आहे तो.

आर्बा सबैन मया व अलफ रविलावल २२

१ मौजे वाघाळे तर्फ पाबळ दरोबस्त देखील पाटिलकी.

१ मौजे वरुडे येथील पाटिलकी निमे.

२

एकूण दोन गांव सदरहू लिहिल्याप्रमाणें मशारनिल्हेकडे आहेत ते जप्त करून कमावीस तुम्हांकडे सांगितली असे, तरी अंमल चौकशीनें करणें; आणि आकार होईल तो ऐवज हुजूर पावता करणें म्हणोन, रघुनाथ हरी प्रांत जुन्नर यांचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू. छ. १ सफर.

---

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(2) PESHWÁ—(c) RághobáDádá

(124) Nimbáji Vittal Kárkun, having taken a letter from Dádá-Saheb (Rághobá Dádá) to Satára, was sent for imprisonment to fort Ráygaḍ. Orders were issued for shackles being put round his feet. There are many instances of the lands of Rághoba's men or persons who had gone over to him, being attached during this and the next month.

A. D. 1773-74.

(125) Jagjiwan Pawár being in the service of Dádá Saheb, his Saranjám was attached.

A. D. 1773-74.

१२६-(५३) बळवंतराव गोपाळ यांचे नांवें सनद कीं तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे चाकरीस शिलेदार आहेत त्यांजकडे सरंजाम प्रांत कडेवलीत पैकीं आहे तो.

आर्बा सबैन
मया व अलफ
रविलावल २२

१ सयाजी भापकर याजकडे मौजे सेटफल तर्फ चांभारगोंदें येथील मोकासा.

१ जानोजी व रामजी व प्रीताजी व रघुनाथजी सेळार याजकडे मौजे निंबोडी तर्फ चांभारगोंदें येथील मोकासा.

१ आवजी कवडे याजकडे मौजे आजपुज येथील अंमल आहे तो.

१ मकाजी भोसले याजकडे मौजे भोकारे तर्फ चांभारगोंदें येथील मोकासा.

१ मल्हारराव बिन दारकोजी पवार याजकडे मौजे पिंपरी तर्फ चांभारगोंदें येथील निमे मोकासा मोरो आपाजी मजमदार दिंमत मशार निल्हे याजकडे आहे तो.

५

एकूण पांच असामी यांजकडील सदरहू लिहिल्याप्रमाणें सरंजाम सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुम्हांकडे सांगितली असे, तरी अंमल चौकशीनें करून आकार होईल तो ऐवज सरकारांत पावता करणें म्हणोन छ. ७ सफर. सनद १.

परवानगी रूबरू.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१२७-(६३) कृष्णाजी रणदिवे शिलेदार यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम आहे, त्यास हे तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे चाकरीस होते, सबब सरंजामाची जप्ती सरकारांत केली होती, ऐशास मशारनिल्हे तिकडून निघोन इकडील फौजेंत हरी बल्लाळ यांजवळ चाकरीस आले या-

खमस सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २९

---

(126) The Saranjám of Sayáji Bhâpkar and other Silledars serving under Dádá Saheb was also attached.

A. D. 1773-74.

FROM NARO APPAJI'S DIARY.

(127) Krishnaji Randive Silledar's Saranjam was attached owing to his defection to Dádá Saheb. He now came over to the side of Government and joined the army under Hari Ballál. His Saranjam was therefore released from attachment; (there are many other orders of this nature in this day's diary.)

A. D. 1774-75.

जकरितां जप्ती मोकळी केली असे, तरी तुम्हीं जप्ती उठवणें. सुदामतप्रमाणें यांचे कमाविसदार अंमल करतील म्हणोन चिटणिसी. पत्रें.

१ परगणे बारागांव नांदुर येथील बाबती सरदेशमुखी येविशीं भिवराव येशवंत यास. पत्र.

१ मौजे अनंग पैकीं धुळें प्रांत खानदेश येथील सरदेशमुखी व घासदाणा याचे रुपये १०० शंभर पावतात येविशीं रामाजी अण्णाजी यास. पत्र.

१ परगणे कर्डे रांजणगांव पैकीं देहे.

१ मौजे रांजणगांव सांडस तालुके कर्डे येथील सरदेशमुखीचा अंमल व याचे घरची जप्ती मोकळी केली असे.

२ मुकासबाबेचे गांव.

१ मौजे कोलेगांव डोळस तालुके बेल्हें.

१ मौजे यरडुली.

———

२

———

३

येविशीं बाबूराव माणके सुभेदार परगणे कर्डे रांजणगांव यांस पत्र.

(१) { १ प्रांत पुणें पैकीं तालुके पाटस मौजे वरवड येथील मुकासबाबेचे ऐवजीं इतलाख रुपये ३९०
१ मौजे बोरी पारधी येथील मुकासबाब. }

———

२

येविशीं नारो आपाजी यांस. पत्र.

———

४

चार पत्रें दिल्हीं असेत. छ. २८ रबिलावल.

(ह्या दिवसाचे रोजनिशींत असेच प्रकारचे दुसरे हुकूम सुटल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.)

१२८-(७२) खानजी देशमुख व रामाजी देशपांडे परगणे भडगांव यांणीं भीलांस मिळोन परगणीयांत दंगा करून बादेरडे गांव मारिला; व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांची फौज खानदेश प्रांतें उतरली तेव्हां माधवराव बांडे यांस सामील होऊन कसबे मजकूरचीं घरें लुटलीं, व कित्येकांचे खंड करविले ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी हरदूजणाचीं वतनें देशमुखी, व देशपांडेपण व हरदूजणाच्या पाटिलक्या, व मौजे गोंडगांव इसाफतीचा रामाजी देशपांडे याजकडे आहे, त्यासुद्धां जप्ती करून सदरहूचा आकार होईल तो सरकारांत पावता करणें; व देशमुख व देशपांडे यांस हुजूर पाठऊन देणें ह्मणून, सदाशिव नारायण कमाविसदार परगणे मजकूर, प्रांत खानदेश, निसबत महादाजी नीलकंठ यांचे नांवें. छ. १३ माहे जमादिलावल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाकर २९

रसानगीयादी.

१२९-(१६५) जिवाजी पुरुषोत्तम, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडून सनदा घेऊन परगणा लक्ष्मेश्वर येथें येऊन लोक फिताऊन दंगा करून ठाणें घ्यावें या राजकारणांत होता, त्याची बातमी पांडुरंग गोविंद यांस मिळतांच कैद करून हुजूर पाठविला तो तुह्मांकडे अटकेंत ठेवावयासी पाठविला असे, तरी यास किल्ले विसापूर येथें पके बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर मध्यम प्रतीचा देत जाणें ह्मणोन, तालुके राजमाची निसबत रामराव नारायण यांचे नांवें हस्तकपत्र पुरंधर व परवानगी रूबरू. छ. ९ जिल्काद. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

१३०-(१७५) येसाजी विश्वासराव व रामचंद्र सावंत भीरवडेकर हे तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई यांजवळ राहून किल्ले अशेर येथील फितुरांत होते, सबब यांचे घराची जप्ती करावयाविषयीं तुह्मांस आज्ञा केली असे, तरी यांच्या घराची जप्ती करून मुलेंमाणसें अटकेंत ठेवणें;

खमस सबैन मया व अलफ सफर १५

---

(128) Khánji Deshmukha and Rámji Deshapánde of Bhadgaon acting in concert with the Bhils attached the village of Báderaden in the said Perganá, and also committed other depredations with the assistance of Mádhavrao Bánde when Dádásaheb's army entered Khandesh. Their watans were accordingly attached.

A. D. 1774-75.

(129) Jiwáji Purshotam was, at the instigation of Dádásaheb, planning the capture of the Thana of Pergana Laxmeshwar. He was arrested and sent to prison.

A. D. 1774-75.

(130) Esáji Vishwásrao and Rámchandra Sáwant Bhirwâdekar while living with Lady Anandibai became implicated in the conspiracy at fort Asher. Their houses were therefore attached and their relations were kept in confinement.

A. D. 1774-75.

आणि जाबता हुजूर लेहून पाठविणें ह्मणोन. सनदा.

१ गंगाधर गोविंद तालुके विजयदुर्ग यांस कीं, येसाजी विश्वासराव याचें घर तालुके मजकुरीं आहे त्याचे जप्तीविषयीं. सनद.

१ बाळाजी गणेश तालुके देवगड यांस कीं, रामचंद्र सावंत भीरवडेकर वस्ती मौजे भीरवडे तर्फ सालसी तालुके मजकूर याचे जप्तीविशीं. सनद.

२

दोन सनदा, परवानगी रूबरू.

१३१-(१९७) हुकसी जेजालंदाज निसबत तोफखाना हा पुणां(ण्यां)त राहून राजश्री दादासाहेब यांजकडे बातमीचीं पत्रें लिहून पाठवीत होता, सबब कैद करून पायांत बिडी घालून तुह्मांकडे पाठविला आहे, त्यास किल्ले नारायणगडावर पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी किल्ले मजकूर यांचे नांवें. छ. २८ रविलाखर. सनद १.

खमस सबैन मया व अलफ रविलाखर ५

रसानगी यादी.

१३२-(२२८) तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडून बातमी आणावयाचें काम तुह्मांस सांगितलें असे, तरी बातमी आणून सरकारांत लिहीत जाणें. बातमीचे कामास खर्च लागेल तो चौकशीनें करणें. प्रांत गुजराथ येथील सरसुभ्याचे ऐवजीं मजुरा पडेल ह्मणोन, चिंतामण हरी यांचे नांवें. सनद १.

सीत सबैन मया व अलफ रज्यब १६

रसानगी यादी.

१३३-(२७६) लोहोगड किल्ला सन अर्बा सबैनांत तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांणीं सदाशिव रामचंद्र यास देविला होता, तेव्हां किल्ले मजकूर येथील पीर शेख उमर यास तेथील लोकानीं सदाशिव रामचंद्र यांजकडे किल्ला न जावा ह्मणोन पांचशें रुपये नवस केला होता, त्याप्रमाणें सरकारांतून

सीत सबैन मया व अलफ सफर २

---

(131) Huksi a gunner in the artillery while residing at Poona used to write news-letters to Dadasaheb. He was therefore sent to prison.

A. D. 1774-75.

(132) Chintáman Hari was entrusted with the duty of collecting information regarding Rághobá Dádá.

A. D. 1775-76.

(133) Dádásaheb gave orders to Sadáshiv Rámchandra to take the fort of Lohogaḍ in A. D. 1773-74. The men of the fort being averse to the transfer vowed a present of Rs. 500 to the Pîr shek Umber in the fort, in case the transfer did not take place. Sanction was given to the amount being presented to the deity.

A. D. 1775-76.

नवसाबाबत रुपये ५०० पांचशें देविले असत, तरी सदरहू रुपये पीराकडे देऊन हिशेबीं नवस खर्च लिहिणें, मजुरा पडेल ह्मणोन, रामराव नारायण यांस. सनद १.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१३४-(३१६) भुकणजी काशीदास यांचे नांवें कौल लिहून दिला कीं, तुह्मीं हैदर नाईक यांजकडील ऐवजाच्या हुंड्या साहुकारी पुण्याहून औरंगाबादेच्या करून ऐवज शहरास नेऊन तेथून तीर्थस्वरूप राजेश्री दादासाहेब यांजकडे सरकारांत जाहीर न करितां पोहोंचता केला, ये गोष्टीची चौकशी सरकारांतून करून मुद्दा तुम्हांकडे शाबुत करून तुमचे गुमस्ते यांजपासून सरकारांत साल गुदस्तां नजर घेऊन फडशा केला, असें असोन तुम्हीं ये गोष्टीचा वसवसा चित्तांत धरिला आहे, म्हणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी तुम्हीं येऊन पुण्यांतील साहुकारीचें कामकाज सुरळीतपणें बेवसवसा करीत जाणें, येविशीं तुम्हांस सरकारांतून उपद्रव लागणार नाहीं, अभय असे म्हणोन. छ. २४ रविलाकर.

सबा सबैन मया व अलफ जमादिलाकर २९

१३५-(३२२) खंडेराव पवार यांजकडे सरंजामास माहाल व गांव पेशजीपासून आहेत, त्यास ते तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे गेले होते, सबब यांचे सरंजामाची जप्ती करून कमावीस खंडेराव त्रिंबक यांजकडे सांगितली होती. पवार हुजूर आले याजकरितां सरंजामाची [जप्ती ?] मोकळी केली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन सुदामतप्रमाणें अंमल सुरळीत देणें म्हणून, चिटणीसी. पत्रें.

सबा सबैन मया व अलफ रजब १०

१८ कित्ता जमीनदारांस पत्रें.

१ परगणे बार येथील जमीदारांस.

१ परगणा बदनावर.

१ परगणा धर्मपुरी.

---

(134) Bhukanji Káshidás, a banker of Poona issued Hundis for amount received from Haider Naik, made them payable at Aurangabad, and sent the amount in cash from that place to Dadasaheb, without informing the Government. A Nazar was taken on this account from his agent. He was now assured that no further harm would be done to him and that he might carry on his business as before.

A. D. 1776-77.

(135) Khanderao Pawár having joined Dádásaheb, his Saranjam was attached. He now came over to Government and the attachment was ordered to be removed.

A. D. 1776-77.

१ परगणा ताल.

१ परगणा पंडावल.

१ परगणा बोरसें.

१ परगणा दुमसी.

१ परगणा सुंदरसी.

१ परगणा जालसें.

१ परगणा सुलतानावल.

१ परगणा बलखेड.

१ परगणा बांसेवाडा.

१ परगणा डोंगरपूर.

१ परगणा इंद्रगड.

१ परगणा कोटें.

१ परगणा सोपार.

१ परगणा बेताली.

१ परगणा कीरवाड.

१८ वगैरे पत्रें.

१३६–(३५३) मौजे सोव, परगणे महाड, तालुके रायगड, हा गाव बळवंतराव मल्हार यांजकडे इनाम आहे, त्यास मशारनिल्हेचे बंधु नीलकंठ मल्हार, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे गेले; व सदाशिव मल्हार तोतयाकडे गेले, सबब मौजे मजकूरची जप्ती सरकारांत केली त्याविशीं सनदा.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

छ. २० रमजान.

१ महादाजी बल्लाळ यांचे नांवें सनद कीं तुम्हांस जप्तीची कमावीस सांगितली, असे, तरी इमानें इतबारें वर्तोन, मौजे मजकूरचा अंमल चौकशीनें करून आकार होईल तो सरकारांत पावता करून [कबज?] घेत जाणें म्हणोन.

---

(136) The village of Sowâ in Pargaṇa Mahâd was held in Inam by Balwantrao Malhâr. One of his brothers Nilkanth went over to Dâdâsâheb and another Sadâshiva joined the Imposter. The village was therefore attached.

A. D. 1776-77.

१ मोकदम मौजे मजकूर याचे नांवें सनद कीं, मशारनिल्हेस मौजे मजकूरची कमावीस सांगितली असे, तरी यासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन.

रसानगी यादी.

२

१३७-(४१२) त्रिंबक मोरेश्वर यास सनद कीं, तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातुश्री आनंदी बाई मंडलेश्वरीं राहणार, त्यास तेथें सरकारचा वाडा आहे त्याची दागदुजी करून देणें; व लांकडें, व वैरण, व शाकभाजी, व किरकोळ साहित्य अगत्या अगत्य लागेल तें देत जाणें म्हणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ मोहरम २४

परवानगी रूबरू.

१३८-(४५९) तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडील मराठे सरदार, व कारकून, व शिष्ये वगैरे यांचीं घरें तालुके बये प्रांत कोंकण येथें आहेत, तेथून तीर्थस्वरूप यांजकडे परिछिन्न कोणीं जाऊं नये, याप्रमाणें गांवगन्ना ताकीद करणें, यामागें कोणी तिकडे गेला असिला, तरी चौकशी करून जो तिकडे गेला असेल, त्याचें घर जफ्त करणें म्हणोन. सनदा.

सबा सबैन मया व अलफ रविलाखर २६

१ किल्ले देवा वगैरे निसबत आनंदराव राम.
१ तालुके वसई निसबत विसाजी केशव.
१ तालुके बीरवाडी निसबत बाबूराव पासलकर.
१ प्रांत बेलापूर निसबत बाजी गंगाधर.
१ तालुके कल्याण भिंवडी निसबत सदाशिव मोरेश्वर व रामचंद्र कृष्ण.
१ प्रांत राजपुरी निसबत गोविंदराव माणकर.
१ तालुके नेरळें निसबत राघो नारायण व धोंडो महादेव.
१ तालुके अवचितगड निसबत आबाजी बल्लाळ व भास्कर महादेव.

८ एकूण आठ सनदा. छ. १८ रविलाखर.

परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

---

(137) Mâtushri Ânandibai was going to reside at Mandaleshwar. Orders were issued for repairing the Government building at the place, and for supplying her with the necessary provisions.

A. D. 1776-77.

(138) Notifications were ordered to be issued to the several villages in the Konkan directing the Sardars, Karkoons, and attendants of Dâdâsâheb living there, to abstain from going to him on any account. The houses of those who had already gone to him were ordered to be attached.

A. D. 1776-77.

दादासाहेब यांचे रोजनिशी पैकीं.

१३९–(४६७) ५४०० जमा छ. मजकूर मेजवानी, गुजारत जनराल व कौंसल बंदर मुंबई यांणीं कंपणीच्या सरकारपैकीं खर्चास दरमहा दहा हजार रुपये द्यावयाचा करार केला, त्यापैकीं भरणा गुजारत त्रिंबकजी भालेराव. जमा. रुपये.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल ३

९४४॥ माहे रबिलाखरच्या ऐवजीं रुपये १०००० पैकीं बाकी राहिले ते जमा. रुपये.

७४४॥ पोता.

२०० चिठ्या मेळखातें.

९४४॥

४४५५।≡ माहे मजकूरच्या ऐवजीं.

५४००

१४०–(४६८) १२०००२॥ जमा छ. मजकूर.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल १२

२०००० मेजवानीबद्दल जनराल व कौंसल बंदर मुंबई यांणीं कंपनीचे सरकारपैकीं खर्चास दरमहा दहा हजार रुपये द्यावयाचा करार केला, त्यापैकीं भवानजी

---

(139) FROM THE DÂDÂSÂHEB'S DIARY.

A. D. 1777-78.

Rs. 5450 are credited as being received from the General and Council of port Bombay in payment of the amount of Rs. 10,000 a month agreed upon by the company.

Rs. 994-9 arrears of the month of Rabilâkhar.

Rs. 4455-7 out of the amount due for the current month.

5450

(140) The following amounts are credited.

A. D. 1777-78.

Rs. 20,000 Amount received from the company for the months of Sawâl and Jilkâd.

Rs. 100,002-8 amount of tribute due from Nabob Haidar alli Khân sent by him by sea.

विसाजी व शरीफ आली निसबत जन-
राल जमा. रुपये.
१०००० माहे सवालचे.
१०००० माहे जिल्कादचे.

२००००

१००००२॥ नबाब हैदर अल्लीखान यांजकडे सन अर्बाचे खंडणीचा ऐवज येणें, त्यापैकीं मशारनिल्हे यांणीं जाहाजांत घालून बराबर माणसें असामी २ दोन देऊन पाठविले, होन एकेरी नाणें २३५३० एकूण, दर ४। प्रमाणें जमा. रुपये.

१२०००२॥

१४१–(४६९) परशराम हजारी व खलफ आरबा जमातदार यांचे नांवें सनद कीं, तुम्हीं हुजूर येऊन विनंति केली कीं, किल्ले देहा व किल्ले बावामलंग फितुरी याजकडून सरकारांत हस्तगत करून देतों ह्मणोन; त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे, तर सदरहूप्रमाणें दोन्ही किल्ले श्रावणी पौर्णिमापर्यंत सरकारांत घेऊन देणें. बारभाई याजकडील कमाविसदार व त्याचे आप्त असतील त्यांस धरून कैद करणें. मातबर असामीचा खंड हुजुरून होईल. किरकोळ असामीचा खंड तुम्हीं तेथें करून त्यांत शिबंदी वगैरे खर्च लागेल तो अगत्या अगत्य करणें, हुजूर हिशेब पाहून मजुरा पडेल. किल्ले हस्तगत जाहल्यावर हुजूरून बेहडा व ऐवजाची नेमणूक करून दिल्ही जाईल. किल्यावर लोकांचा ऐवज नक्त वगैरे असेल त्याची आफरातफर होऊं न देतां जप्त करून ठेवणें. बेशर्त काम इमानें इतबारें केल्यावर कृपावंत होऊन तुम्हांस सर्फराज केलें जाईल म्हणोन, मशार निल्हेचे नांवें.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल २०

सनद १.

रसानगी यादी.

(141) Parshrâm Hazâri and Khalâf Arab Jamâtdâr having offered to get the forts of Dehâ and Bovâ Malang by conspiracy with the fort officers, they were ordered to carry out their plan before 15th Shrâvan, they were further instructed to keep the Kamâvisdar, acting on behalf of Bârbhai, in confinement. They were told that in case they succeded in carrying out the plan, they would be suitably rewarded.

A. D. 1777-78.

१४२-(४७०) जनरल बंदर मुंबई यांचे नांवें पत्र कीं, नबाब हैदर अल्लीखान यांणीं सन आर्बाचे खंडणीचे ऐवजीं मेस्तर टेमसन याचे गुजारतीनें होन हैदर नाणें २३९३० तेवीस हजार पांचशें तीस पाठविलें, तें बंदर मुंबईच्या मुक्कामीं दाखल जाहालें, तें तुमचे विद्यमानें दर ३॥ पावणे चार रुपयेप्रमाणें फरोक्त करून, नक्त इंग्रजी शिक्का तुम्हांकडे अमानत ऐवज रुपये ८८२३७॥ अठ्यायशीं हजार दोनशें साडे सदतीस रुपये ठेव ठेविली असे. जे समई सरकारांत प्रयोजन लागेल ते समई घेऊं म्हणोन.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल २१

पत्र १.

रसानगी यादी.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१४३-(४७९) कोंकणांत फौज भिवराव यशवंत यांजबराबर होती ते प्रजन्य काळची आणविली, त्यास मुंबईस तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब आहेत याजकरतां त्यांचे शहवर कांहीं लोक कोंकणांत ठेविले पाहिजेत, त्यास पावसाचे दिवसांत रावताचें काम नाहीं, याकरतां एक हजार पाईचें माणूस बेलापूरचे आसपास ठेवावें, त्यापैकीं तीनशें गाडदी तोफखान्याकडील ठेवावयाची आज्ञा केली आहे त्याप्रमाणें तीनशें गाडदी ठेवतील, बाकीचे भरतीस सातशें हशमी माणूस तुम्ही व सर्व तालुक्यापैकीं वगैरे सरसुभाहून नेमणूक करून देऊन त्या शहवर ठेवावें. सातशें माणसांत चांगला मातबर विश्वासू एक दुसरा सरदार ठेऊन गाडदी व या लोकांनीं एकत्र राहावें, याप्रमाणें तुम्हीं लोकांस ताकीद करून बंदोबस्त तुम्हीं वरचेवर पहात जाऊन, लिहिल्याप्रमाणें लोकांची नेमणूक जलदीनें करून देऊन हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन, विसाजी केशव यांस छ. जमादिलावल.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

सनद १.

परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

---

(142) The tribute received from Haidar Naik through Mr. Thomson was converted into English Rupees and the amount realized Vizt. Rs. 88,237-8 was kept in deposit with them.

A. D. 1777-78.

FROM JANARDAN APPAJI'S DIARY.

(143) The army sent into Konkan with Bhivâjirao Yeshwant, was, in consequence of the advent of the rainy season, recalled, as however, Dadasaheb was at Bombay it was deemed necessary to keep some force in the province, and Visaji Keshao was directed to post 1000 men, 300 Gârdis, and 700 others, in the nighbourhood of Belâpur.

A. D. 1777-78.

दादासाहेब यांचे रोजनिशी पैकीं.

१४४–(५०३) विठोजी चव्हाण हिंमतबहादूर यांचे नांवें सनद कीं, तुम्हीं काशी लिंगोजी, व शिदोजी मोरे यांजबराबर पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. स्वामीच्या चाकरीची निष्ठा धरून कांहीं फौज मेळविली आहे, विजापूर प्रांतांतील चार ठाणीं बसविलीं आणखीही जथ पाडीत आहों, त्यास सरदारांची नांवनिशी लिहिली आहे त्याप्रमाणें पत्रें पाठवावीं ह्मणोन लिहिलें, व उभयतांचे जबानीवरून सविस्तर विदित जाहलें, ऐशीयास तुह्मीं सरकार सेवेची निष्ठा धरून फौजेचा जथ धरून चाकरी करून दाखवावयाची उमेद बाळगीत आहां हे गोष्ट फार चांगली आहे, त्यास विजापूर प्रांतांतील व तासगांव येथील फितुरी यांचीं ठाणीं उठवून सरकारचा अंमल बसविणें ह्मणोन तुह्मांस हे सनद सादर केली असे; व जमीदारासही अलाहिदा दोन सनदा सादर केल्या आहेत. तुमच्या साहित्याविशीं राजश्री व्यंकटराव नाईक व आणखीही सरदार यांस पत्रें दिल्हीं आहेत, तरी तुह्मीं फितुरी यांचीं ठाणीं जबरदस्तीनें उठवून देऊन सरकारचा अंमल बसविणें; प्रांतांतील ऐवज वसूल घेऊन फौजेस खर्चास देणें; व कांहीं हुजूर पाठवणें. तुह्मांस जितका फौजेचा जथ पडेल तो पाडून ठासून राखणें कस्त मेहनत करून सरकार सेवा बजाऊन लौकिक वाढवून घेणें. वक्त हाच असे ह्मणोन, मशार निल्हेचे नांवें. छ. २१ रजब.

समान सबैन मया व आलफ रमजान २२

सनद.

१४५–(९९४) कमाविस भेट बरोबर महादजी शिंदे यांनीं पोशाक वगैरे पाठविले ते, गुजारत राणोजी निमटका खिजमतगार सनगें एकूण. आंख.

समान सबैन मया व अलफ

११५० कोरी चंदेरी.

३६० तिवटें.

१००	८०	१००
८०	०	०
३६०		४

FROM THE DADA SAHEB'S DIARY.

(144) Vittoji Chavân wrote to Dádásaheb that he had collected some army, had taken 4 places in Prant Bijapoor, and that he was collecting more men. He was praised for his devotion and was directed to collect more men, to establish his authority in the Prants of Bijapoor and Tasgaon, to collect revenues, and after defraying his expenses, to send the remainder to Government, that is, Dádásaheb.

A. D. 1777-78.

(145) Clothes worth Rs. 2350 were received from Mahádji Seindia.

A. D. 1777-78.

७९० जाफरखानी शेले.

६०० प्रत	३
१९० प्रत	१
७९०	४

११५०

५७५ छिटी बराणपुरी सनगें एकूण आंख.

१२५ तिवट	१
२५० जाफरखानी शेला	१
२०० जामेवारे	२
५७५	

५१२॥ लुगडीं नारायण पेठी.

७०	४८॥।	५५	४८॥।
६२॥	६५	४५	४७॥
७०			
५१२॥			९

११२॥ चोळखण पैठणी.

३७॥ प्रत लाल ३ दर १२॥ प्रमाणें.	
७५ प्रत हिरवे ६ दर १२॥ प्रमाणें.	
११२॥	९

२३५०	३०

१४६–(९९९) तेरीख छ. १५ रोज चैत्र वद्य ३ भौमवासरे शके १७०० विलंबी नाम संवत्सरे मुक्काम माजगांव बंदर मुंबई.

समान सबैन
मया व अलफ
रबिलावल १५

(146) The camp hitherto was " Bombay "; it is from this date, " Mazgaon, Bombay. "

A. D. 1777-78.

१४७–(९९६) जमा पोता. रुपये.

सभान सबैन
मया व अलफ
रबिलावल १९

२२६२१४= शिल्लक रोज गुदस्त.
९०२० जमा छ. मजकुरीं.

९००० महादजी शिंदे यांणीं तापीदास लालदास साहूकार मुंबईकर याजवर हुंडी रुपये ९५०० साडे नव हजाराची वैशाख शुद्ध पंचमीचे मुदतीची पाठविली, त्यापैकीं जमा इंग्रजी ऐवज, गुजारत त्रिंबकजी भालेराव. रुपये.

२० ताहा निराजी वासुदेव दिंमत थटी याजकडे गाय खरेदी करावयास रुपये तालुकेस दिल्हे, त्याचा खर्च लागू जाहला ते जमा. रुपये.

९०२०

२७६४१४=

१४८–(९९७) रामराव सदाशिव यांचे नांवें पत्र कीं, केळवें येथें हुजूर यावयाकरितां राऊत वीस पंचवीस जमा जाहाले आहेत म्हणोन हुजूर विदित जाहालें, तरी सदरहू रावताची हजरी घेऊन माणूस पाहून अडीच तीन चार रुपये पर्यंत पंधरवडा खर्चास देऊन केळवेयास ठेवणें, सदरहू खेरीज दुसरे न ठेवणें. मागाहून आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें; व तेथील नेमणुकेशिवाय जाजती खर्च व जप्ती संमंधें जमा खर्चाचा अजमास हालीं लेहून पाठवणें; व पुढें आठ आठादिवशीं जमा खर्चाचा अजमास लेहून पाठवीत जाणें, म्हणजे आज्ञा हुजुरून होईल त्याप्र-

समान सबैन
मया व अलफ
रबिलावल २२

---

(147) A hundi for Rs. 9500 was received from Mahádji Scindia.
A. D. 1777-78.

(148) Râmrao Sadâshiv was directed to entertain 20 or 25 Rauts who had assembled at Kelve and to remain always on his guard. He was informed that further communication would be sent after the assembling of the council in two or four days. (Orders appointing officers, requiring surrender of forts, were issued by Rághobá Dádá in this month.)
A. D. 1777-78.

माणें वर्तणूक करणें. तेथें आपले बळानें रहावयाचा प्रसंग आहे, यास्तव बहुत सावध रहाणें; दोन चारशें रुपये तुम्हांस रुपये पाहिजेत तरी पाठऊं, परंतु मनसुबा कांहीं लांबणीवर पडला आहे, पलीकडील रावताच्या बच्यावाची फिकीरच आहे, परंतु तजविजेनें सावध रहावें, मागाहून दोन चार दिवसांत येथें कोशल करून लेहून पाठऊं. लागल्यास भिंवडी नेरळें येथील कांहीं बातमी तुम्हांस कळली तरी लिहिणें. रावतीं अडीच तीन रुपये याप्रमाणें पंधरवडा घ्यावे, राउतांनीं ठाण्याचे आश्रयानें दम धरून रहावें, लुटीलवाडीस जाऊं नये, याप्रमाणें ताकीद करणें. जाणीजे. आठादिवशीं जमेची व खर्चाची यादी पाठवित जाणें म्हणोन, मशार निल्हेचे नांवें.

पत्र.

(ह्या महिन्यांत राघोबादादा यांणीं किल्ले स्वाधीन करणेंबद्दल कामगार नेमल्याबद्दल हुकुम सोडले आहेत.)

१४९–(५६२) कमाविस नजर चैत्र वद्य १७ (शुद्ध ७?) स्वारी डेरे दाखल मुहूर्तें करून जहाली ते दिवशीं रसानगी जमा धरण्याची यादी.

समान सबैन
मया व अलफ
जमादिलावल ७

१२२८ खाशाकडे.

४३॥। मोहरा नाणें.

३० गुजारत भास्कर महादेव नाणें इंग्रजी सुमार २ दर १५

१३॥। लक्ष्मण आपाजी नातु बराणपुरी नाणें १ एकूण.

४३॥।

६२।- पुतळी ताटें.

१ त्रिंबकजी भालेराव.
१ नारो गोपाळ.
१ लक्ष्मण रणसोड.
१ विठ्ठल गणेश.
१ यादो शामराज.
१ जीवनराव केशव.
१ भास्कर महादेव.

---

(149) Râghobâdâdâ moved into camp at Máhim and Nazars from his adherents were received by him; the names of these persons are given.

A. D. 1777-78,

१ भास्कर शंकर.
१ वेंकटराव पिलाजी.
१ सुरबराव येरूडकर.
१ आपाजी रामचंद्र.
१ बापूजी महादेव सारस्वत.
१ सदाशिवराव घोरपडे.
१ बापूजी महादेव निसबत चिटणीस.

१४

वजन तोळे ३॥।१॥। दर १६

१६ नक्त रुपये.

२ आपाजी आईतोळे.
२ राजाराम दिनकर.
५ देवशेट वीरकर.
२ आत्माराम खेतरी.
२ नागोराव तुलसी.
१ जमातदारखान.
१ इच्छाराम वैद्य.
१ खरगासिंग.

१६

१२२८ऽ

६।ऽ राजश्री अमृतराव यांजकडे.

४।ऽ त्रिंबकजी भालेराव याजबद्दल पुतळी ताढ १
एकूण वजन तोळे ।। दर १६ प्रमाणें.

२ नक्त रुपये.

१ नारो गोपाळ.
१ यादो शामराज.

२

६।ऽ

१२८।=

तपशील.

४३।।। मोहरा नाणें ३

६६।।= पुतळी तार्टे १९ एकूण वजन तोळे ४८= दर १६प्रमाणें.

१८ नक्त रुपये.

१२८।=

[सरकारी दप्तर.]

१५०--(५९४) १ बाळाजी गणेश तालुके देवगड यांस कीं तालुके मजकुरीं मुलें माणसें अटकेस ठेविलीं आहेत ते. असामी.

तिसा सबैन मया व अलफ रबिलावल ८

१ महादेव काळा, रामचंद्र काळा याचा बाप.

१ रामचंद्र सावंत भीरवडेकर, सौभाग्यवती आनंदीबाई यांजकडे राहून किल्ले आशेर येथील फितुरांत होता तो.

२

एकूण दोन असामी यांचीं मुलें माणसें अटकेस आहेत, तीं जामीन घेऊन सोडून देणें ह्मणोन. सनद.

१५१–(५९५) तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांणीं सरकारच्या तोफा अमीनखान पठाण याजसमागमें देऊन अमदाबादेस रवाना केलें होतें, तेथून अमीनखान निघालियावर तुह्मांजवळ गेले, तुह्मीं त्याचें पारिपत्य करून तोफा घेतल्या आहेत, त्यास तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब मुंबईहून इकडे आले. तोफा सरकारांत द्यावयाचा करार ठरला आहे, त्यास तुह्मांजवळ दोन तोफा आहेत, त्या किल्ले अहमदाबाद निसबत बाबाजी भिकाजी व राघो भिकाजी याजकडे देविल्या असत, तरी सदरहू दोन तोफा मशारनिल्हे यांजकडे सरकारची जासूद जोडी पाठविली आहे याचे गुजारतीने देऊन पावल्याचें कबज घ्यावें ह्मणोन, फत्तेसिंगराव गाईकवाड यांचे नांवें.

तिसा सबैन मया व अलफ रबिलावल ११

सनद १.

परवानगी रूबरू.

---

(150) The relations of the dependants of Râghobâdâdâ, and among others, those of Râmchandra Sâvant, who was in the service of Ânandibai and was concerned in the conspiracy at Asher, were ordered to be released after security.

A. D. 1778-79.

(151) Râghobâdâdâ sent his guns to Ahmadabad in charge of Aminkhân Pathân. Fatesingrao Gaikvaḍ captured the guns from him. He was informed that Râghobâdâdâ had returned to Poona from Bombay, and that he had agreed to surrender the guns to Government. Fatesing was directed to hand over the guns to Bâbâji Bhikâji and Râgho Bhikâji.

A. D. 1778-79.

१५२-(६०८) बाजी गोविंद जोशी कारकून निसबत दफ्तर यास बद्दल मुशाहिरा तैनातेंत मौजे आपटी तर्फ पाबळ प्रांत जुन्नर हा गांव दिल्हा होता, तो दूर करून तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे दिल्हा, त्याचे मुबदला पेस्तर सालापासून मौजे पिंपरी बुदरूख तर्फ चाकण प्रांत मजकूर हा गांव खेरीज सरदेशमुखी, व मुकासा, व केसोराम फाटक यास इनाम जमीन आहे त्याचा आकार करून बाकी दरोबस्त गांव करार करून दिल्हा असे, तरी मौजे मजकूर यांचे दुमाला करून आकार बद्दल मुशाहिरा मशारनिल्हे यांचे नांवें खर्च लिहित जाणें ह्मणोन, रामराव त्रिंबक यांचे नांवें. सनद १.

तिसा सबैन
मया व अलफ
रबिलाखर ३०

येविशीं मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. पत्रें २.

१ मोकदम मौजे मजकूर यास सनद.

१ जमीदार प्रांत जुन्नर यास.

२ ३

रसानगी यादी.

१५३-(६१७) मौजे मरकळ, तर्फ चाकण, प्रांत जुन्नर हा गांव तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे खर्चाचे बेगमीस साल गुदस्तां करार करून दिला होता, तो हल्लीं सरकारांत ठेऊन त्याची कमावीस साल मजकूरापासून तुम्हांस सांगोन हे सनद सादर केली असे, तरी मौजे मजकूरचा अंमल तुम्हीं चौकशी करून, आकार होईल तो प्रांत मजकूर येथील हिशेबीं जमा करीत जाणें ह्मणोन, रामराव त्रिंबक प्रांत जुन्नर यांचे नांवें. सनद १.

समानीन
मया व अलफ
जमादिलावल २०

मोकदम मौजे मजकूर यांस कीं मशारनिल्हेसी रुजू होऊन अमलाचा वसूल सुरळीत देत जाणें ह्मणोन. सनद १.

२

परवानगी रूबरू.

---

(152) The village of Ápti in Tarfa Pâbal of Pargaṇa Junnar was given to Dádásáheb (Raghobadada.)
A. D. 1778-79.

(153) The village of Markal in Tarfa Chákan, which was given to Dâdâsáheb for his expenses last year, was now taken back by Government.
A. D. 1779-80.

१५४–(११८) परगणा कसरावद येथील कमावीस त्रिंबकराव मोरेश्वर यांजकडून दूर करून, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे अंमल दिल्हा होता, तो हल्लीं सरकारांत ठेऊन पेशजीप्रमाणें कमावीस मशारनिल्हेकडे सांगितली असे, तरी तुह्मीं यासी रुजु होऊन अंमल सुरळीत देणे ह्मणोन, जमीनदारांस चिटणिसी. पत्र १.

समानीन मया व अलफ जमादिलावल २४

१५५–(१२०) कसबे खेड, तर्फ मजकूर, प्रांत जुन्नर येथील अंमल तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे दिला होता, तो सरकारांत ठेऊन बाबाजी महिपत यांस कमावीस सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजु होऊन कसबे मजकूरचा अंमल सुरळीत देणें; व सालगुदस्ताची बाकी येणें त्याचा वसूल मशारनिल्हेकडे देणें ह्मणोन, मोकदम कसबे मजकूर यास. सनद.

समानीन मया व अलफ जमादिलाकर २

परवानगी रूबरू.

दादासाहेब यांचे रोजनिशी पैकीं.

१५६–(१३१) १०४९९ कमावीस मेजवानी करनेल गाडर साहेब कलकते यांणीं कंपनीचे सरकार पैकीं दरमहा खर्चास द्यावयाचा करार केला, रुपये ३०००० तीस हजार पैकीं जमा नक्त, गुजारत हरी तमाजी. रुपये.

समानीन मया व अलफ रजब

१५७–(१३२) २० नाटकशाळा यांस रोजमऱ्या पैकीं एक माही खर्चास.

४ हमेत.

३ बसंत

३ उमेदा.

समानीन मया व अलफ रजब

---

(154) Similar step was taken regarding the Pargaṇa of Kasravad.
A. D. 1779-80.

(155) The village of Khed in Tarfa Khed in Pránt Junnar, given to Dâdâsaheb in the preceding year, was taken back by Government.
A. D. 1779-80.

FROM THE DÂDÂSÂHEB'S DIARY.

(156) Rs. 10496-8 are credited as received from colonel Godard of Sansthân Calcutta out of Rs. 3000 due by the Government of the Company in accordance with their agreement to pay Raghunâthrao a monthly allowence of his expense.
A. D. 1777-80.

(157) Rs. 20 are paid to harlots in past payment of their salaries.
A. D. 1779-80.

२ चपला.
२ मैना.
२ चंद्रसेना.
२ नैना.
२ रूपकु [व?] र.

२०

[सरकारी दप्तर.]

१५८–(६३३) धोंडो वगैरे यांणीं तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे जाण्याचा मनसबा करून पुण्यांत लोक ठेऊन लबाडी करीत होते, सबब त्यांस कैद करून अटकेस ठेवावयाकरितां रवाना केले असेत, तरी यांच्या पायांत बेड्या घालून यांस पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्ते [प्रमाणें?] देत जाणें म्हणून. सनदा.

समानीन मया व अलफ साबान १८

१ रघुनाथ सदाशिव तालुके रायगड यांचे नांवें बापूजी जनार्दन ठेवावयाविशीं. सनद.
१ नारो शिवदेव किल्ले वंदन यांचे नांवें धोंडो गोविंद ठेवावयाविशीं. सनद.
१ बाजी गोविंद किल्ले पाल यांचे नांवें कीं गोविंदराव बाबाजी ठेवावयाविशीं.

३ तीन सनदा दिल्या असेत.

परवानगी रूबरू.

दादासाहेब यांचे रोजनिशी पैकीं.

१५९–(६३८) बाजीराव गोविंद यांचे नांवें पत्र कीं, तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. आज्ञा होईल तरी इकडे फौजेची जथ धरितों, त्यास विजापूर प्रांताची, व रास्ते, व मिरजकर यांजकडील महालाचे जफ्तीच्या सनदा पाठवाव्या, व नबाब हैदर अल्लीखान बहादूर व व्यंकटापा ना-

समानीन मया व अलफ साबान २५

---

(158) Dhondo Govind and two others wishing to go over to Dâdâsaheb enlisted some persons in Poona. They were arrested and sent to prison.

A. D. 1779-80.

FROM THE DÂDÂSÂHEB'S DIARY.

(159) Bájirao Govind requested permission to entertain troops, and asked for Sanads authorising him to attach the Government Amal revenues in Bijapur, and the Mahals of Raste and Mirajkar. He was permitted to entertain troops and to attach the provinces referred to. He was informed that he would be called to the Huzur when Raghunáthrao would move out in camp. Letters were also sent to Vyankattappá Naik and Haider Naik to assist him.

A. D 1779-80.

ईक वगैरे यांस साहित्य पत्रें सरकारचीं सादर व्हावीं म्हणोन लिहिलें, व तुम्हांकडील व्यंकाजी विठ्ठल कारकुनांनीं अर्ज केला, त्याजवरून विजापूर प्रांतांत सरकारचे अमलाचे जफ्तीची सनद, व रास्ते, व मिरजकर यांचे महालाची सनद एकूण दोन सनदा सादर केल्या आहेत, तरी तुम्हीं त्या मुलुकाची जफ्ती करून फौजेची जथ पडेल तों पाडून, खासा स्वारी मोहिमेस बाहेर निघेल ते समईं तुम्हांस हुजूर यावयाची आज्ञा केली जाईल तेव्हां येणें. तुमचे साहित्याविशीं नवाबास लिहिलें आहे, व व्यंकटापा नाईक वगैरे यांसही अलाहिदा पत्रें सादर केलीं असेत म्हणोन, मशारनिल्हेचे नांवें चिटणिसी. पत्र १.

जमीनदार प्रांत विजापूर यांचे नांवें पत्र कीं, प्रांत मजकूर येथील सरकार अमलाचे जफ्तीची आज्ञा नरसिंगराव गोविंद यांस केली आहे, तरी तुम्हीं मशारनिल्हेसी रुजू राहोन अंमल सुरळीत देणें म्हणोन.

जमीदार महालनिहाय निसबत रास्ते, व मिरजकर यांचे नांवें पत्र कीं, महालानिहाय येथील जफ्तीची आज्ञा नरसिंगराव गोविंद यांस केली आहे, तरी तुम्हीं मशारनिल्हे यांस रुजू राहोन अंमल सुरळीत देणें म्हणोन.

१६०–(६४०) सदाशिव धोंडदेव यांचे नांवें पत्र कीं, मुंबईतील सरकारचा बंगला व घर आहे, त्याचें कोटकाम जाया जहालें असल्यास दागदोजीस शें दोनशें रुपये लागल्यास लाऊन दागदोजी करणें ह्मणून, मशारनिल्हेचे नांवें. पत्र १.

समानीन मया व अलफ रमजान १२

१६१–(६५३) स्वारी राजश्री बाजीराव मुक्काम मंडळेश्वर वगैरे इस्तकबिल छ. ९ जमादिलावल सन खमस सबैन तागाईत छ. १५ मोहरम सन सबा सबैन एकूण माहे ३२८११ गुजारत राघो केशव ठोसर रसानगी दिल्ही.

समानीन मया व अलफ जिल्काद २०

हिशेब खर्च. रुपये.

९९३११।=॥ महालानिहाय पैकीं.

१२००० अहिल्याबाई होळकर पैकीं.

११९४० राजश्री महादजी शिंदे पैकीं.

२३९७१८॥ राजश्री खंडेराव पवार परगणे धार पैकीं.

५००० गुजारत विसाजी हरी कमाविसदार.

---

(160) Sadáshiv Dhonddeo was permitted to repair the Bungalow and house at Bombay belonging to Government (Dádásaheb) at a cost of Rs. 100 or 200.

A. D. 1779-80.

(161) It appears from entries on this page that Raghunáthrao's son Bájïrao recovered Rs. 12000 from the territory of Ahilyâbâi Holkar, Rs. 11940 from that af Mahádji Scindia and 23971 from that of Khanderao Pawâr.

A. D. 1779-80.

७६७९॥ गुजारत लक्ष्मण नर्सी.

७५०० नक्त.

१७९॥ किरकोळ.

७६७९॥

५००० गुजारत कृष्णाजी रघुनाथ कमाविसदार.

२००० गुजारत संताजी काळे कमाविसदार.

४२१॥·॥ किल्यापैकीं गल्ला वगैरे.

३८७०८ गुजारत नारो दुमदेव परगणे मजकूरची जफ्ती सांगितली त्याजबद्दल.

हिशेब छ. १४ रबिलाखर छ. १९ जमादिलाखर, एकूण माहे २८५ एकूण.

३६७१॥≡ ऐन वसूल.

१७॥ रयेतीकडून.

१८०॥।= गुजारत संताजी काळे रुपये २०० साहुकाराकडे येणें, पैकीं मशारनिल्हेचे गुजारत खंडेराव पवार बादीचें देणें १९८= बाकी गुजारत आपाजी कृष्ण दिंमत रामचंद्र आबा तोले.

३८७०८

२३९७१८॥

२७२॥ गहनाबाई पवारीण यांजकडे गांव होता त्याजपैकीं, गुजारत कारकून निसबत पवारीण.

४५००० खंडेराव त्रिंबक.

३४००० धारकिल्याचे शिबंदीचे देण्याबद्दल.

११००० दरमहाचे खर्चाबद्दल.

४५०००

६१२८ कृष्णाजी पवार व सदाशिवराव पवार.

———

९९३११।=॥ (९९३११॥-॥)

१६२–(६७४) १२॥ इंग्रजाकडील लोक फुलपाड्यास मुक्काम असतां चाकरीस आणिले, त्यास भात्याबद्दल एक रोजा रसानगी देण्याची यादी सुर्ती. रुपये.

समानीन
मया व अलफ
रबिलावल ६

[सरकारी दप्तर.]

१६३–(८२४) जमा जामदारखाना.

कमाविस भेट सनगें एकूण. रुपये.

आर्बा समानीन
मया व अलफ
सवाल १७

तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांणीं हरी बल्लाळ यांजबरोबर पोशाक पाठविले ते जमा, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

६३० राजश्री राव यांसी सनगें एकूण. रुपये.

३७० प्रत पोशाक.

६०	चिरा जरी कारचोबी सोनेरी	१
५०	वोढणी जरी कारचोबी सोनेरी	१
१७५	झगा जरी कारचोबी सोनेरी	१
४०	तुंबा किमखापी	१
४५	धोत्रजोडा	१
३७०		५

२६० प्रत पोशाक सनगें. रुपये.

५०	तिवट पैठणी	१
१५०	शेला जाफरखानी	१
२०	झगा छिटी बराणपुरी	१

---

(162) Rs. 12–8 were debited as Batta to the persons who were brought from the English for assistance at Fulpâda.
A. D. 1779-80.

(163) Presents of clothes were received by the Peshvá and his wife from Dâdâsaheb (Raghoba).
A. D. 1783-84.

४० तुंबा किमखापी १

२६० ४

६३० ९

१४७ सौभाग्यवती रमाबाई यांसी सनगें एकूण. रुपये.

९० पातळ जरी कारचोबी चिरडी सोनेरी १

४५ वोढणी जरी कारचोबी सोनेरी १

१२ चोळी जरी कारचोबी सोनेरी १

१४७ ३

७७७ १२

१६४–(८४२) तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे परगणे कुंभारी येथील तेवीस गांव सरंजामास दिल्हे, त्यांत दुमाले गांव व हिसेदार होते ते दिल्हे त्याविशीं सनदा व चिटणिसी. पत्रें.

आर्बा समानीन मया व अलफ जमादिलावल ३०

१६५–(८६५) बाबत तीर्थस्वरूप कैलासवासी दादासाहेब यांची वस्तभाव मुंबईचे वाड्यांत वगैरे होती, त्याचे चौकशीस बाजीराम कारकून शिलेदार साल गुदस्तां पाठविलें होतें, त्यास वाड्यांत सनगें सांपडलीं ते आणिलीं ते, गुजारत कृष्णाजी राम कारकून पागा दिंमत गोपाळराव बापूजी सनगें मजीद एकूण चौपटा. आंख.

खमस समानीन मया व अलफ सफर १

१० तिवट छिटी बराणपुरी १

२० पातळें साधीं २

१६ शेला जाफरखानी १

६ तिवट जालनापुरी १

८ धोत्रजोडा १

६० ६

(164) Twenty three villages in Pargaṇa Kumbhâri were assigned in Saranjam to Râghobâ Dâdâ.
A. D. 1783-84.

(165) A karkoon was sent to Bombay to take possession of the property belonging to Dâdâsaheb, kept in his house at the place.
A. D. 1784-85.

१६६–(८८७) कैलासवासी दादासाहेब यांजबाबत जवाहीर इंगरजाकडे गाहाण आहे, तें फरोक्त करणार परंतु सरकारचें तोशीस लागेल, यास्तव साहुकार घेत नाहीं, त्यास अभय असावें म्हणोन जनरलाचे बोलण्यावरून रणसोड कृष्ण यांणीं हुजूर विनंती केली; त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी इंग्रेज जवाहीर फरोक्त करितील तें तुम्हीं खरेदी घेऊन सरकारांत आणून दाखवावें, त्यापैकीं सरकारांत घ्यावयाची सोय पडेल तें घेऊन किंमत देविली जाईल, सरकारांत न घेतल्यास हरएक जागा नेऊन फरोक्त करणें, तुम्हांस तोशीस लागणार नाहीं म्हणोन, साहुकार यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

खमस समानीन मया व अलफ रजब ६

१६७–(१०२६) कमाविस भेट सनगें एकूण. रुपये.

जमा दुबेर्जी कोपरगांवपैकीं तीर्थस्वरूप मातुश्री आनंदीबाई यांणीं सौभाग्यवती भागीरथीबाई यांजसमागमें सौभाग्यवती रमाबाई यांसी पाठविली, ती गुजारत केदारजी येवला खिजमतगार सनगें एकूण. आंख.

इहिदे तिसैन मया व अलफ जमादिलाखर ७

११६	पातळ साधें	१
२०	चोळखण	१
१३६		२

१६८–(१०९६) धोंडो महादेव यांचे नांवें पत्र कीं, तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांजकडे आनंदराव जाधव वगैरे घाटाखालीं फौज घेऊन पेशजी गेले होते, त्यांजवर सरकारचे फौजेनें कल्याणचे मुक्कामीं छापा घातला, त्यावेळेस राउत पळोन घाट च-

सलास तिसैन मया व अलफ जमादिलावल २१

---

(166) Some jewellery of the deceased Raghunáthrao Dâdâ was mortgaged to the English. They now wished to sell it; but nobody would purchase it through fear of Government. Ransod Krishna, at the desire of the General represented the fact to Government, and asked permission to purchase the jewellery. The permission was granted on condition of his producing all the articles purchased before the Peshwâ, and to allow him to purchase any that he might desire.

A. D. 1784-85.

(167) Presents were sent to the Peshwa's wife by Ânandibâi (Râghobâ Dâdâ's wife) from Kopergaon.

A. D. 1790-91.

(168) Refers to the successful attack made in former years by the Government army against the forces of Ânandrao Jâdhav and others who were going to join Rághobá Dádá, while encamped at Kallyan.

A. D. 17-92-93.

ढोन येतांना किल्ले रतनगड येथील लोकांनीं घोडीं पाडाव करून आणलीं, तीं संस्थान पेठ येथील बंदोबस्तास घोड्यावर बारगीर ठेऊन चाकरीस ठेविलीं होतीं; त्यांस हल्लीं संस्थान मजकूर चिमणाजी दलपतराव यांचे स्वाधीन सरकारांतून केलें, याजकरितां घोडीरास १९ एकूणीस सरंजामसुद्धां सदाशिव कृष्ण याजबरोबर पाठविलीं, त्याची तपशीलवार यादी अलाहिदा आहे, त्याप्रमाणें हुजूरपागेकडे सरकारांत जमा असेत म्हणोन. जाब १.

---

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

३ प्रतिनिधी.

१६९–(२९) राजश्री पंतप्रतिनिधी यांजकडील प्रांत कऱ्हाड वगैरे येथील अंमल सरकारांत ठेऊन, त्याची कमावीस गंगाधर शामराव यांजकडे सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन. सनदा.

आर्बा सबैन
मया व अलफ
जिल्काद ३०

१२ देशमुख व देशपांडे यांस.

१ प्रांत कऱ्हाड.
१ परगणे खटाव.
१ तर्फ वरुण.
१ तर्फ नाणेघोळ.
१ तर्फ कौल.
१ तर्फ परळी.
१ कर्यात आउंद.

---

[1] POLITICAL MATTERS.

(6) Matters relating to

(3) Pratinidhi.

(169) The Amal belonging to the Pratinidhi in Pránt Karáḍ, Pargaṇe Khatáv, Karyát Oundh, Karyat Átpâḍi, and other Mahals was taken under the management of Government.

A. D. 1773-74.

१ कर्यात म्हसवड.

१ कर्यात भालवणी.

१ कर्यात आटपडी.

१ कर्यात वेलापूर.

१ तर्फ मोरगिरी.

———

१२

१ मोकदम देहाये कर्यात वेळापूर यास.

१ कमाविसदार जकात व डाग्ये व दतकणे यांस.

१ दस गावडे धनगर यांस.

———

१५

पंधरा सनदा, रसानगी याद, व बरहुकूम सनद लष्करची आली, सबब दिल्या असेत. छ. २९ रमजान रुजू छ. १ साबान.

१७०–(८६) कमाविस भेट बद्दल श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी. बाळाजी जनार्दन फडणीस मशारनिल्हे यांस वाड्यांत भोजनास सांगावयास गेले होते तेथें सनगें आलीं ते जमा, गुजारत सटवाजी साबळा खिजमतगार दिंमत मजकूर सनगें एकूण किंमत. रुपये.

खमस सबैन मया व अलफ जमादिलावल १०

३०	तिवट छिटी बराणपुरी	१
७५	जाफरखानी छिटी बराणपुरी.	१
७५	किमखाप	॥
७०	जामेवारे छिटी बराणपुरी	२ दर ३५
२५०		४॥

१७१–(८७) किल्ले वसंतगड, वासुदेव अनंत यांजकडून तुम्हांकडे होता, तो दूर करून श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांजकडे देविला असे, तरी किल्ला जकीरासुद्धां मशारनिल्हे यांजकडे देऊन पावलियाचे कबज घेणें म्हणोन. सनदा.

खमस सबैन मया व अलफ जमादिलावल १७

---

(170) The value of clothes received by Báláji Janârdan Fadnis when he went to Shrinivás Gangâdhar Pratinidhi to give the latter an invitation to dinner at the palace is credited on this date.

A. D. 1774-75.

(171) The fort of Wasantgad was ordered to be made over to Shrinivás Pandit Pratinidhi.

A. D. 1774-75.

१ गणेश नारायण भागवत यांचे नांवें.

१ हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचे नांवें.

२

दोन सनदा, परवानगी रूबरू.

१७२-(८८) कमाविस भेट बद्दल बाय, गुजारत हरी विश्वनाथ भाव्ये सनगें एकूण. रुपये.

खमस सबैन मया व अलफ जमादिलावल २३

२२६ बद्दल श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांची स्त्री सौभाग्यवती यमुनाबाई यांस वाड्यांत भोजनास सांगावयाकरितां सौभाग्यवती पार्वतीबाई गेली होती, तेथें सनगें आलीं ते रुपये.

१२५	साडी शेलारी	१	
१	खण	१	
१००	शाल फर्द	२	दर ५०
२२६		४	

२२२। सौभाग्यवती पार्वतीबाई व मातुश्री सगुणाबाई व गंगाबाई यांस सनगें एकूण किंमत. रुपये.

६५ बद्दल आनंदराव गोपाळ.

६० लुगडीं.

	१५	२०	२५
	६०		३
५	खण		२ दर २॥
६५			५

१५७। बद्दल लक्ष्मण कान्हेरे.

१३४। लुगडीं.

६२॥	७१॥।
१३४।	२

(172) The value of clothes received by Lady Pârwatibâi when she went to give Lady Yamunábai, wife of Shrinivas Pandit Pratinidhi, an invitation to dine at the Royal Palace, is credited on this date.

A. D. 1774-75.

			१७॥ लुगडें नारायणपेठी.	१
			५॥ खण ३॥	२
			५॥	२
		१९७।		९
	२२२।			१०
४४८।				२४

१७३–(८९) श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांजकडे किल्ले हाय देविले असेत, तरी तीळ सनदांचा उजूर न धरितां किल्ले जकीरासुद्धां हवाली करून पावलीयाचे कबज घेणें म्हणोन, हवालदार व कारकून यांचे नांवें. सनदा.

खमस सबैन मया व अलफ जमादिलावल २४

१ किल्ले सदाशिवगड.
१ किल्ले कोगरी.
१ किल्ले चंद्रगड.
१ किल्ले कमलगड.
१ किल्ले महिमंडनगड.
१ किल्ले महीपतगड.
१ किल्ले जयगड नजीक हेळवाक.
१ किल्ले मकरंदगड.

---

(173) The following forts were ordered to be made over to Shrinivás Pandit Pratinidhi.

A. D. 1774-75.

1 Fort Sadáshiv gaḍh.	1 Fort Kaugari.
1 Fort Chandragarh.	1 Fort Kamal garh.
1 Fort Mahîmandaṇ garh.	
1 Fort Mahipat garh.	1 Fort Jayagarh. (near Heḷwâk)
1 Fort Makarand garh.	
1 Fort Vyâghra garh.	1 Fort Môrgiri.
1 Fort Prachit garh.	1 Fort Wardhangarh.
1 Fort Bhushaṇ garh.	1 Fort Wasantgarh.
1 Fort Mahimán garh.	1 Varugarh.
1 Fart Vairáṭ garh.	1 Fort Machindragarh.
10	8

18

१ किल्ले व्याघ्रगड.

१ किल्ले मोरगिरी.

१ किल्ले प्रचीतगड.

१ किल्ले वर्धनगड.

१ किल्ले भूषणगड.

१ किल्ले महिमानगड.

१ किल्ले बसंतगड.

१ किल्ले वैराटगड.

१ किल्ले वरुगड.

१ किल्ले मचींद्रगड.

१८

अठरा सनदा, रसानगी यादी.

१७४-(९०) श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांजकडे पूर्ववत् प्रमाणें अंमल करार करून दिल्हा असे, तरी यांजकडील कमाविसदारासी रुजू होऊन अंमल सुदामत प्रमाणें सुरळीत देत जाणें ह्मणोन. सनदा.

खमस सबैन मया व अलफ जमादिलावल २४

१ जमीदार कर्यात भालवणी नजीक इटे यास.

१ मोकदम कसबें सावर्डें प्रांत मिरज यास.

१ (३) मोकदम देहाय कर्यात तासगांव.

१ मौजे चिंचणी.

१ मौजे मंगरूळ.

१ मौजे पार.

३

५

पांच सनदा, रसानगी यादी.

---

(174) Karyát Bhálawaṇi and the villages of Sawarḍe and 3 others were made over to the Pratinidhi as before.

A. D. 1774-75.

१७५-(२२७) भगवंतराव पंडित यांचे नांवें सनद कीं, आपणाकडे साल मजकुरापासून जातीस व फौजेचे बेगमीस सरंजाम द्यावयाचा करार केला, सालीना तैनाता बीतपशील. रुपये.

सीत सबैन मया व अलफ रजब ८

५०००० जातीस तैनात.

१००००० स्वार असामी ३०० तीनशें, दर राउती रुपये ३०० तीनशें प्रमाणें द्रेखील पडीलीं घोडीं तीनशांचे शेऱ्यांत वरकड सरंजामी सरदाराचे शिरस्तेप्रमाणें. रुपये.

९०००० ऐनबोली ३०० प्रमाणें.

१०००० जाजती रयात.

१०००००

१५००००

एकूण दीड लक्ष रुपये सालीना तैनात करार केली आहे, यासी सरंजाम महाल व गांवची बेरीज. रुपये.

६०००० परगणे बेलगी तनखा.

१९३८१ परगणे रुळी तनखा. रुपये.

१९०८१ ऐन तनखा.

३०० जकात.

१९३८१

१०७३६१ प्रांत बुंदेलखंड पैकीं पेशजी राजश्री श्रीनिवास पंडित यांजकडे महाल गांव होते, ते सालगुदस्तां दूर करून विसाजी गोविंद यांजकडे कमावीस सांगोन सनद दिली आहे, ते सालमजकुरीं त्यांजकडून दूर करून आपणाकडे फौजेचे बेगमीस सरंजाम कदर करून दिल्हा.

बीतपशील. रुपये.

---

(175) Bhagwantráo Pandit was granted a personal Saranjám worth Rupees 50000, and military Saranján worth Rs. 100000 on condition of keeping up a body of 300 horse for service under Government.

A. D. 1775-76.

९३९४४ परगणे गडवाई.
९३४१७ तालुके नरसीगड पैकीं गांव.

१०७३६१

१८६७४२

यासी बयान.

१५०००० ऐन.

३६७४२ जाजती महाल लाऊन दिल्हे आहेत, त्यास महाली बेरजेप्रमाणें वसूल होत नाहीं सबब रुपये.

१९३८१ किता नेमून दिल्हे.
१७३६१ जाजती रदबदलीमुळें.

३६७४२

१८६७४२

येणेंप्रमाणें एक लक्ष शायशीं हजार सातशें बेचाळीस रुपये बेरजेचे महाल व गांव करार करून दिल्हे असेत, व सदरहू समंधें कलमें.

स्वाराचा सरंजाम वरकड सरंजामीयाचे शिरस्तेप्रमाणें करार करून दिल्हा असे. कलम १.

परगणे बेलगी व परगणे रुळी येथील वर्षासनें व दुमाले सुदामत चालत आल्याप्रमाणें चालवावे, व हिसेदारांचा हिसा तहव मोजीब देत जावा. कलम १.

एकूण दोन कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें महालचा व गांवचा ऐवज जातीस व फौजेस खर्च करून तीनशें स्वार बाळगून सरकार चाकरी करीत जावी ह्मणोन. सनद १.

रसानगी यादी.

१७६-(२८०) माणको बहिरव कुळकर्णी कसबे रहिमतपूर याणें भगवंतराव पंडित याचे खुळांत मिळून माहितगिरीनें मनस्वी पैका वाईदेशीं वगैरे लोकांपासून ऐवज घेतला आहे, त्याची चौकशी जाली पाहिजे, याजकरितां त्याचें हुजूर प्रयोजन आहे, तरी खिजमतगार पाठविले आहेत, यांज-

सीत सबैन मया व अलफ सफर २०

(176) Máṇko Bahirao Kulkarṇi of Rahimatpur joined the insurrection of Bhagwantrao Pandit, and extorted large sums from the ryats of Wâi and other parts. He was summoned to Poona for inquiry.

A. D. 1775-76.

बरोबर हुजूर पाठऊन देणें, कुळकर्ण जफ्त करणें; व घरावर चौकी ठेऊन त्यास हुजूर पाठवणें म्हणोन, पांडुरंगराव गोविंद यांस.

सनद.

परवानगी रूबरू.

१७७–(३१२) श्रीनिवास शामराव यांचे नांवें सनद कीं, प्रांत कराड वगैरे येथें सालगुदस्तां भगवंतराव प्रतिनिधी यांचा दंगा प्रांत मजकुरीं होऊन मुलूक लुटला, याजमुळें हुजूर मामल्याचे ऐवजास सोड देऊन तह करावयाचीं बीतपशील.

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २२

कलमें.

कर्यात खानापूर व विटे भालवणी या महालाचा वसूल अगदींच पडला नाहीं, अद्यापि ठाणीं नूतन आहेत, याजकरितां गुदस्तांचा ऐवज जमेप्रमाणें सोड देऊन सालमजकुरीं लावणी होईल त्याप्रमाणें वसूल घ्यावा. कलम १.

सालगुदस्तांचे जमाबंदीस सूट द्यावयाची, त्यास कोणें गांवास कसा उपद्रव जाला आहे, त्याची चौकशी करून गांव गेला राहिला पाहून सरासरी तिजाई सूट सन खमसचे जमाबंदीस पड असें करून सूट देऊन फडशा करून गुदस्तांची जमाबंदी करावी.

तिजाई सूट सरबासर पाहून द्यावी, बाकी ऐवज वसूल घ्यावा. कलम १.

बेहडियास जमा आहे, परंतु सालाबाद प्रतिनिधी ऐवज साधू देत नाहींत.

५००० रुजू चढाबद्दल.
४५०० कमाविसीबद्दल.

९५००

साडे नऊ हजार रुपये मागेंही साल दरसाल साधले नाहींत, कमी खालीं येत गेले आहेत, याजकरतां सालगुदस्तां सन सीत सबैनचे साडे नऊ हजार रुपये साधत नाहींत, कमींत आणून पुढें पांच हजार रुपये नेहमीं चढाबद्दल कमतींत आणावे; व कमाविसीचें कलम सालाबादचे अन्वयें बेहडियास सालमजकुरीं जमा धरून ऐवज येईल तो साधणुकेंत आणावा.

कलम १.

एकूण तीन कलमें करार केलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन.

सनद १.

रसानगी यादी.

---

(177) The Pránt of Karáḍ &c. having been pillaged by the Pant Pratinidhi Bhagvantrao in the preceding year; orders were issued for a partial remission of the revenue due.

A. D. 1775-76.

१७८-(४८९) श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांस देवाज्ञा जाहली, त्यांचे पुत्र परशराम श्रीनिवास यांस पदाचीं वस्त्रें द्यावयाचीं यास्तव येथून सदाशिव अनंत याजबरोबर सनगें, व शिरपेंच, व हत्यारें ऐसीं पाठविलीं आहेत, तरी श्रीमंत महाराज राजश्री स्वामींस विनंति करून मशारनिल्हेस प्रतिनिधींचे पदाचीं वस्त्रें देवणें. हत्ती द्यावयाचा तो मागाहून रवाना केला जाईल, एक घोडा त्यांस द्यावयाचा तो नजर पागेपैकीं देणें म्हणोन, बाबूराव कृष्ण यांचे नांवें. सनद १.

समान सबैन मया व अलफ साबान ९

परवानगी रूबरू.

१७९-(६४४) परशराम पंडित प्रतिनिधी यांस सनद कीं, आपणांकडील सरंजाम व वतनें पैकीं मातुश्री राजसबाई कैलासवासी भगवंतराव पंडित यांची स्त्री यांस दहा हजारांचा सरंजाम सालमजकुरापासून द्यावयाचा करार केला आहे, त्यास कर्यात इटें, व मौजे नेवरी कर्यात मजकूर येथील जिल्हेकडील अंमल खेरीज दुमाले गांव व जमीन करून व कर्यात इटें व कर्यात भालवणी येथील देशपांडे ह्यांचे वतनाचा हक्क व इसादत गांव मौजे धानवड कर्यात भालवणी याचा आकार दहा हजार रुपये पर्यंत आहे, त्यास सदरहूप्रमाणें करार करून देविलें पाहिजे म्हणोन, त्यांजकडील हणमंतराव माणकेश्वर यांणीं विदित केलें; त्याजवरून दहा हजाराचे बेरजेस सदरहू महाल व गांव व देशपांडेपणाचें वतन नेमून देविलें असे, तरी कर्यात मजकूर देखील मौजे नेवरी येथील जिल्हे लाऊन अंमल खेरीज दुमाले गांव व जमीन करून व दोही महालचे देशपांडेपणाचें वतन हक्क व इसाफत गांवसुद्धां यांजकडे नेमून देऊन चालवावें. साल मजकुरचा वसूल घेतला असेल तो माघारा द्यावा; व सदरहू आकार दहा हजाराहून जाजती जाहल्यास इटे कर्यात व दोन महालचें देशपांडेपणाचें वतन सदरहूप्रमाणें नेमून द्यावें, दहा हजाराचे भरतीस दुसरा गांव लाऊन द्यावा. मशारनिल्हेनी कर्यात इटे व मौजे नेवरी व हरदू महालचे वतनबाबेचा हक्क व इसापत गांवसुद्धां दहा हजार रुपये आकार समजाविला आहे, त्याप्रमाणें असिल्यास सदरहूप्रमाणें नेमून देऊन चालवावें म्हणोन. सनद १.

समानीन मया व अलफ जिल्काद ५

---

(178) Shrinivás Pandit Pratinidhi having died, Báburao Vishnu was directed to request the Maháraja to confer the dignity of Pratinidhi on his son Parasharám Shrinivás, and clothes of honor, a head dress and arms, were sent for being presented to the new Pratinidhi. Baburao was further asked to give one horse from the cavalry for the same purpose. An elephant was to be sent afterwards.

A. D. 1777-78.

(179) Parashrám Pandit Pratinidhi was asked to assign a Saranjám of Rs. 10,000 for the support of the late Pratinidhi Bhagwantrao Pandit's widow Rájábái.

A. D. 1779-80.

१८०-(७८३) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत परशराम श्रीनिवास प्रतिनिधी यांसी भोजनास सांगावयासी रोज गुदस्तां खासा स्वारी गेली, ते समई पोशाक दिला तो, गुजारत जानोजी जांबक खिजमतगार सनमें एकूण किंमत रुपये.

सलास समानीन मया व अलफ रबिलाखर ३

१२५	तिवट छिटी बुट सोनेरी	१
१५०	दुपटा छिटी बुट सोनेरी	१
१२५	जामेवार छिटी बुट सोनेरी	१
५०	किमखाप	·॥·
४५०		३॥

१ राजकीय·

(ब) इतर माहिती.

४ आंग्रे.

१८१-(३७) तुळाजी आंगरे यास किल्ले नगर येथें अटकेस ठेवावयाबद्दल बेडी सुद्धां पाठविला असे, तरी पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन शिधा खुद्द जातीस व कुणबिणी लास दोन व पोर्गा एक एकूण चहू असामींस दरमहा गल्ला.

आर्बा सबैन मया व अलफ जिल्हेज २०

कैली.	मापें.	वजन.	पक्के.
८।·॥ गहूं.		८८३॥ तूप.	
९।·॥ तांदुळ बारीक सडीक.		८८३॥ तेल.	

(180) Presents were received on the occasion of the Peshwâ's going on the precding day to Parashrám Shrinivás Pratinidhi to give him an invitation to a dinner.

A. D. 1782-83.

[1] POLITICAL MATTERS.

(C) Matters relating to

(4) ÂNGRIÁ.

(181) Tuláji Ángriá was sent to fort Ahmednagar for imprisonment.

A. D. 1773-74.

८८।।।= मीठ.
८-।।। दाळ.
८१।।-।।। बाजरी.

८४३।।। गूळ.
८।-१।

८२।।-।।=

एकूण अडीचमण अधोली निठवें कैली, सवा अकरा शेर वजन पक्कें दरमहा देत जाणें, या खेरीज जळाऊ लांकडें वजन सहा मण दरमहा देणें; व किरकोळ शाकभाजी लागेल ते देणें. खटपटेस पोर्गा एक दरमहा रुपये २ रुपयांत ठेऊन देणें म्हणोन, महादाजी नारायण यांचे नांवें.

सनद १.

१८२–(३६२) संभाजी आंगरे तुळाजी आंगरे याचे पुत्र यास बेडी घालून किल्ले सोलापूर येथें अटकेस ठेवावयास स्वार दिंमत रामराव बारावकर शिलेदार व गाडदी यांजबरोबर पाठविला आहे, तरी किल्ले मजकुरीं पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें म्हणोन, रामचंद्र शिवाजी यांस.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज १६

सनद १.

रसानगी, सदाशिव येशवंत.

१८३–(३६६) राघोजी आंगरे वजारत माहा सरखेल यांजकडे किल्ले माणिकगड देविला असे, तरी भिकाजी सालोखा व रामजी तावरा खिजमतगार हुजूरून पाठविले आहेत, तरी यांचे गुजारतीनें तोफा व जेंजाला वगैरे जेकीरासुद्धां किल्ला मशारनिल्हेचे जिमेस करणें म्हणोन. सनदा.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज ३

१ आनंदराव राम यांस कीं, हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस ताकीद करून किल्ला मशारनिल्हे यांचे जिमेस करवणें.

२ गंगाजी बने हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस कीं, तोफा व जेंजाला वगैरे जेकीरासुद्धां किल्ला मशारनिल्हे यांचे जिमे करून कबज घेणें.

४

चार सनदा, रसानगी यादी.

---

(182) Tuláji Ángriá's son, Sambháji Ángriá was sent to be imprisoned in the fort of Sholapur.
A. D. 1776-77.

(183) The fort of Manikgaḍ was handed over to Raghoji Ángriá.
A. D. 1776-77.

१८४–(३७२) जमा.

जमा जामदारखाना.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज ११

कमाविस भेट राजश्री राव यांस बाबत राघोजी आंगरे वजारत महा सरखेल यांचे डेऱ्यास स्वारी गेली तेथें सनगें आलीं ते जमा, गुजारत जानोजी जांबक खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

२०	तिवट	१
७५	दुपेटा	१
५०	किमखाप	·ll·
१००	महमुदी जरी बुटेदार	१
२४५		३ll

१८५–(३७३) राघोजी आंगरे वजारत महा सरखेल यांस बेगमीबद्दल सरंजामास तर्फा व गांव खारी दरोबस्त व निमे जकातीचा अंमल पेशजीचे मामलेदारांकडून दूर करून साल मजकुरापासून मशारनिल्हेकडे करार करून दिल्हा असे, तरी तेथील अंमल मशारनिल्हे कडील कमाविसदार करतील. साल मजकुरीं तुह्मीं वसूल घेतला असेल त्यापैकीं महाल मजकूर नेमणुकेप्रमाणें शिबंदी वगैरे हिसेरसीद ऐवज होईल तो वजा करून, बाकी ऐवज मशारनिल्हेकडे देणें. गांवगन्ना बाकी सालगुदस्तांची वसनवात सरकारची राहिली असेल, त्याची रुजुवात करून सरखेल यांजकडील कमाविसदारांचे मारफतीनें वसूल घेणें ह्मणोन येविशीं. सनदा.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज ११

१ राघो नारायण व धोंडो महादेव तर्फ नेरल यांस परगणे सांकसे पैकीं तर्फाविशीं तर्फा.

१ तर्फ चिवणखळ.
१ तर्फ दुर्ग देवली.
१ तर्फ वाकरूल.

३

(184) Clothes worth Rs. 245 were received by the Peshwá at the visit he paid to Raghoji Ángriá, Wajarat Mahá Sarkhel. at the latter's tent.

A. D. 1776-77.

(185) The Tarfs of Chiwankhal, Durga Deoli, and Wâkrul in Pargaṇa Sankse, as also some villages aud salt lands in Pargaṇa Karnátick were given to Raghoji Ángriá in Saranjám from the current year.

A. D. 1776-77.

तीन तर्फा खेरीज जकात करून दरोबस्त येविशीं. सनद.

१ आनंदराव राम यांस कीं परगणा कर्नाळा पैकीं गांव व खारी. बीतपशील.

* * * *

एकंदर आकार रु० ९३२४९–४ आहे.

१८६–(४०१) आंगरे सरखेल यांस सालमजकुरीं कोंकण प्रांतें एक लक्ष रुपयांचा सरंजाम द्यावयाचा करार केला आहे, त्या ऐवजीं देशांत गांव परगणे मजकूर पैकीं नेमून दिल्हे, त्याचे सदरहू अमलाचा कमाल आकार.

सबा सबैन मया व अलफ मोहरम १

रुपये.

७९९ तालुके राजूर पैकीं गांवचा कमाल आकार बरहुकूम यादी नरसिंगराव बल्लाळ मांडोगणे सरसुभा. रुपये.

४५० मौजे दीगबर रुपये ५४८ पैकीं वजा मुकासा निसबत माधवराव पवार रुपये ९८ बाकी.

३४९ मौजे बाभुळवाडी खुर्द आकार ४२५ पैकीं वजा मुकासा निसबत माधव पवार रुपये ७६ बाकी.

७९९

६९९८॥· तालुके हवेली पैकीं गांवचा आकार. रुपये.

४६६ (४४६) मौजे जामगांव तनखा १९५।≡॥ रुपये यासी कमाल आकार रुपये ५२१ पैकीं वजा मुकासा निसबत आनंदराव थोरात रुपये ७५ बाकी रुपये.

३४७। जाहागीर दरसदे ७५

२८॥।≡ बाबती दरसदे ६।

५८ सरदेशमुखी दरसदे १२॥ प्रमाणें.

११॥।〳 कसर मुकासी याचे अमलपैकीं.

४४६

२५३८॥ मौजे सुलतानपूर तनखा यासी कमाल आकार ३७९॥〳 रुपये. पैकीं वजा. रुपये.

६३।·॥ सरकारांत. रुपये.

---

(186) A Saranjám worth Rs. one Lac was ordered to be given to the Áugriá.

A. D. 1776-77.

२१८॥ बाबती.
४२८≡ सरदेशमुखी.

६३।॥
६३। मुकासा निसबत आनंदराव थोरात.

१२६॥।॥
बाकी जहागीर. रुपये.

६९९८॥

१४९८८॥
येणेंप्रमाणें चौदाशें अठ्याण्णव रुपये अर्धा आणा कमाल आकार चोहोंगांवचा असे.

१८७–(४०५) आनंदराव राम यांस सनद कीं, तुह्मीं छ. १९ जिल्हेजचें विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. किल्ले माणिकगड राघोजी आंगरे याजकडे द्यावयाचा, त्यास तेथील लोकांस रोजमरा व कापड देवावें; व किल्ले मजकूर येथील लोकांनीं चाकरी कोणीकडे करावी ते आज्ञा जहाली पाहिजे ह्मणोन लिहिलें; त्यास किल्लेमजकूर येथील लोकांनीं तोतयाचें निशाण किल्यावर घेतलें, यास्तव अवल सालापासून ज्या तेरखेस आंगरे यांजकडे किल्ला स्वाधीन होईल, त्या तेरखेपर्यंत लोकांचा आकार मुदत माफक करून, त्यांत साहामाही आकार गुन्हेगारी बाबद वजा करून, बाकी रोजमऱ्या पैकीं ऐवज निघेल तो प्रांत कर्नाळा पैकीं देणें. कापड तर द्यावयाचेंच नाहीं. लोकांनीं चाकरी कोठें करावी ह्मणोन लिहिलें, त्यास लोकांची छान करून चांगलें माणूस निवड निघेल तें, किल्ले कर्णाळा, व विकटगड येथील भरतीस ठेऊन चाकरीस घेणें. नाकारें माणूस निघेल तें, किल्ले कर्णाळा, व किल्ले विकटगड येथील लोकांची छान करून मा-

सबा सबैन मया व अलफ मोहरम ६

(187) Manikgaḍ was to be gîven to Raghoji Ángriá. It was ordered that an inspection should be made of the men at the fort and that those who might be efficient should be employed at forts Karnaḷḷa and Vikaṭgaḍ, the rest being disbanded. An inspection was also ordered to be made of the men at the two latter forts with a view to remove those unfit for service and thus make room for the men transferred from Manikgaḍ. All the men at the fort of Manikgaḍ were fined their 6 month's pay and were deprived of the usual clothing allowance for admitting the banner of the Imposter in the fort.

A. D. 1776-77.

णिकगड पैकीं चांगलें माणूस ठेवाल त्याचे ऐवजीं दूर करणें. देशचें माणूस पाठवावें ह्मणोन लिहिलें, त्यास मागाहून रवाना होईल. किल्ले कर्णाळा, व विकटगड येथें हवालदार व सरनोबत हुजूरून पाठवावे ह्मणोन लिहिलें, त्यास हवालदार व सरनोबत यांची नेमणूक जहाली आहे मागाहून सनदा घेऊन येतील ह्मणोन.

सनद १.

परवानगी रूबरू.

१८८–(४१९) संभाजी आंगरे यास किल्ले सोलापूर येथें अटकेस ठेविला आहे, त्यास शिरस्तेप्रमाणें पोटास देत जाणें ह्मणून पेशजीं सनद सादर जहाली आहे, त्यास हल्लीं मशारनिल्हे अन्नखात नाहीं ह्मणोन मोरो धोंडदेव यांणीं हुजूर विदित केलें, त्याजवरून मशारनिल्हे अन्न खाऊं लागे तोंपावेतों.

सबा सबैन
मया व अलफ
मोहरम ९

वजन. पक्कें.

८८१॥ दूध.

८८८४॥ साखर.

८८१॥४॥ दीड शेर साडे चार छटाक.

वजन दररोज देत जाणें. कलम १.

पोर्गा चाकरीस असामी १ दरमहा तैनात रुपये ३ तीन रुपये करार करून ठेवणें येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण दोन कलमें करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें बेगमी करून वंदोबस्तानें ठेवणें. पोर्ग्याचे रोजमरेयाचा व जिनसांचा आकार होईल तो, तालुके सोलापूर येथील हिशेबीं मजुरा पडेल ह्मणोन, रामचंद्र शिवाजी यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

१८९–(४७१) बाळाजी गणेश तालुके देवगड यांस सनद कीं, तालुके मजकूर येथें तिगस्तां गोपाळजी आंगऱ्या याचा दंगा जहाला होता, तेव्हां लोकांनीं मर्दुमी केली, सबब लोकांस इजाफा करार करून द्यावयाविशीं, व देवास नवस केला आहे त्याप्रमाणें देवाचे पूजा नैवेद्याबद्दल वगैरे करार करून

समान सबैन
मया व अलफ
जमादिलाखर १६

---

(188) Sambháji Ángriá, imprisoned at fort Sholapur having refused to take food, permission was given to him of $1/\frac{1}{2}$ shers of milk and $4/\frac{1}{2}$ Táks of sugar every day till he partook of food again.

A. D. 1776-77.

(189) In the year before the preceding a disturbance was created in the Taluka of Devgaḍ by Gopálji Ángriá. Promotions were given to the men and officers who assisted in quelling it, and allowances were granted to deities in fulfilment of vows made by them.

A. D. 1777-78.

द्यावयाविशीं तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें, त्याजवरून येणेंप्रमाणें. कलमें.

श्रीदेव गणपति वास्तव्य मौजे मीठबाव तर्फ सालसी तालुके मजकूर यांस आंगऱ्याचे पारपत्याविषयीं नवस केला होता, त्याप्रमाणें पारपत्य जहालें, सबब साल गुदस्तां सन सबा सबैन अवल सालापासून सालीना.

श्रावण मासाभिषेकाबद्दल नक्त रुपये ५ वजन. कच्चें.	गल्ला कैली साडे तिसरी मापें नैवेद्यास.
	·।=॥ भात.
	८॥ दाळ.
८८३ तूप नैवेद्यास.	——
८॥२॥ तेल दिव्यास.	·।≡

——

८॥५॥

नक्त पांच रुपये श्रावण मासाभिषेकाबद्दल, व आठ मण कैली साडे तिसरी मापें, व पंचवीस शेर कच्चे साल गुदस्तां अवल सालापासून करार केले असे, तरी पाववीत जाणे. १

तालुके मजकूर येथील खासबरदार सरखेल शिरस्तेयाचे यांस पेशजी दुमाहीची नेमणूक होती, आलीकडे दीडमाहीची नेमणूक जहाली, त्यास विजयदुर्ग तालुक्याकडील खासबरदार यास पावणे दोन महिने पावतात, त्याप्रमाणें यांसही नेमणूक असावी, सबब आठवडा पावमाहा तैनात पैकीं रुपये ४११ चारशें अकरा करार केले असेत, तरी पाववीत जाणें. तिगस्तां आंगऱ्याचे पारपत्यास दोनशें माणूस ठेविलें होतें तेच लोक हल्लीं राखोन कामकाज करितों ह्मणोन तुम्हीं लिहिलें त्याप्रमाणें करार असे, लोकांपासून चाकरी घेणें. कलम १.

एकूण तीन(दोन?) कलमें लिहिलीं आहेत, तरी सदरहू लिहिलेप्रमाणें करणें ह्मणोन. सनद. १.

रसानगी यादी.

१९०–(९७६) तुळाजी आंगरे यास किल्ले अमदानगर तालुके मजकूर येथें अटकेंत पेशजी ठेविलें आहे, त्यास हल्लीं मशारनिल्हेस हुजूर आणविलें असे, तरी पायांत बेडी आहे त्यासुद्धां विसाजी आपाजी तेथें गेले आहेत, त्यांचे हवाला करून कबज घेणें ह्मणून, महादाजी नारायण यांचे नांवें.

तिसा सबैन मया व अलफ रजब ११

सनद १.

परवानगी रूबरू.

---

(190) Tuláji Ángriá, a prisoner at fort Ahmadnagar was ordered to be sent to the Huzur.

A. D. 1778-79.

१९१-(९८४) राघोजी आंगरे वजारत माहा सरखेल यांस सालमजकुरापासून पेशजीचे अंमलदारांकडून अंमल, दूर करून सरंजाम करार करून दिल्हा असे, तरी देहे हायेचा अंमल, व खारी, व जमीनी यांचे दुमाला करून आकार याचे नांवें खर्च लिहित जाणें. सालमजकुरीं वसूल घेतला असेल त्यापैकीं महाल मजकूर वगैरे हिसेरसीद वजा करून, बाकी ऐवज सरखेल यांजकडे देणें. सालगुदस्त पैकीं व सनद बाकी गांवगन्ना व खारीकडे राहिली असेल, त्याची रुजवात सरखेल यांजकडील कमाविसदारांकडे करून देणें, त्याप्रमाणें ते तुम्हांकडे ऐवज वसूल करून देवितील ह्मणून मामलेदारांस.

तिसा सबैन मया व अलफ जिल्काद ६

सनदा.

१ राघो नारायण व धोंडो महादेव यांस सनद तालुके हमरापूर प्रांत कर्नाळा पैकीं तालुके नेरळाकडील खेरीज घरवण करून देहे व मजरे व खारी.

४६ निमे अमलांचे देहे व मजरे व खारी.

१० (१३) देहे व मजरे.

१० देहे.

३ मजरे.

१३

* * * *

१९२-(७९७) कमावीस गड गजरे राजश्री राव यांसी बाबत राघोजी आंगरे सरखेल वजारत महा याणीं वाड्यांत केले ते जमा, गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें एकूण.

सलास समानीन मया व अलफ जमादिलाखर १९

		रुपये.
५०	चिरा बादली	१
८०	झगा जरी बादली	१
४०	वोढणी जरी बादली	१
५०	तुंबा किमखापी	१
२२०		४

(191) A Saranjám of Rs. 25000 was granted to Raghoji Angriá, Wajárat Mahâ Sarkhel, from the current year.
A. D. 1778-79.

(192) Clothes were received by the Peshvá from Raghoji Ángriá, Wajárat Mahâ Sarkhel, who had come to Peshwa's Wáḍa.
A. D. 1782-83.

१९३-(७९८) कमाविस भेट सौभाग्यवती रमाबाई यांसी बाबत राघोजी आंगरे सरखेल वजारत महा यांची स्त्री वाड्यांत भेटीस आली, ते समई दिल्ही ती, गुजारत केदारजी येवला खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास समानीन मया व अलफ जमादिलावल १९

७५ पातळ जरी	१
२ चोळखण	१
७७	२

१९४-(९३०) कमाविस भेट बरहुकूम मानाजी आंगरे, राघोजी आंगरे यांचे पुत्र वाड्यांत भेटीस आले, ते समई पोशाक दिला तो सनगें एकूण. रुपये.

सबा समानीन मया व अलफ साबान

३७० राजश्री राव यांसी गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार.

३०० सनगें छिटी बेलापुरी वर काम सोनेरी.

७५ तिवट छिटी	१
१२५ दुपटा छिटी	१
१०० जामेदा(वा?)र छिटी	१
३००	३
७० किमखाप	१
३७०	४

८२॥ सौभाग्यवती रमाबाई यांसी गुजारत केदारजी यवला खिजमतगार.

८० पातळ जरी	१
२॥ चोळखण	१
८२॥	२
४५२॥	६

(193) Clothes were received by Ramábái from Raghoji Angria's wife who had come to the Peshwa's wáḍá.

A. D. 1782-83.

(194) Presents were received from Mánáji Ángriá, son of Raghoji Angria, who had come to the Palace to pay a visit to the Peshwá.

A. D. 1786-87.

१९५–(९७७) मावजी बिन येसाजी आंगरे वस्ती रेवदंडा तर्फ मजकूर यांणीं सन सीत समानीनांत पुण्यास येऊन लोकांचा जमाव केला, हें सरकारांत कळलें, तेव्हां कैद करून चौकींत ठेविलें, त्याजवर चौकशीकरितां राघोजी आंगरे वजारत महा सरखेल याचे घरकलहामुळें निघोन हुजूर आले, लोकांचा जमाव करून चाकरी करून दाखवावी, या उमेदीनें लोक ठेवीत होते असें दिसोन आलें, परंतु सरकार आज्ञेखेरीज हत्यारबंद लोक ठेविले हा दोष, सबब मावजी आंगरे यांजकडे गुन्हेगारी घ्यावयाचा करार केला आहे; त्यास यांचे तीर्थरूप येसाजी आंगरे यांस तर्फ मजकूर येथील बेहेड्यास नक्त चारशें रुपये व दाहाखंडी भात द्यावयाची नेमणूक आहे, त्याबद्दल इस्तकबील सन सीत समानीन तागाईत सालगुदस्त सन समानीन तीन साला मोईन देणें आहे, त्यापैकीं नक्त रुपये ४०० भात कैली खंडी १० एकूण चारशें रुपये नक्त व दहा खंडी भात गुन्हेगारी ऐवजीं घ्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहू तीन साला मोईन यांचे नांवें खर्च लिहून, त्यापैकीं चारशें रुपये व दहा खंडी भात तर्फ मजकूर येथील हिशेबीं कमाविस जमा धरणें. बाकी दोन सालें राहिलीं तीं मशारनिल्हेस देऊन पुढेंही नेमणुकेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, महादाजी बल्लाळ यांचे नांवें. सनद १.

तिसा समानीन
मया व अलफ
सफर ७

रसानगी याद.

१९६–(९८१) राघोजी आंगरे वजारत महा सरखेल यांजकडील लोक आरमार सुद्धां तुह्मांकडे कुमकेस पाठविले आहेत, त्यांस अडसेरी व खर्चास द्यावयाचा शिरस्ता पेशजीं कर्नाटक प्रांतें टिपूचे मसलतीस जिवाजी गोपाळ या समागमें लोक व आरमार विजेदुर्गास गेले होते, ते वेळेस पावले आहे. दरमहा वगैरे खुसकी व आरमारकरी यांस.

तिसा समानीन
मया व अलफ
रबिलाखर १८

---

(195) Mâstelaji Bin Yesâji Angria of Rewadanḍa came to Poona in Sit Samánin and enlisted some armed men. He was therefore arrested. On enquiry it appeared that Mâwaji left his name on account of a family quarrel with Raghoj Ángriá, Vajarat Maha Sarkhel, and that his object in clothing men was to serve Government. But as he had entertained armed men without the permission of Government a fine was imposed on him.

A. D. 1788-89.

(196) 1000 men of the naval, force of Raghoji Angria, Wajarat Maha Sarkhel were sent for assistance to Gangádhar Govind of Taluka Vijaydrug. The rates at which the men were to be paid are specified.

A. D. 1788-89.

	नक्त. रुपये.	भात. कैली.
दरमहा दर असामी.		
लोकांत खासा येईल त्यास द्यावयाचा हल्लीं सालमजकुरीं करार.	५०	०
कारकून घोडें माणूससुद्धां स्वारी समागमें होते, त्यांस जिवाजी गोपाळ याणीं दिल्हे.	१०	०
सरदार व सारंग व तांडेल यांस.	२	८२।
शिपाई व दर्यावर्दी यांस.	१॥	८१॥
पोर्ग्यास देखील निशाणदार.	·॥·	८॥
एक माही.		
बलोच व सोरटीयांस दर असामीस चाळीस रोजा रोजमरा.	१०	०
	७४।	८४॥

एकूण सवा चवऱ्याहत्तर रुपये नक्त, व साडे चार मण गल्ला द्यावयाचा लोकांचा वगैरे शिरस्ता पेशजीचा आहे, त्याप्रमाणें वगैरे सालमजकुरीं द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे, तरी आरमारकरी लोक, व सरदार, व कारकून, व सारंग, व तांडेल, व दर्यावर्दी, व पोर्गे, व निशाणदार व बलोच, व सोरटी मिळोन आठशें माणसांपासोन एक हजार पर्यंत सरखेल याणीं तुह्मांकडे रवाना केलें आहे, त्यांची हजीरी घेऊन हजीरीचे तेरखेपासून सदरहू लिहिल्याप्रमाणें नक्त व ऐन जिनसी भात तुह्मांजवळ रहातील तों देत जाणें ह्मणोन, गंगाधर गोविंद तर्फ विजयदुर्ग यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

१९७-(१०७१) मानाजी आंगरे यांचे तीर्थरूप राघोजी आंगरे मृत्यु पावले, सबब दुखटा पाठविला, त्यास विद्यमान राजश्री राव तर्फ पांडुरंग राम पेंडसे कारकून शिलेदार याजबरोबर पाठविला.

सलास तिसैन मया व अलफ रमजान ३०

जाफरखानी चिपणी १ एकूण. आंख २४८

१९८-(१०९०) कुलाबेयास गल्ला व जिन्नस महालानिहायेतून उदमी वगैरे नेतील, त्यास एकंदर नेऊं न देणें. आंगरे आपले मुलकांतून जिन्नस नेतील, त्यास तुम्हीं नाक्यावर चौक्या ठेऊन गल्ला वगैरे जिन्नस त्यांजकडे जाऊं न देणें ह्मणोन. सनदा.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलावल २१

(197) Clothes were sent to Mánáji Angria, as a mark of condolence with him for his father Raghoji Angria's death.
A. D. 1793-94.

(198) Export of grain to Kolábâ from Prânt Belápur, Pen &c, was prohibited.
A. D. 1793-94.

१ प्रांत बेलापूर निसबत आपाजी विष्णु.
१ तर्फ पेण निसबत भास्कर लक्ष्मण.
१ तर्फ अवचितगड व बीरवाडी निसबत बाबूराव पासलकर.
१ तर्फ कर्नाळा निसबत रामराव अनंत.
१ तर्फ उंदेरी निसबत निळो महादेव.
१ प्रांत राजपुरी निसबत चिमाजी माणकर.
१ तर्फ रेवदंडा निसबत आनंदराव शिंदे.

७ सात सनदा दिल्या असत.

रसानगी, गणपतराव जिवाजी सरसुभा प्रांत कोकण.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलावल २२

१९९-(१०९५) राघोजी आंगरे वजारत महा सरखेल यांजकडे माहालगांव व जमीनी सरकारांतून सरंजामास आहेत; व त्यांजकडील नेहमीं तनख्याचे गांव दुतर्फा वगैरे असतील त्यांचा वसूल कुलाबेयास त्यांजकडे जाऊं न देणें. रयतेकडे ऐन जिन्नस व नक्त ऐवज येणें त्याचा वसूल घेऊन अमानत जमा करून ठेवणें ह्मणोन. सनदा.

५ कित्ता महालानिहायचे कमाविसदार यांस कीं, वसूल त्यांजकडे जाऊं न देणें ह्मणोन पेशजीं तुम्हांस सनदा सादर जाहल्या आहेत, त्यास रयतेकडे ऐन जिन्नस व नक्त ऐवज येणें तो वसूल घेऊन अमानत जमा करून ठेवणें येविशीं. सनदा.

१ तालुके उंदेरी निसबत निळो महादेव यांस कीं, मौजे भुजवली येथील जमीन सरकारांतून सरंजामास आहे, व त्याजकडील नेहमीं तनख्याचे गांव दुतर्फा असतील येविशीं. सनद.

१ प्रांत कल्याणभिंवडी व तर्फ नेरळ निसबत सदाशिव केशव यांस कीं, प्रांत मजकूर पैकीं गांव जमीनी सरकारांतून सरंजामास आहेत त्याविशीं. सनद.

१ तालुके अवचितगड निसबत बाबूराव पासलकर यांस कीं, मौजे पाटण सई तर्फ नागोठणें हा गांव सरकारांतून सरंजामास आहे; व त्याजकडील नेहमीं तनखा तर्फ मजकूर येथील सरदेशमुखीचा अंमल, व जकात नाका नेणाली पैकीं हिसा आहे त्याविशीं. सनद.

१ प्रांत कर्नाळा निसबत रामराव अनंत यांस कीं, प्रांत मजकूर पैकीं

(199) The villages and lands held in Saranjam by Raghoji Angria were attached.
A. D. 1793-94.

गांव, व खारी, व जकातीचा अंमल सरकारांतून सरंजामास आहे येविशीं. सनद.

१ परगणे सांकसे निसबत भास्कर लक्ष्मण यांस कीं, परगणे मजकूर पैकीं तरफा, व गांवचा अंमल सरकारांतून सरंजामास आहे, व मौजे कादळें हा गांव इनाम आहे त्याविशीं. सनद.

५

९ कित्ता महालानिहायचे कमाविसदार यांस कीं, वसूल त्याजकडे जाऊं न देणें. रयतेकडे ऐवज येणें तो वसूल तुह्मीं घेऊन अमानत जमा करून ठेवणें येविशीं. सनदा.

१ त्रिंबक भिकाजी यांस कीं, तर्फ बोरेटी सरंजाम किल्ले विष्णुपूर पैकीं. देहे.

१ मौजे भानवद.

१ मौजे देवकडे.

१ मौजे खादवली.

---

३ एकूण तीन देहेचा अंमल सरकारांतून सरंजामास आहे येविशीं.

१ ताळुके विजयदुर्ग निसबत गंगाधर गोविंद यांस कीं, तर्फ सालसी पैकीं. सरंजामास.

१ मौजे कुडोदी.

१ मौजे बिदले पैकीं ठिकाणाचा आकार.

---

२ एकूण दोन गांव पैकीं अंमल सरकारांतून सरंजामास आहे येविशीं.

१ आनंदराव धुळप यांस कीं, मौजे शेढे, तर्फ सौदल हा गांव सरकारांतून सरंजामास दिल्हा आहे येविशीं. सनद.

१ तर्फ रत्नागिरी निसबत कृष्णराव महिपत यांस कीं, तर्फ मजकूर पैकीं गांव व जमीनी सरकारांतून सरंजामास आहेत येविशीं.

१ येशवंतराव महादेव यांस कीं, परगणे आकोलें पैकीं सरंजामास देहे.

२ तर्फ हवेली पैकीं.

१ मौजे आंबेगांव.

१ सुलतानपूर.

२

२ तर्फ राजुर पैकीं.

१ मौजे दिगांबर.

१ मौजे बाभुळवाडी.

२

४

एकूण चार देहेचा अंमल सरकारांतून सरंजामास दिल्हा आहे येविशीं.

१ बाबूराव माणकेश्वर सुभेदार यांस कीं, मौजे गोलेगांव परगणे कर्डे हा गांव सरकारांतून सरंजामास दिल्हा आहे येविशीं.

१ आनंदराव विश्वनाथ यांस कीं, प्रांत जुन्नर येथील गांवगन्ना पैकीं जमीन सरकारांतून सरंजामास दिल्ही आहे त्याविशीं.

१ भगवंतराव नारायण यांस कीं, तर्फ चाकण प्रांत जुन्नर पैकीं अंमल व वतन बीतपशील.

१ तर्फ मजकूर येथील देशमुखी निमे.

१ मौजे काकेस येथील जिल्हेबाब व मोकासा व सरदेशमुखी इनाम व पाटिलकीचें वतन.

१ कसबे चाकण येथील पाटिलकी निमे.

१ मौजे पिंपरी येथील पाटिलकी निमे.

४

एकूण चार अंमल वगैरे चालत आहेत येविशीं. सनद.

१ गोविंदराव बाजी यांस कीं, मौजे नेर, मामले पाल, हवेली पैकीं जमीन सरकारांतून सरंजामास दिल्ही आहे येविशीं. सनद.

९

चौदा सनदा दिल्या असत. रसानगी, गणपतराव जिवाजी सरसुभा प्रांत कोंकण.

२००-(१०९७) आनंदराव शिंदे यांचे नांवें कीं, माधवराव हरी कुलाबे यांचे मसलतीस सरकारांतून गेले आहेत, त्यांजकडे तोफा चांगल्या चलाऊ पांच बरोबर गोलंदाज व खलाशी वगैरे सामान, तालुके रेवदंडा पैकीं देऊन मशारनिल्हेकडे तोफा पोंचत्या करणें ह्मणोन. सनद १.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलाखर ९

रसानगी, रामचंद्र हरी फडके.

---

(200) Madhavrao Hari was sent against Kolabâ. Anandráo Shinde of Rewadanda was ordered to supply him with 5 pieces of cannon.

A. D. 1793-94.

२०१–(११३९) राघोजी आंगरे मृत्य पावले, सबब त्यांजकडील मुलकाची जफ्ती सन अर्बा तिसैनांत सरकारांत केली आहे, त्यास त्यांचे पुत्र मानाजी आंगरे यांजपासून पंचवीस हजार रुपयांचा मुलुख सालमजकुरापासून सरकारांत घ्यावयाचा करून, बाकी मुलुख किल्ले कोटसुद्धां व वजारत माहा सरखेलीचा किताब मशारनिल्हेचे नांवें पेशजीप्रमाणें करार करून दिल्हा असे, तरी सदरहू पंचवीस हजारांचा मुलुख सरकार तालुक्या लगत सोईस येईल तो पेशजी आंगरे यांस नवा सरंजाम लाख रुपयांचा सन सबा व सन तिसा सबैनांत सरकारांतून दिल्हा, त्या बेरजेप्रमाणें पंचवीस हजारांचा मुलुख सरकारांत घेणें, बाकी मुलकाची जफ्ती मोकळी करण्याविशीं आलाहिदा पत्रें सामलेदारास सादर केलीं आहेत, त्याप्रमाणें तागीद करून जफ्ती मोकळी करणें. सुदामत प्रमाणें वहिवाट मशारनिल्हे करतील ह्मणोन, सदाशिव रघुनाथ यांचे नांवें. सनद १.

सीत तिसैन
मया व अलफ
रविलावल ६

रसानगी यादी, एकंदर त्यांजकडील ठरावाची.

१ राजकीय.
(ब) इतर माहिती.
५ सचिव.

२०२–(३९) राजश्री सदाशिव पंडित सचिव यांचा परगणे बीड, व परगणे अंबड येथील बाबती सावोत्रीयाचा ऐवज येणें, त्याचा मक्ता सरलष्कराकडे आहे, त्या पैकीं सरकारांत ऐवज आला तो. रुपये.

आर्बा सबैन
मया व अलफ
जिल्काद ३०

७६००० दिगर जागिरी गांव मामले बीड पैकीं तोफखान्याकडे वगैरे

---

(201) Raghoji Ángriá having died, his Saranjám, was attached by Government. A portion of it worth Rs. 25,000 was now taken by Government and the rest was restored to his son Mânâji Ángriá.

A. D. 1795-96.

[1] POLITICAL MATTERS.
(C) Matters relating to
(5) Sachiv

(202) Rupees 94,000 of the revenue on account of *Bâbti Sâhotrâ* due to Sadáshiva Pandit Sachiv in Pargaṇa Bîd and Ambad, were received by Government. Out of this Rupees 59,674 were adjusted as due to Government by the Sachiv on account of his monthly contribution, The remaining

A. D. 1773-74.

बाबती सावोत्रीयाचे ऐवजीं निंबाळकरापासून सरकारांत घेऊन दिल्हे आहेत, त्यांचा ऐवज दरमाहाचे ऐवजीं सचिवास मजुरा द्यावयाचा करार आहे ते रुपये.

४५००० विसाजी कृष्ण याजकडे राक्षसभुवन वगैरे गांवें आहेत, त्यांचे इस्तकबील सन समान सितैन तागाईत सन इसन्ने दरसाल रुपये ९००० प्रमाणें.

२५००० तोफखान्याकडे मौजे पालवण वगैरे गांव आहेत, त्यांचे इस्तकबील सन समान तागाईत इसन्ने एकूण पांच साला दरसाल ५००० रुपये.

६००० निंबाजी सान्या शिलेदार याजकडे मौजे तागडगांव आहे, त्याचा ऐवज इस्तकबील सन तिसा तागाईत सन इसन्ने सबैन, दरसाल रुपये १५०० प्रमाणें.

७६०००

१८००० बाजीराव मोरेश्वर याजकडे बीडची मामलत सरकारांतून सांगितली होती, तेव्हां मशारनिल्हेनीं वसूल घेतला आहे, ते सन सबैनांत. रुपये.

९४०००

पैकीं पंत मशारनिल्हेकडे दरमाहाचा ऐवज येणें, त्या ऐवजीं मजुरा दिल्हे. रुपये.

७२७४ सन सबैनांत.

५२४०० सन इहिदे व इसन्नेंत मजुरा. रुपये.

५९६७४

amount was also to be adjusted in future payment. But in view of the Mogal disturbance in the mahâls of the Sachiv, and the scarcity prevailing therein, as also the heavy expenses of his state, the amount was ordered to be adjusted in account as received out of the Nazar of one lac of Rupees imposed on Anandrao Chimnâji for being continued in his office of Kárbhári to the Sachiv.

बाकी मशारनिल्हेचा ऐवज सरकारांत फाजील आला, ते रुपये ३४३२६ चौतीस हजार तीनशें सवीस रुपये दरमाहाचे ऐवजीं मजुरा द्यावे, ऐसी कराराची यादी पेशजी सरकारांतून जाली आहे, त्याप्रमाणें दरमाहाचे ऐवजीं मजुरा द्यावा, तर इतका ऐवज दरमाहाचा नाहीं, दोन तीन सालांत फेडून द्यावा तेव्हां फिटेल असें आहे; त्यास हा ऐवज सरकारांत घ्यावयाचा खराच; परंतु सालमजकुरीं मशारनिल्हेचे माहालीं मोंगलाचा दंगा जाहाला व आफतही आहे, सबब माहालची खराबी जाली, व दौलतीचा खर्चही भारी, येणेंकरून त्यांची तारांबळ जाणून, रयात करून, सदरहू ऐवज सालमजकुरीं राजश्री आनंदराव चिमणाजी यांजकडे सचिवाचे डोलाचा कारभार पेशजीं चालत आहे, त्याप्रमाणें करार करून देऊन एक लक्ष रुपये नजर सरकारांत घ्यावयाची करार केली आहे, त्यापैकीं मजुरा द्यावयाचे करार केले ते दखलबाज बार केले असेत. बरहुकूम मखलासीची करारी यादी पंत मशारनिल्हे यांजवळ असे, छ. ९ जिल्काद.

आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

२०३–(९७) नारोजी शिंदे देशमुख तर्फ पौन मावळ याचा, व बापूजी, व कोंडाजी, व आनंदराव शिंदे देशमुख तर्फ मजकूर यांचा, मौजे रीहें, तर्फ मजकूर, येथील इनाम शेताचा कजीया आहे; त्या बाबत नारोजी शिंदे हुजूर फिर्याद होऊन, सदरहू इनाम शेतें जफ्त करून, जफ्ती तुम्हांस सांगितली होती; त्यास सालमजकुरीं सदरहू इनसाफ व जफ्ती राजश्री सचिव यांणीं आपले जिल्हेंतील ह्मणून मागून घेतली असे; तरी पंडित मशारनिल्हे इनसाफ करितील, व जफ्ती करून वसूल घेतील. तुम्हीं दखलगिरी न करणें ह्मणोन, बाळाजी हरी आपटे यांचे नांवें चिटणिसी छ. २९ सफर. पत्र.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलाकर २७

२०४–(१०९८) जगन्नाथ देवजी देशपांडे तर्फ कर्यात मावळ यांणीं रघुनाथ राव सचिव वारल्यावर भोरास राहून त्याचे घरची वस्तवानी मनस्वी घेतली, व कारभारांत बखेडे बहुत केले; सबब त्यांचा तर्फ मजकूर येथील देशपांडेपणाचे वतनाचा हिसा सालमजकुरापासून सरकारांत जफ्त

A. D. 1773-74.

(203) There being a dispute regarding a field between 2 Deshamukhs of Pawan Mâwal, it was attached. The Sachiv requested in the current year for the matter being transferred to him as the land was within his jurisdiction. His request was granted and Báláji Hari Apte was directed to allow the Sachiv to decide the matter and to take the income accruing from attachment.

A. D. 1793-94.

(204) Jagannáth Dewáji Deshpande of Karyát Máwal removed considerable property from Sachiv's house at Bhor after Raghunáth Sachiv's death, and created confusion in the State. His Watan was attached.

करून जप्ती तुह्मांकडे सांगितली असे; तरी त्यांचे देशपांडेपणाचे हिशाची जप्ती करून, वतन संमंधें हक्क इनाम वगैरे जें असेल त्याचा वसूल घेऊन, किल्ले सिंहीगड येथील हिशेबीं जमा करीत जाणें ह्मणोन, केशवराव जगन्नाथ यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

६ पंडितराव.

२०५-(५९०) रामचंद्र रघुनाथ यांणीं विदित केलें कीं, श्रीमंत कैलासवासी शाहू महाराज यांजपाशीं आपले आजे मुद्गल बावा राजउपाध्ये यांणीं श्रम साहस केलें, त्याजवरून त्याणीं त्यांस पंडितराई सांगितली. महाराजांस कैलासवास होय तोंपर्यंत, आपले पिते रघुनाथ बावा यांणीं पंडितराई केली. तदोत्तर श्रीमंत कैलासवासी आईसाहेब यांणीं धोंडोबा राजउपाध्ये यांस सांगितली. हल्लीं त्यांचे पुत्र चालवीत आहेत. ऐशास पेशजींप्रमाणें आपणाकडे पंडितराई करार करून दिल्ही पाहिजे ह्मणोन; त्याजवरून धोंडोबा राजउपाध्ये यांचे पुत्र हैबतराव धोंडदेव यांजकडील पंडितराई दूर करून मशारनिल्हेकडे पूर्ववत करार करून दिल्ही असे; तरी यांचे तर्फे पेशजीं पुरुषोत्तम दीक्षित व्यास पंडितराईचें कामकाज, व देवपूजा, व पुराण चालवीत होते, त्याप्रमाणें हल्लीं त्यांचे पुत्र श्रीधर दीक्षित व्यास चालवितील, त्यांचे हातें घेत जाणें, व

समान सबैन मया व अलफ रविलाखर २६

[1] POLITICAL MATTERS.

(C) Matters relating to

(9) Panditrao.

(205) Rámchandra Raghunáth represented that his grand-father Mudgal Bâvâ was given the office of Panditrao by Shâhu Mahâraj, that his father Raghunáth Bâvâ succeeded him, that after Sâhu's death the office was conferred by the late Ayisáheb on Dhondoba Rájopádhya, and that it was now enjoyed by his son. Rámchandra prayed that the office might be given to him. His prayer was granted, and orders were issued to Krishnarao Anant Mutálik to let the duties, viz. worshipping, explaining Purân, and teaching संध्या (Sandhyá–Morning and evening rites) to the Rája, be performed by Shridhar Dixit Vyása and Chitko Náráyen Pore on Rámchandra's behalf.

A. D. 1777-78.

चिटको नारायण पोरे संध्याभटीचें काम पूर्वीं चालवीत होते, त्याप्रमाणें त्यांचे हातें घेत जाणें ह्मणोन, कृष्णराव अनंत मुक्काम सातारा यांस. सनद १.

मशारनिल्हेचे नांवें सदरहू प्रमाणें १

बाबूराव कृष्ण यांस सदरहूप्रमाणें १

३

रसानगी यादी.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

७ सुमंत.

२०६–(९१३) जीवनराव विठ्ठल सुमंत यांस सन तिसा सबैनांत सुमंतीचे पदाचीं वस्त्रें देऊन सरंजाम व वतनें मशारनिल्हेचे नांवें करार करून दिल्हीं; त्यास श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति यांस विनंति करून, जीवनराव यांस सुमंतीचे पदाचीं वस्त्रें देऊन सरंजामाच्या व वतनाच्या सनदा यांचे नांवें करून देवणें ह्मणून पेशजीं तुम्हांस पत्र सादर जालें; त्याजवरून त्यांस वस्त्रें देविलीं. सनदा करून ध्याव्या त्या घेतल्या नाहीं; याजकरितां हल्लीं हें पत्र सादर केलें असे, तरी यांजकडे सरंजाम व वतनें आहेत, त्यांच्या सनदा करून देवणें ह्मणून चिटणिसी. पत्रें.

सीत समानीन मया व अलफ सफर १३

१ कृष्णराव अनंत मुक्काम सातारा यांस.

१ बाबूराव कृष्ण किल्ले सातारा यांस.

१ निळकंठराव अमात्य यांस.

३

---

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(7) Sumant.

(206) Jíwanrao Vithal was appointed Sumant in Tisa Sabain. At the request of the Peshwa, clothes of honor were given to Jíwanrao by the Sattárá Rájá. Sanads however, remained to be issued. Krishnarao Anant Mutálik of Sattára was requested to cause the Sanads to be issued.

A. D. 1785-86.

१ राजकीय.
(ब) इतर माहिती.
८ अमात्य.

२०७-(३३७) बाबूराव शिवराम अमात्य दिंमत हुजुरात यांजकडे तैनातेंत वगैरे गांव सरंजाम होते, त्यास ते सालगुदस्तां मृत्यु पावले, सबब त्यांचे पुत्र निळकंठ बाबूराव अमात्य यांजकडे पूर्ववत प्रमाणें तैनातेंत वगैरे यांस सरंजाम करून दिल्हा असे, तरी सुदामत चालत आल्याप्रमाणें अमलाचा वसूल सुरळीत देणें ह्मणोन. सनदा.

सबा सबैन मया व अलफ रमजान २४

* * * *

---

[1] POLITICAL MATTERS.
(B) Matters releting to
(8) Âmatyâ,

(207) Bápurao Shivrám Âmâtya being dead, orders were issued for the continuance of his Saranjám to his son Nilkanth Báburao.

A. D. 1776-77.

सवाई माधवराव पेशवे
यांची रोजनिशी.
(भाग २)
१ राजकीय.
(ब) इतर माहिती.
९ दाभाडे आणि गाईकवाड.

२०८-(१०) गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांस सनद कीं, दौलत बाबूराव यांजबरोबर फौज देऊन तुमचे कुमकेस पाठविले आहेत. समागमें स्वार २२५० साडे बावीसशें पावेतों सरकारचे ऐवजाशिवाय फौजेचा खर्च तुह्मीं चालवावा ऐसा करार आहे, त्याची सनद व नेमणूक जाबता अलाहिदा स्वार १२३१ बाकी स्वार १०१९ दहाशें ऐकुणीस यांस ऐवज.

आर्बा सबैन मया व अलफ सवाल २४

११५०० नालबंदी पैकीं मशारनिल्हे कडून ऐवज देविला आहे, त्या ऐवजीं माघमासचे हप्त्यापैकीं रुपये.

७०४७। रोज दर आठवडे व एक माही वगैरे यास दरमहा छ. १ जिल्काद पासून रुपये.

१८५४७।

एकूण अठरा हजार पांचशें सवासत्येचाळीस रुपये, पैकीं नालबंदीचे ऐवज अकरा हजार पांचशें व रोजमुरा वगैरे दरमहा सात हजार सवासत्तेचाळीस रुपये देवविले असेत,

---

[1] POLITICAL MATTERS.

(C) Matters relating to

(9) Dâbhâde and Gaikwad.

(208) A body of 2250 horse was sent for assistance to Govindrao Gaikwâḍ Senâ Khâskhel Samsher Bahádur and he was asked to pay their salaries.

A. D. 1773-74.

तरी सरकारचा ऐवज तुम्हांकडे येणें, त्या ऐवजीं पावते करून कबजा(ज?) घेणें, त्याप्रमाणें मजुरा पडतील म्हणोन, मशारनिल्हे यांस. सनद १.

परवानगी रूबरू.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

२०९–(६६) गोविंदराव गाईकवाड यांजकडे शिलेदार वगैरे चाकरीस गेले आहेत, सबब त्यांचीं घरें व वतनें सरकारांत जफ्त करून जफ्ती तुम्हांस सांगितली असे, तरी त्यांचीं वतनें जफ्त करणें, व त्यांचे घरीं चौकी बसऊन मुलामाणसांस तसदी पोंहचऊन, त्याणीं लौकर हिकडे यावें येविशीं त्यांजकडून पत्रें त्यांस लेहून पाठवणें; आणि ते लौकर येत ते करणें म्हणोन, महालानिहायचे कमावीसदारांचे नांवें. सनदा.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

१ गोविंद हरी कमाविसदार मोकासा परगणे नंदुरबार यांस कीं, नारो गणेश वस्ती कसबे मजकूर याचे घराची व वतनाची जफ्तीविशीं.

१ हरि सदाशिव कमाविसदार परगणे भोकर यांस कीं, भवानी बाडपेव्या मौजे आईचले परगणे मजकूर यांचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ शिवाजी विठ्ठल यांस कीं, राघोजी जगताप वस्ती मौंजे मेथी पैकीं सोनगीर याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ रामचंद्र शिवाजी यांस कीं, निंबाजी पांढरे वस्ती सोलापूर याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ रघुनाथ हरी यांस कीं, प्रांत जुन्नर पैकीं शिलेदार असामी यांचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ गोविंदराव कदम वस्ती मौजे निरगूडसर, तर्फ अवसरी.

१ रामेश्वर गोसावी वस्ती मौजे काळूस, तर्फ चाकण.

FROM NARO APAJI'S DIARY.

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(-9-) Dâbhâde & Gâikawad.

(continued.)

(209) Certain Shilledárs and others having gone over to Govindrao Gaikwad, their houses and watans were ordered to be attached. It was further directed that a watch should be kept at the house of these persons, and that their relations should be so treated as to induce them to write to these persons to return home without delay.

A. D. 1774-75.

१ कावजी होत्रे वस्ती मौजे गुळणी.

१ भास्कर+व खंडो+वस्ती मौजे काळूस, तर्फ चाकण.

१ निंबाजी मलगुंड वस्ती मौजे भाइरे, तर्फ निघोज.

---

५ पांच असामीविशीं.

१ हैबतराव भवानी शंकर यांस कीं, पांडुरंग मल्हार वस्ती कसबे निंब, प्रांत वाई याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ विसाजी कृष्ण यांस कीं, राणोजी नवरे वस्ती मौजे विसापूर, तर्फ राजगांव, प्रांत जुन्नर याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ रामचंद्र शिवदेव यांस कीं, मौजे मलठण, तर्फ कर्डे, प्रांत जुन्नर येथील शिलेदार याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ येसाजी देवकते.

१ गोविंदराव देवकते.

१ येसाजी तोंडे.

१ माहिपतराव येशवंत.

---

४ चार असामीविशीं.

१ नारो आपाजी यांस कीं, प्रांत पुणें पैकीं शिलेदार याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ शाहाजी थोरात वस्ती मौजे नांदुर, तर्फ सांडस नजीक खांबगांव.

१ नागोजी सेकले वस्ती मौजे चिंचोली नजीक खडकी, तर्फ पाटस.

१ जावजी गेवणे, व उमाजी गेवणे वस्ती चिंचोली नजीक खडकी, तर्फ पाटस.

---

३ तीन असामीविशीं.

१ नारो महादेव कमाविसदार क्षेत्र पंढरपूर निसबत परशराम रामचंद्र यांस कीं, सुलतानजी कदम वस्ती मौजे तांदुळवाडी, परगणे भालवणी याचे पुत्र व नारो महादेव कारकून वस्ती मौजे मजकूर निसबत मशारनिल्हे याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ गोपाळराम यांस कीं, बळवंतराव आपाजी वस्ती मौजे पाल, तर्फ उमरज, प्रांत कराड याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ बाबूराव माणकेश्वर सुभेदार यांस कीं, काकाजी सोनवणी वस्ती नीरवी, प्रांत कर्डे याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ बाळाजी रघुनाथ कमाविसदार परगणे डबई यांस कीं, लाला नागर वस्ती कसबे डबई याचे घराचे जफ्तीविशीं.

१ नारो आपाजी यांस कीं, महादाजी वस्ती कसबे सोनई, परगणे नेवासें याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ वामनराव गोविंद यांस कीं, नारोजी मान्ये, व सुलतानजी मान्ये वस्ती मौजे सावर्डें, प्रांत मिरज याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ नारो बाबाजी कमाविसदार परगणे पारनेर यांस कीं, परगणे मजकूर पैकीं शिलेदार याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ मल्हारजी लकडे वस्ती मौजे भालवणी.
१ सुलतानजी बाभळे वस्ती मौजे भालवणी.
१ पराड वगैरे वस्ती मौजे पाडळी व मौजे गोरेगांव पैकीं.
१ रूपनवर वस्ती मौजे निमगांव घाणा.
१ पाटील इसलक निबालकचे शिलेदार.

---

५ पांच असामीविशीं.

१ महादाजी नारायण यांस कीं, तालुके अमदानगर येथील शिलेदार याचे घराचे व वतनाचे जफ्तीविशीं.

१ भवानी पिसे वस्ती, मौजे कालेगांव याचा पुत्र.
१ खंडोजी कदम वस्ती, मौजे कालेगांव याचा पुत्र.
१ लंगडे वस्ती, मौजे घारगांव कालेगांव तर्फ कर्डें.
१ मल्हार धोंडाजी वस्ती, मौजे पिंपळगांव गर्भ्यांचें.
१ चांदखान वस्ती, कसबे नगर.

५

---

१७ सत्रा सनदा छ. ३ रबिलाखर दिल्या असेत.

२१०-(१३०) प्रांत गुजराथ येथील महालानिहायचा अंमल गाईकवाडाकडील हल्लीं सरकारांत जफ्त करून, जफ्ती नारो आनंदराव यांजकडे सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन गोविंद वासुदेव यांचे विद्यमानें अमलाचा वसूल सुरळीत देणें म्हणोन, जमीदारांस. सनदा.

खमस सबैन मया व अलफ मोहरम २६

१ सुरत अठाविशींचे महाल व गांव.

१ परगणे बेलसर.	१ परगणे चिखली.
१ परगणे कातरज.	१ कसबे मोते.
१ परगणे तलोडी.	१ परगणे गल्हे.
१ परगणे मरोली.	१ परगणे बिसनपूर.
१ परगणे माहे.	१ परगणे वसराई.
१ परगणे घणदेवी.	१ परगणे तडकेश्वर.
१ कसबे नवसारी.	

१४(१३)

येविशीं जमीदारांस.

१ परगणे सीनोर.	१ परगणे राजपिंपळे.
१ परगणे कारेल.	१ परगणे निकोरे.
१ परगणे भडोच.	

६(५) रसानगी यादी.

२११-(२०३) सयाजीराव गायकवाड यांजकडे सेनाखासखेलीचें पद बहाल केलें असे, तरी मशारनिल्हेचे नांवें शिक्के करून देणें म्हणोन, आपाजी गणेश तालुके अमदाबाद यांचे नांवें. सनद १.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर २२

रसानगी याद.

२१२-(२१४) कृष्णाजी माधवराव यांचे नांवें सनदा कीं, गोविंदराव गायकवाड, व हैदर नाईक यांजकडे शिलेदार वगैरे चाकरीस गेले आहेत, त्यांचीं घरें जप्त करावयाविशीं तुम्हांस आज्ञा केली असे, तरी यांचे घरची जप्ती करून जाबता हुजूर लिहून पाठवणें म्हणोन. सनदा.

सीत सबैन मया व अलफ जमादिलाकर ९

---

(210) The Amal belonging to Gaikwad in pránt Guzeráth was attached, and made over to Náro Anandrao for management.

A. D. 1774-75.

(211) The office of Senâ Khâskhel was conferred on Sayájirao Gaikawad and orders were issued to the officer of Ahmedabád to prepare seals bearing Sayájirao's name, and to send them to him.

A. D. 1775-76.

(212) Some Shilledárs in the Peshwá's territory having gone over for service to Govindrao Gaikwad and Haidar naik, the houses of the former were ordered to be attached.

A. D. 1775-76.

१ गोविंदराव गायकवाड यांजकडे परगणे जामखेड येथील लोक गेले आहेत आसामी.
१ राघो आपाजी देशमुख यांचा भाऊ (?) आपाजी दारकोजी परगणे मजकूर वस्ती कसबे मजकूर.
१ चांगोजी बेलदार वस्ती मौजे धामणगांव.
१ हरबाजी कोंडाजी कुळकर्णी वस्ती मौजे जाहुली.
तीन असामींचे जप्तीविशीं. सनद.

१ भगवंत गोपाळ, व मुरार आबाजी, व नरहर शामराज हे हैदर नाईकाकडे राहून इकडे कारकून पाठऊन त्याजकडे लोक ठेऊन नेतात, सबब यांचीं घरें क्षेत्र नरसीपूर येथें आहेत त्यांचे जप्तीविशीं. सनद.

---

२ दोन सनदा रसानगी यादी दोन.

२१३-(३६०) निंबाजी पांढरे हे गोविंदराव गाईकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांजकडे गुजराथेंत चाकरीस आहेत म्हणोन पेशजीं तुम्हीं सरकार आज्ञेवरून, मशारनिल्हेचा इनाम मौजे ठाणेंगांव, परगणे सोलापूर याची, व मौजे सीरापूर, परगणे मजकूर येथील पाटिलकीची जफ्ती केली होती, त्यास सेनाखासखेल यांचें व सरकारचें ऐक्य जालें आहे, याजकरितां हें पत्र तुम्हांस लिहिलें असे, तरी इनामाची व पाटिलकीची जफ्ती मोकळी करून पूर्ववत चालत आल्याप्रमाणें चालवणें. इनामाचा व पाटिलकीचे हक्काचा वसूल सालमजकूरचा न घेणें, ज्याचे ते घेतील म्हणोन, रामचंद्र शिवाजी यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज १०

२१४-(४४९) गणेश विश्वनाथ यास फौजसुद्धां शहर अमदाबादेस गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर, व फत्तेसिंगराव गायकवाड या उभयतांचा कज्जा होत आहे, तो न व्हावा याजकरितां रवाना केले आहेत, तरी मशारनिल्हे यांस फौजेचे खर्चास कार्याकारण ऐवज लागेल तो तालुके अमदाबादेपैकीं देत जाणें म्हणोन, आपाजी गणेश यांस. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रबिलाकर १

परवानगी रूबरू.

---

(213) Nimbáji Pandhare having joined Govindrao Gaikawaḍ Senâ Khâskhel, Samsher Bahadur, his Inam vllage was attached. Friendly relations having been reestablished between Gaikwaḍ and Government, the attachment was removed.

A. D. 1776-77.

(214) Ganesh Vishwanáth was sent with an army to Ahmedabad to put a stop to the qurrel, which was going on between Goindrao Gaikwaḍ and Fatesingrao Gaikwaḍ.

A. D. 1776-77.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

२१५–(४८०) फत्तेसिंगराव गाईकवाड यांचे नांवें सनद कीं, तुमचा व गोविंदराव गाईकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांचा परस्परें कलह न व्हावा येविशीं सरकारांतून माणको शंकर यांस तुम्हांकडे पाठविले आहेत, त्यांस व त्यांच्या बराबर जासूद व कासीद आहेत त्यांस रोजमरा द्यावयाविशीं. कलमें.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

मशारनिल्हेस पालखीसुद्धां रोजमरा दुमाही कामगारीस रवाना केले, सबब रुपये २०० दोनशें रुपये देविले असेत तरी देणें. कलम १.

जासूद व कासीद जथेहाय यांस रोजमरा दीडमाही. रुपये.

१२॥ जासूद जथे लिंगोजी नाईक.
६ कासोजी गंजाजी छ. २८ रबिलाकरचा.
६॥ महिमाजी त्रिंबकजी छ. १२ रबिलाखरचा.

१२॥

१३ कासीद जयराम मल्ल यास छ. १७ रबिलावलचा रुपये.
६॥ भवानजी महादजी.
६॥ भिकाजी राणोजी.

१३

२५॥

साडे पंचवीस रुपये रोजमरा सदरहू तेरखांचा हुजूर पावला आहे, पुढें दीडमाही भरल्यावर देत जाणें. कलम १.

एकूण दोन कलमें लिहिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें तुम्हांजवळ राहतील तोंपर्यंत सरकार ऐवजीं देत जाणें ह्मणोन छ. २४ जमादिलावल. सनद १.

रसानगी याद.

FROM JANARDAN APAJI'S DIARY.

(215) Manko Shankar was sent to Fatesingrao Gaikwaḍ with the same object.

A. D. 1777-78.

२१६-(४९८) फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांचे नांवें सनद कीं, प्रांत गुजराथ पैकीं वगैरे सरंजाम, व वतनें पेशजीप्रमाणें, व सेनाखासखेली गोविंदराव गायकवाड यांजकडे चालत होती ते हल्लीं तुम्हांकडे करार करून दिल्हीं असे, तरी पेशजीप्रमाणें सरंजाम व वतनाचा अनुभव घेऊन सरकारसेवा एकनिष्ठपणें करीत जाणें ह्मणोन. सनद १.

समान सबैन मया व अलफ रमजान २०

रसानगी यादी एकंदर.

२१७-(६५०) फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांस सनद कीं, तुम्हांकडील सेनाखासखेलीचे डौलाची मजमू पेशजीप्रमाणें अंताजी नागेश यांस सांगोन वेतनें पूर्ववत् प्रमाणें सालीना रुपये ५००० पांच हजार करार केले असेत, तरी मशारनिल्हेपासून मजमूचें कामकाज घेऊन सदरहू वेतन पाववीत जावें ह्मणोन. सनद १.

समान सबैन मया व अलफ रमजान २०

येविशीं अंताजी नागेश यांस कीं, मजमूचें कामकाज करून सदरहू वेतन घेऊन सरकारांत एकनिष्ठपणें असत जाणें ह्मणोन. सनद १.

२

रसानगी यादी.

२१८-(५४०) बाबाजी भिकाजी यांचे नांवें सनद कीं, अमृतराव आपाजी, फत्तेसिंगराव गायकवाड यांचे लष्करांत भेटीस गेले होते, तेथें आरबांनीं दंगा करून मारिलें, त्यास हे गोष्ट अनुचित जहाली. पुढें मामलतीचा व शहर अमदाबादचा बंदोबस्त तुम्हांस, व राघो भिकाजी यांस करावयास सांगितला आहे, तर मामलतीचा व शहरचा बंदोबस्त यथास्थित करणें. अखेर सालीं हिशेब जलदीनें आकारून पाठवणें. सर्व प्रकारें निर्वाह सरकारांतून केला जाईल. गणेश विश्वनाथ यांस तेथेंच राहण्याविशीं पत्र पाठविलें आहे. पौष व माघ दोन महिनेयाची त्यांज-

समान सबैन मया व अलफ सफर २६

---

(216) The saranjám and Watan in Pránt Gujrát and the dignity of Senákháskhel enjoyed by Govindrao Gaikwaḍ was conferred on Fatesingrao Gaikwaḍ.

A. D. 1777-78.

(217) Antáji Nágesh was appointed as his (Gaikwaḍ's) Majmu on a salary of Rs. 5000.

A. D. 1777-78.

(218) Amritrao Appaji was killed by Arabs while the former had gone to Fatesingrao Gaikwaḍ's camp to pay him a visit. Bábáji Bhikáji and Rágho Bhikáji were appointed to take charge of the Pargáṇá and the town of Ahmedabad and were directed to work in harmony.

A. D. 1777-78.

कडील फौजेचे खर्चाची बेगमी परगणे आमोद, व देहनबरे निसबत त्र्यंबकराव गोविंद, व यादवराव रघुनाथ यांजकडून रसदेचे ऐवजीं माघ शुद्ध पौर्णिमेस दहा हजार, व फाल्गून अखेर दहा हजार येणेंप्रमाणें वीस हजार रुपये देविले आहेत, त्याची वरात कमाविसदारांचे नांवें अलाहिदा पाठविली आहे, त्याप्रमाणें त्यांस ऐवज पावेल. तुह्मीं व ते एक विचारें राहून शहरचा व मुलकी बंदोबस्त करून वरचेवर वर्तमान लिहीत जाणें म्हणोन छ. १ जिल्हेज.

सनद १.

येविशीं. सनदा २.

(१) संस्थानिक व जमीदार तर्फ अमदाबाद यांस कीं, तुम्हीं बाबाजी भिकाजी, व राघो भिकाजी यांसी रुजू होऊन अंमल वसूल सुरळीत देत जाणें म्हणोन. सनद.

१ किसोर पुरुषोत्तम पारख साहुकार यांस कीं, बाबाजी भिकाजी, व राघो भिकाजी यांस बंदोबस्त करावयास सरकारांतून सांगितला असे, तरी तुमचा मागील ऐवज तर्फ मजकूरकडे आहेच. पुढेंही रोजमऱ्यास वगैरे ऐवज लागेल तो देत जाणें, त्याचा निर्वाह सरकारांतून दिल्हा जाईल म्हणोन.

---

२ ३

परवानगी रूबरू. राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

२१९ (६५०) दाभाडे यांच्या वंशांत कोणी दौलतीस योग्य नाहीं, याजकरितां लक्षुंबाई दाभाडे तुमचा पुत्र घेणार, परंतु तुह्मी सरकारची आज्ञा असावी येविशीं संशय धरितां ह्मणोन दाभाडे यांजकडील कारभारी यांणीं सरकारांत विनंति केली; त्याजवरून मनास आणितां दाभाडे यांच्या घरांत दौलतीयोग्य कोणी नाहीं. तुह्मी व दाभाडे शरीरसमंधी, तुमचा पुत्र याणीं दत्तक घ्यावा, तुह्मी द्यावा योग्य जाणोन हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी तुह्मी संशय न धरितां आपला पुत्र लक्ष्मीबाई यांस दत्तपुत्र देणें ह्मणोन, देवीसिंग विश्वासराव टोके यांचे नांवें चिटणिसी.

समानीन मया व अलफ जिल्काद २७

पत्र १.

२२० (६५१) लक्ष्मीबाई दाभाडे यांचे नांवें चिटणिसी पत्र कीं, दाभाडे यांची दौलत चालावी, व तुम्हांस पुत्र असावा, या अर्थें दत्तकपुत्र देवीसिंग विश्वासराव टोके यांचा मूल घ्यावयाविशीं आज्ञा जहाली पाहिजे म्हणोन तुम्हांकडील कारभारी याणीं सरकारांत विनंति केली; त्याजवरून

समानीन मया व अलफ जिल्काद २९

---

(219) Laxmibai Dábháde wished to adopt a son of Dewising Vishwásrao Toke, as there was no fit person in the family. Dewising was permitted to give his son in adoption.

A. D. 1779-80.

(220) Laxmibai was informed that the adoption of Devising's son by her should be carried out in accordance with the usual rites, and that the adopted son would be allowed to succeed to her watan and saranjám.

A. D. 1779-80.

मनास आणितां दाभाडे यांच्या वंशांत दौलतीस योग्य कोण्ही नाहीं, यास्तव टोके मशारनिल्हे यांचा पुत्र दौलतीस योग्य समजोन तुम्हांस दत्तक घ्यावयास सांगितलें असे, तरी टोके यांचा पुत्र विधानपूर्वक दत्तक घेणें. तुमचीं वतनें व सरंजाम पुत्राचे नांवें तुम्हांकडे चालेल म्हणून चिटणिसी. पत्र १.

२२१ (६७७) फत्तेसिंगराव गाईकवाड यांजकडे लोक चाकरीस गेले, सबब त्यांचीं घरें जफ्त करावयाची आज्ञा तुह्मांस केली असे, तरी तिकडे गेले असतील त्यांचा शोध बारकाईनें करून, त्यांचीं घरें व मुलेंमाणसें वस्तभावसुद्धां जफ्त करून मुलांमाणसांस चौकी ठेऊन तसदी करणें; व वस्तभावेची जराबजरा मोजदाद करून, जाबते व नांवानिशी लिहून हुजूर पाठवणें म्हणोन, मामलेदारांस. सनदा.

समानीन
मया व अलफ
जमादिलावल १

१ नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यांस सनद कीं, जावजी गिलबिले यांचें घर मौजे तलवडे नजीक सवदाणे, प्रांत मजकूर येथें आहे, त्यास प्रांत मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांची घरें जप्त करणें ह्मणोन पेशजी तुह्मांस सनद सादर केली आहे, त्याजवरून मशारनिल्हेचें घर जफ्त केलेंच असेल; नसिले केलें तर हल्लीं जफ्त करणें ह्मणोन.

१ महादाजी खंडेराव टोके यांस सनद बाबाजी लगड्याचें घर मौजे कालेगांव, परगणे कर्डे येथें आहे त्याविशीं.

१ भवानी शंकर हैबतराव यांस सनद कीं, जाधव शिलेदार यांचीं घरें मौजे चिमणगांव वगैरे गांव, प्रांत वाई येथें आहेत, त्यास प्रांत मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचीं घरें जफ्त करणें ह्मणोन पेशजी तुम्हांस सनद सादर केली आहे, त्याजवरून जाधवाचीं घरें जफ्त केलींच असतील; नसिली केलीं तरी हालीं जफ्त करणें ह्मणोन. सनद.

१ श्रीनिवास शामराव यांस सनद असामीचीं घरें बीतपशील. असामी.

१ नागोजी यादव याचें घर मौजे वडगांव, प्रांत कऱ्हाड येथें.

१ जोत्याजी फडतरे याचें घर मौजे जखणगांव, परगणे खटाव येथें.

२

एकूण दोन असामीचीं घरें जफ्त करणें; व याखेरीज कऱ्हाड प्रांतांतील, व ख-

---

(221) Orders were issued for the attachment of the property and houses of persons, who had gone over for service to Fatesingrao Gaikwad, and for keeping under surveillance the families of such persons.

A. D. 1779-80.

टाव देशचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें म्हणोन.

१ विठ्ठल नारायण यांस सनद बाळाजी यादव याचें घर आमदा नगरांत आहे, तें जप्त करणें, व याखेरीज नगर तालुक्यांतील व आसपासचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें ह्मणोन. सनद.

१ त्रिंबक कृष्ण व भवानी हरी कमाविसदार, तर्फ हवेली संगमनेर यांस सनद जानोजी इखे याचें घर मौजे लोणी, तर्फ मजकूर येथें आहे, तें जप्त करणें; व याखेरीज तर्फ मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें ह्मणोन. सनद.

१ बाबूराव माणकेश्वर सुभेदार परगणे कर्डें रांजणगांव यांस सनद म्हाळोजी बोरकडे याचें घर मौजे मलठण, तर्फ कर्डें येथें आहे, तें जप्त करणें; व याखेरीज परगणे मजकूरचे लोक गाईकवाडाकडे चाकरीस गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें म्हणोन. सनद.

१ खंडो बाबूराव कमाविसदार परगणे आकोले यांस सनद बिरोजी बेड्याचें घर मौजे उचखडक, परगणे मजकूर येथें आहे तें जप्त करणें ह्मणोन.

१ पांडुरंग धोंडाजी कमाविसदार परगणे नाशिक यांस सनद परगणे मजकुरीं असाम्याचीं घरें.

१ रुद्राजी गिरमाजी नाशिकांत.

१ केशवराव देशमुख यांचें घर मौजे देवळाली परगणे मजकूर येथें.

२

एकूण दोन असामीचीं घरें जप्त करणें, व या खेरीज परगणे मजकूरचे लोक तिकडे गेले असतील, त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें ह्मणोन. सनद.

१ शिवराम रघुनाथ यांस सनद सकजी सिन्नरकर याचें घर कसबें सिन्नर, परगणे मजकूर येथें आहे तें जप्त करणें, व याखेरीज परगणे मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जप्त करणें म्हणोन.

१ नरसिंगराव बल्लाळ सरसुभा प्रांत गंथगथडी यांस सनद व्यंकटराव खताल याचें घर मौजे तिलापूर, तर्फ बेलापूर येथें आहे, त्यास प्रांत मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचीं घरें जप्त करणें म्हणोन पेशजी तुम्हांस सनद सादर केली आहे, त्याजवरून मशारनिल्हेचें घर जप्त केलेंच असेल; नसिलें केलें तरी हालीं जप्त करणें म्हणोन.

१ रामराव त्रिंबक यांस सनद जिवाजी पांढरे याचें घर गाजी भोईरे प्रांत जुन्नर येथें आहे, त्यास प्रांत मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचीं घरें जप्त करणें म्हणोन पेशजी तुह्मांस सनद सादर केली आहे, त्याजवरून मशारनिल्हेचें घर [जफ्त ?] केलेंच असतील (असेल); नसिलें केलें तरी हल्लीं जप्त करणें ह्मणोन. सनद १.

१ गोविंद हरी कमाविसदार प्रांत बागलाण यांस सनद खंडोजी गोडसे याचें घर लखमापूर, प्रांत मजकूर येथें आहे, तें जप्त करावयाविशीं नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यास सनद सादर केली आहे, त्याजवरून त्यांणीं मशारनिल्हेचें घर जफ्त केलें असल्यास उत्तम, नाहीं तरी तुम्हीं त्याचें घर जफ्त करणें, व या खेरीज प्रांत मजकूरचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें जफ्त करणें ह्मणोन. सनद.

१ रामचंद्र शिवाजी यांस सनद देवगोजी पांढरे, व नारायणजी पांढरे यांचीं घरें मौजे सिरापूर, परगणे सोलापूर येथें आहेत ते जफ्त करणें, व त्यांजकडे गांव वगैरे असेल तें जप्त करून ऐवज होईल तो सरकारांत पावता करणें; व या खेरीज परगणे मजकूर, व परगणे अहिरवाडी या हरदू महालांतील व जवळपासचे लोक तिकडे गेले असतील त्यांचा शोध करून त्यांचीं घरें वगैरे जप्त करणें ह्मणोन. सनद.

२ धोंडो महादेव यांस सनद परगणे चांदवड येथें असामींचीं घरें.

१ बगाजी खलाटणे, व सुभानजी सांवत याचें घर मौजे कोटमगांव.

१ खंडोजा मोरे परगणे मौजे कोटमगांव.

———

२

एकूण दोन असाम्यांचीं घरें जफ्त करणें, येविशीं तुकोजी होळकर यांजकडील कमाविसदारास अलाहिदा पत्र आहे, तें त्यास देऊन त्याजपासून लोक घेऊन सदरहू घरें जप्त करणें ह्मणोन. सनद १.

येविशीं होळकराकडील कमाविसदारास पत्र कीं, हरदू असाम्याचे घराची जफ्ती मशारनिल्हे करतील त्यास करूं देणें, व तुम्हीं आपले लोक चौकशीस देणें ह्मणोन. पत्र १.

——— ———

१६ २

परवानगी रूबरू.

२२२–(८४३) कोन्हेर गिरमाजी, व रुद्राजी गिरमाजी वस्ती कसबे नाशिक दिंमत राजश्री फत्तेसिंगराव गाईकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपलें घर कसबे मजकुरीं आहे तें, सेनाखासखेल यांचा सरकारांत सलुक नव्हता याजकरितां सरकार आज्ञेनें कमाविसदारांनीं जप्त केलें आहे, तें हल्लीं सेनाखासखेल यांचा सलुक जहाला, सबब मोकळें करावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तर तूर्त मशारनिल्हेचे घराची जप्ती मोकळी केली असे. जप्ती उठऊन घर त्यांचे स्वाधीन करणें ह्मणोन, पांडुरंग धोंडाजी कमाविसदार, परगणे नाशिक यांचे नांवें छ. ३ सवाल चिटणिसी. पत्र १.

आर्बा समानीन मया व अलफ जमादिलावल ३०

२२३–(१०९१) परगणे सावली, प्रांत गुजराथ हा महाल फत्तेसिंगराव गायकवाड यांजकडे मोबदला दिला होता, तो सरकारांत घ्यावयाचा ठरला, येविशीं गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहाद्दर यांणीं तुम्हांस लिहिलें आहे, तरी खंडो मोरेश्वर यांचे हवालीं महाल करून तुह्मीं आपले कडील कमाविसदार उठऊन नेणें ह्मणोन, कान्होजीराव गायकवाड यांचे नांवें. सनद १.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलावल १

येविशीं जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद १.

२

रसानगी, अंताजी गोविंद कारकून निजबत दफ्तर.

---

(222) There is a reference in this Sanad to the restoration of friendly feelings between Government and Fatesingrao Gaikwaḍ, Senákháskhel.

A. D. 1783-84.

(223) The parganá of Sáwli in Prant Gujrath, which was given in exchange to Fatesingrao Gaikwaḍ, was retaken by Government.

A. D. 1793-94.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

१० नागपूरकर भोंसले.

२२४–(१८) मुधोजी भोंसले सेना धुरंधर, व साबाजी भोंसले यांनीं घासदाणा काय घेतला, व पायमली फौजेमुळें जाली, त्याची चवकशी करावयास आपाजी रामचंद्र, व रामचंद्र केशव पाठविले असे, तरी भोंसल्यांनीं घासदाणा काय घेतला, व पायमली झाली असेल ते वाजवी यांस समजावणें ह्मणोन. पत्रें.

आर्बा सबैन मया व अलफ सवाल १०

२ परगणे सिंदखेड.

१ मल्हारराव रामकृष्ण कमाविसदार यांस.

१ जमीदारास.

२

२ परगणे चारठाणें.

१ विनायेक रंगनाथ कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे शेवली.

१ केसो कृष्ण कमाविसदार यांस.

---

[1] POLITICAL MATTERS.

(6) Matters relating to

(10) Bhosle of Nagpur.

(224) Appáji Rámchandra and Rámchandra Keshav were sent to make inquiries regarding the damage caused in the country by the army of Mudhoji Bhosle Sená-Dhurandhar, and Sábáji Bhosle, and regarding the amount of *Ghásdáṇá* levied by them. The Kamavisdars and Jamidars of Parganá Sind-khed, Chárthāṇe, Sákhar khedle, &c., were directed to furnish correct information to them, on the subject.

A. D. 1772-73.

१ जमीदारास.

२

२ परगणे साखरी खेडले.

१ गोविंद हरी कमाविसदार यांस.

१ जमीदारास.

२

२ परगणे मेहेकर.

१ खंडेराव बल्लाळ कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ अंबडापूर.

१ बाळाजी खंडेराव कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे फुलंबरी.

१ श्रीराम श्रीधर कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे जालनापूर.

१ श्रीपतराव रघुनाथ कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे आंवढें.

१ गोपाळ केशव कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे परबाणी.
  १ सदाशिव हरी कमाविसदार.
  १ जमीदारास.
  ——
  २
२ कजबे खेड विसाद.
  १ व्यंकटराव रघुनाथ कमाविसदार.
  १ मोकदमाचे नांवें.
  ——
  २
२ परगणे सोनपेठ.
  १ महादाजी अनंत कमाविसदार.
  १ जमीदारास.
  ——
  २
४ परगणे नेवासें वगैरे महाल.
  १ नारो आपाजी यांचे नांवें.
  ३ जमीदारांचे नांवें.
    १ परगणे नेवासें.
    १ परगणे दाभाडी.
    १ परगणे येकतुनी.
    ——
    ३
२ मौजे मुद्गल.
  १ व्यंकटराव रघुनाथ कमाविसदार यांस.
  १ जमीदारास.
  ——
  २
२ परगणे पैठण.
  १ महादाजी नारायण कमाविसदार.
  १ जमीदारास.
  ——
  २

२ परगणे टाकळी.

१ बाळाजी महिपत रोडे कमाविसदार.

१ जमीदारास.

२

२ परगणे आंबे जोगाई.

१ गोपाळ महिपत कमाविसदार.

१ जमीदारास.

२

१ यादवराव मोरेश्वर यांस पावडगांव पैकीं गांव कमाविसीनें आहेत येविशीं.

३७

चिटणिसी.

२२५–(२६) काशीराव आपाजी यांचे नांवें जाब कीं, तुमचे तीर्थरूप आपाजीराव मृत्यु पावले, सबब साबाजी भोंसले यांजकडील कुलडौलाची दिवाणगिरी, व सरंजाम, व असाम्या पेशजीप्रमाणें तुमचे नांवें करार करून देऊन नजरेचा ऐवज करार केला तो सरकारांत जमा.

आर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

२५०० जमा पोता छ. २७ रमजान रुपये.

४५०० पागा दिंमत गणेश विठ्ठल याजकडील खास बारदार वगैरे यांस नालबंदी साल मजकूर, व चंदीबद्दल वरात छ. ३० रमजान पौष शु॥ ३

७००० एकूण सात हजार रुपये सदरहू प्रमाणें सरकारांत जमा जहाले असेत ह्मणोन छ. ३ सवाल जाब १.

---

(225) Appájirám being dead, the office of Diwan to Sábáji Bhosle was continued to his son Káshirao Appáji and a Nazar of Rs. 7000 was levied from him.

A. D. 1772-73.

२२६-(१७४) शिवाजी भोसले सेनासाहेब सुभा यांचे नांवें पत्र कीं, श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामीनीं तुह्मांवर कृपा करून सेनासाहेब सुभा पद सांगोन, पदाचीं वस्त्रें, व जवाहीर, व ढाल, तरवार, व शिक्यास कटार, व हत्ती बहुमान दिल्हा तो घेऊन तुह्मांकडे पाठविला आहे. सुमुहूर्तें परिधान करावें, आणि राजश्री स्वामीचे चरणाचें लक्ष चित्तांत धरून एकनिष्ठेनें वर्तत जावें ह्मणोन.

खमस सबैन मया व अलफ सफर ९

पत्र १.

परवानगी रूबरू.

२२७-(१७७) मुधोजी भोंसले यांजकडून इकडील प्रांतांतील फौज ठेऊन चाकरीस न्यावयाकरितां कारकून आले आहेत, त्यास लोक मोंगलाकडे व शिवाजी भोसले यांजकडे जाण्याचा बहाणा करून, मुधोजी भोसले यांजकडे जातात ह्मणोन हुजूर विदित जहाले; ऐशास तुह्मीं परगणा मजकुरीं व लगतें महालीं बारकाईनें चौकशी करून मातबर पथकें व फुट शिलेदार मुधोजी भोंसले यांजकडेसच गेले कोण, व जाणार कोण तें लिहून पाठवणें. गेले असतील त्यांचीं वतनें व घरें जप्त करून तसदी देणें. जाणार असतील त्यांस ताकीद करून अटकाव करणें. ताकीद केली असतां भारी जमावानें तुम्हांसी रेटाई करून जाणार असतील, त्यांचें वर्तमान लिहून जलद हुजूर पाठवणें. या कामास हल्लीं हुजुरून गोपाळ अनंत, व गंगाधर सिद्धेश्वर कारकून शिलेदार पाठविले आहेत यांचे विद्यमानें बंदोबस्त करून लिहून पाठवणें म्हणोन सनदा.

खमस सबैन मया व अलफ सफर २०

१ रामचंद्र शिवाजी परगणा सोलापूर, व अहीरवाडी.

१ गोविंदराव सदाशिव परगणे भोसे.

---

(226) Shiváji Bhosle, Sená Sáheb Subhá, was informed that the Raja was graciously pleased to confer on him the office of Sená Sáheb Subhá, that he had sent clothes, jewelery, a sword, a shield, a seal, and an elephant for being presented to Shiváji Bhosle in honor of the event and that the present should be accepted on an auspicious day. He was exhorted to be loyal to the Sovereign.

A. D. 1774-75.

(227) Government was informed that some persons had come from Mudhoji Bhosle and that they were enlisting men in his service while professing to do so for the Mogal or Shiváji Bhosle. The officers of the provinces were directed to make inquiries in the matter and to attach the houses and watans of those Silledars who had gone over to Mudhoji Bhosle and to prevent others from doing so.

A. D. 1774-75.

१ विठ्ठलराम, व धोंडो मल्हार परगणे आवढे.

१ मेघःशाम रामकृष्ण परगणे मंगळवेढें.

१ कमाविसदार दिंमत नरसिंगराव जनार्दन परगणे आंबे जोगाई.

१ कमाविसदार परगणे करकंब निसबत वामनराव गोविंद.

२ कमाविसदार दिंमत विसाजी कृष्ण. सनदा.

१ परगणा आनंद, व गुजोटी.

१ परगणा सांगोलें.

८

परवानगी रूबरू.

२२८-(१८१) व्यंकटराव काशी वकील दिंमत मुधोजी भोंसले यांस जंजिरे सुवर्णदुर्ग येथें अटकेस ठेविले आहेत, त्यांस हल्लीं हुजूर आणविले असेत, तरी मशारनिल्हे बरोबर तुम्हीं तेथून चार शिपाई देऊन हुजूर पाठवून देणें ह्मणोन, मोरो बापूजी तालुके सुवर्णदुर्ग यांचे नांवें. सनद.

खमस सबैन मया व अलफ रबिलावर १२

परवानगी रूबरू.

२२९-(२०७) कृष्णराव अनंत यांचे नांवें पत्र कीं, मौजे देऊर, प्रांत वांई हा गांव बंदोबस्त इनाम मुधोजी भोंसले सेना धुरंदर यांजकडे आहे, त्याची जप्ती सरकारांतून करविली होती, ते हल्लीं मोकळी करून हें पत्र लिहिलें आहे, तरी जप्ती उठऊन मौजे मजकूर मशारनिल्हेकडील कमाविसदारांचे हवालीं करणें, दखलगिरी न करणें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर १४

येविशीं मोकदम मौजे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन सुदामत प्रमाणें अंमल देणें ह्मणोन. १

२

---

(228) Vyankatrao Kashi, Vakil of Mudhoji Bhosle who was in confinement in the fort of Suvarṇadurg was ordered to be sent to the Huzur.

A. D. 1778-79.

(229) The village of Deur held in Inám by Mudhoji Bhosle, which was previously attached, was now ordered to be restored.

A. D. 1779-80.

२३०-(२०८) संताजी भोंसले यांजकडे सरंजामास गांव आहेत, त्यांची जप्ती सालगुदस्तां केली होती, ते हल्लीं मोकळी केली असे, तरी मशारनिल्हेचे कमाविसदारासी रुजू राहून सुदामत प्रमाणें अंमल सुरळीत देणें म्हणोन, मोकदम याचे नांवें चिटणिसी. पत्रें.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर १४

१ मौजे पिंपळगांव, परगणा पारनेर येथील मोकासा, व सावोत्रा, व तीनहिसे, व जहागीर पैकीं एक हिसा येणेंप्रमाणें.

१ मौजे धारगांव, परगणे कर्डे रांजणगांव येथील मोकासा, व बाबती, साहोत्रा, व निम चौथाई अंमल याप्रमाणें.

१ कजबे जिंती, तर्फ चांभारगोंदें बंदोबस्त अंमल.

३

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

२३१-(२२२) श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचे आज्ञेवरून तुम्हांस सेनासाहेब सुभा पद बहाल केलें असे, तरी तुम्हीं फौजेचा व मुलुकाचा बंदोबस्त करून, चाकरी सरकारची एकनिष्ठपणें करीत जावी म्हणून रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांसी छ. २५ रबिलाकर. परवानगी रूबरू. राजश्री सखाराम भगवंत, व बाळाजी जनार्दन फडणीस. सनद १.

सीत सबैन मया व अलफ जमादिलाकर २९

२३२-(३२७) गोपाळ भगवंत कमाविसदार परगणे इंदापूर यांचे नांवें सनद कीं, पीलखानापैकीं रतनगज बुरहाती परगणे मजकुरीं चारणीस आहे, तो हत्ती रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांस पेशजी सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें दिल्हीं, ते समई बहुमानार्थ हत्ती द्यावा, त्यास जिवाजी

सबा सबैन मया व अलफ साबान ७

---

(230) A similar order was issued for the restoration of the attached Saranjám of Santàji Bhosle.

A. D. 1779-80.

FROM THE JANARDAN APAJI'S DIARY.

(231) Rághoji Bhosle was informed that the office of Senásáheb Subhá was conferred on him by the Raja of Satárá and that he should keep good army, administer his province and serve Government with devotion.

A. D. 1779-80.

(232) On the occasion of presenting Rághoji Bhosle with the title of Sená Sáheb Subhá, an elephant was obtained from Nawáb Nizám Alli to be handed over to Rághoji Bhosle Another elephant was now sent to the Nawáb. in his stead.

A. D. 1784-85.

रघुनाथ याचे मारफातीनें नबाब निजाम अल्लीखान यांजकडील उसना हत्ती घेऊन दिला, त्याचे मुबदला हल्लीं नबाब यांस द्यावयाचा तो देविला असे, तरी हत्तीच्या चाऱ्याचा रतीबाची हैद-राबादेस पोहचेतों पर्यंत परगणे मजकूरपैकीं बेगमी तुम्हीं करून देऊन, राणोजी खैरा खिजमतगार पाठविला आहे त्याचे हवालीं करणें म्हणोन. सदरहू हत्ती पाठवावयाचा मना केला असे.

२३३–(४२०) शाहाजी भोंसले यांचे नांवें सनद कीं, तुम्हांकडील काशीराव आ-पाजी दिवाण यांजपासून सरकारांत कर्ज पटीचा ऐवज घेतला, याज-करितां मशारनिल्हेकडील स्वार आसामी २४ च्योविस स्वार तुम्हां-कडे सरंजामांत चाकरीस आहेत, त्यांची चाकरी कर्जपटी घेतल्यामुळें सालमजकुरीं माफ केली असे, तरी मशारनिल्हे यांजवळून सदरहू स्वारांची चाकरी न घेणें. दिवाणगिरीचें कामकाज घेत जाणें म्हणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ मोहरम १४

रसानगी यादी.

२३४–(४३१) कमाविस भेट राजश्री सखाराम भगवंत यांस बाबत हाये गुजारत मल्हारजी कामथा खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपये.

सबा सबैन मया व अलफ सफर २८

३६५ बाबत राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांणीं मेज-मानी केली सबब.

४०	तिवट ब्ऱ्हाणपुरी कच्चा रंग चुनडी	१
१५०	जाफरखानी ब्ऱ्हाणपुरी चुनडी कच्चा रंग	१
५०	झगा धुवट	१
१२५	तुंबा किमखापी अस्तर गजनीसुद्धां	१
३६५		५ (४)

७० बाबत वेंकटराव काशीबुंधेले सनगें एकूण किंमत. रुपये.

२०	तिवट	१

---

(233) The karjapatti tax having been levied from Káshirao Appáji, Diwán of Sháháji Bhosle, by the Government, the latter was requested to exempt the former from furnishing 24 Sowars for service under the Bhosle, for one year.

A. D. 1784-85.

(234) At a dinner party given by Rághoji Bhosle Sená Sáheb Subhá, a present of clothes worth Rs. 365 was made to Sakháram Bhagwant.

A. D. 1778-79.

	५० जाफरखानी	१
	७०	२
४३५		६

२३५-(४३८) जमा जामदारखाना.

सबा सबैन मया व अलफ रबिलावल २२

कमाविस भेट बद्दल रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे डेऱ्यास मेजवानी जाली, सबब सनगें आलीं तीं किंमत. रुपये.

१२७५ राजश्री राव यांस गुजारत कान्होजी सौदा खिजमतगार जमा सनगें एकूण. रुपये.

८२५ प्रत पोशाक.

१५०	चिरा जरी कारचोबी	१
२५०	झगा जरी कारचोबी	(१)
१५०	चादर जरी कारचोबी	१
१५०	शाला फर्द	२ दर ७५
१२५	तुंबा किमखापी	१
८२५		६

४५० प्रत पोशाक रुपेरी जरी.

१००	चिरा जरी	१
५०	वोढणी जरी	१
१००	जामेवार जरी	१
२००	किमखाप	१
४५०		४

१२७५

४५० राजश्री सखाराम भगवंत यांस गुजारत दत्तराम परदेशी दिंमत मजकूर सनगें एकूण. रुपये.

(235) Clothes were presented on the occasion of the dinner given by Rághoji Bhosle to which the Peshwá was invited.

A. D 1779-80.

७५	तिवट बस्की साधें	१
२००	जाफरखानी बस्की साधा	१
१२५	तुंबा किमखापी	१
५०	झगा धुवट शेल्याचा	१
४५०		१४

१७२५

२३६–(७९१) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत शाहाजी भोंसले यांचे डेऱ्यास खासा स्वारी गेली, ते समई पोशाक दिल्हा तो, गुजारत जिवाजी कोटकर खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपये.

सलास समानीन मया व अलफ जामदिलावल ९

७५	तिवट	१
१२५	दुपटा	१
१००	झगा	१
७५	तुंबा किनखापी	१
३७५		४

२३७–(८९८) जमा जामदारखाना.

सीत समानीन मया व अलफ सवाल १४

कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत मुधोजी भोंसले सेनाधुरंधर यांचे डेऱ्यास खासा स्वारी मेजवानीस गेले, ते समई पोशाक दिल्हा तो, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

४१०	चिरा जरी बादली	१
४०३	दुपटा जरी बादली	१
३००	झगा बादली	१
१००	तुंबा किमखापी	१
१२१३		४

(236) Presents were received on the occasion of the Peshwâ's visit to Sháhji Bhosle at the latter's tent.

A. D. 1777-80.

(237) Presents were received on the occasion of the Peshwâ's visit to the tent of Mudhoji Bhosle, Senâ Dhurandar, for dinner.

A. D. 1779-80.

२३८-(९००) राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांणीं विदित केलें कीं, मौजे विरलें, परगणे नळदुर्ग येथें कैलासवासी जानोजी भोंसले यांची छत्री आह्मी बांधली आहे, तेथील खर्चास स्वराज्याचा अंमल मुकासा, व बाबती, व सावोत्रा, व सरदेशमुखीचा अंमल करार करून देविला पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मौंजे मजकूर येथील स्वराज्याचा अंमल मशारनिल्हेकडे छत्रीचे खर्चास सालमजकूर पासून करार करून दिल्हा असे, तरी यांजकडे चालवणें ह्मणोन. सनदा, व पत्रें.

सीत समानीन मया व अलफ जिल्काद १

५ सनदा.

१ मौजे मजकूरचे मोकदमास कीं, स्वराज्याचा अंमल सदरहूप्रमाणें पेशजींचे अंमलदार यांजकडून दूर करून, सेनासाहेब सुभा यांजकडे छत्रीचे खर्चास करार करून दिल्हा असे, तरी मशारनिल्हेकडील कमाविसदारासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद.

१ सुलतानजी बांडगर अमिरुल उमराव यांजकडे मोकाशाचा अंमल फौजेचे सरंजामास होता, तो दूर करून मशारनिल्हेकडे दिल्हा येविशीं. सनद १.

सदरहू अंमल चौकशी करितां मशारनिल्हेकडे नाहीं, विठ्ठल येशवंतराव दिंमत हुजुरात यांजकडे आहे, यास्तव पहिली सनद माघारी घेऊन दुसरी सनद विठ्ठल येशवंतराव यांचे नांवें दिल्ही असे. परवानगी रूबरू.

१ महिपतराव प्रल्हाद कमाविसदार परगणे वरवाल वगैरे यांस कीं, बाबतीचा अंमल तुम्हांकडून दूर करून मशारनिल्हेकडे देविला असे, तरी मौजे मजकूरचे बाबतीचा आकार होईल तो मशारनिल्हेचे नांवें हिशेबीं खर्च लिहिणें ह्मणोन. सनद १.

१ सदाशिव चिमणाजी सचिव यांस कीं, सावोत्र्याचा अंमल मशारनिल्हेकडे चालवणें ह्मणोन.

१ भास्करराव त्रिंबक अनहत सरदेशमुख यांस सरदेशमुखीच्या अमलाविशीं, आकार होईल तो मशारनिल्हेचे नांवें खर्च लिहिणें ह्मणोन. सनद.

५

---

(238) At the request of Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhâ, revenue of the village of Wiráḷe in Pargaṇe Naldurg was assigned for the expenses of the monument raised in commemoration of Jánoji Bhosle.

A. D. 1777-78.

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशमुख व देशपांडे परगणे नलदुर्ग यांस सदरहू अंमल बांडगराकडे नाहीं, सबब पत्र माघारें घेऊन चिठ्यांत ठेविलें असे.

१ शाहाजी भोंसले यांस कीं, मौजे मजकूर येथील मुकाशाचा अंमल सुलतान जिंबडगर अमिरुल उमराव यांजकडे फौजेचे सरंजामास होता, तो दूर करून सेनासाहेब सुभा यांजकडे छत्रीचे खर्चास करार करून दिल्हा असे, तरी मशारनिल्हेकडे चालवणें म्हणोन. पत्र.

२

---

७ सात पत्रें पैकीं सनदा पांच, व चिटणिसी पत्रें दोन.

रसानगी यादी.

मौजे मजकूरचा आकार मखलाशीचे यादीस लागला नाहीं.

२३९–(९०१) खंडोजी भोंसले सेना बहाद्दर यांचे नांवें सनद कीं, संस्थान गढे-मंडले पैकीं रेवा दक्षण तीरचे महाल राजश्री रघोजी भोंसले सेना-साहेब सुभा यांजकडे द्यावयाचा करार जाला आहे, ते खेरीज करून सरकारांत घेतले आहे, ते तुम्हांकडे फौजेचे सरंजामास सालमजकुरा-पासून करार करून दिल्हे असे येविशीं. कलमें.

सीत समानीन मया व अलफ जिल्काद १

संस्थान मजकूर तुमचे हवालीं जाल्यावर, तेथील कमाल जमा असेल ती मनास आणून, फौजेचा करार करून देऊं; त्याप्रमाणें फौज चांगली बाळगावी. एकनिष्ठपणें दुसरें लक्ष न धरितां चाकरी करावी. कलम १.

संस्थान मजकूर उत्तरतीर दक्षणतीर यांत जमीदार व पाटील कुळकर्णी वगैरे हकदार यांजकडे हकदक मानपान गांव इनाम व जमिनी व ब्राह्मणास वगैरे इनाम गांव व धर्मादाय पेशजीपासून चालत आले आहेत, व सरकारांत आल्यावर

---

(239) The portion of sansthán Gadhe Mandal to the south of Rewá was given to Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhá. The portion of the sansthán to the north of the river, which lately came into the possession of Government, was given in Military Saranjám to Khandoji Bhosle, Sena Bahadur. The conditions attached to the Saranjám were,

A. D. 1778-79.

1 that a good army should be maintained,

1 the Saranjámdár should serve loyally,

1 that he should serve in person with his army &c.

खाशानीं फौज सुद्धां चाकरीस यावें, वरकड सरदाराप्रमाणें फौजेची गणती द्यावी. कलम १.

पडले घोडे व दारूगोळी सरकारांतून देऊं नये. कलम १.

दिल्हे असतील ते चालवावे. बोभाट येऊं नये. कलम १.

मंडळ्या खेरीज दुसऱ्याचे महाल बुंदेल्यांनीं घेतले असल्यास ते सरकारांत राहतील. कलम १.

पांच कलमें करार केलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें अमलांत आणून सरकारसेवा एकनिष्ठपणें करीत जाणें ह्मणोन.

सनद १.

येविशीं.

सनदा २.

१ बाळाजी गोविंद यांस कीं, उत्तरतीरचे महाल व किल्ले व ठाणीं मशारनिल्हेकडील अमिल येतील, त्यांचे हवाली करून पावलियाचें कबज घेणें. सालमजकूरचा वसूल तुम्हीं घेतला असेल, तो जमीदाराचे गुजारतीनें रुजू करून याद हुजूर पाठवणें म्हणोन.

१ मंडलोई व कानगो यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन.

३

रसानगी यादी.

२४०–(९८५) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत रघोजी भोंसले सेनासाहब सुभा याचे डेऱ्यास खासा स्वारी गेली, ते समईं पोशाख दिल्हा तो गुजारत जानोजी जाबला खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

तिसा समानीन मया व अलफ रजब ११

३४०	चिरा जरी रुपेरी		१
३२५	चादर जरी रुपेरी		१
२००	झगे व जीमे		
	१९० प्रत जरी रुपेरी	१	
	९० प्रत बंगाली शेल्याचा धुवट	१	
		२	
२००			
१००	तुंबा किमखापी अस्तर गुलबादन.		
९६९			९

(240) The Peshwá paid a visit to Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhá, at his tent.

A. D. 1777-78.

२४१-(९८७) वेंकोजी भोंसले सेनाधुरंधर यांचे नांवें कीं, रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा पुणियास आले. भेटी जाहल्या. मुधोजी भोंसले कैलासवासी जाहले, याजकरितां सेनाधुरंधरीचें पद त्यांचे नांवें होतें, तें तुमचे नांवें सरकारांतून करार करून दिल्हें पाहिजे म्हणून बोलले; त्याजवरून सेनाधुरंधरीचें पद तुमचें नांवें करार करून पदाचीं वस्त्रें व जवाहीर व हत्ती व सकिकेटार पाठविली असे. अलाहिदा यादी आहे त्याप्रमाणें घ्यावी आणि मुधोजी भोंसले यांजकडे सरंजाम चालत आला आहे, त्याप्रमाणें बंदोबस्त करून सरकार लक्षांत राहून सेवा एकनिष्ठेनें करून सेनासाहेब सुभा यांचे लक्षाप्रमाणें वर्तणूक करावी म्हणोन. सनद १.

तिसा समानीन मया व अलफ साबान १३

रसानगी यादी.

२४२-(९८८) राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडे संवस्थान गढमंडले येथील रेवा दक्षणतीरचा तालुका पेशजीच्या सनदांप्रमाणें चालवावयाचा करून, व खंडोजी भोंसले सेनाबहाद्दर यांजकडे फौजेचे सरंजामास रेवा उत्तरतीरचे महाल देखील किल्ले व ठाणीं संस्थान मजकूरचीं करार करून देऊन, तुम्हांस सनसीत समानीनांत सनदा सादर केल्या आहेत, त्याप्रमाणें संवस्थान स्वाधीन जाहलें नाहीं. सांप्रत सेनासाहेब सुभा पुणियास आले, मंडले संवस्थान हवालीं करावें असा करार ठरला, त्यास हवाली करण्याविशीं पेशजी मोरो गोविंद तुम्हांकडे पाठविले आहेत, ते तुम्हांजवळ आहेत. हल्लीं बाळाजी मल्हार व हुजरे पाठविले आहेत, त्यास पेशजीच्या सनदांप्रमाणें दक्षणतीर व उत्तरतीरचे महाल व किल्ले व ठाणीं संवस्थान मजकूरची सेनासाहेब सुभा यांजकडील अमिल येतील त्यांचे हवालीं करून पावलियाचें कबज घेऊन हुजूर पाठऊन देणें म्हणोन, बाळाजी गोविंद यांचे नांवें. सनद १.

सीत समानीन मया व अलफ साबान १३

परवानगी रूबरू.

---

(241) Venkáji Bhosle, Sená Dhurandar, was informed that through the intercession of Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhá, the title of Sená Dhurandhar together with the Saranjám attached thereto was, in conseqence of Mudhoji Bhosle's death, conferred on Venkáji.

A. D. 1779-80.

(242) The portion of the sansthán Gaḍhe-Manḍaḷ to the south of the Rewá was in sit samánin ordered to be given to Raghoji Bhosle, and the portion to the north of the river to Khandoji Bhosle, Sená Bahádur, in Military Saranjám. The territory was not however actually made over to Raghoji. This was now ordered to be done.

A. D. 1776-77.

२४३-(११२४) जमा जामदारखाना.

खमस तिसैन मया व अलफ रमजान ७

कमाविस भेट राजश्री राव यांस बाबत हाय खासा स्वारी, रामनवमीचे उत्साहांत वगैरे डेऱ्यास गेली, तेथें पोशाख आले ते जमा, गुजारत जानाजी जावळा खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

१०२५ बाबत रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा सनगें एकूण. रुपये.

१२५	तिवट बस्ती लाल	१
३५०	दुपटा बस्ती लाल	१
३००	जामेवार बस्ती लाल	२ दर १५०
२५०	किमखाप काशीचा	१
१०२५		५

५७५ बाबत दौलतराव शिंदे सनगें एकूण सनगें रुपये.

७५	तिवट कलमी हिरवे	१
३००	दुपटा कलमी हिरवा	१
१५०	किमखाप	१
५०	शेले साधे धुवट	२ दर २५
५७५		१०

१६००

२४४-(११३४) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत हाय गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सीत तिसैन मया व अलफ सफर १७

५७५ बाबद रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे डेऱ्यास खासा स्वारी मेजवानीस गेली, ते समई पोशाख दिल्हा तो सनगें एकूण. रुपये.

३००	मंदील जरी	१
३००	चादर जरी	१
२५०	झगा जरी	१

(243) The Peshwá visited Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhá, and Daulatrao Scindia at their tent.
A. D. 1779-80.

(244) The Peshwá went to a dinner-party at Raghoji Bhosle's tents.
A. D. 1779-80.

१२९	तुंबा किमखापी अस्तर गुलबादन	१
९७९		४

९९ बाबद रामचंद्र शिवाजी जोशी सोलापूरकर सनगें एकूण रुपये.

३९	तिवट	१
६०	दुपटा	१
९९		२

१०७०

२४५-(११२७) बाळाजी गोविंद यांचे नांवें सनद कीं, तीर्थरूप कैलासवासी नाना-साहेब यांणीं संस्थान गढेमंडले पैकीं रेवा दक्षणतीरचे सोळा महाल, कैलासवासी रघोजी भोंसले यांस करार करून दिल्हे होते, परंतु भोंसले यांचा अंमल महालीं दखल जाहला नाहीं, त्यास हल्लीं रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांणीं पुण्याचे मुक्कामीं येऊन दक्षणतीरचे महालाविशीं रजबदली केली, त्यास मशारनिल्हे सरकार लक्षाप्रमाणें चालतात, सबब यांस सरकारांतून रेवा दक्षणतीर पैकीं खेरीज चवऱ्यागड करून कमाल आकाराचे महाल रुपये ४००००० चार लक्ष रुपयांचे द्यावयाचा करार ठरला ते महाल दक्षणतीरचे बीतपशील.

सीत समानीन
मया व अलफ
रबिलावल २९

१ परगणेबचई.
१ परगणे बिछीया तर्फ दोन.
१ परगणे बर्गी तर्फ आठ.
१ परगणे भांवरेगड तर्फ तीन.
१ परगणे सायपूर चवऱ्यागड तर्फ सात.
१ परगणे खोडबारे तर्फ नऊ.
१ परगणे कटोटिया.
१ परगणे पलोद.
१ परगणे दरेवधा.
१ तर्फ मुंतुलदपूर.
१ परगणे संभलपूर.
१ परगणे रामगड.

१२

एकूण बारा महालपैकीं सरकार अंमल ज्या महालीं असेल, त्या पैकीं किल्ले चौऱ्याग-

---

(245) The territory consisting of 16 Mahâls to the south of the Rewá sansthán in Gadhe Mandal was ordered by Peshwá Náná Saheb to be made over to the deceased Raghoji Bhosle. The order was not carried out. Raghoji Bhosle, Sená Sáheb Subhá, urged now at Poona for the surrender of the territory. Having regard to his loyalty, 12 Mahâls, Bachai Bichhiya &c, valued at rupees. 4 lacs were ordered ta be made over to him. The fort of Chavaryágad and mahâls worth Rs. 50000 in the neighbourhood, required for its expenses, were however retained by Government.

A. D. 1778-79.

डचे खर्चाबद्दल रुपये ५०००० पन्नास हजार रुपयांचे महाल व गांव किल्या लगत असतील, ते सरकारांत किल्याचे खर्चास ठेऊन; बाकी सरकार अमली महाल सेनासाहेब सुभा यांजकडे सदरहू चार लक्षाचे द्यावयाचे करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी मशारनिल्हेचे दुमाला करणें. चार लक्षाचे बेरजेहून अधिक बेरीज सरकार अमली महाली जाहलीयास त्याचे महाल सरकारांत ठेवणें. चार लक्षाचे भरतीस अमली महालापैकीं बेरीज कमी आलियास गैर अमली महाल आहेत, त्यांपैकीं भरतीस कमाल आकाराचे बेरजेचा महाल लाऊन देणें म्हणोन. सनद १.

रसानगी यादी.

सीत तिसैन मया व अलफ रविलाखर २

२४६-(११३८) परगणे सीवणी हुसंगाबाद बामण, किल्ला गुणारे व चाळीसाबू वगैरे महाल तर्फ देवगड हे पहिले पासून रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडील, त्यांपैकीं कांहीं महाल भूपाल करांनीं दाबून अंमल सुरळीत चालों देत नाहीं, येविशीं सरकारांतून पेशजी भूपाळ करास पत्रें सादर जाहलीं असतां कराराप्रमाणें अंमल न देतां खलेल करितात म्हणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र लिहिलें असे, तरी तुम्हीं भूपाळकरास ताकीद करून महाल दाबिले असल्यास सोडून देणें, व पेशजीपासून अंमल चालत आला असेल त्याप्रमाणें मशारनिल्हेकडे चालता करवणें म्हणोन, दौलतराव शिंदे यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

---

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

११ पवार.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

२४७-(१००) येशवंतराव पवार याचा तोतया तुम्हांकडे पाठविला असे, तरी किल्ले

A. D. 1778-79.

(246) Pargaṇe Siwaṇi Hushangábád and the other mahals of Taluka Dewagaḍ belonged to Raghoji Bhosle. Some of them were however, usurped by Bhopalkar. Doulatrao Shindia was requested to restore them to Raghoji Bhosle.

[1] POLITICAL MATTERS.

(b) Matters relating to

(2) Powár.

FROM NARO APPAJI'S DIARY.

A. D. 1774-75.

(247) The person who pretended to be Yeshwantrao Powár was sent to fort Ratangaḍ for imprisonment.

खमस सबैन मया व अलफ रमजान २९

रतनगड तालुके कल्याण येथें बेडी घालून पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन, पोटास शेर मध्यम प्रतीचा देत जाणें; व त्यास पांघरावयास एक खादी पासोडी व एक घोंगडी हातरावयास येणेंप्रमाणें देणें म्हणोन, त्रिंबक विनायक यांचे नांवें छ. १९ रजब.

सनद.

रसानगी यादी.

२४८–(५७९) विठ्ठलराव पवार यांचे नांवें सनद कीं, तुमचे वडील बंधु मल्हारराव पवार यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम वगैरे पेशजीपासून चालत आहे, त्यास तुमचें व त्यांचें एकत्र राहण्याचें न बने, याजकरितां तुह्मांस सरंजामाची वगैरे वांटणी करून दिल्ही बीतपशील.

तिसा सबैन मया व अलफ रजब २३

१५ विश्वासराईचा सरंजाम पवाराकडे महालनिहाय, व फुट गांवचा मुकासा देखील जकात आहे, त्याजपैकीं चोविसावा हिसा मल्हारराव पवार यांजकडे आहे त्याजपैकीं निमे हिसा तुम्हांकडे करार करून, तुमचे वांटणींत महालचा व गांवचा अंमल करार केला देखील वेठ बेगार व फड फर्मास बीतपशील.

१० कित्ता मुकासा जकात सुद्धां मल्हारराव पवार यांजकडे चालत होता त्याप्रमाणें दरोबस्त तुमचे वांटणींत करार केला.

३ परगणे शेवगांवपैकीं मुकासबाबेचे गांव.

१ मौजे कोरेगांव दरोबस्त.

१ मौजे येरंडगांव दरोबस्त.

१ मौजे भेंडे येथील मुकासा दरोबस्त पैकीं चोविसावा हिसा.

३

---

(248) Malhárrao Powár and his younger brother Vithalrao Powár could not live amicably together. The Saranjám (in Piánt Málva, in Pargaṇa Nevásá &c.), which stood in the name of the former, was divided between them, and they were directed to keep up a body of 87 horse and to pay in equal proportion the salaries of the officers attached to the Saranjám; Viz. Diván, Mujumdár, Faḍnis, Chitnis, Potnis, and Shikenis. Their mother Mainábái was informed of the divisîon, and was told that if any of the brothers refused to accept the division, his portion should be attached and managed by her.

A. D. 1778-79.

३ तर्फ बेलापूर, परगणे संगमनेर पैकीं मुकासबाबेचे गांव दरोबस्त.

१ कसबे बेलापूर खुर्द.

१ मौजे चिंचोली खुर्द.

१ मौजे नातप.

३

३ परगणे कोतुळ पैकीं मुकासबाबेचे गांव दरोबस्त.

१ मौजे बैठण.

१ मौजे सलेद.

१ मौजे आवीत.

३

१ परगणे सातारे येथील मुकासा देखील जकातपैकीं चोविसावा हिसा.

१०

५ कित्ता महालानिहायचा मुकासा देखील जकात पैकीं चोविसावा हिसा व मौजे कोरेगांव, प्रांत पुणें येथील निमे मुकासा मल्हारराव पवार यांजकडे चालत होता, त्याजपैकीं निमे अंमल तुमचे वांटणींत करार केला बीतपशील.

४ महाल प्रांत खानदेश चोविसावे हिशा पैकीं निमे.

१ परगणे धुळें.

१ परगणे चाळीसगांव.

१ परगणे झोडगें.

१ तर्फ वाघलिंबरे परगणे बद्दल.

४

१ मौजे कोरेगांव कानकाव्याचे तर्फ सांडस, प्रांत पुणें येथील निमे मुकासा पैकीं निमे अंमल.

५

१९

१ परगणे नेवासेंपैकीं पवार तर्फेचा मुकासा व बाबतीचा अंमल देखील जकात पवाराकडे सरंजाम आहे, त्याजपैकीं निमे अंमल मल्हारराव पवार यांजकडे चालत होता, त्याजपैकीं निमे तुमचे वाटणींत करार केला असे.

१ मौजे अमदाबाद, परगणा कडे येथील खेरीज मुकासा व रहदारीची जकात करून जाहगीर, व जमा चौथाई, व जकात थलमोड व थलभरीत देखील सिंग सिंगोटी सुद्धां सरंजाम व बाबती साहोत्रा बक्षीस याप्रमाणें मल्हारराव पवार यांजकडे चालत होता, त्याजपैकीं निमे तुम्हांकडे करार केला असे.

२ प्रांत माळवा पैकीं.

१ परगणे डांग येथील अंमल मल्हारराव पवार यांजकडे चालत होता, त्याप्रमाणें दरोबस्त तुम्हांकडे करार केला असे.

१ परगणे गंगराड येथील आकार पैकीं हाल वसुली रुपये ७८५० सात हजार आठशें पन्नास रुपयांचे गांव तुम्हांकडे वांटणींत नेमून द्यावयाचे करार केले असेत.

२

१९

एकूण एकूणीस महालगांव मिळोन येथील सदरहू लिहिल्याप्रमाणें अंमल मल्हारराव पवार यांचे सरंजाम पैकीं तुह्मांकडे वांटणींत फौजेचे बेगमीस सरंजाम व मौजे अमदाबाद पैकीं कडे येथील निमे बाबती व निमे साहोत्रा बक्षीस याप्रमाणें करार करून दिल्हा असे, तरी अंमल चौकशीनें करून मल्हारराव पवार यांचे स्वार पावणें दोनशें पैकीं निमे स्वार ८७ सत्याईशीं तुम्हीं ठेऊन घोडे माणूस धडधडीत व सामान चांगलें बाळगून सरकार चाकरी एकनिष्ठपणें करीत जाणें म्हणोन. सनद १.

येविशीं जमीदार व मोकदम यांस वगैरे १९ सनदा कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन सदरहूप्रमाणें अंमल सुरळीत देणें म्हणोन वगैरे. सनदा (१९).

८ जमीदारांस.

२ प्रांत माळवा.

१ परगणे डंग.

१ परगणे गंगराड पैकीं सात हजार आठशें पन्नास रुपयांचे गांव येविशीं.

२

४ प्रांत खानदेश.

१ परगणे धुळें.

१ परगणे चाळीसगांव.

१ परगणे झोडगें.

१ तर्फ वाघलिंबेरें.

४

१ परगणे नेवासें.

१ परगणे सातारें.

८

६ मोकदमास.

१ तर्फ बेलापूर पैकीं २ गांव.

१ परगणे कोतुळ पैकीं गांव ३.

१ मौजे कोरेगांव कानकाव्याचें, तर्फ सांडस, प्रांत पुणें.

२ परगणे शेवगांव पैकीं.

१ मौजे भेंडे.

१ मौजे येरंडगांव व कोरेगांव.

२

२ मोजे अमदावाद, परगणा कडे.

६

१ कृष्णाजी तानदेव कमाविसदार परगणे गंगराड, प्रांत माळवा दिंमत मल्हारराव पवार यांस सनद कीं, परगणे मजकूरपैकीं विठ्ठलराव पवार यांजकडे वांटणींत हाल वसूल रुपये ७८५० सात हजार आठशें पन्नास रुपयांचे गांव द्यावयाचे करार केले असेत, तरी सदरहू आकाराचे गांव मशारनिल्हेकडील कमाविसदार यांकडे नेमून देणें म्हणोन. सनद.

१५

१६

रसानगी यादी.

मल्हारराव पवार यांस सनद कीं, तुमचे कनिष्ठ बंधु विठ्ठलराव पवार यांचें व तुमचें एकत्र न जमे, याजकरितां तुमचे नांवें फौजेचा सरंजाम चालत होता, त्याची वांटणी तुमची व विठ्ठलराव यांची अलाहिदा करून दिल्ही आहे, त्यास पुरातन कारकून तुम्हांकडील डौलाचे सरदारीचे.

असामी.

१ दिवाण.	१ फडणीस.	१ पोतनीस.
१ मजमदार.	१ चिटणीस.	१ शिकेनीस.

६

एकूण सहा असामी आहेत, त्यांस पेशजीप्रमाणें करार केले असेत, तरी यांजपासून पूर्ववत् प्रमाणें तुह्मीं आपले डौलाचें कामकाज घेऊन, वेतनाची नेमणूक पेशजीची आहे त्याजपैकीं निमे वेतन तुह्मी आपले वांटणीचे सरंजामपैकीं पावीत जाणें ह्मणोन. सनद १.

रसानगी यादी.

विठ्ठलराव पवार यांस सनद कीं, तुमचे वडील बंधु मल्हारराव पवार यांचें व तुमचें एकत्र न बने, याजकरितां मल्हारराव पवार यांचे नांवें सरंजाम वगैरे चालत होता, त्याची वांटणी तुमची व त्यांची अलाहिदा करून दिल्ही आहे, त्यास पुरातन कारकून डौलाचे सरदारीचे.

असामी.

१ दिवाण.	१ फडणीस.	१ पोतनीस.
१ मजमदार.	१ चिटणीस.	१ शिकेनीस.

६

एकूण सहा असामी आहेत, त्यांस पेशजीप्रमाणें करार केले असेत, तरी यांजपासून पूर्ववत् प्रमाणें तुह्मी आपले डौलाचें कामकाज घेऊन, वेतनाची नेमणूक पेशजीची आहे त्याजपैकीं निमे वेतन तुम्हीं आपले वांटणीचे सरंजामपैकीं पावीत जाणें ह्मणोन. सनद १.

मैनाबाई यांचे नांवें सनद कीं, तुमचे नातु मल्हारराव, व विठ्ठलराव पवार यांचें एकत्र रहावयाचें बनत नाहीं, यास्तव सरंजामाची वगैरे उभयतांस सरकारांतून वांटणी करून द्यावयाविशीं तुह्मीं विनंतिपत्र व यादी पाठविलीत, व हे हुजूर आले; त्याजवरून मनास आणितां यांचें एकत्र बनत नाहीं, याजकरितां मल्हारराव पवार यांचे नांवें सरंजाम वगैरे चालत होता, त्याची वांटणी हल्लीं सरकारांतून विठ्ठलराव पवार यांस करून देऊन वांटणी जाबते अलाहिदा करून दिल्हे आहेत, त्याप्रमाणें तुम्ही उभयतांस वर्तवणें. जे न वर्तत त्यांची वांटणी तुम्हीं आपणाजवळ अमानत ठेऊन, तुमचे कारकून पुरातन आहेत त्यांचे हातून निराळे डौल राखोन स्वाराची सरकार चाकरी कराराप्रमाणें करवणें म्हणोन. सनद १.

रसानगी यादी.

२४९–(९७०) शिवराव, व केरोजी, व वेंकटराव पवार हे त्रिवर्ग सखे बंधु व धीराजी पवार हे सापत्न बंधु यांचें व तुमचें एकत्र रहावयाचें न बने, कजीये होऊं लागले, सबब येविशींचें वर्तमान हुजूर मनास आणून सरंजामाच्या वगैरे दौलतीच्या चार वांटण्या करून द्यावयाचें सरकारांतून ठरविलें त्याचीं. कलमें.

समान समानीन मया व अलफ साबान १

फौजेस जातीस सरंजाम सरकारांतून आहे, त्याच्या चार वांटण्या करून द्याव्या. कलम १.

वतनें व इनाम जमिनी वगैरे घरवाडे व वस्तभाव व घोडीं हत्ती व उंटें व खिलारे वगैरे कुलदौलतीच्या चार वांटण्या कराव्या. कलम १.

सरदारीसमंधें वगैरे आज तागाईत कर्ज जाहलें असेल तें चौघांनीं वारावें, व कमाविसदारांची फाजीले वाजबी निघतील ती चौघांनीं द्यावी. कलम १.

रामचंद्र पवार याचे स्त्रियांशिवाय बायका घरांतील आहेत, त्यांचे पोटापाण्याचें व कापडाचें वगैरे पूर्वींपासून चालत आहे त्याप्रमाणें चौघांनीं चालवावें, हुजूर बोभाट येऊं देऊं नये. कलम १.

देव, वडीलांचे वेळेचे असतील ते शिवराव याजकडे असावे. कलम १.

पाटिलक्या ज्या असतील त्या चौघांनीं वांटून घ्याव्या, तेथील पाटिलकी समंधें मानपान व हक्क ज्याचे वांटणीस जेथील येईल तेथील त्याणें करावे. मौजे नगरदेवळे परगणे भडगांव येथील पाटिलकी आहे तिच्या चार वांटण्या कराव्या वडीलपणासमंधें मानपान वगैरे असेल तें शिवाजी पवार याजकडे चालावें. कलम १.

ज्याजकडे जीं वतनें जातील त्याचे कागद पत्र असतील ते ज्याचे त्याजकडे असावे. कलम १.

———

७

एकूण सात कलमें वांटणीचे ठरावाचीं करार करून वांटणी करून द्यावयास सरकारांतून विसाजी काशी कारकून शिलेदार पाठविले आहेत. बराबर खिजमतगार व गाडदी दिल्हे आहेत, त्यास मशारनिल्हे सदरहू कलमाप्रमाणें चार वांटण्या करून देतील ह्मणोन. सनदा.

१ शिवराव व केरोजी, व वेंकटराव पवार यांस कीं, तीन वांटण्या तुम्हीं त्रिवर्गानीं घेऊन सरकार चाकरी हिशाप्रमाणें एकनिष्ठेनें करीत जाणें ह्मणोन. सनद.

---

(249) Disputes having arisen between Shivrao, Keráji and Venkatrao Powár, orders were issued for dividing the Saranjám (military and personal) and Ináms and Watans in equal proportion between the brothers.

A. D. 1787-88.

१ धीराजी पवार यांस कीं, एक वांटणी तुम्हीं घेऊन सरकार चाकरी हिशाप्रमाणें एकनिष्ठेनें करीत जाणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी याद.

२५०-(१००८) महादजी शिंदे यांचे नांवें सनद कीं, कृष्णाजी पवार, व सदाशिव पवार, व आनंदराव पवार यांस हिंदुस्थानांतील मुलुक सुटेल, व संस्थानिकांकडे खंडण्या करार होतील, त्यापैकीं हिसा दरसदे रुपये १२ बारा रुपये द्यावयाचा करार पेशजी पासून आहे, त्यापैकीं तुकोजी होळकर यांचे हिशापैकीं रुपये २।॰ सवा दोन रुपये एक आणा त्यांजकडून देविला. बाकी तुह्मांकडून. रुपये.

तिसैन मया व अलफ रजब ९

७।= सरकार हिशापैकीं.

२।॰ तुमचे हिशापैकीं.

९॥=

एकूण साडे नऊ रुपये तीन आणे, पैकीं आनंदराव पवार यांचे दोन हिसे वजा होऊन बाकी एक हिसा तिजाई उभयतांकडे पावत होता, त्यास कृष्णाजी पवार मृत्य पावले, सबब त्यांचे पुत्र तुकोजी पवार यांजकडे व सदाशिव पवार यांजकडे साडे नऊ रुपये तीन आणे पैकीं तिजाई हिसा पेशजीप्रमाणें द्यावयाचा करार करून, हे सनद तुम्हांस सादर केली असे,

---

(250) Krishnáji Powár, Sadáshiv Powár, and Anandrao Powár were entitled under an agreement with the Peshwá to receive from the Peshwá 12 per cent of the revenue of newly conquered country in Upper India and of the tributes levied from Sanstháníks.

A. D. 1788-89.

The Amount was paid as under:—

Rs. 2—5 By Tukoji Holkar out of his share,
7—6 By Government out of their share,
2—5 By Mahádji Scindia out of his share.

---

12 Per cent.

Krishnáji Powár having died, his third share out of the above 12 per cent was ordered to be continued to his sons; Tukoji Powár and Sadáshiva Powár. Mahádji Scindia was directed to see that 666 Sowars (in addition to 951 Sowars for maintaining whom a separate Saranjám was provided) were sent by them for service under him.

तरी सदरहू पैकीं तिजाई वांटणी यांस देत जाऊन, कदीम सरंजामाचे स्वार नऊशें एकावन व हिशाचे वांटणीबद्दल स्वार सहाशें सासष्ट एकूण सोळाशें सत्रा स्वारांची हजीरी गणती घेऊन चाकरी घेत जाणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी याद एकंदर.

तुकोजी होळकर यांचे नांवें सनद कीं, कृष्णाजी पवार, व सदाशिव पवार, व आनंदराव पवार यांस हिंदुस्थानांतील मुलुक सुटेल, व संस्थानिकांकडे खंडण्या करार होतील, त्यापैकीं हिसा दरसदे रुपये १२ बारा रुपये द्यावयाचा करार पेशजीपासून आहे, त्यापैकीं महादजी शिंदे यांजकडून. रुपये.

७।≈ सरकार हिशा पैकीं.

२।‑ मशारनिल्हेचे हिशा पैकीं.

———

९॥≡

बाकी तुमचे हिशा पैकीं रुपये २।‑ सवा दोन रुपये एक आणा, पैकीं आनंदराव पवार यांचे दोन हिसे वजा होऊन बाकी एक हिसा तिजाई उभयतांकडे पावता [होत] होता, त्यास कृष्णाजी पवार मृत्य पावले, सबब त्यांचे पुत्र तुकोजी पवार यांजकडे व सदाशिव पवार यांजकडे तिजाई हिसा पेशजीप्रमाणें द्यावयाचा करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू सवा दोन रुपये एक आणा पैकीं तिजाई हिसा उभयतांस देत जाणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी याद एकंदर.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

१२ शिंदे व होळकर.

२५१-(९६) कमाविस भेट सनगें एकूण किंमत कापड. रुपये.

खमस सबैन मया व अलफ साबान १०

५५ राजश्री रावसाहेब यांस बहुमान महादजी शिंदे यांजकडून बाळाराव घेऊन आले ते जमा, गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

---

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(12) Scindia and Holkar.

(251) Clothes were received from Mahádji Scindia and Tukoji Holkar for the infant Peshwá, his mother, and lady Párvatibai.

A. D. 1774-75.

२० कुंची बादली १
२५ झगा बादली १
१० तुंबा जरी लहान १

५५ ३

२४४० गुजारत रामाजी वागमारा खिजमतगार सनगें सुमार.

४ सौभाग्यवती पार्वतीबाई यांस.
४ मातुश्री गंगाबाई यांस.
२ मातुश्री सगुणाबाई यांस.

१०

किंमत. रुपये.

१२७० बहुमान महादाजी शिंदे.

८५० लुगडीं पैठणी.

५०० ३५०

८५० २

४०० पातळ जरी पैठणी १
२० खण पैठणी २ दर १०

१२७० ५

११७० बहुमान तुकोजी होळकर.

७७५ लुगडीं पैठणी.

३७५ ४००

७७५ २

३७५ पातळ जरी पैठणी १
२० खण पैठणी २ दर १०

११७० ६

२४४० १०

२४९५ १३

२५२-(१२०) महादजी शिंदे यांजकडे पेशजीप्रमाणें सरंजाम महाल दिल्हे येविशीं. सनदा.

खमस सबैन मया व अलफ जिल्काद १९

२ प्रांत नेमावर पंचमहाल.

१ परगणे नेमावर.

१ परगणे काटफोड.

१ परगणे सतवास.

१ परगणे राजोर.

१ परगणे हरणगांव.

५

एकूण पांच महाल येथील कमाविस नारो बल्लाळ भुसकुटे यांजकडे होती, ते दूर करून शिंदे यांजकडे पेशजीप्रमाणें खेरीज मौजे खरदा, व बाबच्या, व कोकरी एकूण तीन गांव मुगाजी सावंत यांजबद्दल व मौजे विजलगांव, परगणे नेमावर हा गांव पिलाजी जाधव याजबद्दल एकूण चार गांव करून सदरहू महालाचा निमे अंमल सरंजाम करार करून दिल्हा येविशीं. सनदा.

१ जमीदारास कीं सदरहू महालाचीं ठाणीं सुद्धां अंमल मशारनिल्हेकडे देऊन कबज घेणें ह्मणोन.

---

२ (?)

२ परगणे सिंदखेड.

१ मल्हारराव रामकृष्ण यांस कीं, परगणे मजकूरचें ठाणें मशारनिल्हे कडील कमाविसदाराचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद.

१ जमीदारास कीं, मशारनिल्हे कडील कमाविसदारासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद.

२

---

४ परवानगी रूबरू.

---

(252) Half the revenues of the Mahals of Nemáwar, Kátaphod, Satwás, Rájor and Harangaum were assigned in Saranjám to Mahádji Scindia. The remaining half was given to Tukoji Holkar.

A. D. 1774-75.

तुकोजी होळकर यांस सालमजकुरीं सरंजाम महाल दिल्हे येविशीं. सनदा.

२ प्रांत नेमावर पंचमहाल.

१ प्रांत नेमावर.
१ प्रांत काटाफोड.
१ प्रांत सतवस.
१ परगणे राजोर.
१ परगणे हरणगांव.

९

एकूण पांच महाल येथील कमाविस नारो बल्लाळ भुसकुटे यांजकडे होती, ते दूर करून होळकर यांजकडे पेशजीप्रमाणें खेरीज मौजे करदा, व बाबच्या, व कोकरी एकूण तीन गांव मुगाजी सावंत याजबद्दल, व मौजे बिजलगांव, परगणे नेमावर हा गांव याजबद्दल एकूण चार गांव करून सदरहू महालाचा निमे अंमल सरंजाम करार करून दिल्हा असे, तरी सनदेवर तगीरीपासून अंमल सुरळीत घेणें (देणें?) ह्मणोन. सनदा.

१ मोरो बल्लाळ यांस कीं, ठाणीं सुद्धां अंमल मशारनिल्हेकडे देऊन कबजा घेणें ह्मणोन.

१ जमीदारास कीं, मशारनिल्हेकडील कमाविसदाराची (सी) रुजू होऊन अंमल सुरळीत घेणें (देणें ?) ह्मणोन.

२

२ परगणे रावेर येथील तिजाई वांटणीचे गांवचा दोन हिसे अंमल, व दुजाई वांटणीचे गांवचा दरोबस्त अंमल, देखील कजबे मजकूर दोन हिसे सरकारांत आहे त्याची कमावीस नारो शिवदेव यांजकडे आहे, त्यास सदरहू अंमलपैकीं निमे अंमलाची कमावीस नारो शिवदेव यांजकडून दूर करून होळकर यांजकडे फौजेचे सरंजा-मास सालमजकुरीं सदरहू निमे अंमलाचे अन्वयें तनखा रुपये ९७००० सत्याणव हजार करार करून दिल्हा असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून अंमल घेणें(देणें?) ह्मणोन. सनदा.

१ नारो शिवदेव यांस कीं, परगणे मजकूर येथील पाळ तर्फा खेरीज करून सदरहू प्रमाणें निमे अंमल ठाणे सुद्धां देऊन कबजा घेणें ह्मणोन.

१ जमीदारास कीं, मशारनिल्हेकडील कमाविसदारासी रुजू होऊन परगणे मजकूर येथील सदरहू प्रमाणें निमे अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

२

४ रसानगी यादी दोन.

२५३-(२०४) तुकोजी होळकर यांजकडे फौजेचे सरंजामास महाल आहेत, तेथील जमीदाराचा हक रुसूम इनाम सुद्धां एकसाला सरकारांत घ्यावयाची आज्ञा तुह्मांस केली होती, त्यास हालीं होळकराकडून हुजूर जमीदाराचा हक्क रुसूम इनाम सुद्धां फडशा करून घ्यावयाचा करार केला असे, तरी हक्क रुसूम इनाम सुद्धां येविशीं जमीदारास तगादा करणें ह्मणोन, कमाविसदारांस सनदा.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर ११

१ रामाजी अण्णाजी दिंमत नारो कृष्ण सरसुभा, प्रांत खानदेश यांस महाल बीतपशील.

१ परगणे नंदुरबार.	१ परगणे उत्राण.
१ परगणे सुलतानपूर.	१ परगणे थाळनेर.
१ परगणे आंबे.	१ परगणे गाळणा.
१ परगणे आडावद.	॥· रावेर जिल्हे.

७॥

१ परगणे आंबड येविशीं सदाशिव महिपतराव कमाविसदार परगणे आंबड वगैरे यांस.

१ नरसिंगराव बल्लाळ मांडोगणे यांस परगणे संगमनेर पैकीं तर्फा.

१ तालुके देवपूर.	१ तालुके कावदले.

२

१ परगणे शेवगांव निमे महाल येविशीं नरहर लक्ष्मणराव कमाविसदार परगणे मजकूर यांस.

४ रसानगी यादी.

(253) The Kamávisdárs of Khándesh and other places were previously directed to levy all the Haks and Rûsûms and Ináms of Jamindárs in the Mahâls assigned as military Saranjám to Tukoji Holkar. The Holkar having now agreed to pay the amount, the previous orders were cancelled.

A. D. 1775-76.

२५४-(२०५) नारो शिवदेव कमाविसदार परगणे रावेर, प्रांत खानदेश यांस सनद कीं, परगणे मजकूर येथील निमे अंमल तुकोजी होळकर यांजकडे सालगुदस्तां फौजेचे सरंजामास करार करून दिल्हा असे; त्यास साल मजकुरापासून परगणे मजकूर येथील आईमा, व सायेर, व खंडपलीरोई या बाबेपैकीं निमे फौजेचे सरंजामास मशारनिल्हेकडे करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू बाबेपैकीं निमे मशारनिल्हेकडे देत जाणें ह्मणोन. सनद १.

सीत सबैन
मया व अलफ
रविलाकर ११

रसानगी यादी.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

२५५-(३४०) मौजे चास, व मौजे गणोरे, परगणे अकोलें येथें कुरण तुमचें आहे, तें महादजी शिंदे यांजकडे देशीं आले आहेत, सबब वैरणीबद्दल देविलें असे, तरी सालमजकुरीं कुरण मशारनिल्हेकडे देणें; पुढें स्वारीस गेल्यावरी तुमचें तुम्हीं घेणें ह्मणोन, पिलाजी, व तानाजी ताकपीर यांस. सनद.

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २९

परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

२५६-(४३२) तुकोजी बिन मल्हारजी होळकर यांणीं हुजूर मौजे थेऊर, तर्फ सांडस, प्रांत पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले तीर्थरूप मल्हारजी होळकर मौजे अलमपूर, परगणे बोरछा, तालुके झांशी येथें कैलासवासी जाहले; त्यांचे छत्रीच्या व सदावर्ताच्या खर्चीबद्दल तालुके मजकूर पैकीं इनाम. देहे.

सबा सबैन
मया व अलफ
सफर १२

---

(254) Half the Amal of Parganá Ráver was in the preceding year granted in military Saranjám to Tokoji Holkar. Half the revenues of certain other Bábs were now given on the same tenure.

A. D. 1775-76.

FROM JANARDAN APPAJI'S DIARY.

(255) Mahádji Scindia having come to the Deccan, the kurans of Chás and Ganôren belonging to Tákpir Family were placed at his disposal.

A. D. 1776-77.

(256) Tukoji bin Malharrao Holkar represented that certain villages in Práut Zánsi were given by Dádásáheb for expenses at the grave of his father and the feeding house connected therewith at Alampur in Parganá Borchhya and requested that the grant might be renewed. His request was complied with.

A. D. 1776-77.

११ परगणा वोरछा पैकीं. देहे.

१ मौजे अलमपूर.	१ मौजे रंजरापुरा.
१ मौजे गधेरी.	१ मौजे दुरंधर.
१ मौजे खरीपा.	१ मौजे भालपूर.
१ मौजे खुज्या.	१ मौजे बेलवा.
१ मौजे जोडरी.	१ मौजे विंडाव.
१ मौजे रतनपुरा खुर्द.	

११

३ परगणा दभो पैकीं.

१ मौजे गंगापुरा. १ मौजे साईपुरा. १ मौजे अस्वार.

३

१ मौजे धोंड, परगणा भोर.

१५

एकूण पंधरा गांव श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं सन सीत सीतैनांत इनाम करून देऊन आपले नांवाची सनद करून दिल्ही, त्याप्रमाणें गांव आपल्याकडे चालत आहेत, परंतु सरकारची सनद भोगवटियास करून दिल्ही पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणितां तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांणीं पंधरा गांव इनाम करार करून देऊन सनद करून दिल्ही, ती यांणीं आणून दाखविली; ती पाहून त्याप्रमाणें हालीं सदरहू पंधरा गांव छत्रीच्या व सदावर्ताच्या खर्चाबद्दल कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेप सहित खेरीज हकदार कदीम इनामदार करून दरोबस्त इनाम करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी पेशजीपासून गांव चालत आल्याचा भोगवटा मनास आणून त्याप्रमाणें सदरहू पंधरा गांव इनाम चालवणें. दरसाल नवीन सनदेचा उजूर न करणें. या सनदेची प्रत लेहून घेऊन असल सनद यांजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन, कमाविसदार वर्तमान व भावी तालुके झांशी यांस. सनद. १.

परवानगी रूबरू.

२५७-(४३३) तुकोजी होळकर यांजकडे फौजेचे बेगमीस पेस्तर साल सन समान

(257) It was formerly agreed that a territory worth rupees five lacs should be assigned in Saranjám to Tukoji Holkar including the Amal in Perganá Ráver that was in his enjoyment. The assignment was now made.

A. D. 1776-77.

सबा सबैन मया व अलफ सफर १२

सबैनापासून पांच लाख रुपयांचा सरंजाम पेशजी परगणा रावेर पैकीं अंमल मशारनिल्हेकडे सरंजामास दिल्हा आहे, त्या सुद्धां कमाल बेरजेचा द्यावयाचा करार जाहला, त्यापैकीं महाल सरंजामास लाऊन दिल्हे त्याच्या. सनदा.

१ परगणा कोंच, प्रांत बुंदेलखंड हा महाल तुकोजी होळकर यांस पेस्तर साल सन समान सबैनापासून दरोबस्त फौजेचे सरंजामास द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी परगणा मजकूर पेस्तर सालापासून दरोबस्त मशारनिल्हेकडे देऊन कमाल बेरीज यांचे नांवें खर्च लिहीत जाणें ह्मणोन, बाळाजी गोविंद, प्रांत बुंदेलखंड यांचे नांवें. सनद.

परगणा मजकूर येथील कमाल आकार बरहुकूम मक्ता सन सीत खमसेन रुपये.

२७९३३६

१ परगणा रावेर, प्रांत खानदेश या महालपैकीं दुमाले गांव आहेत, ते व नागोजी राऊत यांजकडे मोकासा आहे तो वजा करून बाकी अंमल पैकीं खेरीज जकात वगैरे करून निमे अंमल राजश्री तुकोजी होळकर यांजकडे फौजेचे सरंजामास पेशजी दिल्हा आहे; बाकी अंमल सरकारचा राहिला आहे, तो हल्लीं दरोबस्त पेस्तर साल सन समान सबैनापासून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे सरंजामास द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी तुम्हीं परगणा मजकूरचा अंमल सरकारांत आहे, तो दरोबस्त पेस्तर सालापासून मशारनिल्हेचे दुमाला करून कमाल बेरीज यांचे नांवें खर्च लिहीत जाणें ह्मणोन, नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यांचे नांवें. सनद.

परगणा मजकूर येथील दुमाले गांव व मोकासा वजा करून बाकी दरोबस्त अमलाची कमाल बेरीज तनख्याप्रमाणें. रुपये.

९७००० पेशजी सन खमस सबैनांत निमे अंमल दिल्हा त्याचा तनखा. रुपये.

९७०१६ हल्लीं सरकारांत अंमल राहिला होता तो दिल्हा त्याचा तनखा. रुपये.

१९४०१६

२

रसानगी यादी.

२५८–(४३४) तुकोजी होळकर यांचे नांवें जाब कीं, तुह्मांकडे बाबती व सरदेशमुखी प्रांत माळवा वगैरे येथील ऐवज येणें, त्याचा इस्तकबील सन समान सितैन तागाईत सन सीत सबैन एकूण नवसाला हिशेबाचा फडशा होऊन ऐवज सरकारांत ध्यावयाचा करार जाहला आहे, त्या पैकीं तूर्त सावकारी निशा तुम्हीं करून दिल्ही ते.

सबा सबैन
मया व अलफ
सफर १५

रुपये.

३५०००० गुजारत बळवंतरावाकडे.

१००००० गुजारत सिद्धेश्वर विष्णु गद्रे.

१५०००० गुजारत यादवराव रघुनाथ भागवत.

६०००००

एकूण सहा लक्ष रुपयांचा भरणा सदरहू प्रमाणें सरकारांत जाहला असे ह्मणोन. जाब १.

२५९–(४७७) नरसिंगराव गोविंद व पांढरे वगैरे चार लुच्चे मिळोन कांहीं राऊत व प्यादे जमा करून करकंबचें ठाणें घेतलें आहे, त्यांचें पारपत्य करावयास त्या प्रांतें तुकाजी होळकर तुजळापुरास देवदर्शनास गेले आहेत त्यांसच सांगितलें आहे, त्यास होळकरांनीं सरकारांत तोफांविशीं लिहिलें, त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी पत्र पावतांच दोन तोफा थोर चांगल्या स्वारीचे उपयोगी पाहून तयार करून बैल वगैरे सरंजाम लागेल तो देऊन जलदीनें तोफा मशारनिल्हेकडे पावत्या करणें; व तुम्हांजवळ राऊत व प्यादे असतील त्यासुद्धां तुम्हींही सामील त्यांजकडे होणें; व तोफांस दारूगोळा लागेल तो सोलापूर पैकीं देणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी यांचे नांवें छ. ८ जमादिलावल. सनद १.

समान सबैन
मया व अलफ
रजब ३०

---

(258) An account was struck of the balance due from Tukoji Holkar for the Bábti and Sardeshmukhi Amals of Fránt Málwá from A. D. 1767/68 to 1775/76 and Rupees six lacs were received from him in part payment of the account.

A. D. 1776-77.

(259) Narsingrao Govind and others having collected some Rauts and soldiers, captured the Thāṇá of Karkamb. Tukoji Holkar was about this time in the vicinity having gone on a pilgrimage to Tuljápur, and he was directed to punish the rebels. Orders were issued for supplying him with 2 pieces of cannon.

A. D. 1777-78.

२६०–(६२२) महादजी शिंदे बिन राणोजी शिंदे पाटील मौजे जामगांव, परगणे पारनेर यांणीं हुजूर किल्ले पुरंदर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, मौजे मजकूरची पाटिलकी आपली आहे, वतनसंबंधें सरकारसेवा एकनिष्ठपणें करीत आहों, त्यास पाटिलकी समंधें इनाम जमीन नाहीं, यास्तव साहेबीं कृपाळु होऊन कांहीं जमीन नूतन इनाम करार करून देऊन चालविली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणितां मौजे मजकूरची पाटिलकी यांची आहे, त्यास पाटिलकी समंधें इनाम जमीन यांस नाहीं; हे वतन समंधें सरकार सेवा एकनिष्ठपणें करीत आहेत, यास्तव यांचें चालवणें अवश्यक जाणोन यांजवरी कृपाळु होऊन मौजे मजकुरी येथें त्यांस पाटिलकीचें वतन समंधें अवल दुम सीम तीही प्रतीची जमीन चावर १ एक दरोबस्त कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेप सहित खेरीज हक्कदार करून नूतन इनाम करार करून दिल्ही असे, तरी मौजे मजकूर येथें सदरहू-प्रमाणें एक चावर जमीन चतुःसीमापूर्वक यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें. दर-साल ताजे सनदेचा आक्षेप न करणें. या सनदेची प्रती लिहून घेऊन हे असल सनद यांज-वळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन.

समान सबैन मया व अलफ
मोहरम १३

सनदा, पत्रें.

सनदा.

२ फडणिसी.

१ नांवाची.

१ मोकदम मौजे मजकूर यास.

२

पत्रें.

२ चिटणिसी.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी परगणे पारनेर यांस.

१ देशमुख व देशपांडे परगणे मजकूर यांस.

२

४

रसानगी यादी.

---

(260) One cháhur of Pátilki Inám land was given to Mahádji Scindia bin Ráṇoji Scindia Patel of Jámbgaum in Pergana Parner at his request.

A. D. 1777-78.

२६१–(९३३) महादजी शिंदे यांजकडे फौजेचे बेगमीस परगणे भेलसे येथील दरोबस्त अंमल सरंजाम सालमजकुरापासून करार करून दिल्हा त्याविशीं. सनदा.

समान सबैन मया व अलफ सफर २६

१ धोंडो गोपाळ यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडे मामलत होती ते दूर करून परगणे मजकूर यांजकडे दिल्ही असे, तरी तुम्हीं महालीं बीज व तगाई दिल्ही असेल ते व्याज सुद्धां, व शिबंदी हिसे रसीद पैवस्ता पावेतों होईल ते घेऊन परगणे मजकूर दरोबस्त ठाणें सुद्धां त्यांचे हवालीं करून कबज घेणें; व साल मजकूरचा वसूल तुह्मांकडे आला असेल तो मशारनिल्हेकडे देणें. परगणे मजकुरीं बाकी सरकारची असेल ते दार किती व नादार किती ते तुम्हीं मशारनिल्हेकडे रुजू करून देणें. दार बाकी मशारनिल्हे वसूल करून सरकारांत देतील ह्मणोन. सनद.

१ देशमुख व देशपांडे परगणे मजकूर यांचे नांवें सनद कीं, तुम्हीं मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देत जाणें ह्मणोन. सनद.

१ महादजी शिंदे यांचे नांवें सनद कीं, रामचंद्र गणेश, व विसाजी कृष्ण यांचे स्वारीपैकीं तोफखाना भेलशांत आहे, तो सरकारचा सरकारांत प्रयोजन पडल्यास आणविला जाईल. तेथें आहे तोंपर्यंत तुह्मीं माफजतीनें ठेऊन देखरेख करीत जाणें ह्मणोन.

---

३ येणेंप्रमाणें तीन सनदा दिल्या असे.

रसानगी यादी. छ. ९ जिल्काद.

२६२–(५३७) परगणे खामखेड, प्रांत माळवा येथील मामलत तुह्मांकडून दूर करून महादजी शिंदे यांजकडे फौजेचे सरंजामास करार करून दिल्हा असे, तरी हे अंमल करितील, तुह्मीं दखलगिरी न करणें. परगणे मजकुरीं बिन तगाई दिल्हे असेल ते व्याजसुद्धां, व तुमची शिबंदी हिशेबीस रसीद होईल ते तुम्हीं यांजपासून घेणें; व सालमजकूरचा वसूल तुम्हीं घेतला असेल

समान सबैन मया व अलफ सफर २६

---

(261) The Amal of Pargaṇá Bhelse was assigned as military Saranjám to Mahádji Scindia. The existing Kamávisdár was directed to hand it over to him, after receiving from him the amount advanced by the Kamávisdár for seed &c. to ryots, and the expenses of establishment incurred by the Kamávisdár.

A. D. 1777-78.

(262) The Pargaṇá of Khámkhed in Pránt Málva was assigned in Military Saranjám to Mahádji Scindia.

A. D. 1777-78.

तो मशारनिल्हेकडे देणें. महालीं बाकी असेल ते रुजू करून देणें; त्यापैकीं दार बाकी असेल ते रुजू करून सरकारांत देतील म्हणोन, धोंडो गोपाळ यांचे नांवें छ. १५ जिल्काद.

सनद १.

जमीदाराचे नांवें कीं, यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन. सनद १.

२

रसानगी यादी.

मुतालिक ह्यांचे रोजनिशी पैकीं.

२६३–(१५) मानाजी शिंदे यांची स्त्री, व सासरे, व सासु एकूण तीन असामी तुम्हांकडे कैदेंत आहेत, त्यांस हल्लीं त्यांची मोकळीक करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी सदरहू तीन असामी महादजी शिंदे यांचे स्वाधीन करून पावती घेणें म्हणोन, गंगाधर राव भिकाजी रास्ते यांचे नांवें चिटणिसी.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल ६

पत्र १.

२६४–(५६५) महादजी शिंदे यांस मुलें माणसें ठेवावयास जागा देशीं नाहीं, याजकरितां किल्ले अशेर सालगुदस्तां मशारनिल्हेचे निसबतीस द्यावयाचा करार करून सनद तुम्हांस सादर केली आहे, तरी किल्ले मजकूर जंगी सामान सुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून पावलियाचे कबज घेणें म्हणोन, केशवराव जगन्नाथ यांस.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल १७

सनदा २.

येविशीं हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस कीं, किल्ला यांचे हवालीं करून कबज घेणें, आणि तुम्हीं हुजूर येणें म्हणोन.

सनदा ३.

६

रसानगी यादी.

परगणे अशेर सरकार मजकूर प्रांत खानदेश जाहागीर बाबती सरदेशमुखी खेरीज मु-

---

FROM MUTÁLIK'S DIARY.

(263) Mánáji Scindia's wife, and his mother-in-law, and father-in-law, who were in confinement with Gangádhar Bhikáji Ráste were ordered to be released and made over to Mahádji Scindia.

A. D. 1777-78.

(264) The fort of Ásher was given to Mahádji Scindia for keeping his family, and the Pargaṇa of Ásher was assigned to him in Military Saranjám.

A. D. 1778-79.

कासा करून सालमजकुरीं अशेर येथील व फौजेचे सरंजामास नेमून दिल्हा असे, तरी अंमल हे करतील म्हणोन येविशीं. सनदा.

१ केशव जगन्नाथ यांस कीं, तुम्हीं दखलगिरी न करणें म्हणोन.

१ जमीदार व परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन.

२

दोन सनदा, रसानगी यादी.

सदरहू अमलाविशीं सालगुदस्तां सनदा दिल्या आहेत, परंतु सालगुदस्तां मशारनिल्हेकडे अंमल चालला नाहीं, सबब सालमजकुरीं सनदा दिल्या असेत.

२६५–(५६९) नारो बल्लाळ यांचे नांवें सनद कीं, नर्मदा तीरीं भीलांचा उपद्रव भारी, त्याचा बंदोबस्त जाहला पाहिजे, याजकरितां हांडे तालुक्यांत नर्मदेमध्यें सरकारचा जुगा किल्ला आहे तो आमचे निसबतीस द्यावा म्हणोन महादजी शिंदे यांणीं विनंती केली; त्याजवरून हल्लीं मशारनिल्हेचे बद्दल खातर व भिल्लांच्या बंदोबस्ताबद्दल किल्ले मशारनिल्हेच्या निसबतीस दिल्हा असे, तरी किल्ले मजकूर जंगी सामान सुद्धां मशारनिल्हेच्या हवाला करून पावलियाचें कबज घेणें म्हणोन. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलाकर ८

येविशीं सदरहू अन्वयें मशारनिल्हेचें नांवें दोन. सनदा २.

१ दुसरी सनद कीं, पेशजी सनद सादर केली आहे, त्याप्रमाणें किल्ले मजकूर मशारनिल्हेचे स्वाधीन करणें म्हणोन.

१ तिसरी सनद कीं, पेशजी सनदा सादर केल्या आहेत, त्याप्रमाणें किल्ले मजकूर मशारनिल्हेचे हवाला करणें म्हणोन.

---

२ ३

रसानगी यादी.

२६६–(५७१) राजश्री तुकोजी होळकर यांचे नांवें सनद कीं, तुमचे डौलाची फ-

---

(265) Mahádji Scindia requested that the fort Juga situated in the bed of the Narbadâ in Taluka Hânde might be given to him to enable him to put down the Bhils who were infesting the territory along the Narbadâ. His request was granted and Náro Ballál was directed to hand over the fort to him.

A. D. 1778-79.

(266) Tukoji Holkar was informed that the office of his Fadnis,

तिसा सबैन मया व अलफ जमादिलाकर १७

डणिसी नारो गणेश यांस सांगितली होती, ते सालमजकुरीं त्यांजकडून दूर करून, माधवराव गंगाधर यांस सांगितली असे, तरी फडणिसीचें प्रयोजन यांचे हातें घेऊन पूर्ववत् प्रमाणें वेतन पाठवीत जाणें म्हणून.

सनद १.

परवानगी रूबरू.

२६७-(६६६) संस्थानें दतीया तालुके झांशी पैकीं महाल.

समानीन मया व अलफ मोहरम १

१ परगणे भांडेर पैकीं वेदमूर्ति राजश्री रघुनाथ देव चिंचवडकर यांजकडे मौजे मंडोरा, तर्फ पाल्हेर हा गांव इनाम आहे तो, व तुकोजी होळकर यांजकडे सरंजामास गांव आहेत ते खेरीज करून बाकी.

१ तालुक महुमोहनी.

१ तालुक खलासीस फत्तेपूर.

३

एकूण तीन महाल तुह्मांकडून दूर करून महादजी शिंदे यांजकडे फौजेचे सरंजामास सालमजकुरापासून करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी महाल व ठाणीं जकीरासुद्धां मशारनिल्हेकडील कमाविसदाराचे हवालीं करून कबज घेणें. सालगुदस्त सन तिसा सबैन अखेर पर्यंत महालीं बाकी राहिली असेल त्याची जमीदाराचे गुजारतीनें रुजुवात करून देणें, तो ऐवज यांजकडील कमाविसदार वसूल करून देवितील. सालमजकूर पैकीं वसूल तुह्मांकडे पडला असेल त्यापैकीं शिबंदी वगैरे नेमणुकेची हिसेरसीद मुदतमाफक वजा करून, बाकी ऐवज राहिला तो यांजकडे देणें. कमी वसूल पडिला असल्यास यांजपासून घेणें म्हणोन, रघुनाथ हरी यांस. १

जमीदारांस सनदा कीं, मशारनिल्हे यांजकडील कमाविसदारासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें म्हणोन. ३

१ परगणे भांडेर.

१ तालुके महुमोहनी.

१ तालुके खलासीस फत्तेपूर.

---

३ ४

A. D. 1778-97.

which was held by Naro Ganesh, was in the current year conferred on Mâdhavrao Gangádhar and that service should therefore be accepted from the latter.

A. D. 1779-80.

(267) The Parganas of Bhánder, Mahumohani, and Khalásis Fatepur in Taluka Zánsi of Sansthán Datiá were given to Mahádji Scindia as Military Saranjám.

चार सनदा, रसानगी यादी, यासी आकार सन तिसा खमसेन कारकीर्द महादाजी गोविंद.

रुपये.

३४७३४९। परगणे भांडेर.

३७६४४९।।। ऐन जमा.

८६७३१ तर्फ गीर्द भांडेर.	३२१०९।।। तर्फ द्यावल.
८६२४५ तर्फ उतुणा.	१६००१ मौजे गोदन.
३६६३५ तर्फ बिल्हेरी.	७५०० मौजे पिंपरवा.
५२५० तर्फ लहराजाट.	१०००० सायेर.
९५९७८ तर्फ पाल्हेर.	

३७६४४९।।।

९१६४।। कमाविस देखील अंतस्त वगैरे सुभाकडील एकंदर हिशेबीं जमा आहे, त्यापैकीं हिसेरसीद अजमासें.

३८५६१४।

पैकीं वजा सरंजाम वगैरे.

३०६४८ तुकोजी होळकर यांजकडे सन समान सबैनापासून पांच लक्षांचा करार जाहला, त्यापैकीं तालुके मजकूर येथील कमाल आकाराचे गांव अलमपुरा नजीक परगणे दभुवण, परगणेभांडेर पैकीं द्यावयाचे करार केले असेत, तरी सदरहू तीस हजार सहाशें अठ्ठेचाळीस रुपये कमाल आकाराचे गांव नेमून देणें म्हणोन सब सबैनांत सनद आहे, त्याप्रमाणें बेरीज लिहिली आहे. गांव नेमून दिल्याची रुजुवात होणें असे. रुपये.

३००७०।। ऐन.

५७७।। कसबे व अंतस्तपैकीं हिसेरसीद अजमासें.

३०६४८

७६१७ रघुनाथ देव चिंचवडकर यांजकडे मौजे मडोरा, तर्फ पाल्हेर हा गांव इनाम आहे, त्याचा आकार.

७५०० ऐन.

११७ अंतस्त पैकीं हिसे रसीद अजमासें.

७६१७

३८२६९ बाकी.

११६२६३। तालुके महुमोहनी, व खलासीस फत्तेपूर.

११३५०० ऐन.

२७६३। कमाविस देखील अंतस्त वगैरे सुभा कडे एकंदर हिशेबीं जमा आहे, त्यापैकीं हिसेरसीद अजमासें.

११६२६३।

४६३६१२॥

चार लक्ष त्रेसष्ट हजार सहाशें साडे बारा रुपये, शिंदे यांजकडे सरंजामांत बेरीज लाऊन दिल्ही असे.

२६८–(७११) सगुणाबाई शिंदे यांजकडे इनाम गांव व दोन गांवचे पाटिलकीचें वतन होतें, त्यास सालगुदस्तां मृत्य पावली, सबब गांवगन्नाचा व वतनाचा बंदोबस्त सरकारांतून कृष्णराव गोपाळ यांजकडे सांगितला होता, तो दूर करून सगुणाबाईकडे इनाम गांव व पाटिलकीचें बतन चालत होतें, त्याप्रमाणें सालमजकुरापासून महादजी शिंदे यांजकडे करार करून दिल्हे असेत, तरी मशारनिल्हेकडील कमाविसदारासी रुजू होऊन गांवचा अंमल व दोन गांवचे पाटिलकीचे वतनसमंधें हक्क लवाजिमा वगैरे सुदामतप्रमाणें सुरळीत देणें म्हणोन, मोकदम यांस वगैरे सनदा.

इसने समानीन मया व अलफ साबान १७

१२ मोकदम यांस. सनदा.

२ परगणे कर्डे पैकीं.

१ मौजे हिवरे दरोबस्त व पाटिलकीचें वतन येविशीं. सनद.

१ मौजे बेलवडी येथील जाहागिरीचा अंमल येविशीं.

२

---

(268) Sagunábái Scindia having died, her villages were ordered to be made ouer to Mahádji Scindia.

A. D. 1781-82.

१ मौजे सिंदवडी, तर्फ बेल्हें, प्रांत जुन्नर येथील दरोबस्त अंमल येविशीं.
२ तर्फ चांभारगोंदें, प्रांत कडेवलीत पैकीं.
१ मोजे जदाबेर येथील खेरीज मुकासा व जागीर करून दरोबस्त अंमल येविशीं. सनद.
१ मौजे भिगलण येथील स्वराज्याचा अंमल येविशीं.

२

२ तर्फ देडगांव पैकीं.
१ मौजे टाकळी येथील स्वराज्याचा अंमल येविशीं.
१ मौजे बेलवडी येथील स्वराज्याचा अंमल येविशीं.

२

१ मौजे सोनवडी, तर्फ पांडे देडगांव येथील दरोबस्त अंमल येविशीं.
१ मौजे वेहगांव पैकीं पैठण येथील जाहागिरीचा अंमल येविशीं. सनद.
३ परगणे नेवासें पैकीं.
१ मौजे देडगांव येथील स्वराज्याचा अंमल व पाटिलकी येविशीं. सनद.
१ मौजे मोम येथील नांदगिरीचा अंमल येविशीं.
१ मौजे करजी येथील दरोबस्त अंमल येविशीं. सनद.

३

१२

१ कृष्णराव गोपाळ यांस सनद कीं, सदरहू बारा गांव देखील दोन गांवचे पाटिलकीचें वतन व कसबे चांभारगोंदें तर्फ मजकूर येथील सगुणाबाईचा घरवाडा वस्तभाव सुद्धां व बाग यांचा बंदोबस्त तुह्मांकडे सांगितला होता, तो दूर करून सगुणाबाईकडे इनाम गांव वगैरे चालत होते, त्याप्रमाणें सालमजकुरापासून मशारनिल्हे यांजकडे करार करून दिल्हे असे, तरी देहेहाय मजकूरचा अंमल व दोन गांवचें पाटिलकीचें वतन व कसबे मजकूरचा वाडा वस्तभाव सुद्धां, व बाग मशारनिल्हेकडील कारकून येईल त्याचे स्वाधीन करून कबज घेणें म्हणोन. सनद.

१३

रसानगी याद.

२६९-(७३३) तुकोजी होळकर यांचे पुत्राचें लग्न आहे, त्यास साहित्य देविलें असे, तरी महालनिहायपैकीं आपलेकडील कारकून देऊन मशारनिल्हेकडे वाफगांवास पावते करणें; याखेरीज बेगारी लग्न होई तोंपावेतों देणें म्हणोन. सनदा.

इसने समानीन मया व अलफ मोहरम ७

रसानगी यादी.

१ प्रांत पुणें निसबत रामचंद्र नारायण यांजकडून. सुमार.

१४७५ बुरुडकाम.

- १००० शिपतरें.
- १०० हारे.
- १०० दुरड्या.
- ५० सुपें.
- २०० पाट्या.
- २५ चाळण्या.

१४७५

५७५० कुंभारकाम.

- १०० रांजण.
- २०० माठ.
- ३०० घागरी.
- १५० कोळंबीं.
- २०० झांकणें.
- ५०० मडकीं.
- १०० परळ.
- १०० रांधणी.
- १०० मोरवे.
- ४००० दिवेलावणीं.

५७५०

२६९० सुतारकाम.

- ७५ पोळपाट.
- ५० लाटणीं.
- २५०० मेखा.
- ५० ठाणवया.
- १५ मेकसु.

२६९०

- १०००० पत्रावळी.
- २००० केळीचीं पानें.
- ३२००० वैरणपुले.
  - ७००० कडबा.
  - २५००० गवत.

३२०००

५० लांकडें जळाऊ गाडे.

५३९६५

त्रेपन हजार नवशें पासष्ट सुमारी, व याखेरीज बेगारी असामी १०० शंभर देविले त्याजविशीं. सनद.

---

(269) The marriage of Tukoji Holkar's son was to be celebrated at Wáfgaon. Orders were, therefore, issued to supply him with provisions and labourers.

A. D. 1781-82.

१ परगणे पारनेर निसबत महादाजी नारायण यांजकडून देविलीं सुमारी. सुमार.

९१९ बुरुडकाम.

९०० शिपतरें.

१९ चाळण्या.

५१५

१९८० सुतारकाम.

२९ लाटणीं.

१९०० मेखा.

५० ठाणवया.

५ मेखसु.

१९८०

३२४५ कुंभारकाम.

४५ रांजण.

१०० माठ.

२५० घागरी.

१०० कोळंबीं.

५० झांकणें.

४०० मडकीं.

१०० परळ.

१०० रांधणीं.

१०० मोरवे.

२००० दिवेलावणीं.

३२४५

२०००० पत्रावळी.

३००० केळीचीं पानें.

३२००० वैरण पुले.

७००० कडबा.

२५००० गवत.

३२०००

५० लांकडें जळाऊ गाडे.

६०३९०

साठ हजार तीनशें नवद सुमारी, व याखेरीज बेगारी असामी १०० शंभर देविले त्याजविशीं. सनद.

१ तालुके शिवनेर निसबत बाळाजी महादेव यांजकडून. सुमारीं.

१०७५ बुरुडकाम.

६०० शिपतरें.

१०० हारे.

१०० दुरड्या.

५० सुपें.

२०० पाट्या.

२१४० सुतारकाम.

९० पोळपाट.

५० लाटणीं.

२००० मेखा.

२५ ठाणवया.

२५ चाळण्या.

१०७५

२२७५ कुंभारकाम.
५० रांजण.
७५ माठ.
१००० (?) घागरी.
५० कोळंबीं.
५० झांकणें.
३०० (?)मडकीं.
५० परळ.
५० रांधणीं.
५० मोरवे.
१५०० (?)दिवेलावणीं.

२२७५

१५ मेखसु.

२१४०

१०००० पत्रावळी.
१०००० केळीचीं पानें.
१९००० वैरण पुले.
४००० कडबा.
१५००० गवत.

१९०००
४० लांकडें जळाऊ गाडे.

४४५३०

चवेचाळीस हजार पांचशें तीस सुमारीं, व याखेरीज बेगारी असामी १०० शंभर देण्याविशीं.

सनद.

१ प्रांत जुन्नर निसबत रामराव त्रिंबक यांजकडून सुमारी. सुमार.

१४७५ बुरुडकाम.
१००० शिपतरें.
१०० हारे.
१०० दुरड्या.
५० सुपें.
२०० पाट्या.
२५ चाळण्या.

१४७५

१९९० कुंभारकाम.
९० रांजण.
१०० माठ.
२०० घागरी.

२६४० सुतारकाम.
५० पोळपाट.
२५०० मेखा.
२५ ठाणवया.
१५ मेकसु.

२६४०

६००० पत्रावळी.
१०००० केळीचीं पानें.
३२००० वैरण पुले.
२५००० गवत.

१०० कोळंबीं.
२०० झांकणें.
९०० मडकीं.
१०० परळ.
१०० रांधणीं.
१०० मोरवे.
२९०० दिवेलावणीं.

३९९०

७००० कडबा.

३२०००
५० लांकडें जळाऊ गाडे.

५६१५५

छप्पन हजार एकशें पंचावन सुमारी, व याखेरीज बेगारी असामी १०० शंभर देविले त्याजविशीं.

सनद.

१ परगणे कडे रांजणगांव निजबत बाबूराव माणकेश्वर यांजकडून देविलीं. सुमारीं.

४२५ बुरुडकाम.
४०० शिपतरें.
२५ सुपें.

४२५

११०० सुतारकाम.
२५ पोळपाट.
५० लाटणीं.
१००० मेखा.
२५ ठाणवया.

११००

६७५ कुंभारकाम.
२५ माठ.
१०० घागरी.
५० कोळंबीं.
२०० मडकीं.
१०० परळ.
१०० रांधणीं.
१०० मोरवे.

६७५

३००० पत्रावळी.

५२००

पांच हजार दोनशें सुमारी, व याखेरीज बेगारी असामी ५० पंनास देविले त्याजविशीं.

सनद.

१ तालुके चास निसबत निळकंठराव रामचंद्र यांजकडून सुमारी.

६३५ बुरुडकाम.
५०० शिपतरें.
२५ सुपें.

३६५ कुंभारकाम.
१५ रांजण.
५० घागरी.

१०० पाट्या.
१० चाळण्या.

६३५

५५० सुतारकाम.
२५ लाटणीं.
५०० मेखा.
२५ ठाणवया.

५५०

५० कोळंबीं.
१०० मडकीं.
५० परळ.
५० रांधणीं.
५० मोरवे.

३६५

१००० पत्रावळी.
१०००० गवत पुले.
१० लाकडें जळाऊ गाडे.

१२५६०

बारा हजार पांचशें साठ सुमारी, व याखेरीज बेगारी असामी ५० पन्नास देविले त्याजविशीं. सनद.

६ सहा सनदा दिल्या असेत.

२७०–(७४२) कमाविस भेट राजश्री रावसाहेब यांसी बरहुकूम तुकोजी होळकर यांचे घरीं वाफगांवास पुत्राचे लग्नास स्वारी गेली, ते समई पोषाक दिले, ते गुजारत जानोजी जाबला खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

इसने समानीन मया व अलफ सफर.

४२५ छ. २० सफर वाड्यांत पोशाख दिला तो सनगें.

७५	तिवट छिटी ब-हाणपुरी वर काम सोनेरी	१	
१५०	दुपटे छिटी बराणपुरी वर काम सोनेरी	२	दर ७५
१००	झगा छिटी बराणपुरी वर काम सोनेरी	१	
१००	तुंबा किमखापी	१	
४२५		५	

१७५ छ. २१ रोज वाड्यांत पोशाक दिला तो सनगें एकूण. रुपये.

२५ तिवट कच्चा रंग केसरी १
७० जाफरखानी कच्चा रंग केसरी १

(270) Presents were given by Tukoji Holkar to the Peshwá, who had gone to Wáfgaon on the occasion of the marriage ceremony of the former's son.

A. D. 1781-82.

२० झगा शेल्याचा कच्चा रंग १
६० तुंबा किमखापी अस्तर छिटी १

१७९ ४

२४० छ. २२ सफर पोशाक.

९० तिवट चुनडी बेलापुरी १
१०० दुपटे चुनडी बेलापुरी (२) दर ५० प्रमाणें.
३० झगा चुनडी बेलापुरी १
६० तुंबा किमखापी १

६४० (२४०) ५

२९९ छ. २३ रोज निरोप समई पोशाख दिल्हा तो सनगें एकूण. रुपये.

७९ चिराबादली तमामी १
५० ओढणी जरी तमामी १
१०० झगा बादली तमामी १
७० तुंबा किमखापी १

४

११३९ १८

२७१–(७५६) महादजी शिंदे यांस मुलें माणसें ठेवावयास देशीं जागा नाहीं, याजकरितां किल्ले अशेर, सन समान सबैनांत मशारनिल्हेस द्यावयाचा करार करून तुम्हांस सनदा सादर जाहल्या आहेत, परंतु किल्ला शिंदे यांचे हवालीं जाहला नाहीं, त्याजवरून हल्लीं हे सनद सादर केली असे, तरी किल्ला मशारनिल्हेचे हवालीं जंगी सामान सुद्धां करून पावलियाचें कबज घेऊन तुम्हीं लोक सुद्धां हुजूर येणें ह्मणोन, केशवराव जगन्नाथ यांचे नांवें. सनद १.

इसने समानीन मया व अलफ जमादिलाकर ३

दाद सावंत भोंसले हवालदार व कारकून यांचे नांवें सनदा कीं, किल्ला जंगी सामान सुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून पावलियाचें कबज घेणें, आणि तुम्हीं हुजूर निघोन येणें ह्मणोन. ३

४

परवानगी रूबरू.

(271) The fort of Ásher was not yet surrendered to Mahádji Scindia, as previously directed. It was now ordered to be made over to him.

A. D. 1781-82.

२७२-(९०९) रत्नशालेपैकीं.

सीत समानीन मया व अलफ मोहरम २९

देणें दिंमत तुकोजी होळकर यांस कर्नाटकचे स्वारीस पाठविलें, सबब निरोप समई सदरेस विद्यमान राजश्री रावसाहेब रूबरू पाहोन दिल्हे, जडाव वगैरे किंमत रुपये ६४४९॥≈ छ. २४ रोज.

खासा तुकोजी होळकर यास किंमत रुपये. २३२७।

जडाव दागिने.

१ शिरपेंच घाट मिनेगार साधणी रुपें तावदानी पांच फुलाचा, बाबत नानाजी शंकर दिंमत नबाब यांणीं बाळाजी जनार्दन फडणीस यांस यादगिरीचे स्वारीस दिल्हा तो किंमत. रुपये ८००

शहत.

९७ हिरे व हिरकण्या मदनाईक सुद्धां.
३ मोत्यें लोलक.

१००

१ तुरा मोत्याचा बाबत रासकर्दन छ. मजकुरीं नवा केला तो किंमत रुपये १९२७।

शहत.

९१३ मोत्यें सर १९ दर २७ प्रमाणें किंमत १९१७। रुपये.
१ दांडी रुपें मूठ सोनें रुपें वजन तोळे २१.॥ एकूण किंमत रुपये १०

एकूण.

९१४

२३२७।

२

भींवजी लांबा हाते यांस शिरपेंच घाट साधा बाबत रासकर्दन छ. २८ जिल्हेज सन मजकुरीं नवा केला किंमत. रुपये २००

शहत.

२७ माणकें चुणी लोलक मदनाईक सुद्धां.
६ हिरकण्या.
१८ पांच किर्डे.

(272) Tukoji Holkar being deputed to the Karnátic campaign, he and his Sardárs were honoured with presents of jewellery.
A. D. 1785-86.

१ मोती लोलक.

९२

दागिना १.

कासीबा होळकर यांस शिरपेंच घाट साधा पंचीगिरीचा.

शहत.

२ पांच लोलक मदनाईक सुद्धां.
२ माणकें मदनाईक बाजूस.
१ लोलक पांच मणी.

---

३८ (?)

दागिना १.

बापूजी वागमारे यांस शिरपेंच घाट साधा बदल रासकर्दन छ. १६ रमजान सन मजकुरीं नवा केला किंमत. रुपये. १९०

शहत.

२१ माणकें चुणी नाईक सुद्धां.
३० पांच किर्डे.
१ मोती लोलक.

९२

दागिना १.

नारो गणेश दिवाण यांस चौकडा मोत्याचा किंमत. रुपये २०१३८=

मोत्यें खरेदी गुजारत कृष्णाजी बहिरव थथे छ. मजकुरीं नवा घेतला, वजन रती २७। एकूण किंमत २००० रुपये.

मोत्यें दाणे सुमार ४

सोनें तसलमात पैकीं पिंपळया व गाभे दर तोळा रुपये १९ प्रमाणें किंमत रुपये १३८=

सोनें वजन तोळे. ॥।१॥

दादाजी गंगाधर फडनीस यांस जोडी मोत्याची किंमत. रुपये ४०६॥।=

मोत्यें बाबद कंठी भोसले, सन इसने समानीनांत मोडली पैकीं वजन रती १० एकूण रुपये ४०० मोत्यें दाणे २.

सोनें बाबत तसलमात पैकीं पिंपळया व गाभे दर तोळा रुपये १९ प्रमाणें किंमत रुपये ६॥।= सोनें वजन तोळे ।२॥

पाराशर दादाजी यांस कडें सोन्याचें १ एकूण सोनें बाबत तसलमात पैकीं दर तोळा रुपये १४॥ प्रमाणें किंमत रुपये ३४६८≡ सोनें वजन तोळे २३॥।१॥

रामराव आपाजी पळशीकर यांस कडें सोन्याचें १ एकूण सोनें बाबत तसलमात पैकीं दर तोळा रुपये १३॥ प्रमाणें किंमत रुपये २२४॥ सोनें वजन तोळे १६॥१॥

तेरीज.

जडाव किंमत. रुपये ३४९४॥

दागिने.

९ शिरपेंच किंमत. रुपये. १९२७॥

१ तुरा किंमत. रुपये १५२७।

६ ३४५४॥

मोकळ जवाहीर किंमत रुपये २४००

मोत्यें.

४ प्रत चौकडा १ एकूण किंमत. रुपये २०००

२ प्रत जोडी १ एकूण किंमत. रुपये. ४००

६ २४००

वजनी वजन किंमत रुपये ९९०॥=

सोनें वजन. तोळे.

१।१ प्रत कुडक्यास दर १९ प्रमाणें रुपये २०

२३॥।१॥ प्रत कडें १ दर १४॥ प्रमाणें किंमत रुपये ३४६=

१६॥१॥ प्रत कडें १ एकूण दर १३॥ प्रमाणें रुपये २२४॥

४१॥।१।

२७३–(१०३०) मल्हार होळकर यांणीं फौज जमा करून सरकारचे व सरंजामीयांचे वगैरे महालांस उपद्रव करितात, सबब त्यांजकडे लोक चाकरीस गेले आहेत, त्यांचे घराच्या जप्त्या करून चौक्या घरीं बसऊन मुलें माणसें बाहेर जाऊं न देणें, आणि वस्तवानीचा जाबता जराबजरासुद्धां लेहून हुजूर पाठवणें ह्मणोन. सनदा.

इहिदे तिसैन मया व अलफ रजब १

१ नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश.

१ रावजी कुळकर्णी चांदवडकर.

(273) Malhárrao Holkar was disturbing the Government territory, and the territory of Saranjámdárs. Houses of persons, who had gone over to him, were ordered to be attached.

A. D. 1790-91.

१ भिकाजी उत्राणकर.

२

सनद.

१ महादाजी नारायण यांस कीं, हैबतराव खळदकर वस्ती चांभारगोंदें याविशीं.

१ रामचंद्र नारायण प्रांत पुणें यांस कीं, विसाजी राम वस्ती मौजे फुरसुंगी याविशीं.

१ मल्हारराव नरसी यांस कीं, दावलभाई वस्ती मौजे नांदुर मध्यमेश्वराचें, तर्फ देपुर, प्रांत गंगथडी येविशीं.

१ गोपाळ राम कमाविसदार मौजे धानोरी, तर्फ पाबळ, प्रांत जुन्नर यांस कीं, रामजी डफळे वस्ती मौजे मजकूर येविशीं.

६

रसानगी, गोविंदभट नीजसुरे.

२७४–(१०६१) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत महादजी शिंदे यांणीं वाड्यांत आले ते समईं दिल्ही ती, गुजारत जिवाजी, काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ सवाल ३०

२१९०	शाला फर्द	२०
२००	जामेवारे दस्की	२
१९०	रजया दस्की	२
२७५	पटके दस्की	२
४००	पट्टु दस्की	२
४०	हस्तपंजे दस्की व पायपंजे दस्की.	
२०	हस्तपंजे	४
२०	पायपंजे	४
४०		८
३२९५		३६

---

(274) Presents were received from Mahádji Scindia on the occasion of his visit to the palace.

A. D. 1792-93.

२७५–(१०९३) देणें महादजी शिंदे यांस, वकील मुतलकी व अमीर व उमराईचीं पदें पादशहा यांणीं दिल्लीहून इनायत केलीं, त्यांची नायबी सरकारांतून मशारनिल्हेस सांगितली, सबब वस्त्रें दिल्हीं, ते समईं विद्यमान राजश्री राव याणीं सदरेस रूबरू पाहून दिल्हे, जडाव दागिने किंमत रुपये ४६७९८≡

सलास तिसैन मया व अलफ जिल्काद १

१ शिरपेंच घाट मिनेगारी तावदानी पाच फुलाचा बाबत नवाब निजाम अल्लीखान पैकीं आला छ. ७ साबान सन सीत समानीनांत किंमत रुपये १०००

शहत.

१४५ हिरे हिरकण्या मजूरीसुद्धां.
१ पाच मणी लोलकास.

१४६

१ जेगा घाट मिनेगार तावदानी बाबत नवाब निझाम अल्लीपैकीं छ. ७ साबान सन सीत समानीनांत आला किंमत रुपये १२००

शहत.

२०० हिरे व हिरकण्या मजूरीसुद्धां.
१ पाच मणी लोलकास.

२०१

१ कंठी मोत्याची बाबत रासकर्दन पैकीं छ. मजकुरीं नवी केली किंमत रुपये २४७९८≡

त.

१० धुगधुगी घाट साधा किंमत ३९० रुपये.
९ हिरे व हिरकण्या.
१ मोती लोलक.

१०

(275) The office of Nâyabi in connection with the dignity of Wakil Mutálik and Amirul Umrao (conferred on the Peshwá by the Emperor) was bestowed on Mahádji Scindia, and presents of jewellery, clothes &c, were made to him.

A. D. 1792-93.

६८ मोत्यें माळेस बाबत रासकर्दन पैकीं किंमत रुपये. २०८५८= (८≡)

७८

एकूण.

३

२७६-(१०९४) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत महादजी शिंदे यांचे डेऱ्यास खासा स्वारी मेजवानीस गेली, ते समईं पोशाख दिल्हा तो, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ जिल्हेज २०

२५०	चिरा जरी अनारदाणा	१
६००	चादर जरी अनारदाणा	१
८०	महमुद्या धुवट	२
३५०	किमखाप	१
५०	डगला दाना केशाचा अस्तर दस्की जामेवाराचे	१
११८० (१३३०)		६

२७७-(१०५५) कमाविस भेट सौभाग्यवती रमाबाई यांस बाबत महादजी शिंदे यांणीं वाड्यांत पाठविली ती, गुजारत कालोजी मान्या खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ जिल्हेज २२

१४५० पातळें जरी.

५००	प्रत पैकीं हिरवें रात्याचें चौकडीदार	१
७५०	प्रत आनार दासकाचें	१
२००	प्रत भस्मी बना[र]सी	१
१४५०		३

४००	लुगडें पैठणी निंबाळी	१
५०	लुगडें नारायण पेठी	१
७१	चोळखण पैकीं	५

---

(276) Presents were received on the occasion of the Peshwá's visit to Mahádji Scindia's tent for dinner.
A. D. 1792-93.

(277) Presents were sent by Mahádji Scindia to the Peshwá's wife.
A. D. 1792-93.

४००	चादर जरी हिरवी मोराची चौकडीदार	१
६३०	शाला फर्द	६
३००१		१७

२७८–(१०५६) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत महादजी शिंदे यांचे डेऱ्यास गोकुळ अष्टमी निमित्य खासा स्वारी गेली, ते समई पोशाख दिल्हा तो, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ जिल्हेज २३

४०	तिवट छिटी बऱ्हाणपुरी	१
१९०	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी	१
६०	महमुद्या धुवट चंदरीच्या सनगें २ दर ३० प्रमाणें रुपये.	
२००	किमखाप	१
४५०		५

२७९–(१०६९) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत महादजी शिंदे यांचे डेऱ्यास रोजगुदस्त खासा स्वारी रंगाबद्दल गेली, ते समई पोशाख दिल्हा तो, गुजारत जानाजी जाबक खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ रजब २९

६०	तिवट छिटी बऱ्हाणपुरी	१
१७९	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी	१
४०	झगा धुवट शेल्याचा	१
१९०	तुंबा किमखापी	१
४२९		४

२८०–(१०८३) जमा जामदारखाना.

कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत महादजी शिंदे यांचे डेऱ्यास खासा स्वारी गोकुळ अष्टमीचे उत्साहानिमित्य गेली, ते समई पोशाख दिला तो, गुजारत मलोजी जाधव खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

आर्बा तिसैन मया व अलफ मोहरम २२

---

(278) Presents were received on the occasion of the Peshwá's visit to Mahádji Scindia's tent on the Gokul Asṭami festival.
A. D. 1792-93.

(279) Presents were received from Mahádji Scindia on the occasion of the Peshwá's visit to his tent on the previous day, that is, Falgun Vadya 30 for the Shimgâ festival.
A. D. 1792-93.

(280) The Peshwá visited Mahádji Scindia at his tent on the Gokul Asṭami festival.
A. D. 1793-94.

३९	तिवट पैकीं	१
३००	शेला जाफरखानी पैकीं	१
४०	शेले साधे धुवट	२ दर २०
१५०	किमखाप	१
५२५		५

२८१–(११०४) दौलतराव शिंदे यांस, वकील मुतलकी व अमीर व उमराईचीं पदें पादशहा यांणीं दिल्लीहून इनायत केलीं, त्यांची नायबी सरकारांतून महादजी शिंदे यांस सांगितली होती, त्यास ते मृत्यु पावले, सबब मशारनिल्हेस नायबी सांगोन वस्त्रें दिल्हीं, ते समईं विद्यमान राजश्री राव सदरेस रूबरू पाहून दिल्हे दागिने. सुमार.

आर्बा तिसैन मया व अलफ सवाल १०

१ निमचा पान जनेबी नीट परज मुल्हेरी कोरीं व जाळीदार वर मुलामा गंगाजमनी तहनाल रुपें तोळे १॥। वर मुलामा सोनेरी मेण मखनाली एकूण.

१ ढाल सुरती रोगण पिवळें फिरक्या व कड्या कोडें व फुल्या रुप्याच्या वर मुलामा सोनेरी दर ६ प्रमाणें सुमार २४ एकूण बरहुकूम राघोजी आंगरे पैकीं दागिना सुमार.

२ येलावा जामदी व मखमली नव्या सुमार.

१ प्रत निमच्यास शहत रुपें. सुमार.

१ कचला तोळे	२८॥.
१ कडी तोळे	१८२॥।.
२	३।·।

मुलामा सोनेरी.

१ प्रत ढालेस समेत कचला रुपें तोळे १॥।ऽ वर मुलामा सोनेरी एकूण.

२

१ कटार शिके दौतीस लावावयास बऱ्हाणपुरी परजास कुलप सोनेरी तहजाल रुपये तोळे १८॥ वर मुलामा सोनेरी मेण मखमली बरहुकूम स्वारी विसाजी कृष्ण

(281) Mahádji Scindia having died, the office of Nâyabi of the dignity of Vakil Mutáliki and Amirul Umrao was conferred on Daulatrao Scindia.

A. D. 1793-94.

पैकीं एकूण.

५

२८२-(११९८) रत्नशाळे पैकीं.

खमस तिसैन मया व अलफ रबिलाकर १८

देणें दौलतराव शिंदे यांस फौजसुद्धां मोहिमेस रवाना केलें, सबब वस्त्रें दिल्हीं ते समई विद्यमान राजश्री राव सदरेस रूबरू पाहून दिल्हे किंमत. रुपये २०५०

जडाव दागिने.

१ तुरा मोत्याचा दांडी मिनगोर फुलाचे माथां व घोसास खालीं हिरे सात सरी बरहुकूम नवाब निजाम अल्लीखान पैकीं किंमत. रुपये. १४००

शहत.

१९८ हिरे व हिरकण्या फुलास व घोसास किंमत. रुपये ७२०
११८ मोत्यें सरास सर ७ एकूण चव ८० किंमत. रुपये ५६०
० दांडीस सोनें व अनुरा. रुपये १२०

१४००

२७६

१ शिरपेंच तीन फुलांचा घाट साधा बरहुकूम हैबतराव पवार पैकीं किंमत. रुपये ६५०

शहत.

४८ हिरे व हिरकण्या मदनाईक सुद्धां किंमत. रुपये ४५०
६ माणकें किंमत. रुपये ६८
१ मोती लोलक किंमत. रुपये ७५
० सोनें अनुरा. रुपये ५७

५५

२

२८३-(११२५) जमा जामदारखाना.

खमस तिसैन मया व अलफ रमजान ९

कमाविस भेट राजश्री राव यांस बरहुकूम तुकोजी होळकर यांचे डेऱ्यास स्वारी गेली तेथें पोशाख आला तो जमा, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपये.

---

(282) Daulatrao Scindia was sent with an army on a campaign, and presents of clothes and jewellery were made to him.
A. D. 1794-95.

(283) The Peshwá visited Tukoji Holkar at his tent.
A. D. 1794-95.

९०	तिवट जैनाबादी कच्चा रंग कलमी हिरवा	१
२९०	दुपेटा जैनाबादी काटपदर जरी पैकीं असवली किनारदार रंग हिरवा कलमी	१
९०	महमुद्या धुवट चंदेरी सनगें	२ दर २५ प्रमाणें.
२००	किमखाप जर भरगची सनंग	(१)एक एकूण रुपये.
६९०		५

२८४-(११३९) दौलतराव शिंदे यांणीं विनंती केली कीं, आपले तीर्थरूप महादजी शिंदे मौजे वानवडी, तर्फ हवेली, प्रांत पुणें येथें कैलासवासी जाहले, त्यांचे छत्रीचे खर्चास मौजे मजकूर पैकीं छत्रीचे लगत एक चाहूर जमीन बागास वगैरे देविली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून महादजी शिंदे यांचे छत्रीचे खर्चास मौजे मजकूर पैकीं जमीन चाहूर १ एक चाहूर जमीन खरेदी इकरार करून छत्रीचे लगत देविली असे, तरी सदरहूप्रमाणें एक चावर जमीन नेमून देणें ह्मणोन, रामराव कृष्ण यांचे नांवें.

सीत तिसैन
मया व अलफ
सफर २०

सनद १.
रसानगी याद.

१ राजकीय.
(ब) इतर माहिती.
१३ विंचूरकर.

२८५-(११५) किल्ले ग्वालेर गोपाळराव नारायण यांजकडे आहे; तो त्यांजकडून दूर करून शिवाजी विठ्ठल यांजकडे सांगितला, याविषयीं सनदा.

खमस सबैन
मया व अलफ
सवाल १८

१ शिवाजी विठ्ठल यांस किल्ले मजकूरचें कामकाज ते करीत आहेत, त्याप्रमाणें

---

(284) Mahádji Scindia died at Wanavḍi. Some land near his tomb was at Dowlatrao Scindiá's request assigned for the expenses connected with a monument raised in memory of the deceased.

A. D. 1795-96.

[1] POLITICAL MATTERS.
(B) Matters relating to
(13) Vinchurkar.

A. D. 1774-75.

Vithal.

(285) The fort of Gwalior was entrusted to Shiváji

तुम्हीं आपले तर्फेनें त्यांचे हातें घेत जाणें, आणि किल्ले मजकूरचे बंदोबस्त अलग चौकी पहारा खबरदारीनें राखणें ह्मणोन.

१ गोपाळराव नारायण यांस कीं, किल्ले मजकूरचें कामकाज तुम्हीं करीत आहां, त्याप्रमाणें मशारनिल्हे तुमचे हातें कामकाज घेतील, तुम्हीं त्यांचे इतल्यानें करीत जाणें ह्मणोन.

२

रसानगी यादी.

२८६–(१०८६) खंडेराव विठ्ठल यांचे बंधु शिवाजी विठ्ठल मृत्यु पावले, सबब मशारनिल्हेस सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं, ते समई रूबरू पाहून दिल्हे. छ. १० सफर दागिने सुमार.

आर्बा तिसैन मया व अलफ सफर २५

१ निमचा पान इंग्रजी परज तांब्याचीं वर मुलामा सोनेरी बरहुकूम केदारजी शिंदे पैकीं नवा घातला तो तहनाल रुपयांचें वजन तोळे १। व नथणी रुप्याची वजन तोळे ·।।|· मेण मखमली लाल एकूण दागिना सुमार.

१ ढाल गेंड्याची रोगण पिंवळें सुरती फिरक्या लोखंडी वर मुलामा सोनेरी सुमार ६ एकूण दागिना.

१ एक वाज मढीव मखमली लाल नवी समेत कचक लोखंडी वर मुलामा सोनेरी एकूण दागिना.

३

---

१ राजकीय.

(ब) इतर माहितीं.

१४ पटवर्धन.

२८७–(७९२) कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन यांचे घरीं भोजनास गेले ते समईं पोशाख दिल्हा तो, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण किंमत. रुपये.

सलास समानीन मया व अलफ जमादिलावल २०

७५ तिवट छिटी बऱ्हाणपुरी. १

---

(286) Shiváji Vithal having died, his Sardar-ship was conferred on his brother Khanderao Vithal.

A. D. 1793-94,

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(14) Patwardhan.

(287) Presents were received on the occasion of the Peshwá's visit to Chintámanrao Pándurang at Patwardhan's house for dinner.

A. D. 1782-83.

१२९	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी	१
१००	झगा छिटी बऱ्हाणपुरी	१
६०	तुंबा किमखापी	१
३६०		४

२८८-(८०५) प्रांत गुजराथ येथील महालानिहायचा बंदोबस्त चिंतामण हरी सरसुभा प्रांतमजकूर यांजकडे सांगितला असे, तरी मशारनिल्हेचे तर्फेनें कारकून पाठविले आहेत, त्यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. पत्रें.

आर्बा समानीन मया व अलफ रजब २२

१९ महालानिहाय येथील जमीदारांस. पत्रें.

१ परगणे जंबूसर.
१ परगणे बलसाड.
१ परगणे उरपाड.
१ परगणे बालवाडा.
१ परगणे सत्रागांव.
१ परगणे सुपें.
१ परगणे मुतसर.
१ परगणे अंकलेश्वर.
१ परगणे देहनबरे.
१ परगणे डबई.
१ परगणे बहादरपुरा.
१ परगणे आमोद.
१ परगणे हसोट.
१ परगणे पारचोळ.
१ परगणे बादरी.
१ परगणे पारनेरा.
१ परगणे सरभुवन.
१ कसबे सुरत.
१ जकात तापी दक्षणतीर.

१९

५ मोकदम देहाये यांस. पत्रें.

१ मौजे पढगापैकीं तलाडी.
१ मौजे दाभेळ, परगणे तलाडी.
१ मौजे पोसरा, परगणे मरोली.
१ मौजे सीमलगांव, परगणे मरोली.
१ कसबे बारडोली.

५

१ संस्थान वासदे यांस कीं, संस्थान मजकूरचा अंमल सुरळीत देणें ह्मणोन. पत्र.

२५ एकूण पंचवीस पत्रें चिटणिसी दिल्हीं असेत.

(288) The office of Sar Subhá of Pránt Gujráth was conferred on Chintáman Hari.
A. D. 1783-84.

२८९–(११२९) कमाविसभेट राजश्री राव यांसी बाबद हाय सनगें एकूण. रुपये.

सीत तिसैन मया व अलफ जिल्हेज ४

६९५ बाबद परशराम रामचंद्र पटवर्धन यांचे घरीं खासा स्वारी भोजनास गेली, ते समई पोशाख दिल्हा तो सनगें. रुपये.

५९५ गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

१२५	तिवट चुनडी	१
२५०	दुपटा काशीचा	१
१६०	तुंबा किमखापी अस्तर गुलबदन	१
६०	झगा धुवट	१
५९५		४

१०० गुजारत विठोबा ताम्रनकर धोत्रजोडा धुवटपैकीं १ रुपये.

६९५	५

७४९ गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

२०९ बाबद रामचंद्र नाईक परांजपे यांचे घरीं लग्न जाहलें, सबब खासा स्वारी भोजनास गेली, ते समई पोशाख दिल्हा तो सनगें एकूण. रुपये.

२०	तिवट पैठणी	१
१२५	दुपटा पैठणी	१
२४	महमुद्या	२ दर १२ प्रमाणें रुपये.
४०	किमखाप	·॥·
२०९		४॥

५४० बाबद आबाजी कृष्ण शेलूकर शालफर्द ४ रुपये.

७४९	८॥
१४४४	१३॥

(289) Presents of clothes were received by the Peshwá on the occasion of his going to the house of Parashrám Rámchandra Patwardhan for dinner.

A. D. 1795-96.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

१५ सखारामबापू.

२९०-(३२३) कमाविसभेट राजश्री सखाराम भगवंत यांची स्त्री सौभाग्यवती राजुबाई प्रसूत जाली, त्यास सरकारांतून सौभाग्यवती चिमाबाई कोलटकर, व सौभाग्यवती साळुबाई, बाजी बल्लाळ परांजपे यांची बहीण यांजबरोबर बाळंतविडा हिवऱ्यास पाठविला होता, तेथें या बाईकांस दोन लुगडीं व दोन चोळखण आले, त्यापैकीं चोळखण उभयतां बायकांस दिल्हे, विद्यमान मातुश्री गंगाबाई बाकी दोन लुगडीं सरकारांत आलीं ते जमा, गुजारत जानोजी चवाण खिजमतगार लुगडीं एकूण.

सबा सबैन मया व अलफ रजब १२

रुपये.

५० प्रत	१
२५ प्रत	१
७५	२

२९१-(९८९) सखाराम भगवंत किल्ले सिंहीगड येथें आहेत, त्यांचे बेगमीचीं येणेंप्रमाणें.

तिसा सबैन मया व अलफ सफर १५

कलमें.

शिधा खाशास उत्तम, व आचारी वगैरे ब्राह्मणांस मध्यम प्रतीचा याप्रमाणें दररोज देत जाणें.

कलम १.

खाशाकडील किरकोळ कामकाजास वगैरे माणसें. असामी.

२ कामाठी.
१ हलालखोर.

३

[1] POLITICAL MATTERS.

(B) Matters relating to

(15) Sakhárám Bápu.

(290) The wife of Sakhárám Bhagwant having given birth to a child, at Hivra, a present was sent to her.

A. D. 1776-77.

(291) Sakhárám Bhagwant was confined in the fort of Sinhagad. Orders were issued to provide him with excellent food and to place the service of 2 Hamáls, and 1 sweeper at his disposal.

A. D. 1778-79.

एकूण तीन असामी ठेऊन देविलीं असत, तरी शिरस्तेप्रमाणें तैनात करून तुम्हीं तेथें ठेऊन देणें. कलम १.

एकूण दोन कलमें लिहिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें किल्ले मजकूर पैकीं देत जाणें. मजुरा पडेल ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू.

२९२-(५८७) मोरो विश्वनाथ यांचे नांवें सनद कीं, बाग संगम बेटांतील नजीक पुणें सखाराम भगवंत यांजकडे होती, ते हल्लीं सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे, तरीं बागेचा आकार चौकशीनें करून उत्पन्न होईल त्या ऐवजापैकीं बागेचा खर्च वजा होऊन, बाकी ऐवज सरकारांत पावता करून पावलियाचा जाब घेणें ह्मणोन. सनद १.

सन तिसा सबैन
मया व अलफ
सफर १७

परवानगी रूबरू.

२९३-(५८८) सखाराम भगवंत सिंहगड येथें आहेत, त्यांस नित्यदानाविशीं वगैरे. कलमें.

तिसा सबैन
मया व अलफ
सफर २२

नित्य दानास दररोज नक्त रुपये १, खुर्दा शिवराई देवास वगैरे रुके ८९, नारळ १ सुमार.

एकूण रुपया एक, व नारळ १ एक, व खुर्दा शिवराई नऊ रुके येणेंप्रमाणें दररोज देत जाणें. कलम १.

मशारनिल्हेचे घरीं श्राद्ध येईल तेव्हां ब्राह्मणांस दक्षणा दर असामीस एक रुपया व भोजनाचें साहित्य देत जाणें.

कलम १.

व्यतिपाताचे दानास सोन्याचे तुकडे सुमार २८॥ एकूण सोनें वजन तोळे २। सवा दोन येथून दिल्हे आहेत, त्यास दक्षणा रुपया एक देविला असे, तरी व्यतिपात येईल तेव्हां एक रुपया देत जाणें.

कलम १.

शाखभाजी व पानें विड्याचीं बागेपैकीं मेळवून देणें, बागापैकीं न मिळे तरी खरेदी करून देत जाणें. कलम १.

---

(292) The garden at the *Sangam* near Poona belonging to Sakhárám Bhagwant was attached. There are several sanads on this date attaching his Saranjám situated in the various districts.

A. D. 1778-79.

(293) Orders were issued to give Sakhárám Bhagwant Re. 1 and 9 Rupees for his daily alms; twenty eight pieces of gold weighing $2\frac{1}{4}$ Tolas were sent for being given to him for distribution as alms on the व्यतिपात day.

A. D. 1778-79.

एकूण चार कलमें करार करून दिल्हीं असेत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें देत जाणें ह्मणोन, नारो महादेव किल्ले सिंहगड यांस. सनद १.

परवानगी रूबरू.

२९४–(६०३) सखाराम भगवंत किल्ले सिंहीगडीं अटकेस आहेत, त्यांस किल्ले प्रतापगड येथें ठेवावयाची नेमणूक करून, किल्ले मजकुरीं न्यावयास जयराम कृष्ण, व शिवराम नारायण आठवले पाठविले आहेत, यांचे स्वाधीन मशारनिल्हेस करून पावल्याचें कबज घेणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें.

तिसा सबैन मया व अलफ रविलाकर २१

सनद १.

परवानगी रूबरू.

२९५–(६२४) सखाराम भगवंत यांस दुभत्याकरतां किल्ले प्रतापगड येथें पाठवावयाची प्रांत पुणें येथील थटीपैकीं गाय व ह्मैस दुभती सर २ दोन वासरें सुद्धां जयराम कृष्ण यांजकडे देविलेली असे, तरी सखाराम भगवंत यांजकडील जप्तीचीं गुरें पेशजी प्रांत मजकूरचे थटीकडे दिल्हीं आहेत, त्यांपैकीं एक गाय व एक ह्मैस चांगली दुभती पाहून देणें ह्मणोन, रामचंद्र नारायण यांचे नांवें.

समानीन मया व अलफ जमादिलाखर १०

सनद १.

२९६–(६३४) जयराम कृष्ण यांचे नांवें कीं, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें, सखाराम भगवंत किल्ले प्रतापगड येथें ज्या घरांत ठेविले आहेत त्या घराचे चौफेर बंदोबस्ताकरतां चार दिवाळी दगडी घातली पाहिजे, येविशींची आज्ञा व्हावी ह्मणोन लिहिलें; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी त्यांजला तेथें ज्या घरांत ठेविलें असेल त्या भोवतीं दगडी चौफेर चार दिवाळीची इमारत पांचशें रुपये पर्यंत खर्च लागल्यास किल्ले मजकूर पैकीं लाऊन करणें, आणि त्याचा बंदोबस्त चांगला पक्का राखणें ह्मणोन. सनद १.

समानीन मया व अलफ साबान १९

परवानगी रूबरू.

---

(294) Sakhárám Bhagwant was sent from fort Sinhagaḍ to fort Pratápgaḍ.
A. D. 1778-79.

(295) A milch cow and a she-buffalo were sent to fort Pratápgaḍ for the use of the prisoner Sakhárám Bhagwant.
A. D. 1779-80.

(296) Sanction was accorded to the expenditure of Rs. 500 for enclosing the room in which Sakhárám Bhagwant was confined at fort Pratápgaḍ with stone-walls on all sides.
A. D. 1779-80.

२९७–(९३९) त्रिंबकराव नारायण राजे बहादूर यांजकडे सखाराम भगवंत यांचे अंतस्ताचा ऐवज येणें तो रुपये १००००० एक लक्ष रुपये तुह्मांस सरकारांतून ऐवज देणें त्यापैकीं देविले असत, तरी सदरहू रुपयांची वरात अलाहिदा आहे, त्याप्रमाणें ऐवज घेणें, न दिल्यास मशारनिल्हेकडील महाल जप्त करून ऐवज घेणें, सदरहू एक लक्ष रुपये वसूल होये तोंपर्यंत महालची घालमेल होणार नाहीं, ऐवज तुह्मांस पावल्यावर महाल सोडून देणें ह्मणोन, महादजी शिंदे यांचे नांवें. सनद १.

समानीन मया व अलफ रमजान १९

२९८–(७१६) सखाराम भगवंत किल्ले रायगड येथें मृत्य पावले, त्यांची वस्तभाव होती ते तुम्हीं गोविंद विश्वनाथ कारकून किल्ले मजकूर यांजबरोबर हुजूर पाठविली ते बीतपशील.

इसन्ने समानीन मया व अलफ रमजान १८

किता.

२ लेप.
- १ दस्ती बुटेदार.
- १ बऱ्हाणपुरी पिंवळें.

―――
२

१ गोदडी शालजोड्याची.
- १ लाखी जोडी.
- १ सफेत जोडी.

―――
२

२ रुमाल दस्ती.

७ आंगवस्त्रें.

१ न्याहाली अतलसी पराची.

किता.

१ घोंगडी सफेद.

१ गवाळें घोंगडीची.

१३ तांब्रें दागिनें.
- २ पंचपात्रे लहान.
- २ तबकड्या.
- १ पळी संधेची.
- १ तांब्या.
- ७ कर्डे.

―――
१३

४ पितळी दागिने.
- १ घाटमुट खडगपात्री.
- १ पंचपात्र.

---

(297) Trimbak Náráyan Rájebahádar owed one Lac of rupees to Sakhárám Bhagwant an actt: of अंतस्थ (bribe): Mahádji Scindia was requested to recover the amount in payment of the amount due to him by Government.

A. D. 1779-80.

(298) Sakhárám Bhagwant died at fort Ráigad. His clothes, which were received from the fort, were made over to his family.

A. D. 1781-82.

३ उशा पराच्या.

१ अतलसी थोर.

२ किमखापी.

———

३

२ गिर्द्या पराच्या.

१ जाजम छिटी साधें.

१ शालजोडी पिंवळी.

१ धोतरजोडा जुना.

१ टोपी सकलादी जुनी.

१ शेला नारायणपेठी साधा.

३ आभ्रे उशाचे.

१ पलंगपोस.

१ पितांबर मर्दानी.

१४ वस्त्रें सकलादी देवाचे संपुष्टांतील.

१ गोमुखी सकलादी.

———

४३

३७ कित्ता.

———

८०

१ फासांडी.

१ तबकडी.

———

४

९ माळा.

८ रुद्राक्षाच्या मणी सुमार २०१

१ स्पटिकाच्या मणी सुमार १०६

———

९

१ संबळी वेताची झांकणसुद्धां मढीं-व सकलादी.

१ शंख लहान टोपण सोन्याचें मढींव.

६ देव.

१ शालग्राम.

१ बाण नर्मदी.

१ गणपती नर्मदी.

१ सूर्यकांत.

१ सुवर्णमुखी.

१ चक्रांगीत सोन्याचे मढीव साखळीसुद्धां.

———

६

१ संपुष्ट रुप्याचा झांकणसुद्धां देवांचा वजन तोळे १६॥।

———

३७

एकूण सुमारी ऐशीं सदरहू प्रमाणें पाठविलीं, ते परभारे सखाराम भगवंत यांचे घरीं दिल्हीं असे ह्मणोन, रघुनाथ सदाशिव यांचे नांवें.

जाब १.

परवानगी रूबरू.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

१६ बाळाजी जनार्दन.

२९९-(५००) बाळाजी जनार्दन यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सालमजकुरापासून महाल व गांव येथील अंमल पेशजीचे अंमलदाराकडून दूर करून करार करून दिल्हा असे येविशीं. सनदा.

समान सबैन मया व अलफ रमजान २१

८ कमाविसदारांस सनदा कीं, खेरीज दुमाले गांव व हिसेदार करून दरोबस्त अंमल दिल्हा असे, तरी अंमल देखील ठाणें मशारनिल्हेकडील कमाविसदारांचे स्वाधीन करून कबज घेणें. सालमजकूरचा वसूल घेतला असेल त्यापैकीं महाल मजकूर शिबंदी हिसेरसीद वजा करून, बाकीचा ऐवज यांजकडे माघारा देणें ह्मणोन. सनदा.

१ परगणे सरभुवन, प्रांत गुजराथ येथील खेरीज दुमाले गांव करून दरोबस्त अंमले येविशीं चिंतामण हरी यांस. सनद.

१ परगणे भोकर, प्रांत बागलाण येथील खेरीज मोकासा व दुमाले गांव करून जाहगीर, व बाबती, व सरदेशमुखीचा अंमल देखील जकात व सुभा निसबत कलमेंसुद्धां, येविशीं लक्ष्मण सादो, व वासुदेव नारायण यांस. सनद.

१ परगणे चोपडें, प्रांत खानदेश येथील खेरीज मुकासा व दुमाले गांव करून जाहगीर व बाबती व सरदेशमुखीचा अंमल देखील जकात व सुभा निसबत कलमें सुद्धां येविशीं गोपाळराव हरी यांस. सनद.

१ परगणे जलोद, प्रांत खानदेश येथील खेरीज दुमाले गांव व नांदेड तर्फेचा मुकासा करून जहागीर, व बाबती, व सरदेशमुखी, व मुकासा देखील जकात व सुभा निसबत कलमें सुद्धां येविशीं काशी नारायण यांस. सनद.

१ परगणे कोतुळ येथील खेरीज फुटगांवचा मुकासा व दुमाले गांव करून जाहगीर, व बाबती, व सरदेशमुखीचा अंमल, व हरजी घारे यांजबद्दल मुकासा जप्त आहे त्यासुद्धां देखील जकात येविशीं गोविंदराम यांस. सनद.

---

[1] POLITICAL MATTERS.

(b) Matters relating to

(16) Baláji Janárdan.

(299) Some Mahíls and villages in Gujráth, Báglan, Doulatábad & Karáḍ were assigned in military Saranjám to Baláji Janárden.

A. D. 1777-78.

१ परगणे अंतूर सरकार दौलताबाद येथील बाबती व सरदेशमुखीचे ऐवजी दरोबस्त अमलाचे गांव पेशजी सरकारांत घेतले आहेत, त्यांची कमावीस तुह्मांकडे आहे, त्यापैकीं मशारनिलेकडे फौजेचे सरंजामास रुपये २४५०० चौवीस हजार पांचशें रुपये तनख्याचे गांव द्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू बेरजेचे गांव यांजकडून कमाविसदाराकडे नेमून देऊन हिशेबीं याचे नांवें खर्च लिहिणें, गांव नेमून द्याल तेथील सालमजकूरचा वसूल तुह्मीं घेतला असेल त्यापैकीं महाल मजकूर शिबंदी हिशेरसीद वजा करून, बाकीचा ऐवज यांजकडे माघारा देणें ह्मणोन, धोंडो महादेव यांस. सनद.

१ प्रांत कऱ्हाड पैकीं गांव.

१ मौजे सेलगांव, तर्फ हवेली.

१ मौजे विंग, तालुके हवेली येथील कमावीस लक्ष्मण कान्हेरे यांजकडे पेशजी सांगोन प्रांतमजकुराकडे ऐवज द्यावयाचा करार आहे तो.

२

एकूण दोन गांवचे हुजूर मामल्याचा अंमल तुह्मांकडून, व लक्ष्मण कान्हेरे यांजकडून दूर करून मशारनिल्हेकडे फौजेचे सरंजामास दिल्हा असे, तरी हरदुगांवचे हुजूर मामल्याचा दरोबस्त अंमल यांजकडून कमाविसदार करतील; तुह्मी सदरहू अमलाचा आकार होईल तो यांचे नांवें पथकाचे सरंजामांत खर्च लिहीत जाणें. सालमजकूरचा वसूल हरदुगांवचा घेतला असेल तो माघारा देणें, व याखेरीज तर्फ हवेली पैकीं हर एक गांवीं जमीन रुपये ९१॥= येक्याणव रुपये तीन आणे आकाराची मशारनिल्हेस सदरहू सरंजामांत द्यावयाचा करार करून देविली असे, तरी नेमून देऊन खर्च लिहिणें ह्मणोन, श्रीनिवास शामराव यांस.

सनद.

१ मौजे माणीकशेडे, तर्फ कडे, परगणे पाडेपडगांव येथील जहागिरीचा अंमल येविशीं भगवंतराव राम यांस.

सनद.

८

९ जमीदार व मोकदम यांस सनदा कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन सदरहू अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

सनदा.

६ जमीदारांस.

सनदा.

२ प्रांत खानदेश.

१ गरगणे चोपडें.

१ परगणे जलोद.

२

१ परगणे भा(भो?) कर, प्रांत बागलाण.

१ परगणे सरभुवन, प्रांत गुजराथ.

१ परगणे कोतुळ.

१ परगणे अंतूर पैकीं साडेचोविस हजार रुपये तनख्याचे गांव येविशीं.

६

३ मोकदम यांस. सनदा.

२ प्रांत कऱ्हाड पैकीं गांव येविशीं.

१ मौजे सेलगांव, तालुके हवेली.

१ मौजे विंग, तर्फ हवेली.

२

१ मौजे माणिकदोंड, तर्फ कडे, परगणे पाडेपेडगांव.

३

९

१७

रसानगी यादी.

३००–(७९९) कमाविस भेट सौभाग्यवती रमाबाई यांसी बाबत बाळाजी जनार्दन फडणीस यांचे स्त्रीचें ओटभरण जहालें, सबब घरीं स्वारी गेली ते समईं दिल्ही ती, गुजारत भिवाजी संकपाल खिजमतगार सनगें एकूण.

सलास समानीन मया व अलफ जमादिलाखर ३०

रुपये.		
१२०	पातळ जरी तमामी सोनेरी पदर कारचोबी	१
५	चोळखण चोळी जरी बादली	१
१२५		२

---

(300) A present of clothes was received by Ramábái on the occasion of her visit to Baláji Janárdan Fadnis' house on acct: of the ओटभरण ceremony of the Fadnis' wife (the ceremony performed on the first appearance of the menses.)

A. D 1782-83.

३०१-(८६३) राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांस पुत्र जाहल्याचें वर्तमान घेऊन आले, त्यांस इनाम विद्यमान राजश्री राव छ. २८ सवाली सनगें एकूण. आंख.

खमस समानीन मया व अलफ जिल्काद १५

२००। खिजमतगार निजवत बाळाजी जनार्दन यांजकडील यांस. आंख.

१००। नरसोजी बिन गोपाळजी गुड यास सनगें. आंख.

२८ तिवट १

७२। गोलदार १

१००। २

१०० आपाजी जाधव यास. आंख.

२९ तिवट सार्धे. १

७१ गोलदार १

१०० २

२००। ४

७८। बयाजी निकम निसबत हरी बल्लाळ यांजकडील यांस सनगें. आंख.

३७॥ तिवट सार्धे १

४०॥ गोलदार १

७८। २

२७८॥ ६

३०२-(८७६) विद्यमान बाळाजी जनार्दन फडणीस सालगुदस्तां नवाब निजाम अलीखान बहाद्दर यांचे भेटीस यादगिरीस गेले होते, त्यास स्वारींत सनदा व पत्रें दिल्हीं तीं इस्तकबील छ. ८ जमादिलावल सन आर्बा छ. २० साबान सालमजकूर सन खमस, तीं या तारखेस बार केलेलीं आहेत.

खमस समानीन मया व अलफ रबिलाकर १५

---

३५०-(८९६) नारो कृष्ण यांस पत्र कीं, परगणे पाचोर, व वरणगांव प्रांत खानदेश हे महाल चिरंजीव राजश्री महादाजी नीळकंठ यांजकडे पेशजी सरंजामास होते, ते नवाब निजाम अलीखान बहादूर यांस सरकारांतून देऊन, त्याचे मुबदला परगणे नसीराबाद महाल मशारनिल्हेस लाऊन दिल्हा, त्यांत बत्तीस हजार एकशें पंच्यायशीं रुपये जाजती जहाले, ते गुजराथचे महाल

सीत समानीन मया व अलफ रमजान २५

(350) The Mahals of Wárangaum and Páchore were made over to Nawáb Nizám Allikhán Bahádur.

A. D. 1785-86.

सरंजामांत यांजकडे होते, तेथील अंमल इंग्रजाचे दंग्यामुळें उठला, त्या महालीं अंमल बसे तोंपर्यंत सदरहू रुपये सरंजामाकडे लाऊन दिल्हे, त्यास गुजराथचे महाल सरंजामाकडे आले नसतां बत्तीस हजार एकशें पंच्यायशीं रुपयांचे गांवाविशीं तुह्मीं सरकारचें पत्र नेऊन तगादा लाविला आहे, ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी गुजराथचे महाल मशारनिल्हेकडे सरंजामास होते तेथील अंमल इंग्रजाचे दंग्यामुळें उठला, तो अंमल बसे तोंपर्यंत बत्तीस हजार एकशें पंच्यायशीं रुपये जाजती जहाले ते सरकाराकडे लाऊन दिल्हे, त्यास हल्लीं गुजराथचे महाल सरकारांत ठेविले, सबब सदरहू ऐवजाविशीं, व गांवाविशीं तूर्त तगादा न करणें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

३५१-(८९७) नवाब निजाम अल्लीखान बहाद्दर यांजकडून किल्ले परांड्याचे बंदोबस्तास अजीमुतदौल व रफातुदौल बहादूर फौजेसुद्धां आले आहेत, त्यांजकडे किल्ले सोलापूर पैकीं तोफा थोर सुमारें २ दोन देविल्या असेत, तरी दारूगोळा सरंजामसुद्धां तयार करून त्यांजकडे पाठवून देणें. तेथील काम जाहल्यावर माघाऱ्या किल्ले मजकुरीं घेऊन जाणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी यांचे नांवें.

सीत समानीन
मया व अलफ
सवाल ८

सनद १.

रसानगी यादी.

३५२-(१००३) जमा जामदारखाना.

कमाविसभेट बाबत दिंमत नवाब निजाम अल्लीखान यांणीं सौभाग्यवती रमाबाई यांचें गर्भाधान जहालें, सबब महमद यारजंग, व केसोराव हैबत यांजबरोबर आहेर पाठविला तो, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण.

तिसैन
मया व अलफ
जमादिलावल २३

रुपये.

१९२९ राजश्री राव साहेब यांसी सनगें एकूण. रुपये.

५८२॥ बाबत नवाब निजाम अल्लीखान.

२८२॥ सनगें बादली कारचोबी.

३७॥ चिरा १

२०० झगा जरी. १

---

(351) Two pieces of cannon were ordered to be sent to Ajimatdoula and Rafátudoula Bahádur who were deputed by Nawáb Nizám Allikhán Bahádur to protect the fort of Parándá.

A. D. 1785-86.

(352) A present of clothes was sent to the Peshwá and his wife by Nawáb Nizám Allikhán, Mainut Daula Dasi Begam, on the occasion of the (गर्भाधान) ceremony of the Peshwá's wife.

A. D. 1789-90.

३७॥	पटका जरी.	१	
७॥	गोषपेच	१	
२८२॥		४	
२००	शाल फर्द	२	केशरी, दर १००
५०	तुंबा किमखापी	१	
५०	किमखाप	·॥·	
५८२॥		७॥	

९९७॥ बाबत मैतुतदौले.

३२२॥ सनगें बादली कारचोबी.

३१।	चिरा	१	
७॥	गोषपेच	१	
२४३॥।	जामेवारे	३	दर ८१।
४०	पटका	१	
३२२॥		६	
१२५	किमखाप	१	
१५०	शाल फर्द	२	केशरी, दर ७५
९९७॥		९	

३०२॥ बाबत वेणुराव धोंडाजी.

१२७॥ सनगें बादली कारचोबी.

२९	चिरा	१	
८७॥	जामेवारे	२	दर ४३॥।
१९	पटका	१	
१२७॥		४	
१२५	शाल फर्द	२	हिरवे दर ६२॥
५०	किमखाप	१	
३०२॥		७	

४४२॥ बाबद बक्षी बेगम.

२९९ सनगें बादली कारचोबी.

३१।	चिरा	१
३॥।	गोषपेच	१
४५	पटका	१
१७५	जामेवार	२ दर ८७॥
२९९		५

८७॥	शाल फर्द	(२) केशरी दर ४३॥।
१००	किमखाप	१
४४२॥		८

१९२९ ३१॥

९७४॥। सौभाग्यवती रमाबाई यांसी सनगें एकूण. रुपये.

३१३॥ बाबत नवाब निजाम अलीखान.

१३८॥ सनगें बादली कारचोबी.

१२९	पातळ	१
१२॥	चोळी	१
	१ रजा जामेवाराचा चोळीपैकीं उरला तो सनंग.	
१३८॥		२

१७५	शाल फर्द लाखी	(२) दर ८७॥
३१३॥		४

२२७॥ बाबत मैतुतदौले.

१४० सनगें बादली कारचोबी.

१२१	पातळ	१
१९	चोळखण	१
१४०		

८७॥ शाल फर्दै	२ दर ४३॥
२२७॥	४

२०६। बाबत वेणुराव धोंडाजी.

२०० पीतांबर जनानी काशीचा लाल	१
६। चोळखण पीतांबराचा लाल	१
२०६।	२

२२७॥ बाबद बक्षी बेगम.

१४० सनगें बादली कारचोबी.

१२५ पातळ	१
१५ चोळखण	१
१४०	
८७॥ शाल फर्दै	२ दर ४३॥
२२७॥	४
९७४॥	१४
२८९९॥	४५॥

खासगी राजश्री राव पैकीं खर्च मुळें जमा आंगरखे धुवट उभारी २ दोन एकूण किंमत. रुपये १९

३५३–(११२२–११२३) परगणे हवेली परांडे पैकीं देहेहाय येर्थाल तनखा, एक लक्ष अडसष्ट हजार नऊशें सवा चौसष्ट रुपये चवल, नवाब निजाम अल्लीखां बहाद्दर यांणीं सरकारांत लाऊन दिल्हा, त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे, तरी सदरहू तनख्याचे गांव चौकशीनें लाऊन घेऊन इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून आकार होईल त्यापैकीं शिबंदी खर्च कार्याकारण होईल तो वजा करून बाकी ऐवज सरकारांत पावता करून जाब घेत जाणें ह्मणोन, सखाराम बाळाजी यांचे नांवें. सनद १.

खमस तिसैन मया व अलफ साबान २३

(353) Villages worth Rs. 168,964 in Parganá Haveli Paránde, the Jahágir Amal of Parganá Indur, and Parganá Boodhun in Nánded, the Jahágir Amal of Parganá Mhes in Sirkár Nánded, the Jahágir Amal of Parganá Mándwe in Sarkár Paránde; and the Jahágir Amal of Parganá Pángáum Bárábidiche in Sarkär Paránde, were made over by Nawáb Nizám Allikhán,

A. D. 1794-95.

येविशीं जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

सनद १.

२

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दफ्तर रुजू याद.

परगणे इंदूर व परगणे बोधन सरकार नांदेड येथील जहागिरीचा अंमल नवाब निजाम अलीखां बहाद्दर यांणीं सरकारांत लाऊन दिल्हा, त्याची कमावीस सालमजकुरीं तुह्मांकडे सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून आकार होईल त्यापैकीं महाल मजकूर शिबंदीखर्च परगणे बोधन येथील नेमणुकेच्या अन्वयें, व इंदूर येथील कार्याकारण होईल तो वजा करून, बाकी ऐवज सरकारांत पावता करून जाब घेणें ह्मणोन, श्रीनिवास शामराव यांचे नांवें.

सनद १.

येविशीं जमीदार यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

सनदा २.

१ परगणे इंदूर.
१ परगणे बोधन.

२

३

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दप्तर.

परगणे मांडवे सरकार परांडे येथील जहागिरीचा अंमल नवाब निजाम अलीखां बहाद्दर यांणीं सरकारांत लाऊन दिल्हा, त्याची कमावीस सालमजकुरीं तुह्मांकडे सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून आकार होईल, त्यापैकीं महाल मजकूर शिबंदीखर्च कार्याकारण होईल तो वजा करून, बाकी ऐवज सरकारांत पावता करून जाब घेणें ह्मणोन, बापूजी बाबाजी यांचे नांवें.

सनद १.

जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

सनद १.

२

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दप्तर.

परगणे ह्मैस सरकार नांदेड येथील जहागिरीचा अंमल नवाब निजाम अलीखां बहाद्दर यांणीं सरकारांत दिल्हा, त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून आकार होईल त्यापैकीं महाल मजकूर शिबंदीखर्च नेमणुकेचे अन्वयें होईल तो वजा करून, बाकी ऐवज सरकारांत पावता करून जाब घेत जाणें ह्मणोन, मोरो अनंत यांचे नांवें.

सनद १.

येविशीं जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद १.

२

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दप्तर.

परगणे पानगांव वाराबिदीचे सरकार परांडे येथील जहागिरीचा अंमल नवाब निजाम अलीखां बहाद्दर यांणीं सरकारांत दिल्हा, त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून आकार होईल, त्यापैकीं महाल मजकूर शिबंदीखर्च कार्याकारण होईल तो वजा करून, बाकी ऐवज सरकारांत पावता करून जाब घेत जाणें ह्मणोन, कृष्णाजी माणकेश्वर यांचे नांवें. सनद १.

येविशीं रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन जमीदार परगणे मजकूर यांस. सनद १.

२

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दप्तर.

३५४–(११२६) दौलताबादचा किल्ला नवाब निजाम अलीखां बहाद्दूर यांणीं सरकारांत दिल्हा येविशीं. सनदा.

खमस तिसैन
मया व अलफ
सवाल ६

१ मीरहसन अलीखान दिंमत मीर हैदरजंग यांस कीं, किल्ला सरकारांत द्यावयाचा ठराव होऊन नवाब निजाम अलीखां बहादूर यांणीं सनद व किल्ला सरकारांत सोडण्याविशीं पत्र मीर हैदरजंग मुनसी यांचे नांवें दिल्हें, तें मशारनिल्हेनीं घेऊन तुमचे नांवें दोन पत्रें दिल्हीं तीं पाठविलीं आहेत. सदरहू पत्रें घेऊन किल्ला धोंडो महादेव यांचे स्वाधीन करून अलाहिदा नवाबाचे नांवें सरकारची रसीद दिल्ही आहे ती घेणें ह्मणोन. सनद.

१ मीर हैदरजंग यांस कीं, नवाब निजाम अलीखां बहादूर यांणीं किल्ला सरकारांत देऊन सनद दिल्ही आहे, त्यास किल्ला हवालीं करून घ्यावयास धोंडो महादेव यांस पाठविले आहेत, तरी किल्ला मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद १.

१ नवाब निजाम अलीखां बहाद्दर यांस कीं, किल्ला सरकारांत द्यावयाचा ठराव होऊन आसाहेबांनीं सनद व पत्र दिल्हें, त्या बमोजीब मीर हैदरजंग यांणीं

(354) The fort of Doulatábád was surrendered by Nawáb Nizám Alli to the Peshwá.
A. D. 1794-95.

किल्ला सरकारांत दिल्हा, तो कराराप्रमाणें पोहोंचला ह्मणोन. सनद.

---

३ तीन सनदा दिल्या असेत.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

३५५-(११२७) महालानिहाय व फुटगांव येथील नवाब निजाम अल्लीखां बहाद्दर यांजकडील जहागिरीचे अमलाचे बंदोबस्ताचें काम तुह्मांकडे सांगितलें होतें, त्यास हल्लीं सरकारचा व नवाबाचा तह ठरला, सबब हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी महालानिहाय, व फुटगांव येथील जहागिरीचे अमलाचीं ठाणीं नवाबाकडील अंमलदार यांचे स्वाधीन करून कबज घेणें. ते अंमल करतील. तुह्मांकडे सालमजकुरींचा वसूल पडला असेल त्याची वासलात तेरीखवार जमीदारांचे दस्कतानिशीं लिहून घेऊन, कारकुनाबरोबर हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, कमाविसदारांस सनदा, व जमीदार, व मोकदम यांस चिटणिसी. पत्रें.

खमस तिसैन मया व अलफ जिल्काद १६

१० महालानिहाय निसबत जोत्याजी जाधवराव महाल. बीतपशील.

१ परगणे वेताळवाडी.
१ परगणे खुलताबाद.
१ परगणे उडणगांव.
१ परगणे हवेली औरंगाबाद.
१ परगणे सुतोडा.
१ परगणे फुलंबरी.
१ परगणे कनड.
१ परगणे गोताळे.
१ परगणे पिंपरी.

९

नऊ महाल येविशीं.

१ जोत्याजी जाधवराव यांस कीं, कसबे बाबरे, परगणे फुलंबरी, व मौजे अवकळे, परगणे कनड हे दोन्ही गांव तुह्मांकडे, व संभाजी, व मलोजी जाधवराव यांजकडे नवाबाकडून आहेत, ते खेरीज करून बाकी महालाविशीं. सनद.

९ जमीदारांस चिटणिसी. पत्रें.

१०

---

(355) A treaty having been concluded with Nawáb Nizám Alli his Jahágir Amals, which were attached, were ordered to be restored.

A. D. 1794-95.

१६ महाल निसबत लक्ष्मणराव नागनाथ महाल बीतपशील.

१ परगणे हरसुल.
१ परगणे सातारें.
१ परगणे रांजणी.
१ परगणे भोकर्दन.
१ परगणे रोशनगांव.
१ परगणे देउळघाट.
१ परगणे चाडोल.
१ परगणे माटरगांव.
१ परगणे धाड.
१ परगणे धावडे.
१ परगणे वाकद.
१ परगणे चिखली.
१ परगणे घाटबोरी.
१ परगणे जाफराबाद.
१ परगणे सोवली.

१९

पंधरा महाल येविशीं.

१ लक्ष्मणराव जगन्नाथ यांचे नांवें.	सनद.
१५ जमीदारांस.	पत्र(त्रें?).

१६

२ परगणे टाकळी हा महाल नवाबाकडून रे(वे?)णुराव धोंडाजी यांजकडे आहे येविशीं.

१ धोंडोराम, व बाळाजी महादेव यांस कीं, परगणे मजकूरचा वसूल घेतला असेल तो माघारा देणें ह्मणोन.	सनद.
१ जमीदारास.	पत्र.

२

२ परगणे वैजापूर येविशीं.

१ प्रभाकर गोविंद यांचे नांवें.	सनद.
१ जमीदारास.	पत्र.

२

८ महाल व गांव निसबत येशवंतराव महादेव. बीतपशील.

६ महाल.

१ परगणे टेंभुर्णी.
१ परगणे उदरतपा.
१ परगणे रासीन पैकीं गांव कवीजंगाकडील खेरीज करून.

१ तर्फ कडे, परगणे कडेवलीत.
१ परगणे पाडे पेडगांव, सरकारांत पेशजी गांव आहेत ते खेरीज करून.
१ परगणे कडेवलीत, सरकारचे गांव खेरीज करून.

६

१३ तर्फ चांभारगोंदें पैकीं. देह.

१ मौजे कोरेगांव. १ मौजे लोणी मसदपूर.
१ मौजे केडगांव. १ मौजे जातेगांव.
१ मौजे वरलाटणें. १ मौजे चोंडी.
१ मौजे उदरगांव. १ मौजे खडकी.
१ मौजे उपडगांव. १ मौजे खातगांव.
१ मौजे दिघी. १ मौजे निखोडी.
१ मौजे पांचपिपळे.

१३

१९

एकूणीस महाल व गांव येविशीं.

१ येशवंतराव महादेव यांस सदरहू महाल, व गांव येविशीं सनद.
७ जमीदार व मोकदम यांस चिटणिसी. पत्रें.
६ जमीदार महालनिहाय यांस.
१ मोकदम देहाय तर्फ चांभारगोंदें यांस.

७

८

२ परगणे शिवणें येविशीं.
१ कृष्णाजी माणकेश्वर यांचे नांवें. सनद.
१ जमीदार यांस. पत्र.

२

२ परगणे खंडाळे येविशीं.
१ बापूजी लक्ष्मण यास. सनद.
१ जमीदारास. पत्र.

१३ महाल निसबत आबाजी कृष्ण. बीतपशील.

१ परगणे निउर.	१ कसबे टाकळी कुंभकर्ण.
१ परगणे हटे.	१ परगणे वालुर.
१ परगणे भोगांव.	१ परगणे टाकळी नीलवर्ण.
१ परगणे झरी.	१ परगणे लोणार.
१ परगणे चारठाणें खेरीज मौजे उमरखेड.	१ परगणे पडदुर देखील तर्फ श्रीदेवी.
१ परगणे लोहगांव.	——
१ परगणे कोसडी.	१२

बारा महाल व गांव येविशीं.

१ आबाजी कृष्ण यांस कीं परगणे पडदुर पैकीं पंचवीस हजार रुपये तनख्याचे गांव सरकारांत द्यावयाचे खेरीज करून बाकी सदरहू महाल, व गांव येविशीं.

१२ चिटणिसी. पत्रें.

१ मोकदम कसबे टाकळी कुंभकर्ण यास.

११ जमीदार महालनिहाय यांस.

——

१२

——

१३

२ महाल निसबत लक्ष्मण खंडेराव. बीतपशील.

१ परगणे मेहेकर.

१ परगणे साखरखेडलें.

——

२ दोन महाल येविशीं.

१ लक्ष्मण खंडेराव यांचे नांवें सदरहू महालाविशीं. सनद.

२ जमीदारांस. पत्र(त्रें).

——

३

२ महाल निसबत पांडुरंग बल्लाळ. बीतपशील.

१ परगणे वाळुंज.

१ परगणे खानापूर.

——

२ दोन महाल येविशीं.

१ पांडुरंग बल्लाळ यांस. सनद.
२ जमीदारांस. पत्रें.

३

९ गांव निसबत गोपाळ गणेश दिंमत प्रतिनिधी गांव. बीतपशील.

१ कसबे उचण.
१ कसबे मपूर.
१ कसबे माशाल.
१ कसबे हिपरगे.

---

४ चार गांव येविशीं.

१ गोपाळ गणेश यांचे नांवें. सनद.
४ मोकदम देहाय यांस. पत्रें.

५

३ महाल निसबत सदाशिव व महिपतराव. बीतपशील.

१ परगणे येकदुणी.
२ परगणे मडसांगवी.

---

२ दोन महाल येविशीं.

१ सदाशिव महिपतराव यांचे नांवें. सनद.
२ जमीदारांस. पत्रें.

३

२ परगणे सिरढोण येविशीं.

१ आपाजी बाबाजी यांचे नांवें परगणे मजकुराविशीं. सनद.
१ जमीदारास. पत्र.

२

२ मौजे कुकडगांव व मौजे देवगरे परगणे भुला येविशीं.

१ आपाजी गोपाळ पागा दिंमत राजश्री फडतरे यांस स-
दरहू गांवांविशीं.

१ मोकदम देहाय यास. पत्र.

२

३ महाल निसबत बाजी नारायण. बीतपशील.

१ परगणे अंतूर खेरीज मौजे भोर करून.

१ परगणे सुलतानपूर.

---

२ दोन महाल येविशीं.

१ बाजी नारायण यांचे नांवें. सनद.

२ जमीदारांस. पत्रें.

३

७६

शाहात्तर सनदा, व पत्रें मिळोन दिल्हीं असेत.

परवानगी रूबरू.

३५६–(११३१) धोंडो बल्लाळ पागा यांस कीं, पापण्णा पंडित निसबत नवाब निजाम अलीखां बहाद्दर याणें महालानिहाय वगैरे येथें दंगा करून नुकसानी केली, यास्तव तुह्मीं त्यास धरून ठेविला आहे, त्यास तालुके बागलकोट व जालीहाल व नंदवाडगी येथील नुकसानीची याद आनंदराव भिकाजी रास्ते यांजकडील कमाविसदार तुह्मांस समजावितील त्याप्रमाणें पापण्णा पंडित यांजपासून ऐवजाचा फडशा करून देणें ह्मणोन. सनद १.

सीत तिसैन मया व अलफ जिल्हेज १६

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

---

(356) Pápaṇṇa Paṇḍit in the service of Nizám Alli invaded the Peshwá's territory and caused much loss in Tálukás Bágalkoṭ, Jálihál, and Nandwádgi. Dhondo Ballál arrested him. Dhondo was directed to recover the loss from him.

A. D. 1795-96.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

२१ जंजिऱ्याचा नवाब.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

३५७-(१६४) जंजिरकर शामल उंदेरीस येऊन बसणार, यास्तव प्रांत राजापुरी पैकीं हशमी माणूस चांगलें असामी १०० शंभर असामी बरकंदाज चांगलें, पत्र पावतांच लौकर रवानगी करणें, येविशींचा बयान एकंदर न लिहिणें. पत्र पावतांच लोकांची रवानगी करणें. जे क्षणीं पत्र पोंहचलें ते क्षणीं लोकांचे रोजमरे याची बेगमी करून उंदेरीस रवानगी करणें; आणि लोक पोंहचल्याचा जाब पाठविणें ह्मणून, चिमाजी माणकर प्रांत राजापुरी यांचे नांवें. छ. ८ जिल्काद.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

सनद १.

परवानगी रूबरू.

३५८-(१६६) शामल जंजिरेकर याजविषयीं मामलेदारांस चिटणिसी. पत्रें.

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

२ सरकारचा व शामलाचा तह जाहला आहे, त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणून गुदस्तां तालुके मजकुरीं पत्रें सादर जहालीं आहेत; व हल्लीं हें पत्र सादर केलें असे, तरी गुदस्तांचे पत्राप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. पत्रें.

१ बाबूराव पासलकर तालुके बीरवाडी यांस.

---

[1] POLITICAL MATTERS.

(b) Matters relating to

(21) Chief of Janjirá.

FROM NÂRO APÂJI'S DIARY.

(357) The Shámal of Janjirá having proceeded to Underi, orders were issued for sending 100 men to the place from Piánt Rájpuri.

A. D. 1774-75.

(358) The Mámlatdárs of Birwádi and Rájápuri were directed to act up to the instructions issued in the preceding year for giving effect to a treaty concluded with the Shámal of Janjirá.

A. D. 1774-75.

१ चिमाजी माणकर प्रांत राजापुरी.

२

२ नादगांव, व मुरुड वगैरे जंजिरे तर्फेच्या सावकारी सिबडीं व माहांगिऱ्या कोळ्यांच्या जंजिरे रेवदंडा येथील खांडींतून अष्टमीचे बंदरास सालाबाद येतात, त्यास तूर्त मुंबईची बंदी केली आहे, याकरितां हीं मना कराल तर न करणें, सुदामत चालीप्रमाणें येतील त्यांस येऊं देणें ह्मणोन. पत्रें.

१ आनंदराव शिंदे.

१ आनंदराव धुलप सुभा आरमारे.

२

---

४ चार पत्रें. छ. ९ जिल्काद.

३५९–(१८२) आनंदराव शिंदे तालुके रेवदंडा यांस पत्र कीं, जंजिरकर यांणीं मुंबईहून नोरी गलबतें करून सोठे मुंबईस भरून जंजिरे यास घेऊन येत होते, ते माघारे जातां तुह्मीं धरून रेवदंड्यास नेलीं ह्मणोन विदित जाहलें, ऐशास जंजिरेकर यांचा व सरकारचा स्नेह, सबब बद्दल खातर सदरहू दोन गलबतें या खेपेस सोडून देणें. गलबतावर लोक असतील तेही सोडून देणें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

खमस सबैन मया व अलफ रबिलावल १६

३६०–(१८८) गणेशराम दातार यांचे नांवें कीं, अमारतपन्हा खानजा कुदखान जंजिरकर यांचे पुत्रास सरकारांतून सालमजकुरीं वस्त्रें व कंठी मोत्याची तुह्मांबरोबर पाठविली, त्याप्रमाणें तुह्मीं जंजिरेयास खानास प्रविष्ट करून पावतीची याद मोर्तबनसी छ. २९ जिल्काद सन मजकुरीं आणली. बीतपशील.

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

---

(359) Two ships carrying rafters belonging to the Chief of Janjirá were caught while returning to Bombay by Ánandrao Scindia. Having regard to the friendly relations existing between Janjirkar and the Government, the ships were ordered to be released.

A. D. 1774-75.

(360) Clothes and pearl-ornaments were sent as a present to the son of Amrat Panáh Khánjáhkud khán of Janjirá.

A. D. 1774-75.

वस्त्रें.	कंठी मोत्याची शहीत.
१ चिरा बादली.	५३ मोत्यें लोलक सुा।
·॥।≈ जामेवार.	९ गुजनी १ एकूण.
१ वोढणी जरी.	१ माणीक.
·॥· किनकाफ.	८ हिरकण्या.
३।≈	

६२

दागिना.

एकूण सनगें सवा तीन तीन आणे, व कंठी मोत्याची शहीत बासष्ट एकूण दागिना एक सदरहू याद तुह्मीं आणून दिल्ही, ते दप्तरीं विल्हेस लागली असे. छ. २३ मोहोरम.

सनद. १

३६१–(२१०) हाबसी जंजिरेकर यांजकडील लोक मावळांत दंगा करावयास आले होते, त्यास त्या लोकांपैकीं कांहीं लोक किल्लेकरी गडकरी यांणीं धरून नेऊन अटकेस ठेविले आहेत ह्मणोन विदित जाहलें, त्यास गणेश राम दातार जंजिराहून हवशासीं बोलोन आले. पेशजींचा करार मावळांत त्यांजकडून उपद्रव होऊं नये ऐसा आहे तोच आहे. लोक आले ते गैरसमजानें आले, पुढें तिकडोन कोणी येऊन उपद्रव करणार नाहीं, याप्रमाणें निखालसतेनें सरकारांत विनंति केली; त्याजवरून जंजिरकरांकडील लोक धरोन तुम्हीं अटकेस ठेविले आहेत, ते सोडावयाचा करार करून पुण्यास आणविले आहेत, तरी त्यांजकडील लोक तुम्हीं अटकेस ठेविले असतील ते पुण्यास रवाना करणें म्हणोन, आनंदराव भिकाजी यांचे नांवें. सनद १.

सीत सबैन मया व अलफ जमादिलावल ८

---

(361) Some of the men of the Habsi of Janjirá, who had come to create a disturbance in Máwal were arrested by the officers of fort Korigaḍ(Gaḍkaris?). Ganesh Rám Dátár interviewed the Habsi in the matter, and informed Government that the men went to Máwal through some misunderstanding, and that steps had been taken to prevent any such occurrence in future. The prisoners were therefore ordered to be set at liberty.

A. D. 1775-76.

३६२-(९६६) तालुके रायगड येथें शामल जंजिरकर याणें जमाव करून येऊन मुलकांत दंगा केला आहे, त्याचे बंदोबस्ताविशीं. सनदा.

तिसा सबैन
मया व अलफ
जमादिलावल १४

२ तालुके अंजणवेल, व रेवदंडा पैकीं लोक असामी २०० दोनशें पाठवावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहू असामी यांस रोजमरा व अडसेरी बेगमी शामलाचा बंदोबस्त होय तोंपर्यंत करून देऊन, रघुनाथ सदाशिव यांजकडे तालुके मजकुरीं पाठवणें ह्मणोन. सनदा.

१ कृष्णाजी विश्वनाथ तालुके अंजणवेल त्यांस लोक असामी शंभर १००

१ आनंदराव शिंदे तालुके रेवदंडा यांस लोक असामी १००

२

१ रघुनाथ सदाशिव तालुके रायगड यांस सनद कीं, माजी रायगडकरी, व माहाडकरी लोक नामजादीस तुह्मांकडून गेले आहेत, त्यां पैकीं असामी शंभर १०० तुह्मीं तालुके मजकुरीं आणून शामलाचा बंदोबस्त करणें, बंदोबस्त जहालियावर सदरहू शंभर १०० असामी जेथील तेथें माघारे पाठवणें ह्मणोन. सनद.

३

३६३-(९७९) शामल जंजिरकर याणें रायगड तालुक्यांत चौथाई करितां उपद्रव केला आहे, येविशींचा बंदोबस्त जाला पाहिजे म्हणोन लिहिलें तें कळलें; त्यास शामलाकडील वकील बोलाऊन आणून त्याचें हरद्द मनास आणून पक्का तह होत असल्यास, तालुके मजकूरचे चार पांच हजार रुपये पर्यंत अंमल न करितां उचल्या हातें द्यावयाचें करून, दरम्यान मातबर माणूस

तिसा सबैन
मया व अलफ
रजब १

---

(362) The Shámal of Janjirá having made an incursion into Táluká Ráygaḍ, arrangements were made to send additional force to the Táluká.

A. D. 1778-79.

(363) The Shámal of Janjirá was troubling the people in Tarf Ráygaḍ for the recovery of the Chouthái Amal. The officer of Ráygaḍ was directed to invite the agent of the Shámal to a conference and to conclude a treaty with the Shámal, if he could be induced to relinquish his claim for a cash payment of Rs. 4,000 or Rs. 5,000 every year, to be paid by Government.

A. D. 1778-79.

घेऊन तह करणें, फिरोन रयतेस उपद्रव लागों नये; असें पक्कें जाहल्यास लिहिल्या अन्वयें करून हुजूर लेहून पाठवणें. सदरील प्रमाणें जाहल्यास शामलाचा दस्ताऐवज शिक्यानिशीं घेणें; आणि लौकर उरकणें ह्मणोन, रघुनाथ सदाशिव गद्रे यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

३६४-(७०२) तालुके बीरवाडी निसबत बाबूराव पासलकर व भास्कर बल्लाळ यांजकडे तालुके मजकूर येथें शामलाचा दंगा जाहला आहे, सबब बेगमीस नक्त येवो(थो?)न शामलास द्यावयाकरितां पेशजी तुह्मांकडे रवाना केला, तो तुह्मांजवळ अमानत आहे, त्यापैकीं मशारनिल्हेकडे मुबदल्यास खर्चास तसलमातीस लिहून रुपये ३००० तीन हजार रुपये देविले असेत, तरी देऊन पावलियाचें कबज घेणें ह्मणोन, गोविंदराव व चिमाजी माणकर प्रांत राजपुरी यांस.

इसन्ने समानीन मया व अलफ रजब १२

सनद १.

रसानगी यादी.

३६५-(७१८) रामचंद्र अनंत कारकून शिलेदार यांचें घर मौजे अवळस, तर्फ पौडखोरें येथें आहे, त्यास मावळांत शामलाची गडबड जाहली, त्याजकरितां मशारनिल्हेचे घरीं चौकशीस किल्ले कोरीगड पैकीं शिपाई असामी २ दोन, शामलाची गडबड आहे तोपावेतों देविले असेत, तरी सदरहू दोन शिपाई नेमून देणें. फारच गडबड जाल्यास त्यांचीं मुलें माणसें किल्यावर घेऊन राहावयास जागा करून देणें म्हणोन, आनंदराव भिकाजी यांस. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ सवाल १

परवानगी रूबरू.

३६६-(७२५) जंजिरे दंडा राजपुरी येथील खोरीं नजीक सरकारचे लोकांसी व शामल जंजिरकर यांसीं लढाई जाहली, तेव्हां तालुके बीरवाडी व अवचितगड येथील लोक जखमी, व वार जाहले, त्यास खर्चास खेरीज कबज.

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्काद ४

रुपये.

१२ विठोजी नाईक पारटे खुद्द सरदार अवचितगड पैकीं ठार जहाला, सबब कफनास व दिवसांबद्दल.

---

(364) There was a disturbance of the Shámal in Táluká Birvádi.
A. D. 1781-82.

(365) There being a disturbance of the Shámal in Máwal, 2 persons were ordered to be sent from Korigaḍ to protect the house of Rámchandra Anant Kárkun, at Awalas in Tarf Paud Khore.
A. D. 1781-82.

(366) A battle was fought between some men of Government and the Shámal Janjirkar, near Daṇḍá Rájpuri.
D. D. 1781-82.

२० तालुके बीरवाडी पैकीं जखमी जहाले, त्यास जखमेबद्दल खर्चास. रुपये.

१९ भगवंतराव विचारे दिंमत माधवराव गुजर यांस उजवे पायाचे गुडग्यास गोळी लागोन हाड फुटोन पार जहाली सबब. रुपये.

९ शिवाजी जखाते दिंमत खास बारदार यासीं टीरीवर गोळी लागोन चाटून गेली सबब.

२०

३२

एकूण बत्तीस रुपये देविले असेत, तरी तालुके बीरवाडी पैकीं देऊन सदरहूप्रमाणें तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें, मजुरा पडतील ह्मणोन, बाबूराव पासलकर व भास्कर बल्लाळ यांस. सनद १.

रसानगी यादी.

इसन्ने समानीन मया व अलफ मोहरम ११

३६७–(७३६) शामल जंजिरकर याजकडील चाकरमाने लोक त्याजकडून फुटोन येतील त्यांस आणणें; ह्मणजे शत्रूची जड कमी होईल ह्मणोन आज्ञा जहाली होती; त्याजवरून शंभर सवाशें माणूस फुटोन आलें आहे, त्याच्या तैनाता करून प्रांत राजपुरी येथें चाकरी घ्यावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणून, तुह्मीं हुजूर विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी शामलाकडील जे लोक आले असतील त्यांस पक्का जामीन घेऊन प्रांत मजकूरचे शिरस्तेप्रमाणें तैनाता माणूस पाहून करून चाकरी घेणें, तेथें उपयोग असेल तोपावेतों ठेऊन अट(ड)शेरी देणें, पुढें हुजूर पाठवणें ह्मणोन, गोविंदराव व चिमाजी माणकर यांस. सनद १.

रसानगी यादी.

३६८–(७९६) याकुपखान शामल जंजिरकर याचे लेकाचें लग्न आहे, सबब त्याज-

---

A. D. 1781-82.

(367) Govindrao and Chimnáji Mánkar were formerly directed to gain over the followers of Shámal Janjirkar. About 100 or 125 men were thus gained over, and permission was granted to their employment under Government in Príant Rájpuri.

(368) Bhikáji Govind Thosar was sent with a present of clothes

सलास समानीन मया व अलफ जमादिलाखर १६

कडे सामान न्यावयास भिकाजी गोविंद ठोसर यांस आज्ञा केली आहे, तरी मशारनिल्हे तुह्मांस लिहितील त्याप्रमाणें दोनशें रुपये किमतीचें सामान तालुके रेवदंडा पैकीं पावतें करून हिशेबीं खर्च लिहिणें ह्मणून, आनंदराव शिंदे यांचे नांवें. सनद १.

रसानगी, भिकाजी गोविंद ठोंसर.

३६९–(९३२) सरकारचा व जंजिरकराचा तह सालगुदस्तां जाहला, त्यास जंजिरकराचे अंमलदार सरकारचे महालीं राहतील त्यांस लांकूड फांटें व शाखभाजी व पानपत्रावळ सुदामत चालीप्रमाणें देणें, व सरकारचे अंमलदार जंजिरकराचे महालीं राहतील त्यांस सदरहूप्रमाणें ते देतील; नवीन कटकट करून दिकत न करणें, येविशीं तुह्मी आपले कडील अंमलदारांस ताकीद करणें ह्मणोन, गोविंदराव माणकर प्रांत राजपुरी यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सबा समानीन मया व अलफ जिल्काद १५

३७०–(९३३) सरकारचा व जंजिरकरांचा तह सालगुदस्तां जाहला, त्यास तालुके-हाय येथील कमाविसीची वैवाट पेशजींचे सुदामत चालीप्रमाणें परस्परें इतल्यानें करीत जाणें ह्मणोन, मामलेदार तालुके हाय यांस चिटणिसी. पत्रें.

सबा समानीन मया व अलफ जिल्काद १६

१ सदाशिव रघुनाथ तर्फ रायगड यांस कीं, तालुके मजकूर येथील बेगमीस तर्फ गोरेगांव पैकीं नऊ गांव, व तर्फ निजामपूर पैकीं तीन गांव एकूण बारा गांव आहेत, त्यास गोरेगांवीं व निजामपुरीं दुतर्फाचे अंमलदार राहतात, तेथें तुह्मांकडील कमाविसदारांनीं राहून सदरहू गांवचे कमाविसीची वैवाट पेशजींचे सुदामंत चालीप्रमाणें करीत तें करणें येविशीं.

१ बाबूराव पासलकर तालुके बीरवाडी यांस कीं, जंजिरकरांकडील अंमलदार मौजे

A. D. 1782-83.

worth Rs. 200 in connection with the marriage ceremony of a son of Yákudkhán Shámal Janjirkar.

(369) A treaty was concluded between Government and the Janjirkar in the preceding year. It was therefore ordered that officers of Government should supply officers of the Janjirkar living in Government territory, with fuel, vegetable &c, as usual without obstruction.

A. D. 1786-87.

(370) It was further ordered that the Government officers of Táluká Ráygaḍ, Birwáḍi, Rewadanḍá, and Rájapuri should administer the villages in the revenues of which the Janjirkar had a share conjointly with the officers of the Janjirkar.

A. D. 1786-87.

सिलोसी, तर्फ मजकूर येथें राहतात, तेथें तर्फ मजकूर येथील महालकरी यांणीं राहून सुदामत चालीप्रमाणें कमाविसीची वैवाट करीत जावी, याप्रमाणें ताकीद करून करवणें येविशीं.

१ आनंदराव शिंदे तालुके रेवदंडा यांस कीं, परगणा घोसाळें पैकीं आठ गांव तर्फ मजकूरचे बेगमीस आहेत, ऐशास सरकारचे, व जंजिरकरांकडील अंमलदार रोह्यास राहतात, तेथें तुह्मीं आपलेकडील कारकून ठेऊन कमाविसीची वैवाट पेशजीच्या सुदामत चालीप्रमाणें जंजिरकरांचे इतल्यानें करीत जाणें येविशीं.

१ गोविंदराव माणकर प्रांत राजपुरी यांस कीं, दुतर्फा अंमल चालला पाहिजे. याजकरितां मामले तळें येथील महालकरी यांणीं, मौजे चरईस जंजिरकरांकडील अंमलदार राहतात तेथें राहोन, कमाविसीचा अंमल पेशजीच्या सुदामत चालीप्रमाणें करीत तें करणें येविशीं.

---

४ चार पत्रें दिल्हीं असेत.

३७१-(९३४) सरकारचा व जंजिरकराचा तह जाहला, त्यास तालुके हाय वगैरे येथून चालवावयाचीं. कलमें.

सबा समानीन
मया व अलफ
जिल्काद १७

सन सीत समानीनांत छ. २२ जिल्हेजीं तह जाल्या अलिकडे गलबतें, व माहांगिऱ्या व डंग्या व बतेले वगैरे धरिलीं असतील तीं परस्परें सोडावीं, याप्रमाणें करार ठरला आहे, त्यास सरकार तालुकियांतील गलबतें व महांगिऱ्या व डंग्या व बतेले वगैरे जंजिरकरांनीं धरिलीं असतील तीं जंजिरकर सोडून देतील;

जंजिर तर्फेचीं गलबतें, व जाफराबाद जंजिरकरांकडील या बंदरांचीं गलबतें समुद्रांत वैवाट करितील, त्याजवर जंजिरकराचें दस्तक असेल त्यास सरकारचे आरमारकरी यांणीं छडाछड करूं नये, व सरकारचे तालुके हायचीं गलबतें वगैरे सावकारी गलबतें यांजवर सरकाचें दस्तक असेस त्यास जंजिरकर यांचे आर-

---

(371) It was agreed in a treaty between Government & Janjirkar that ships belonging to Janjirkar or possessing his permit should not be molested by the ships of Government, and that they should be allowed to trade with the Government territory on payment of the usual taxes, and that ships belonging to the Janjirkar captured by Government vessels after the 22nd of Jillej in A. D. 1785/86, the date of the treaty, should be restored to the Janjirkar and vice versa.

A. D. 1786-87.

आणि भिकाजी गोविंद तुह्मांस लिहितील तेव्हां जंजिर तर्फेचीं गलबतें, व माहांगिऱ्या व डंग्या, व बतेले वगैरे बंदर जंजिरा व जाफराबाद येथील तुह्मीं धरिलीं असतील तीं सोडून देणें. कलम १.

सन सबा सलासीनांत तह जाहला, त्यांतील कलमें जंजिरेकरांचे खासगी तरांडे सरकारच्या बंदरीं व्यापारास आले तरी त्यांचा हांसील सरकारांत घेऊं नये याप्रमाणें करार आहे, परंतु जंजिरकरांकडील खासगत तरांडी सरकारच्या बंदरीं उदमास आजपर्यंत आलींच नाहीं, यास्तव सुदामत चालत आल्याप्रमाणें चालणें, नवीन न करणें. कलम १.

मारकरी यांणीं छडाछड करूं नये. सावकारी गलबतें जंजिरकरांकडील सरकारच्या बंदरीं व्यापारास आलीं, तरी शिरस्तेप्रमाणें हांसील सरकारांत द्यावा, सरकारच्या बंदरींचीं गलबतें, व सावकारी जंजिरकरांचे बंदरीं व्यापारास गेलीं, तरी शिरस्तेप्रमाणें हांसील त्यांस द्यावा. सुदामत चालत आल्याप्रमाणें चालणें, नवीन न करणें. कलम १.

एकूण तीन कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन चिटणिसी पत्रें.

१ गंगाधर गोविंद तालुके विजयदुर्ग यांस.
१ महिपतराव कृष्ण तालुके रत्नागिरी यांस.
१ त्रिंबक कृष्ण तालुके अंजनवेल यांस.
१ मोरो बापूजी तालुके सुवर्णदुर्ग यांस.
१ आनंदराव शिंदे तालुके रेवदंडा यांस.
१ माहादाजी कृष्ण तालुके उंदेरी यांस.
१ आनंदराव धुलप आरमार विजयदुर्ग यांस.

७

सात पत्रें दिलीं असेत.

सबा समानीन मया व अलफ रबिलाखर १०

३७२-(९४२) सरकारचा व जंजिरकराचा तह छ. २२ जिल्हेज साल गुदस्त सन सीतांत ठरावांत आला, तोपर्यंत सरकारचे लोक मतगडास व जंजिरकराचे महालीं होते, त्यास जंजिरकरांकडून आदा जहाला, व सिदीजमरूद सरकारांत आले, त्यास सरकारांतून आदा जहाला, तो परस्परें मागों नये. पुढें लोक ठाणीं दुतर्फा बसत तों महिना पंधरा रोज लागतील, त्यास पर-

A. D. 1786-87.

(372) In the treaty concluded with the Janjirkar, on the 22nd of Jillej in the preceding year, it was settled that the Janjirkar should bear the expenses incurred by him on account of the Peshwá's men at Matgad &c. and that the Peshwá should bear the expenses incurred by him on account of Siddhi Jamrud living under his protection.

स्परें आदा होईल तो द्यावा ध्यावा, याप्रमाणें गुदस्तां करार जाहला आहे, त्यास मतगडास सरकारचे लोक राहिले, त्यास सिदी जमरूद यांजकडून तुह्मांकडील लोकांस पावती जहाली आहे, त्याचा हिशेब तुह्मीं पाठविला, त्यांपैकीं जंजिरकरांकडे द्यावयाचे. बेरीज.

नक्त रुपये ७१३ भात कैली खंडी ३८॥=

एकूण नक्त सातशें तेरा रुपये, व भात कैली पावणे एकूण चाळीस खंडी दोन मण जंजिरकरांकडे द्यावयाचा करार करून, हे सनद सादर केली असे, तरी तुह्मांकडे मतगडा-कडील नक्त व गला पावला आहे, त्या ऐवजीं सदरहूप्रमाणें पावते करून पावलियाचें कबज घेणें ह्मणोन, गोविंदराव माणकर यांस. सनद १.

रसानगी यादी.

३७३-(१०३५) परगणा सत्रागांव, प्रांत गुजराथ येथील मुलाणाचे गांव खेरीज करून अमलाची कमावीस तुमच्याकडे होती, ते दूर करून खान अजम सिदी अबदूल करीम याकुपखान हबसी जंजिरकर यांजकडे करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी परगणा मजकूर-चा अंमल ठाण्यासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन, मनोहर त्रिंबक यांचे नांवें. सनद १.

इहिदे तिसैन मया व अलफ रमजान २५

येविशीं जमीदार परगणा मजकूर यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद १.

२

रसानगी यादी.

३७४-(१०३६) बाळुमिया शामल जंजिरकर यांचे भाऊ छोटे मिया, व सिदी इसुफ, व त्यांजबरोबरील माणसें असामी सात तालुके रायगड येथें अटकेंत ठेविले आहेत, त्यास जरा बजरासुद्धां हुजूर पाठऊन देणें ह्मणोन तुह्मांस सनद सादर जहाली; त्याजवरून तुह्मीं छोटे मिया, व सिदी इसुफ व त्यांजबरोबरील माणसें सात एकूण असामी ९ नऊ यांस जरा बजरासुद्धां पाठविले ते हुजूर पावले असेत ह्मणून, सदाशिव रघुनाथ तालुके रायगड यांचे नांवें. सनद १.

इहिदे तिसैन मया व अलफ रमजान १६

परवानगी रूबरू.

---

(373) The Parganá of Satrágaum in Gujrath excepting certain villages was ordered to be made over to Khán Azam Siddhi Abdul Karim Yákudkhán Habshi of Janjirá.

A. D. 1790-91.

(374) Chhotemîyá and Siddhi Esuf, brother of Báḷumîyá Shámal of Janjirá, and others who were prisoners at Ráyagaḍ were ordered to be brought to Poona and handed over with all their effects to Bahirao Raghunáth Mehendaḷe.

A. D. 1790-91.

सदरहू नऊ असामी यांस जरा बजरासुद्धां बहिरो रघुनाथ मेहेंदळे यांचे हवालीं केले असेत.

३७५-(१०५०) तालुके रायगड येथें शामलाचा दंगा आहे, त्याचे बंदोबस्तास नवे लोक ठेविले पाहिजेत, याजकरितां लोक ठेवावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन तुह्मीं विनंति केली; त्याजवरून दंग्याचे बंदोबस्ता करतां हशमी लोक असामी ४० एकूण दरमहा दर असामीस शेरा रुपये ५ पांच प्रमाणें खेरीज शिरस्त्याचे लोक जदीद तालुके मजकुरीं ठेऊन शामलाचे दंग्याचा बंदोबस्त करणें; आणि लोकांचा आकार होईल तो तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें ह्मणोन, सदाशिव रघुनाथ तालुके मजकूर यांचे नांवें. सनद १.

सलास तिसैन मया व अलफ सवाल २९

रसानगी याद.

३७६-(१०९६) सिदी अबदूल करीम खान शामल जंजिरकर यांस पाऊण लक्षाची जहागीर सरकारांतून लाऊन द्यावयाचा करार आहे, त्यापैकीं परगणे सत्रागांव येथील साठ हजार रुपयांची बेरीज लाऊन दिल्ही, बाकी पंधरा हजार रुपयांचे गांव लाऊन द्यावयाचे, त्यास परगणे पारचोल पैकीं देहे.

आर्बा तिसैन मया व अलफ जमादिलावल ३०

बीतपशील.

१ मौजे वासण.
१ मौजे कोथा.
१ मौजे करोड कोटवा.
१ मौजे सरई खुद.

४

एकूण चार गांव येथील इस्तकबिल सन अर्बा समानीन सन तिसैन सात साला व इंग्रजाचे कारकीर्दी पूर्वील सरकारअमलांतील तीन साला, एकूण दहा साला पटी पटीयांत सुद्धां कचे आकाराची चौकशी करून त्यापैकीं भरसालची बेरीज लाऊन द्यावयाची, त्यास भरसाल सन सबा समानीन (दोन ओळी फाटल्या) पासून शामलाकडे गांव लाऊन द्यावयाचा ठराव केला असे, तरी दहा सालांपैकीं भरसालची बेरीज असेल ती व बाकी तगाई कमाविसदार यांची गांवांकडे येणें असेल त्याची रुजवात, तुह्मीं पांडुरंग राम कारकून पाठविले आहेत यांचे, व शामलाकडील कारकून यांचे विद्यमानें करून, गांव हवालीं करणें

---

(375) There being a disturbance by the Shámal in Táluká Ráyagad, additional men were ordered to be entertained.
A. D. 1792-93.

(376) A Jahágir worth Rs. 75,000 was agreed to be granted to Siddhi Abdul Karim Khán of Janjirá. A territory worth Rs. 60,000 was given in Parganá Satrágaum (सत्रागांव). The villages of Wásaṇ, Kothá, Karod, Kotwá, Sarai khud were now given to make up the remaining 15,000 Rs.
A. D. 1793-94.

कदाचित् रुजुवात मुळें पंधरा हजारास भरसालची बेरीज कमी आल्यास त्या बेरजेचा गांव अगर जमीन नेमून देऊन हुजूर लिहिणें. जाजती आकार जाहल्यास सदहू गांव पैकीं जमीन लाऊन घेणें, व बाकी तगाईचा ऐवज ठरेल तो वसूल घेऊन ज्या कमाविसदाराचे कारकीर्दीचा असेल त्याजकडे देणें ह्मणोन, हरी चिंतामण सरसुभा प्रांत गुजराथ यांचे नांवें. सनद१.

रसानगी यादी.

१ राजकीय.

(ब) इतर माहिती.

२२ हैदरअल्ली व टिपू.

३७७-(३०८) सुपे प्रांतीं हैदरखानाचा दंगा आहे, ठाण्याचा बंदोबस्त जाहला पाहिजे, ह्मणोन शिवाजी बाबाजी ह्मसकर यांणीं हुजूर विनंति केली, व सौधकर सवस्थानिक यांस मुलें माणसें ठेवण्यास जागा नाहीं, त्याणें (त्यामुळें) ठाणें सुपें त्यांचे हवालीं केल्यास ठाणें राखितील. मुलकी वसूल आपला कारकून ठेऊन घ्यावा, याप्रमाणें सवस्थानियांसी बोलून ठेविलें आहे ह्मणोन तुह्मीं मशारनिल्हेस लिहिलें; त्याजवरून ठाणें मजकूर सौधकर संस्थानिकांकडे तसलमातीस देविलें असे, तरी तुह्मीं आपली खातरजमा करून घेऊन ठाणें हवालीं करणें. ठाण्याचे शिबंदीची नेमणूक पेशजीं तुह्मांस करून दिल्ही आहे, त्याप्रमाणें त्यांजकडे नेमून देऊन ठाणें मजबुदीनें राखणें. मुलकी वसुलास तुह्मीं आपला कारकून ठेऊन वसूल घेऊन सरकार हिशेबीं जमा करणें ह्मणोन, वेंकटराव नारायण यांचे नांवें. सनद १.

सबा सबैन मया व अलफ जमादिलाखर ७

परवानगी रूबरू.

३७८-(४६४) कमासविस भेट राजश्री राव यांस बद्दल हैदरखान संस्थान श्रीरंगपट्टण यांजकडून वकील वस्त्रें घेऊन आले ते जमा, गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें एकूण किंमत. रुपयें.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल

---

[1] POLITICAL MATTERS.

(b) Matters relating to

(22) Haidar Alli and Tippoo.

(377) Haidar Khan having created a disturbance in Plánt Supá, the Thaṇá of Supá was, at the request af Shiwáji Bábáji, ordered to be entrusted to the Sansthánik of Soudh for being well guarded.

A. D. 1776-77.

(378) Clothes worth Rs. 205 were received as a present from Haidarkhán of Sansthán Shrírangapattaṇa.

A. D. 1777-78.

२५	चिराबादली	१
१२०	जामेवारे.	
६०	प्रत	१
६०	प्रत	१
१२०		२
२०	पटका बादली	१
४०	किमखाप	१
२०५		५

३७९-(५३०) कमाविस जप्ती बद्दल कारकून दिंमत मानाजी शिंदे यांणीं मानाजी शिंदे यांच्या फितुरांत मिळोन हैदरखानाकडे गेले, सबब त्यांची वस्तभाव घरें वगैरे जागा सांपडली ते गंगाधरराव गोविंद यांणीं जप्त करून हुजूर पाठविली, त्यापैकीं कापड सनगें जमा गुजारतं गंगाधर सदाशिव कारकून दिंमत गंगाधरराव गोविंद आंखाचे निमे नक्त जमा. रुपये.

समान सबैन मया व अलफ सफर २९

९६३॥ बरहुकूम बाळाजी रघुनाथ वस्ती मौजे वाटेगांव प्रांत कराड दिंमत शिंदे मजकूर यांची वस्तभाव मौजे मजकुरीं सोनाराचे घरीं सांपडली त्यापैकीं सनगें एकूण किंमत. रुपये.

२८	तिवटें	३	७॥	दुपटा छिटी बऱ्हाणपुरी	१
३०	जाफरखानी	०	१७॥	लुगडीं साधीं	३
२९	शेले साधे	३	१२॥	जामेवार	१
८७॥	धोत्रजोडे	३	९०	किमखाप	१
३०	पासोडी कळसपाकी	२	९	बांदरी छिटें रजे सनंग	८≡
१२॥	ताडपत्री जुनी	१	४०	पायजामे व तुंबे	४
१७॥	गजनी	१	४०	महमुद्या	९
६	खण हरजिनसी	८	७॥	पातळ साधें धुवट	१
१	चोळखण गजनीचा	१	३५५	शाला फर्द	१४
१	बासनें छिटी जुनीं	२	४९	पितांबर मर्दानी	२
१२॥	झगा	१	३७॥	जाफरखानी छिटी बऱ्हाणपुरी	।॥।
५९	तिवटें	४			
			९६३॥		६३॥≡

(379) Báláji Raghunáth Karkoon joined in the Conspiracy of Mánáji Scinde and went over with him to the side of Haidar Alli, his house was therefore attached.

A. D. 1777-78.

९०॥ बद्दल अबाजी भटंभट सप्रे वस्ती कसबे रहिमतपूर प्रांत वाई.

३८०-(५४९) परगणे धारवाड येथील पेठ, व कसबा हैदर नाईक यांचे दंग्यामुळें लुटला गेला, याजकरतां देशमुख, व देशपांडे यांजकडे दरसाल ऐवज सुभाहून करार होत असतो, तो एक साला आबादानी होण्याकरितां माफ केला असे, तरी एक साला ऐवज देशमुख व देशपांडे यांजपासून न घेणें; व रयतेस कौल देऊन अबादानी करणें ह्मणोन, त्रिंबकराव यशवंत यांचे नांवें. छ. २९ सफर.

समान सबैन मया व अलफ सफर २६

सनद १.

रसानगी यादी.

३८१-(५८०) तुह्मांस चिकोडी प्रांतांत बंदोबस्तास पाठविलें आहे तेथील कलमें.

तिसा सबैन मया व अलफ रजब २४

हैदर नाईकानें ठाणीं, व गांव घेतले असतील ते सोडावयाची आज्ञा तुह्मांस केली असे, तरी ठाणीं व गांव घेऊन इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकशीनें करून ऐवज सरकारांत पावता करून पावलियाचा जाब घेत जाणें. कलम १.

हैदर नाईकाकडे व येसाजी शिंद्याकडे लोक गेले असतील, त्यांची चवकशी करून घरें जप्त करणें. लोक गेले असतील ते उठऊन आणवणें, व जप्तींत सांपडेल तें सरकारहिशेबीं जमा करणें. कलम १.

परगणा राहुरी, व परगणा रायबाग, व कागल वगैरे गांवांपैकीं गांव सरकारांत आहेत तेथील ऐवज सरकारांत येतो, ते गांव खेरीज करून इनामदार व जमीदार यांजकडे दुमाले गांव सदरहू परगण्यापैकीं असतील तेथील घांसदाणा गांव पाहून घेणें; आणि ऐवज येईल तो सरकारहिशेबीं जमा करणें. कलम १.

---

(380) The Peth and Kasbá in Pargaṇá Dhárwár were pillaged during the revolt of Haidar Naik.

A. D. 1777-78.

(381) Bacháji Vishvanáth was sent into the province of Chikoḍi with instructions to recover any Thánás or villages taken by Haidar Naik and to attach the property of persons who might be found to have gone over to him or to Yesáji Scindia.

A. D. 1778-79.

एकूण तीन कलमें करार करून दिल्हीं असेत; तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन, बच्याजी विश्वनाथ यांचे नांवें: सनद १.

रसानगी यादी.

३८२-(६२९) कमाविस भेट सनगें एकूण किंमत. रुपये.

समानीन मया व अलफ जमादिलाखर २३

५९९ राजश्री राव यांसी बाबत हाय गुजारत जानाजी जाबक खिजमतगार.

३९२ बाबत शरफत दौला.

१७	चिरा बादली	१
१५	पटका बादली	१
५	गोषपेंच बादली	१
८०	जामेवार बादली	२
१५०	शाला थिर्के	२
१२५	किमखाप	१
३९२		८

२०३ बाबत नाईक यांजकडून नरसिंगराव वकील वस्त्रें घेऊन आले तीं.

१८	चिरा बादली	१
१३	पटका बादली	१
७२	जामेवारे जरी	२
१००	किमखाप	१
२०३		५

५९५	१३
● लंग.	
५९९	१३

(382) Clothes worth Rs. 392 and Rs. 203 were received as presents from Sharáfat Doula and Haidar Naik respectivly.

A. D. 1779-80.

दादासाहेबांच्या कीर्दीपैकीं.

३८३–(६७०) नवाब हैदर अल्लीखान बहादर यांचे नांवें पत्र कीं, तुह्मांकडील सरकारांत खंडणीच्या ऐवज पैकीं भरणा.

समानीन
मया व अलफ
मोहरम १२

४००००० हुजूर.

२००००० मार्फत भुकनजी देव सावकार. रुपये.

१००००० कित्ता हुंडी.

१००००० कित्ता हुंडी.

२०००००

इंग्रजी जहाजावरी पाठविले.

१००००० कित्ता.

१००००० कित्ता.

२०००००

४०००००

सदरहूच्या पावत्या अलाहिदा दिल्या असेत.

९९४९९२। गुजारत बाजीराव गोविंद.

७०००४० कित्ता.

२९४९५२। मशारनिल्हेच्या खर्चाबद्दल.

९९४९५२।

FROM THE DÂDÂSÂHEB'S DIARY.

(383 A letter was sent to Nawáb Haidar Allikhán acknowledging
A. D. 1779-80. receipt of the following amounts of tribute sent by him.

Rs.	200,000	Through Bhukanji Dewa sávkár.
Rs.	Do	Sent by Haidarkhán on board an English ship.
Rs.	994,952–4.	Through Bájirao Govind.
Rs.	498,142–10.	To be received from Mánáji Scinde.
	18,93,094–14	

४९८१४२॥= मानाजी शिंदे यांजकडे.

१८९३०९४॥=

एकूण अठरा लक्ष त्र्याणव हजार पावणे पंच्याण्णव रुपये दोन आणे, इस्तकबिल सन अर्बा सबैन तागाईत सुर सन समानीन सदरहूप्रमाणें ऐवज सरकारांत पावला असे म्हणोन, मशारनिल्हेच्या नांवें. छ. ४ मोहरमचें. पत्र.

३८४-(७७६) जमा जामदारखाना.

सलास समानीन मया व अलफ मोहरम २०

कमाविसभेट राजश्री राव यांसी बाबद नवाब हैदर अल्लीखान बहाद्दर यांणीं कृष्णराव नारायण जोशी यांजबरोबर पोशाक पाठविले ते, गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

५१	चिरे जरी बादली कारचोबी सोनेरी	२
२०७	जामेवार जरी बादली कारचोबी	४
४२	पटके जरी बादली	२
२९०	शाला थिर्के	६
२६५	किमखाप	५
७०	तिवटें छिटी बराणपुरी	३
१३०	जामेवार छिटी बराणपुरी	६
१९५	जाफरखानी छिटी बराणपुरी	३
१२५०		३१

३८५-(८३१) जमा जामदारखाना.

कमाविस भेट सनगें एकूण रुपये.

आर्बा समानीन मया व अलफ जिल्हेज २७

कर्ज गुजारत कृष्णराव नारायण जोशी सन इहिदे समानीनांत मशारनिल्हे यांस नवाब हैदर अल्लीखान यांजकडे पाठविले होते, त्यास मोघम पोशाकाचीं सनगें सरकारांतून समागमें दिल्हीं होतीं; त्याशिवाय तेथें मशारनिल्हे यांणीं कापड खरेदी केलें, तें इस्तकबील छ. ६ रविलाखर सन इहिदे समानीन तागाईत छ. ६ मोहरम सलास बरहुकूम हिशेब मखलासीचा सनगें एकूण किंमत. रुपये.

---

(384) Clothes worth Rs. 1,250 were received as presents from Nawáb Haidar Allikhán Bahádur.
A. D. 1782-83.

(385) Krishṇrao Náráyeṇ Joshi was sent to Nawáb Haidar Allikhán in A. D. 1780/81.
A. D. 1783-84.

१११	जामेवारे छिटी बऱ्हाणपुरी	६
६६	महमुद्या	४
६२॥	किमखाप	१
७३	शाला फर्द	३
६६	तिवटें	४
३७८॥		१८

हरी बल्लाळच्या कीर्दीपैकीं.

३८६–(९४४) सरकारचा व नवाब हैदर अलीखान बहादर यांचा पेशजी तहनामा सन ११९३ विकारीनाम संवत्सरे छ. २० सफरीं मदारुल माहाला, बाळाजी जनार्दन व हरी बाळाजी व महादजीराव शिंदे व आनंदराव भिकाजीराव रास्ते व कृष्णराव बल्लाळ यांचे विद्यमान शफत बेलभंडारपूर्वक जहाला आहे, तोच सही व दुरुस्त असे, त्यांत तफावत दोहींकडून होऊं नये; कधीं काळो बहिरव किल्ले नरगुंद याचे हरकतेकडून हरदु सरकारची नाखुशी जहाली होती, त्यास तुह्मांकडून बदरुदी जमाखान बहादर व अलीरजा, तुकोजीराव बेलकर व गंगाधरराव भिकाजीराव रास्ते यांजकडे येऊन दोहीं सरकारची दोस्ती पेशजींचे तहनाम्याप्रमाणें चालावी ह्मणोन बोलणें जहालें; त्याजवरून मदारुल माहाला, बाळाजी जनार्दन व हरी बल्लाळ व तुकोजीराव होळकर व गंगाधरराव भिकाजीराव रास्ते दरम्यान येऊन पेशजींचा तहनामा शपतपूर्वक जहाला आहे, तोच करार केला असे, पूर्वीं जाजती दोस्ती

सबा समानीन मया व अलफ जमादिलावल १७

EROM THE HARI BALLÂḶ'S DIARY.

(386) A treaty was formerly entered into with Nawáb Haidar Allikhán Bahádur through Báḷáji Janárdan, Hari Balláḷ, Mahádjirao Scindia, Anandrao Bhikájirao Ráste, and Krishṇarao Balláḷ. After that treaty some misunderstanding arose between the 2 Powers owing to the conduct of Kálo Bahirao of fort Nargund. Tipu Sultán now sent Badrudin Jamálkhán Bahádur and Alli Rajá to Tukojirao Hoḷkar and Gangádharrao Bhikájirao Ráste to propose that the 2 Governments should continue on terms of friendship according to the original treaty. The original treaty was accordingly ratified. The tribute had remained in arrears for the 4 years, at the rate of Rs. 12 lacs a year. The net amount due on this account was proved to be Rs. 45 lacs to the satisfaction of Badru Jamákhán Bahádur and Alli Rajá. Tipu was requested to remit it as also the amount of tribute for the year A. D. 1786/87 in the month of Shrávaṇ and to pay the amount every year at Poona in future.

A. D. 1787-88.

व रफायतखान खुलासी अमलांत येईल. पेशकसीचा ऐवज इस्तकबिल सन सलास समानीन तागाईत सन सीत समानीन सन ११९९ हिजरी विश्वावसुनाम संवत्सरे पावेतों दरसाल बारा लक्ष रुपये प्रमाणें चौसाला अठेचाळीस लक्ष रुपयांचा फैसला बदरु जमाखान बहादर व अलीरजा याचे मारफतीनें जहाला. सन सबा समानी(न) पराभव संवत्सरचा पेशकसीचा ऐवज बारा लक्ष रुपये श्रावणमासीं पुण्यांत नक्त पावते करावे. पेस्तर सालापसून पेशकसीचा ऐवज बारा लक्ष रुपये दरसाल पुण्यांत साळाचे सालांत नक्त देत जावे. येणेंप्रमाणें टिपू-सुलतान बहादर यास लिहून दिल्हा असे.

करारनामा १.

रसानगी यादी.

३८७–(९४५) सरकारचे पेशकसीचा ऐवज नवाब टिपू सुलतान बहादर यांजकडे येणें, त्याचा वगैरे फडशा करून द्यावयाचा बदरु जमाखान बहादर व अल्लीरजा यांचे मारफतीनें ठरला तितका पराभवनाम संवत्सरे सन १२०० हिजरी.

सबा समानीन मया व अलफ जमादिलाखर १७

कलमें.

पेशकसीचा ऐवज तागाईत सन सीत समानीन पर्यंत नक्त रुपये.

१२०००० सन सलास समानीन शके १७०४ शुभकृत् संवत्सर सन ११९६ हिजरी.

१२०००० सन आर्बा समानीन शके १७०९ शोभकृत् (शोभन?) संवत्सर सन ११९७ हिजरी.

१२०००० सन खमस समानीन शके

सालमजकूर सन सबा समानीन पराभव संवत्सरेचे बारा लक्ष रुपये पेशकसीचे येणें, ते श्रावणमासीं पुण्यांत नक्त पावते करावे, पेस्तर सन समान छवंगनामसंवत्सरे सन हिजरी १२०१ यापासून दरसाल बारा लक्ष रुपये प्रमाणें सालाचे सालांत नक्त ऐवज पुण्यांत देत जावा. कलम १.

अदवानी तालुका पेशजीप्रमाणें नवाब-निजाम (अ)लीखान बहादर यांजकडे चा-

(387) It was at the same time stipulated that Tippoo should not attack the Táluká of Adwáni which was to be continued to Nawáb Nizám Allikhán Báhádur, as before. And that the Táluká and fort of Nargund and the Sansthán of Kittoor lately taken by Tippoo, should be surrendered to the Peshwá and that Kálo Bahirav and the Desai of Kittor and other subjects of the Peshwá in the confinement of Tippoo should be released by him and vice versa. And that the fort of Badámi and the territory worth Rs. 1½ Lacs, surrendered by Tippoo, should remain with the Peshwá.

[A. D. 1787-88.]

१७०६ क्रोध(धी?)नाम संवत्सरे सन ११९८ हिजरी.

१२००००० सन सीत समानीन शके १७०७ विश्वावसु संवत्सरे सन ११९९ हिजरी.

४८०००००

पैकीं वजा. रुपये.

२००००० वरात आनंदराव भिकाजीराव रास्ते यांची पेशजीं वरात जहाली आहेत.

१००००० सूट एक साला.

३०००००

बाकी. ४५००००० रुपये.

तपशील.

३०००००० तूर्त.

१५००००० नक्त.

१५००००० जिन्नस.

३०००००(३००००००)

१५००००० सावकारी निशा.

नक्त. रुपये.

७५०००० वैशाख शुद्ध पौर्णिमा

७५०००० आषाढ शुद्ध पौर्णिमा.

१५०००००

४५०००००

एकूण पंचेचाळीस लक्ष रुपयांचा फडलावा. तालुके मजकुरास उपद्रव लागूं नये. कलम १.

नरगुंद किल्ला तालुक्यासुद्धां पेशजीप्रमाणें व कितुर संवस्थान नवीन पेशजीचे तह अलीकडे तुह्मीं घेतले ते तालुक्यासुद्धां सोडावे, त्याचा अंमल सरकारांत राहील. कलम १.

काळो बहिरव व कितूरचा देसाई व सरकारचे तर्फेचे पाडाव तुह्मांकडे गेले असतील ते तुह्मीं सोडावे, तुह्मांकडील पाडाव सरकारांत असतील ते सरकारांतून सोडावे; परस्परें कोणी कोणाचे ठेऊं नयेत. कलम १.

बदामीचा किल्ला दीढ लक्ष रुपयांचा तालुकासुद्धां तुह्मीं सरकारांत दिल्हा तो सरकारांत राहील. कलम १.

शा कराराप्रमाणें क्षेप निक्षेप करून द्यावा.

कलम १.

पहिला करारनामा बेलभंडारसुद्धां आहे

तो करार व समस्त आहे. कलम १.

एकूण सात कलमें करारांत आलीं आहेत, याप्रमाणें अमलांत यावें. येणे प्रमाणें कलमबंदीची यादी टिपू सुलतान यांस लिहून दिल्ही असे. यादी १.

रसानगी यादी.

३८८–(९४६) सरकार, व नवाब निजाम अल्लीखान बहादूर व नवाब टिपू सुलतान बहादूर यांणीं यावत् चंद्रसूर्य ईश्वराचे इच्छेकडून आपले आपले सरकारचे दस्तूरप्रमाणें शपथपूर्वक इतिफाकानें राहून करारमदारास अंतर न करितां दोन्हीं कडून आपले आपले रयासतेची बंदोबस्ती व खलखुलाचे रफाबीयतीवर असावें, अगर चवथा कोणी मुखालीफ आपेआप तीहीं दौलतींतून एका दौलतीवर चालून आल्यास इतिफाकानें तिन्ही सरकार मिळोन मुखालीफाची तंबी करावी, याप्रमाणें करारनामा टिपूसुलतान बहादूर यांस लिहून दिल्हा असे. करारनामा १.

सबा समानीन मया व अलफ जमादिलावल १७

रसानगी यादी.

३८९–(९४९) नवाब टिपू सुलतान बहादूर यांजकडील महाल वगैरे सरकारांत घेऊन मामलत सांगितली होती, त्यास हल्लीं नवाब मवसुफ यांजकडे द्यावयाचा करार केला असे, तरी यांजकडील अमीन येतील त्यांचे हवालीं करून कबज घेणें म्हणोन, मामलेदारांचे नांवें. सनदा.

सबा समानीन मया व अलफ जमादिलाखर २४

१ त्रिंबकराव येशवंत व गंगाधर विश्वनाथ परभारे.

९ तालुके धारवाड.

१ कर्यात तडकोट.	१ कसबे मारडगी वगैरे गांव.
१ कर्यात हुबळी.	——
१ कर्यात यनमडी.	५
१ परगणे मिश्रीकोटे.	१ परगणे गदक.

---

(388) A treaty of alliance was concluded between the Peshwá, Nawáb Nizám Allikhán Báhádur, and Nawáb Tippoo Sultán Báhádur, by which the Powers bound themselves to live on terms of friendship with each other and to unite together to defend themselves against outsiders.

A. D. 1786-87.

(389) The territory belonging to Tippoo which was taken by the Peshwá was now ordered to be restored.

A. D. 1786-87.

सहा माहाल वगैरे यांजविशीं. सनद.

१ कृष्णाजी विश्वनाथ कमाविसदार कसबे मोरब यांस.

१ शेशगीरराव माधव यांजकडे. बीतपशील.

१ परगणे मुलगुंद. १ कसबे बेहटी. १ मौजे सुल.

---

३ एकूण तीन महाल वगैरे यांजविशीं. सनद.

१ विसाजी महादेव दिंमत महिपतराव कृष्ण यांचे नांवें परगणे नवी हुबळी याजविशीं. सनद.

१ लक्ष्मण बाबूराव यांजकडे.

१ परगणे लखमेश्वर. १ ठाणें शिर[ह]टी परगणे लखमेश्वर.

---

२ दोन महाल व ठाणें यांजविशीं. सनद.

१ तुकोजी होळकर यांजकडील महाल वगैरे. बीतपशील.

१ परगणे नवलगुंद. १ कर्यात बेटगिरी.

१ परगणे कुंदगोळ.

१ परगणे जुनी हुबळी. ४

एकूण चार महाल वगैरे यांजविशीं हवालीं करणें ह्मणोन. सनद.

१ दौलतराव हिंदुराव घोरपडे यांचे नांवें किल्ले गजेंद्रगड सरकारांतून तुह्मांकडे आहे, त्यास बहादूर यांजकडे देविला असे, तरी किल्ला तालुका सुद्धां यांजकडील अमीन येतील त्यांचे हवालीं करून कबज घेणें ह्मणून.

७

रसानगी याद.

३९०–(९९१) नवाब टिपू सुलतान बहादूर यांजकडील बंदीवान तहांत सोडावयाचा करार जाहला आहे; सबब त्यांजकडील राघवेंद्र नाईक जखाते यांचीं मुलेंमाणसें वगैरे मनोलीस अटकेस ठेविलीं आहेत. बीतपशील.

सबा समानीन मया व अलफ रजब १९

---

(390) As agreed at the treaty, orders were issued for the release of Tippoo Sultán's subjects who were under imprisonment by the Peshwá.

A. D. 1786-87.

1 Female relations of Rághawendra Naik.

1 Konher Naik and family.

1 Narsáppá Naik and family and others.

६ राघवेंद्र नाईक यांजकडील बायका.

१ आई. १ कन्या. १ चुलत बहीण.

